
म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय आ.वा.
दा. क्र. 9807



BVBK-0401475

म. वं. मं. ठाणे, जगन्नाथ
ग्रंथ जाहीरात विभाग.
वा. क्र. 9/3/04 दिनांक
विषय .....

१

BVBK-0401475

## श्रीसमर्थांच्या सान्निध्याचा

*" माझी काया गेली खरे । परि आहे मी जगदाकारे ।*
*ऐका स्वहित उत्तरे । सांगेन ती ।। "*

श्रीसमर्थ रामदासस्वामी यानी अवतारसमाप्ती केली या गोष्टीला आता सुमारे तीनशे वर्षे होत आली आहेत. त्यावेळी त्यांनी सांगितले की माझा पार्थिव देह आता विसर्जित होत आहे हे खरे असले तरी भाविकांना त्यांच्या हिताचा उपदेश देण्यासाठी मी सदैव जगदाकारात चैतन्यमय राहाणार आहे. महानिर्वाणसमयी ते जे काही बोलले ते त्यांच्या शिष्यमंडळींनी टिपून ठेवले त्यातीलच वरील एक अवतरण आहे. आपणास " स्वहिताची उत्तरे " सांगण्यासाठी ते आता कोणत्याही वेळी, कोणत्याही ठिकाणी येऊ शकतात याचा स्वानुभव येथे सांगावयाचा आहे.

२७ मे १९६४ ची सकाळी सातची वेळ ! आदल्याच दिवशी भारताचे पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू यांचे निधन झाले होते. साऱ्या देशावर शोकाचे दाट आवरणच जणू पडले होते. गेल्या अर्धशतकात ज्या राष्ट्रपुरुषाचे प्रभावी नेतृत्व लाभले होते; ज्याच्या असामान्य सद्गुणानी भारतीयांच्या हृदयामध्ये प्रेमाचे स्थान पटकाविले होते असा तो राजबिंडा देह यापुढे दिसणार नव्हता. शुभ्र पोषाखावर गुलाबपुष्प लावलेली पं. नेहरूंची हसतमुख मूर्ती आता चितेमध्ये भस्म होणार होती. हा आघात भारतीय मनाला पेलवणारा नव्हता. नजीकच असलेल्या रेडिओमधून नेहरूंच्या जीवनपटाचे दर्शन घडविले जात होते.... दैनंदिन व्यवहार कुणालाच सुचत नव्हते. दुःखप्रसंगी आप्तमित्र येतात, सांत्वन करून दुःखभार हलका करण्यास मदत करतात पण पं. नेहरूंच्या निधनाने **सारा देशच जर शोकाकुल झाला तर**

**कोणी व कोणाचे सांत्वन करायचे ?** पण अशा वेळी एक मोठा चमत्कार झाला. माझ्यापुरता तरी मला श्रीसमर्थांच्या सान्निध्याचा अनुभव मिळाला आणि त्यांनी मला जणू पाठीवर थाप देऊन 'स्वहिताची उत्तरे' सांगितली. त्यावेळी जगज्जीवनामध्ये श्रीसमर्थ भरून राहिले असल्यांचाच प्रत्यय मला आला ! असा तो कोणता चमत्कार मी अनुभवला याचा वृत्तान्त वाचकांना मी सांगितलाच पाहिजे.

पं. नेहरू यांच्या अलौकिक जीवनगाथेची महती २८ मे १९६४ च्या सकाळी रेडिओवर सांगितली गेली आणि त्यानंतर श्रीसमर्थांच्या मनाच्या श्लोकांतील ओळी गंभीर पण सुस्वर आवाजात म्हटल्या जाऊ लागल्या. जणू काही पं. नेहरू यांच्या संबंधातच बोलून श्रीसमर्थ आपले सांत्वन करीत आहेत असा मला भास होऊ लागला.

" जिवा कर्मयोगे जनी जन्म झाला ।
परी शेवटी काळमूखी निमाला ।
महाथोर ते मृत्युपंथेचि गेले ।
कितीयेक ते जन्मले आणि मेले ॥

या श्लोकपंक्ती मी पूर्वी वाचल्या होत्या, ऐकिल्या होत्या पण त्यातील शब्दन् शब्द किती अर्थपूर्ण आहे याचा प्रत्यय मला येऊ लागला. श्रीसमर्थ सांगत होते.... या जगात कर्मानुसार किंवा कर्म करण्यासाठीच जीवाचा जन्म होतो पण अखेरीला त्या जीवाला काळाच्या मुखामध्येच विसर्जित व्हावे लागते.... आजवर महाथोर अशा साऱ्याच विभूतींना सुद्धा मृत्युपंथानेच जावे लागले.... आणि आजवर असंख्य प्राणी आले आणि गेले आहेत. पूर्वकर्मानुरूप जन्म घेणे आणि कालमुखी विलीन होणे हे चिरंतन सत्य सांगितल्यावर समर्थ पुढे सांगू लागले.... " हे मना, विचार कर की आपण ज्यावर वास्तव्य करीत आहोत ती मृत्युभूमी आहे हे सत्य आहे. जिवंतपणी मात्र आपणास वाटते की आपण ' चिरंजीव ' आहोत, अजरामर आहोत आणि त्यामुळे सर्वजण आव्यतेने ' मी ' ' मी ' म्हणत असतात. "

" मना पाहता सत्य हे मृत्युभूमी । जितां बोलती सर्वही जीव मी मी ।
चिरंजीव हे सर्वही मानिताती । अकस्मात सांडोनिया सर्व जाती ॥ "

श्लोकाच्या पहिल्या दोन ओळी सांत्वन करणाऱ्या वाटल्या पण लगेच पुढच्या दोन ओळींमध्ये समर्थांनी जणू मला हलवून विचारले, " अरे खुळ्या, तू हा शोक चालविला आहेस तो करणारा तू स्वतः तरी चिरंजीव-अमर आहेस का ? तू सुद्धा

काळाच्या दाढेखाली चिरडला जाण्यासाठी हळू हळू पुढे सरकत आहेस याची जाणीव धर. तुझ्या चित्तामध्ये शोक-लोभ-क्षोभादी विकार आहेत ते आवर....

" मरे येक त्याचा दुजा शोक वाहे। अकस्मात तोही पुढे जात आहे।
पुरेना जनी लोभ रे क्षोभ त्याते। म्हणोनी जनी मागुता जन्म घेते॥

या श्लोकाच्या ओळी रेडिओमधून बाहेर पडत होत्या त्यावेळी मनामध्ये विचारांची गडबड उडाली होती... पंडितजींच्या निधनाबद्दलच जणू समर्थ मला सांगत होते की, त्यांचे निधन केव्हातरी होणार होतेच ते आकस्मात झाले असे वाटून तुला शोकाचे भोक्तृत्व आले तेही तुझ्या कर्मानुसार आहे कारण " घडे भोगणे सर्वही कर्मयोगे।" पण " मतिमंद तो खेद मानी वियोगे।".... आवडत्या व्यक्तीच्या वियोगामुळे सतत दुःख करीत बसणारा मतिमंद असतो. या वाक्याचा अर्थ ध्यानात आल्यावरोबर मी चरकलो! मी आतापर्यंत जो दुःखभार वाहिला त्याबद्दल समर्थ मला 'मतिमंद' म्हणत होते पण त्याबद्दल थोडासुद्धा रोष माझ्या चित्तात उत्पन्न झाला नाही, कारण त्यांना जे सांगावयाचे होते ते माझ्या हिताचे होते आणि त्यामुळे फार महत्त्वाचे होते. मग रागावण्यात काय फायदा; उलट समर्थांच्या स्पष्टोक्तीबद्दल त्यांना धन्यवादच द्यावे असे मला वाटू लागले.

....एकापाठोपाठ एक असे श्लोक रेडिओवर म्हटले जात होते पण त्या काव्यपंक्ती कानावरून जात असताना कोणीतरी महासमर्थ महामानव आपल्या अगदी शेजारी आला असून तो जणू माझ्या अंतःकरणाशी संभाषण करीत आहे असा मला भास होऊ लागला. तो उपदेश किंवा सद्विचार अधिक चांगला समजावा म्हणून मी डोळे झाकून घेतले.... रेडिओतून पुढील काव्यपंक्ती बाहेर पडत होत्या....

" मना वीट मानू नको बोलण्याचा। पुढे मागुता राम जोडेल कैंचा।
सुखाची घडी लोटता सूख आहे। पुढे सर्व जाईल, काही न राहे॥"

जणू काही समर्थ माझी समजूत घालीत होते की 'मतिमंद' म्हटल्याबद्दल तू राग मानू नको हो! तू जर शोकच करीत राहिलास तर तुला रामाची भेट होणार नाही. जगात निश्चल, निरंतर असे जर काही असेल तर तो श्रीरामरूपी परमेश्वरच आहे. त्याचे गुण गा. त्यामुळे तुझा दुःखभार हलका होऊन शांती मिळेल. मनुष्य किती जरी मोठा असला तरी तो मानवच आहे म्हणून " मना मानवाची नको कीर्ति तू रे। जया वर्णिती वेदशास्त्रे पुराणे।" त्या श्रीरामांची कीर्ती वर्णन करता

सर्व श्लाघ्यवाणे होते : असे अर्थपूर्ण श्लोक श्रवणपटलावर पडत होते. एक श्लोक संपल्यावर किंचित्-काळ थांबून जणू काही पहिल्या श्लोकामुळे निर्माण झालेल्या विचारलहरी क्षीण होण्यासाठी वाट पाहून दुसरा श्लोक म्हटला जात होता. त्याच्यामुळे आणखी विचार तरंग उमटत असत.

" मना, मानसी दुःख आणू नको रे । मना सर्वथा शोक चिंता नको रे ।
विवेके देहेबुद्धी सोडोनि द्यावी । विदेहीपणे मुक्ति भोगीत जावी । "

— स्वामीजी आणखी वजावीत होते की, शोक, चिंता यांना मनात मुळीच थारा देऊ नकोस. " देह म्हणजेच आपण आहोत " अशा प्रकारचे चिंतन करणारी जी ' देहबुद्धी ' ती आपण सोडून दिली तरच विदेहीपणाने एक प्रकारची मुक्तपणाची जाणीव उपभोगता येते. "

एखाद्या सरोवरामध्ये तरंगलहरी निर्माण व्हाव्या तशा **' मानस ' सरोवरामध्ये विचारलहरी उत्पन्न होत होत्या पण त्यांचा निर्माता माझे स्वतःचे मन नव्हते याचा अद्भुत प्रत्यय मला येत होता.** एखादा लंबक जसा एका टोकाकडून सोडला की दुसऱ्या टोकाकडे जातो आणि आपोआप काही काळ आंदोलने घेत राहतो तशीच आंदोलने माझ्या विचारलहरींना मिळत होती, **त्या आंदोलनांचा निर्माता तीनशे वर्षांपूर्वी होऊन गेलेला एक थोर संत होता !** मला अप्रत्यक्षपणे श्रीसमर्थांच्या सान्निध्याचा साक्षात्कारच त्या दिवशी झाला. ' आकाशवाणी 'च्या माध्यमातून श्रीसमर्थांचे विचार माझ्या कानी पडले त्याबद्दल मनातल्या मनात आकाशवाणीच्या कार्यक्रम नियोजकांना मी धन्यवाद दिले पण मग आणखी एक विचार मनात आला की या परावलंबी माध्यमापेक्षा समर्थांची वाङ्मयमूर्ती ' दासबोधा 'सारखा ग्रंथ आहे. त्यामध्ये समर्थ ओतप्रोत भरले आहेत. त्यांनी स्वमुखाने शिष्यांना सांगितले होते,

" माझी काया आणि वाणी । गेली म्हणाल अंतःकरणी ।
परि मी आहे जगज्जीवनी । निरंतर ।
आत्माराम दासबोध । माझे स्वरूप असता सिद्ध ।
कोणी न करावा खेद । संतजनी ॥ "

या त्यांच्या कथनानुसार आपण जर ते ग्रंथ नित्य वाचनात ठेवले तर श्रीसमर्थ आपल्या चित्तामध्येच सदैव वास्तव्यास येणार नाहीत का ? आपल्याला कोणत्याही प्रसंगी त्यामधील अवतरणांचे किंवा ओव्यांचे जर स्मरण झाले तर स्वामीजींच्या सान्निध्याचा नित्य अनुभव येत जाईल.

" सुखाची घडी लोटता सूख आहे " पण पुढे सर्वच जाईल काही शिल्लक राहणार नाही. सुख, ते निर्माण करणारे कारण आणि ते अनुभवणारा तू स्वतः यातील सारे काही शून्यवत होणार आहे अशा आशयाचा श्लोक असला तरी ' सुख ' या शब्दाच्या जागी ' दुःख ' हा शब्द घालून त्यातील आशय आपण मनानेच समजावून घेऊ शकतो. ज्या मानसिक अवस्थेत मन असताना आपण श्लोक वाचीत असतो त्या त्या मनःस्थितीला अनुरूप असा अर्थ आपल्या आकलनात येतो. मनाच्या श्लोकांचे हे वैशिष्ट्य मी प्रत्यक्ष अनुभवले आहे. समर्थांचे सारेच वाङ्मय प्रवृत्तिपर आहे. माणसाला यत्नवादी बनविण्याकडे त्यांचा ओढा आहे. ' कर्ममार्गे उपासना ' हा त्यांचा महत्त्वाचा संदेश आहे. त्यामुळे रेडिओवरील तो श्लोकवाचनाचा कार्यक्रम संपला त्यावेळी माझी शोकाकुल आणि किंकर्तव्यमूढ अवस्था पूर्णपणे नष्ट होऊन माझ्या प्राप्त कर्तव्याकडे मी वळलो. अशा प्रकारे दुःखद प्रसंगातून माझ्या मनाला बाहेर खेचून काढणारी आणि स्वतःच्या उद्योगाकडे चालविणारी एक महान शक्ती मला भेटली अशा आनंदात मी सारा दिवस होतो.

.... आणि लवकरच पुढे सुद्धा पंडितजींच्या रक्षाविसर्जनाचे कार्यक्रम, शोकसभा आदी सारे जेव्हा यथाक्रम झाले त्यावेळी मी तेथे उपस्थित राहात होतो, ते कार्यक्रम पहात आणि ऐकत होतो पण माणसाला शोकाकुल करणाऱ्या आणि निष्क्रिय करणाऱ्या विषण्णतेपासून मात्र मी दूर राहू शकलो. अशी असते श्रीसमर्थांची कृपा ! जी जी व्यक्ती त्यांच्या सान्निध्यात जाईल तिच्यावर ही प्रेमपूर्ण कृपा ते छत्राप्रमाणे तर धरतातच पण त्याखेरीज व्यक्तीच्या ठिकाणी जीवनातील बऱ्यावाईट गोष्टीच्या सामोरे जाण्याचे ' श्रेष्ठ धारिष्ट ' ते निर्माण केल्याविना राहात नाहीत. आणि म्हणूनच मला नित्य वाटते की समर्थ रामदास आणि ज्ञानदेव तुकारामादि सारे संत त्यांच्या शिकवणुकीच्या स्वरूपात ' अजर – अमर ' झाले आहेत.

" साधू दिसती वेगळाले । परि ते स्वरुपी मिळाले ।
अवघे मिळून एकचि झाले । देहातीत वस्तू ॥ "


असे समर्थांनीच सांगितले आहे. त्यांच्या सान्निध्याचा साक्षात्कार करून घ्यावयाचा तर त्यांचे वाङ्मय आपल्या नित्य वाचनात ठेवावयाचे हाच खरा मार्ग आहे. पोथीची गंध फुलांनी नुसती पूजा केल्याने तो सान्निध्याचा अनुभव चाखता यावयाचा नाही.

# २

## बहुतांच्या नजरेतून श्रीसमर्थ

रामदासांच्या वाङ्मयाचा प्रभाव महाराष्ट्रातील जनमानसावर खोलवर उमटला आहे. महाराष्ट्रामध्ये ज्या प्रतिभावंत व्यक्तींनी जीवनाच्या विविध क्षेत्रांमध्ये नाव कमावले अशा काही व्यक्तींच्या नजरेतून रामदासस्वामींचे दर्शन घडविण्याचा प्रयत्न, या प्रकरणात करण्यात आला आहे. या संबंधात 'सज्जनगड' मासिकामध्ये एक लेखमाला मी लिहिली होती. तिचा समावेश या ठिकाणी करण्यास अनुमती दिल्याबद्दल संपादकमंडळाला माझे धन्यवाद.

— लेखक



## श्री. यशवंतराव चव्हाण

महाराष्ट्र-कवी यशवंत यांनी लिहिलेल्या "छत्रपती शिवराय" या महाकाव्याला माननीय श्री. यशवंतराव चव्हाण यांनी पुरस्कारार्थ लिहिलेल्या मजकुरामध्ये ते म्हणतात "शिवरायांचे जीवन घडत असताना त्यांच्या समकालीन दोन प्रतिभावंत पुरुषांना त्यांच्या जीवनाचा अर्थ समजला. एक उत्तर भारतातील इतिहासप्रसिद्ध कवी भूषण व दुसरे समर्थ रामदास. उत्तर भारतात बुंदेलखंड. हरियाणा, पूर्व उत्तर प्रदेश आणि बिहार या भागात कवी भूषणाची ललितवाणी मी असंख्यांच्या कंठांतून ऐकली आहे. शिवरायाच्या प्रतापाचे सामर्थ्य कवी भूषणाच्या प्रतिभेला जागवू शकले तशीच समर्थांची संतवाणी तेव्हाच्या महाराष्ट्राला आवर्जून सांगत होती की, शिवरायाचे रूप आठवा, शिवरायाचा प्रताप आठवा, शिवरायाचा साक्षेप आठवा, आणि त्यांच्या निनादाने भूमंडळ भरून काढा. चाफळच्या दऱ्याखोऱ्यांतून आलेले हे कवी यशवंत महाकाव्याच्या रूपाने समर्थांचे शब्द खरे करीत आहेत."

वरील अवतरणामध्ये मा. यशवंतरावांनी समर्थांच्या कार्याकडे वेगळ्या नजरेतून पाहून त्याची महती वर्णन केली आहे. एखादे प्रचंड युगप्रवर्तक कार्य प्रारंभी आकार घेत असते तेव्हा त्याची महती सर्वसामान्य लोकांच्या आकलनात येत नाही पण श्रीसमर्थांच्यासारख्या दूरदृष्टीच्या महापुरुषांना अनाकालनीय असे काय होते? त्यांनी शिवरायाच्या कार्याची महानता ते कार्य बीजस्वरूपात असल्यापासूनच ओळखली होती आणि त्या कार्यामागे आपले सारे सामर्थ्य त्यांनी खडे केले होते. मा. यशवंतराव चव्हाण यांनी वरील अवतरणामध्ये व्यक्त केलेले विचार छत्रपती शिवराय, श्रीसमर्थ आणि कवी भूषण याच्यावर एक नवा प्रकाशझोत टाकणारे आहेत यात शंका नाही.

[संदर्भ : — "छत्रपति शिवराय" काव्यकर्ता : — महाराष्ट्र कवि यशवंत, कॉंटिनेंटल प्रकाशन, पुणे-]



## आचार्य विनोबा भावे

**आचार्य विनोबा भावे** यांचे 'रामदासांची भजने' हे पुस्तक परंधाम प्रकाशन, पवनार यांनी प्रकाशित केले आहे. त्यामध्ये 'समर्थांचे स्मरण' म्हणून एक अत्यंत वाचनीय प्रकरण श्री. विनोबाजींनी लिहिले आहे. त्यातून खालील उतारा निवडला आहे. "वस्तुतः संसार आणि परमार्थ ह्यांमधील काही तडजोड समर्थांनी स्वीकारली असे मानणे म्हणजे समर्थांचे हृदय न समजणे होय.


"जयास वाटे सुखचि असावे। तेणे रघुनाथभजनी लागावे।
स्वजन सकळहि त्यागावे। दुःखमूळ जे॥"

हा त्यांचा कायमचा सिद्धांत असून तो त्यांनी शेकडो वेळा एकसारखा सांगितला आहे. तुकाराम निवृत्ति-मार्गी म्हणविला जात असून विचारा संसारात कसावसा वागत तरी होता; पण समर्थांनी तर पहिल्यापासूनच मूलोत्पाती धोरण स्वीकारले होते. **श्रीशंकराचार्यांनी घालून दिलेले वळण अक्षरशः कोणी गिरविले असेल तर ते समर्थांनी.** "येच क्षणी मरून जाशी। तरी रघुनाथी अंतरलासी।" या वचनात जी घाबरेपणाची वृत्ती दिसून येते, तिच्याकडे पाहता त्यांच्या हृदयात काय जळत होते हे सूर्यप्रकाशाइतके स्पष्ट आहे. मृत्यूच्या साम्राज्याखालचे जीवन ही किती भयंकर वस्तू आहे याची पूर्ण जाणीव त्यांना होती. जीवनातील कोणतेच कार्य स्वातंत्र्याने होत नसून मृत्यूच्या सार्वभौम सत्तेखाली जीवनातील सर्व चळवळी चाललेल्या असतात. चरकात सापडलेल्या ऊसाला ज्याप्रमाणे पिरगळले जाऊन रस ओकण्याच्या कर्मणि-प्रयोगाशिवाय दुसरा प्रयोगच माहिती नाही, त्याप्रमाणे मृत्यूच्या चाबकाखाली वागण्याशिवाय आम्हांला स्वतंत्र कर्तृत्वच नसते. आम्ही उठतो, काम करतो, जगतो, मरतो, सर्वच कर्मणि-प्रयोगाची उदाहरणे आहेत. आम्ही झोप घेतो

की झोप आम्हाला घेते, आम्ही उठतो की जागृती आम्हाला उठविते ? आम्ही मरेपर्यंत जगतो आणि जगत नाही म्हणून मरतो असे आमच्या जीवनाचे अर्थशून्य स्वरूप आहे. "**स्वतंत्रः कर्ता**" असे पाणिनीचे सूत्र आहे. आमच्या सबंध जीवनात स्वातंत्र्य कोठेच नसल्यामुळे कर्तरि-प्रयोगच नाही, असले कर्तव्यशून्य बावळे जीवन जगण्यात काय पुरुषार्थ आहे ? **समर्थांना जीवनातील कर्तरि प्रयोग शिकवावयाचा होता.** "मरणाआधीच मरून" आपले मरण डोळ्यांनी पहावयाचे होते. 'याचि जन्मे येणेचि काळे' स्वातंत्र्य मिळवावयाचे म्हणून त्यानी स्वतः गृहत्याग केला, आणि 'सदा सेवि आरण्य तारुण्यकाळी' अशी सर्व जगास हाक मारली. "कौमार आचरेत् प्राज्ञो धर्मान् भागवतानिह" – धर्माचे आचरण लहानपणीच (सुरू) झाले पाहिजे ही भगवद्भक्त प्रल्हादाची भागवत धर्मातील आज्ञा त्यांनी शिरसावंद्य केली आणि महाराष्ट्रास शिकविली.

"....'वैराग्या'च्या प्रखर शस्त्राने देह गेहाविषयीचा स्नेह छाटून ह्यापुढील अभ्यासासाठी समर्थ गोदावरी-परिसरी दाखल झाले. कंबरभर पाण्यात उभे राहून गायत्रीचे आणि राममंत्राचे पुरश्चरण बारा वर्षांत समर्थांनी केले, ह्या पलीकडे जगास काहीच माहिती मिळालेली नाही आणि जगास ही माहिती मिळविण्याची मनापासून इच्छाही नाही ! समर्थांनी उत्तरचरित्रात जे समाज संघटनेचे काम केले त्यांची वर्णने आम्हाला गोड लागतात. पण ही संघटना करण्याची शक्ती मिळविण्यासाठी त्यांनी पूर्वतयारीचे जे कठोर कष्ट घेतले त्याचे आम्हास महत्त्व वाटत नाही ! मनुष्यास पुण्याचे फळ हवे असते पण पुण्य नको असते. 'आधी कष्ट मग फळ' हा सृष्टीचा नियम माहीत असूनही 'जनाचा लालची स्वभाव' कष्ट केल्याविना अपेक्षा राखतो.'

आ. विनोबाजींनी लिहिलेल्या लेखातील दोन अवतरणे येथे दिली आहेत. वास्तविक सारा लेखच इतका मननीय आहे की एखादे वाक्य सुद्धा वगळू नये असे वाटले पण मी योजलेल्या विषयाशी ते प्रस्तुत ठरले नसते. असो. वरील दोन अवतरणामध्ये मांडलेला विचार किती भेदक आहे ! 'समर्थांनी समाजाला कर्तरी प्रयोगाने जगण्यास शिकविले' आणि दुसरी गोष्ट म्हणजे समर्थांनी 'आधी केले मग सांगितले' या दोन गोष्टींकडे आचार्यांनी बोट दाखविले आहे. त्यांच्यासारख्या थोर तपस्वीवृत्तीच्या महापुरुषास श्रीसमर्थांबद्दल काय वाटते ते वरील दोन अवतरणांतून दिसून येते.



## महाराष्ट्र कवी यशवंत

" रामदासांचे कवित्व आणि रामदासांचे चरित्र यात अभेदपण आहे, त्यांनी जे अनुभवले आणि जे आचरले तेच त्यांच्या मुखातून प्रगट झाले आहे. ते सारे मनःपूर्वक जो वाचील त्याला त्यांच्या अनुभवसमृद्धीची आणि ज्ञानसमृद्धीची अथांगता जाणवल्याशिवाय राहाणार नाही. व्यवहार, समाजकारण, वेदान्त आणि राजकारण या सर्वांविषयी त्यांची वचने रोखठोक आहेत. आत्मोद्धाराबरोबर जगदुद्धाराचीही पोटतिडीक त्यांना असल्यामुळे कोणत्या एका गोष्टीबद्दल त्यांचा उद्गार नाही असे नाही. कोणत्याही पेशाचा मनुष्य असो, त्याला त्यांच्या वाङ्मयात 'हे आपल्यासाठीच आहे' असे वाटण्याजोगे काही ना काही आढळेलच; इतकी त्याची विशालता आहे.

रामदासांच्या सद्गुणसंख्येबद्दल तर बोलायलाच नको. अमोघ वक्तृत्व अखंड चाळणा, निरंतर कष्ट, प्रयत्नांवर पराकाष्ठेची मदार, गायनाची आवड, एकान्तप्रियता, निर्भयवृत्ती, कडकडीत वैराग्य, लोकांवर छाप पाडण्यासारखी मुद्रा, त्यागवृत्ती अशा अनेक उत्तम गुणांचा परिपाक त्यांच्या ठायी दिसून येतो. 'चिंता करतो विश्वाची' हे त्यांनी बालपणी आईला दिलेले उत्तर! ह्याचा पडताळा सर्व आयुष्यभर सापडतो. त्यांचे आचरण म्हणजे ह्या उत्तराचा अहर्निश अनुवादच! देवाजवळ मागणे मागताना-सुद्धा त्यांना त्याचा विसर पडला नाही. " कल्याण मागणे रामा तुज " असे आळवताना " तुझे देणे असे असो की भक्त सुखी असोत आणि ऋषी सुखी असावेत " हीच त्यांची वांच्छा आहे.

—असा हा अनन्यसाधारण संत 'समर्थ' ह्या विरुदानेच आजतागायत ओळखला जात आहे. लोकमान्य म्हणजे बाळ गंगाधर टिळक, महात्मा म्हणजे मोहनदास करमचंद गांधी त्याप्रमाणे समर्थ म्हणजे रामदासस्वामी अशी ही समीकरणे

प्रसिद्ध आणि रूढ होऊन बसली आहेत. संतमालिकेत, मला नाहीं आठवत, अन्य कोणी आपल्या विरुदानेच विख्यात झालेला !.... त्यांच्या चरित्रात सामर्थ्याचा जो अखंड गजर आहे त्याच्या जाणिवेमुळेच त्यांच्या शिष्यांना

समर्थें समर्थ करावे । तरीच समर्थ म्हणावे ।
त्रैलोक्यासी पडले ठावे । सामर्थ्य ज्याचे ॥

या न्यायाने रामदासांनाच 'समर्थ' म्हणून गौरविण्याची प्रेरणा झाली असावी.

स्वामींनी दासबोधात ( द. १ ८ स. १० ओ. ४६ )

" बहुत जनास चालवी । नाना मंडळे हालवी ।
ऐसी हे समर्थ पदवी । विवेकें होते ॥ "

असे 'समर्थ' पदवीचे लक्षण सांगितले आहे. खुद्द रामदासांचे कर्तृत्व लक्षात घेता हे लक्षण त्यांना तंतोतंत लागू पडते. तेव्हा शिष्यांना जी प्रेरणा झाली तिला ह्या व्याख्येने पक्की बळकटी आली असावी. आणि तशातच स्वामींच्या वाङ्मयातील धनदौलत धुंडाळताना तिच्यात " जिवींचे मनीचे पुर्विले । गोमटे केले ॥ " असा कृतज्ञतेचा भावपूर असलेले पद हाती आले असावे ह्या पदात रामदासांनी म्हटले आहे —

देवा तू त्रैलोक्यनाथ । मी रे अनाथ !
मज करूनी सनाथ । केले समर्थ ॥

ह्या त्यांच्या आत्मनिवेदनाचा आधार मिळाल्यावर सर्वांनाच स्फुरण चढून अंतरी उचंबळून येऊन त्यांनी " समर्थ " ह्या पदवीने त्यांचा जयजयकार केला असावा."

वरील उताऱ्यामध्ये समर्थांचे वाङ्मय, त्यांची सद्गुणसंख्या आणि त्याची अनन्य-साधारणता याबद्दल सुंदर विचार व्यक्त केले गेले आहेत. रामदासांना 'समर्थ' ही पदवी कशी प्राप्त झाली असावी याबद्दलची कल्पना कवी यशवंतांनी येथे दिली आहे. ज्या काळी छपाईची कला महाराष्ट्रात नव्हती; दळणवळणाची साधने सध्या सारखी सुलभ आणि वेगवान नव्हती, वैचारिक क्रांतीच करणे जेव्हा अत्यंत अवघड होते त्यावेळी रामदासांना " समर्थ " हे विरुद प्राप्त झाले ही गोष्ट लक्षात घेतली म्हणजे रामदासांच्या कर्तृत्वाबद्दल अवाक होऊन अचंब्याने बोट तोंडात जाते असे म्हटले तर अतिशयोक्ती होणार नाही.

**भोंदूगिरी करणाऱ्यांना समर्थांचा आहेर !**

त्रिविध तापाने पोळलेले आणि व्याकूळ झालेले लोक जेव्हा अध्यात्माच्या मार्गाने

जाऊ लागतात त्यावेळी त्यांना ठकविणाऱ्या आंणि चुकीचा मार्ग दाखविणाऱ्या भोंदू 'गुरूं'पासूनच खरा धोका असतो. असे भोंदू नेहमीच समाजात असतात. त्यांच्याबद्दल सावधगिरीचा इषारा 'दासबोध'मध्ये समर्थांनी परखड भाषेत दिला आहेच.

"शिष्यास न लाविती साधन । न करविती इंद्रिये दमन ।
ऐसे गुरू अडक्याचे तीन । मिळाले तरी त्यजावे ॥"

असे त्यांनी म्हटले आहे. टिळे–माळा आणि भस्माचे पट्टे लावून बाह्यतः साधुवेश केलेल्या भोंदूना उद्देशून त्यांनी केलेली एक कविता आता पाहा —

"हे काय ! ते काय !
योग काय ! भोग काय !
अंतरी संसार काय !
वाहेर काषाय दंड काय !
आत अवघे भंड काय !
वाहेर सात्त्विक ध्यान काय !
आत मद्यपान काय !
रामदास म्हणे पाहे
व्यर्थ भजन करून काय !

या कवितेबद्दल महाराष्ट्र कवी 'यशवंत' लिहितात, 'शेवटच्या चरणातील कवीचा नामोल्लेख वगळला, तर मुक्तछंदातल्या जमान्यातल्या आधुनिक कवीचीच वाटावी इतका या कवितेत अद्ययावतपणा आहे.' तथापि रामदास हे साधे कवी नव्हते, ते ते संतहृदय कवी होते त्यामुळे भोंदूंवर केवळ आसूड उगारणे हे त्यांनी केले नाही तर उलट त्यांनाही त्यांनी उपदेश केला की "डोळ्यांना भूल पाडणारे तुम्ही काही दाखवाल, कानात मंत्र फुंकाल पण या ज्ञानाच्या आधारे तुम्हाला स्वतःला परमेश्वरप्राप्ती कधीही होणार नाही हे लक्षात ठेवा. आचार व उपासना सोडतात ते भ्रष्ट आणि भक्तिशून्य असतात.

"जळो तयांची महंति । कोण पुसे ॥"

या विसाव्या शतकात देखील जे काही संत आढळतात पण तसे काही लफंगे साधूही आहेत त्यांनी, समर्थांनी दिलेल्या आहेराचे स्मरण करावे.

[संदर्भ : समर्थ रामदास : एक अभ्यास. लेखक : य. दि. पेंढरकर, कॉन्टिनेन्टल प्रकाशन. पृष्ठांक २२–२४ प्रकरण समर्थांची जीवन–सरिता.]



## कै. श्री. म. माटे

मध्यप्रदेशाच्या शासन साहित्य परिषदेच्या सूचना व प्रकाशन विभागातर्फे 'श्री रामदासस्वामींचे प्रपंचविज्ञान" हा कै. प्रा. श्री. म. माटे यांमी लिहिलेला प्रबंध १९५६ मध्ये प्रसिद्ध झाला, त्यामधून या लेखातील अवतरणे घेतली आहेत. प्रा. माटे यांचे नाव मराठी साहित्यामध्ये विख्यात आहे. अस्पृश्योद्धार (हा त्यांच्या वेळचा शब्द....आताचा हरिजनोद्धार) चळवळीसाठी त्यांनी केलेले कार्य कधीच विस्मरणात जाणार नाही. अशा या चौफेर बुद्धीच्या वाङ्मयसेवकाने श्रीसमर्थांच्या संबंधात खूपच वाचन केले होते. मध्यप्रदेशाचे मुख्यमंत्री रविशंकर शुक्ला, श्रेष्ठ साहित्यिक द्वारकाप्रसाद मिश्रा, गजाननराव माडखोलकर, बाबासाहेब खापर्डे यांच्या उपस्थितीत श्रीसमर्थांच्या संबधात प्रा. माटे यांनी मॉरिस कॉलेजच्या स्वातंत्र्यमंदिरामध्ये एक व्याख्यानमाला गुंफली होती, त्या वेळी ते म्हणाले होते....

"स्वामी संतपरंपरेतीलच होते. ते भक्तिमार्गातीलच होते आणि ज्ञानेश्वरापासून सुरू झालेल्या शुद्धिकरणाच्या कामात आग्रहाने पडलेले होते. अशा वेळीं त्यांची दृष्टी कोणाकडे व कशाकडे गेली असेल याचा विवेक येथे करावयास हवा. रामदासांना समाजोन्मुख बनविण्यास एक अस्मानी कारण उत्पन्न झाले होते, या कारणाला सुलतानी कारणाची जोड होतीच होती. ही दोन्ही कारणे उत्पन्न झाल्यामुळे समाजात अंदाधुंदी माजलेली होती. अवर्षण पुनः पुन्हा पडत होते. कोणी कोणाचा नव्हे असे झाले होते. बदमाष लोक पोरींना हाताला धरून घरातून ओढून नेत होते. एखाद्या वेळी पाऊस पडपड पडे आणि पडेनासा झाला म्हणजे डोळ्याला लावायला पाणी मिळत नसे. लोकांवर आलेली ही आपत्ती पाहून रामदासांचे सामाजिक मन खरोखर पिळवटून निघाले. लोकांबद्दलच्या सहानुभूतीचा त्यांचा आवेश विलक्षण

वाढला. या लोकांना कोण सांभाळील, हे कोठे जातील, यांना त्राता कोण, या चिंतेने त्यांचें 'ऊर फाटू लागले' आणि त्यांना दुःखाच्या राशी झाल्या. टाहो फोडून ते म्हणाले "जग बुडाले बुडाले – काही मिळेना मिळेना खायाला, ठाव नाही रे नाही रे नाही जायाला" पुढील खरे खरे सामाजिक करुण काव्य वाचा—

जग बुडाले बुडाले । पोटेविण गेले । बहु कष्टले कष्टले । किती एक मेले
विसा लोकात लोकात । येकचि राहिले । तेणे उदंड उदंड । दुःखचि साहिले ॥१॥
काही मिळेना मिळेना । मिळेना खायाला । ठाव नाही रे नाही रे । नाहीरे जायाला
हौस कैची रे कैची रे । कैची रे गायाला । कोठे जावे रे जावे । जावे मागायला ॥२॥
पाऊस पडतो पडतो । उदंड पडतो । नाहीतर उघडतो उघडतो । अवघाचि उघडतो
पीळ पेचाचा पेचाचा । प्रसंग पडतो
लोक उद्भवेना उद्भवेना । अवघाचि दडतो ॥३॥
धान्य महाग महाग । तैसेहि मिळेना । कैसे होईल होईल । होईल कळेना
पुढे होणार होणार । होणार टळेना । पुण्य गेले रे गेले रे । काहीच फळेना ॥४॥
उदंड चाकरी चाकरी । मिळेना भाकरी । लोक निलंड निलंड । काढोनी नेती पोरी
न्याय बुडाला बुडाला । जाहली शिरजोरी । पैक्याकारणे कारणे । होते मारामारी ॥५॥
एक पळाले पळाले । दूर देशा गेले । बहुत कष्टले कष्टले । तेथे नागवले
फिरोनि आले रे आले रे । घरीचे लोक मेले
कोठे उपाय दिसेना । कासावीस झाले ॥६॥
कोणी वाचला वाचला । मध्येचि मारिला
येतो एकाकी एकाकी । अकस्मात घाला ॥७॥
सुडके पटकर पटकर । मिळेना पांधराया । शक्ती नाही रे नाही रे । खोपट कराया
वाट फुटेना फुटेना । विदेशी भराया । अवघी बैसलो बैसलो । बैसलो मराया ॥८॥

समर्थांच्या काव्याचा सर्व भाग प्रा. माटे यांनी दिला आहे पण येथे त्यातील निवडक भाग घेतला आहे. त्यानंतर ते म्हणतात...

"एका प्रतिभाशाली, पराक्रमी, ज्याचे चित्त समाजाच्या अनुभूतीने नाहलेले आहे, ज्याने समाज धुंडून पाहिला आहे, ज्याने समाजासाठी फकिरी घेतलेली आहे, **जो वाङ्मयातला जबरदस्त मल्ल आहे.** अशा एका कवीचे काव्य आहे. ही काव्याची जिवंत वाणी आहे. यात समाजोन्मुखता आहे. यातील साधे साधे मनोगत वाचकाच्या मनाला पीळ पाडील असे आहे. असे होते म्हणूनच स्वामींचा महिमा

एवढा वाढला, म्हणूनच रंकापासून रावापर्यंत सर्व लोक स्वामींचे मित्र बनले आणि त्यांना शरण आले. या धगधगलेल्या भावनेतूनच स्वामींचे कडक चातुर्य म्हणजे राजकारण सुरू झाले! एकदा समाजाची सुधारणा करावयाची असे ठरले आणि मग स्वामींचे प्रतिपादन त्या दृष्टीने सुरू झाले."

"रामदासी वाङ्मयामध्ये रेखीव सलगपणा नाही." असा जो आक्षेप घेतला जातो त्याबद्दल प्रा. माटे म्हणतात, "स्वामी महाबुद्धिवान होते; मोठे लढवय्ये आणि प्रतिपक्षाशी हुज्जत घालणारे वाङ्मयमल्ल होते; त्यांना परिच्छेदरचना सहज साधली असती आणि ती साधल्याचीही वाटेल तेवढी उदाहरणे देता येण्यासारखी आहेत. पण एकंदरीने पाहाता हे लिखित वाङ्मय नसून हे बोललेले वाङ्मय आहे हा ठसा मात्र त्यावर उमटलेला आहे. .... परमार्थ, प्रपंच, राजकारण व्यवहार या सर्वांचा एक मोठा रोचक आणि पौष्टिक मलिदा स्वामींनी बनविलेला आहे. तो खात असताना त्यातील घटकद्रव्ये कोणती हे रसिकाने व केवळ चवीनेच ओळखावयास हवे."

*

प्रा. श्री. म. माटे यांच्या दीर्घ प्रबंधाच्या दोनशे पृष्ठांमधून किती अवतरणे घ्यावी असे होऊन गेले. त्यातून माझ्या अल्पमतीनुसार काही भाग येथे देत आहे. एका साक्षात्कारी महापुरुषाला समाजोन्मुख का व्हावे लागले आणि लोकांना निद्रेतून खडबडून जागे करण्यासाठी 'वाङ्मयातील जबरदस्त मल्लाची" भूमिका कशी घ्यावी लागली याचे मार्मिक चित्र प्रा. माटे यानी त्यांच्या व्याख्यानांमध्ये रेखाटले आणि ती व्याख्याने पुस्तकाच्या स्वरूपात प्रसिद्ध करून शा. स. परिषद, मध्यप्रदेश यांनी औचित्य साधले आहे.



## प्राचार्य शिवाजीराव भोसले

महाराष्ट्राला सुपरिचित असलेले प्राचार्य शिवाजीराव भोसले यांनी आपल्या रसाळ आणि अमोघ वाणीने श्रीसमर्थांच्या चरित्रावर अनेक व्याख्याने दिली आहेत. मिरज या ठिकाणी त्यांनी तीन व्याख्याने देऊन श्रीसमर्थांच्या जीवनाबद्दलचा आपला व्यासंग सिद्ध केला आहे. पुणे येथील श्रीरामकृष्ण आश्रमाच्या द्वादश वर्धापन दिना-निमित्ताने १९६९ मध्ये एक संग्राह्य अशी स्मरणिका प्रसिद्ध करण्यात आली. त्यामध्ये अनेक संतांची चरित्रे समाविष्ट करण्यात आली आहेत. त्यामध्ये प्रा. शिवाजीराव भोसले यांनी श्रीसमर्थांचे चरित्रावरच आपला लेख दिला आहे. त्यामध्ये ते लिहितात—" समर्थकालीन भारताची स्थिती ही रावणाच्या बंदिशाळेसारखी झाली होती म्हणून देवादिकांना बंधमुक्त करणाऱ्या कोदंडधारी रामचंद्राची उपासना समर्थांनी सार्वजनिक जीवनात सुरू केली. समर्थांची थोरवी ही की, समुदायाला उपासनेचे व उपासनेला समुदायाचे अधिष्ठान त्यांनी दिले. धर्मसंस्था ही समाज-धारणेसाठी आहे हा त्यांचा अढळ विश्वास होता. आपल्या साधनेचा प्रारंभकाळ सोडला तर समर्थांना व्यक्तिगत मुक्तीची अभिलाषा उरली नव्हती. अवघ्या समाजाचे उत्थान घडावे, प्रबोधन घडावे हा त्यांचा ध्यास होता. हे कार्य पार पाडण्यासाठी हजारो हात एके ठिकाणी आले पाहिजेत, हजारो मने एका भावनेने भारली पाहिजेत हे समर्थांनी जाणले व आपल्या विचारांचे " धर्मचक्र प्रवर्तन " सुरू केले. समर्थांचे महंत, कार्याची पताका खांद्यावर घेऊन, पायाला चाक बांधून " ब्रह्मांड भेदून रामकथा पैलाड न्यावी " या निश्चयाने मठाबाहेर पडले. त्यांच्या अंगी असणारी वेधशक्ती व प्रबोधनशक्ती साक्षात समर्थांनी सिद्ध केली होती. मानव्याचा एक व्यापक संस्कारही त्यांच्या बुद्धीवर समर्थांनी केला होता. बहुतांचे मनी भरावे,

बहुतांचे मुखी उरावे, बहुतांचे अंतर जाणावे, देशकाल प्रसंग पाहून वागावे हे सामूहिक जीवनाचे प्राणभूत तत्त्व समर्थांनीं सर्वांस शिकविले होते. "पतित करावे पावन । शहाणे करावे जन ॥" हा मंत्र त्यांनी दिला होता. संकुचित बुद्धीचा व कोत्या विचाराचा एखादा महंत कोणाचा अकारण पक्षपात करील, म्हणून समर्थांची सक्त ताकीद होती की—

मेटो कोणी नर । घेड महार चांभार ।
त्याचे राखावे अंतर । या नाव भजन ॥

या संदर्भात एक गोष्ट आवर्जून लक्षात घेतली पाहिजे, त्या काळचा समाज हा आजच्याहून अनेक बाबतीत वेगळा होता. समाजसंस्थेची मूलतत्त्वे वेगळी होती, चालरीती भिन्न होत्या. ब्राह्मणांनी अध्ययनशील असावे. क्षत्रियांनी शर्थीची तरवार करून समाजरक्षण करावे व अन्य जनांनी समाजजीवनातील उरलेले व्यवहार सुकर करावे असे व्यवस्थापनाचे संकेत होते. समाजाचे नेतृत्व करणारे 'ब्राह्मण' व 'क्षत्रिय' असे दोनच वर्ग होते. समर्थांनी प्रथम त्यांना आवाहन केले. परक्यांचा फौजांचा सर्वत्र सुळसुळाट असताना अज्ञ जनाना कोणतेही जोखमीचे काम सांगणे शक्य नव्हते. त्यांची वाटचाल जाणत्यांच्या मार्गदर्शनाने व्हावी अशी अपेक्षा होती यास्तव समर्थांनी जे सूज्ञ व साक्षर होते त्यांच्यावर अधिक भार टाकला. समर्थ आज हयात असते तर समतेच्या संजीवक सामर्थ्याची साक्ष पटताच त्यांनी आपल्या विचारात आवश्यक तो फेरफार केला असता. ज्या काळात समाजाचा विचार करणारे शासन नव्हते, तेव्हा समर्थांनी उदंड विचार केला होता. आज ते हयात असते तर त्यांनी केवढा चमत्कार करून दाखविला असता हे कल्पनेने जाणावे लागेल. "जनाचा प्रवाह चालला । म्हणजे कार्यभाग आटोपला । जन ठायी ठायी तुंबला । म्हणजे खोटे या समर्थांच्या मार्गदर्शक वचनात सामाजिक समस्यांच्या निराकरणाचा चिरस्थायी विचार व्यक्त होतो.

कोणत्या प्रसंगी कसे वागावे काय करावे, याविषयी समर्थ अखंड मार्गदर्शन करीत होते. समाजात सारेच सज्जन नसतात हे जाणून, "अमर्याद फितवेखोर । त्यांचा करावा संहार । शोधिला पाहिजे विचार । यथातथ्य ॥" असे सांगताना समर्थांना संकोच वाटला नाही.....छत्रपतींच्या देहावसानानंतर हवालदिल झालेल्या महाराष्ट्राचा ढासळता संसार सावरण्यासाठी हा संन्यस्त पुढे सरसावला. संभाजी राजांना एक सुदीर्घ व सूचक पत्र पाठवून मौलिक मार्गदर्शन केले—

" शिवरायाचे आठवावे रूप । शिवरायाचा आठवावा प्रताप ।
शिवरायाचा आठवावा साक्षेप । भूमंडळी ॥
सकळ सुखांचा त्याग । करूनि साधिजे तो योग ।
राज्यसाधनाची लगबग । कैसी असे ॥
आहे तितुके जतन करावे । पुढे अधिक मेळवावे ।
महाराष्ट्र राज्य करावे । जिकडे तिकडे ॥

".....प्लेटो या नावाच्या तत्त्वज्ञाने आदर्श राज्याचे स्वरूप निवेदन करताना म्हटले आहे की, शासनाची सूत्रे तत्त्वज्ञाच्या हाती असावीत. हे कधीच घडले नाही. तत्त्वज्ञांच्या हाती राज्य गेले नाही व राजांनी तत्त्वचिंतन करून राज्यकारभार केला नाही; पण महाराष्ट्राच्या इतिहासात एक नवल वर्तले. एक राजनीतिकुशल तत्त्वज्ञ आणि एक तत्त्वचिंतनशील राजा एकरूप झाले. समर्थांनी राजकारणाला हरिकथानिरुपणाची जोड दिली. ऐहिकाला पारमार्थिकाचे अधिष्ठान पुरवले. आचाराला विचारांचा आधार दिला. विचार हा आचारसिद्ध केला. अध्यात्ममंदिरावर छत्रपतींच्या कर्तृत्वाचा कळस चढविला. आपल्या पार्थिव देहाचे पतन घडल्यावर आपले अनुयायी अंधारात धडपडत, ठेचाळत राहतील, म्हणून मागे 'दासबोध' हा ग्रंथराज ठेवला. असे होते समर्थांचे जीवन ! 'उत्कट आणि भव्य' " निर्भय आणि निःस्पृह " जीवनाचा मूर्तिमंत वस्तुपाठ म्हणजे समर्थांचे जीवन !

*

वरील प्रदीर्घ उतारा वाचत असताना प्रा. शिवाजीराव भोसले यांची श्रोत्यांना मंत्रमुग्ध करणारी मूर्ती आपल्या डोळ्यांसमोर खात्रीने तरंगेल. त्यांनी या गढूळ झालेल्या कालखंडामध्ये निर्मळ मनाने श्रीसमर्थांचे चरित्र जनतेसमोर मांडले आहे व ते मांडत आहेत. त्यांच्यासारख्या विचारवंत तत्त्वज्ञाचे बोल आपल्या हृदयामध्ये साठवून ठेवून साऱ्या समाजाने श्रीसमर्थांच्या आणि शिवरायांच्या कार्याकडे पुन्हा एकदा जवळून पहावे. भावी काळामधील व्यक्तिमात्रांच्या व साऱ्या देशाच्या उन्नतीची बीजे त्यात आहेत.

प्रा. शिवाजीराव भोसले यांनी लिहिलेल्या लेखातील अवतरणे 'सज्जनगड' मासिकासाठी निवडण्यास अनुमती दिली याबद्दल त्यांचे आणि श्रीरामकृष्ण आश्रम, पुणे यांनी मला स्मरणिका उपलब्ध करून दिली त्याबद्दल त्यांचे आभार.

## कॉस्मे ड गार्डा,

श्रीसमर्थ ज्या कालखंडात वावरले त्याकाळच्या कॉस्मे ड गार्डा या लेखकाने शिवाजी महाराजांचे चरित्र लिहिले आहे; त्यात समर्थांचा व त्यांच्या कार्याचा उल्लेख त्याने ओझरता का होईना पण केला आहे. इ. स. १६९५ मध्ये लिहिलेल्या या शिव चरित्रात गार्डा लिहितो –

" या भागात एक फार प्रचंड संस्था आहे तिचा उल्लेख या ठिकाणी जरूर केला पाहिजे. संस्थेचा अधिकार विस्तृत भूभागावर चालत असून संस्थेचे अधिपती एक थोर ब्राह्मण गृहस्थ आहेत. बाहेर अनेक लढाया चालू असल्या तरी या संस्थेत कोणाही सैनिकांनी केव्हाही जावे आणि शांतता-सौख्य भोगावे. सैनिक मुसलमान असो अगर हिंदू अगर हिंदूंपैकी कोणत्याही जातीचा असो, त्यास तेथे मुक्तद्वार असते. बाहेरचे सारे विरोध या ठिकाणी मावळतात असा या संस्थेचा अधिकार आहे; आणि म्हणूनच ही संस्था साऱ्या हिंदुस्थानचा दवाखाना होऊन बसली आहे. जो कोणी या संस्थेत जातो, मग तो कोणीही असो, त्यास तेथे अन्न व रहावयास जागाही सुखाने मिळतात. त्याने तेथे वाटेल तितके दिवस राहावे. या मठपतीचे म्हणणेच असे की परमेश्वर कित्येकांना संपत्ती देतो ती इतरांच्या सुखसोयीसाठी दिलेली असते. आणि आपली सर्व दौलत रंजल्यागांजल्यांसाठी आहे, अशा भावनेनेच मठपती वागत असतात. ही त्यांची वृत्ती असामान्य असल्यामुळे सर्व देशभर त्यांच्याविषयी आदरभाव आहे. या भागातून वारंवार लष्कर जाते, त्या सर्वांना, जगात हा एक अवतारी पुरुष आहे, असे वाटते. या भागात अनेक जाती आहेत व एकाच्या हातचे दुसऱ्याला चालत नाही; म्हणून मठात सर्व जातीचे आचारी ठेवले आहेत. मठपतीने आपले जणू हेर सर्वत्र विखुरले आहेत की, मठाला डावलून कोणी जाऊच नये. शिवाजीराजे

या भागातून प्रथम गेले तेव्हा ते मठात आले नव्हते, म्हणून महंताने त्यांच्याकडे सर्व प्रकारची शिधासामुग्री पाठवून त्यांचे आदरातिथ्य केले होते. त्याबरोबर महाराजांना निरोपही पाठविला होता की, 'आपल्या आदरातिथ्यातून राव असो वा रंक असो कोणीही सुटत नाही तरी शिधा-सामग्रीचा स्वीकार करावा. आपण सर्वच जण गरीब आहोत. मी तरी हे कोठून आणले आहे ? "आम्ही काय कुणाचे खातो तो राम आम्हाला देतो" ते माझ्या एकट्यासाठी नसून सर्वांसाठी असते. या महंताचे नाव रामजी काहे. त्याजवर ईश्वराची पूर्ण कृपा आहे. त्याचा दानधर्म वाया जाणार नाही."

सुरेंद्रनाथ सेन यांनी "फॉरिन बायॉग्राफीज ऑफ शिवाजी" हा ग्रंथ लिहिला आहे. त्यामध्ये पृष्ठांक ६०–६१ वर जो मजकूर प्रसिद्ध करण्यात आला आहे त्याचा मराठीमधील अनुवाद के. स. भ. शंकर श्रीकृष्ण देव यांनी त्यांच्या 'श्रीसमर्थावतार' या ग्रंथामध्ये वरीलप्रमाणे प्रसिद्ध केला आहे. गार्डा हा मूळ लेखक शाहिस्ताखानाच्या पुरंदर भागातील स्वारीचे वर्णन करीत असताना मध्येच त्यांनी 'रामजीं'च्या कार्याचे वर्णन केले आहे व लगेच स्वारीची हकीगत त्याने पुढे चालू केली आहे. हे त्याने जे वर्णन सहजी केले आहे त्यावरून रामदासांच्या मठातून कशाप्रकारचे कार्य चालत असे याची कल्पना तर येतेच पण परकीयांच्या सुद्धा सहजपणे ध्यानात यावे इतके त्या कार्याचे स्वरूप ठसठशीत असल्याचेही आज आपणास कळून येते. असे नसते तर विषयांतर करूनसुद्धा त्या लेखकाने 'रामजी'चा निर्देश केला नसता. समर्थांचा सर्व महाराष्ट्रात होणारा संचार व त्यांच्या मठांची स्थापना ही एक मोठी सामाजिक घडामोड असली पाहिजे असे अनुमान यावरून काढता येते. "श्रीराम कर्ता हे असावे अभ्यंतरी" हे समर्थांचे वचन आहे त्यानुसार येथे त्यांचे वर्तन झाल्याचे प्रत्यक्ष वर्णन कॉस्मे ड गार्डा याने करून ठेविले आहे. हे एक मोठेच सत्कृत्य आहे. त्याबद्दल आपण त्याचेही उतराई असले पाहिजे.



## लोकमान्य टिळक

इंग्रजांच्या सत्तेच्या जोखडातून भारताला मुक्त करणाऱ्यांमध्ये लो. टिळक यांचा सिंहाचा वाटा आहे हे निर्विवाद आहे. पाचही खंडांमध्ये पसरलेल्या ब्रिटिश साम्राज्यशाहीला हादरवून हाकणाऱ्या लोकमान्यांना प्रेरणा देणाऱ्या ज्या विविध शक्ती होत्या त्यामध्ये श्रीसमर्थांना अनन्यसाधारण असे स्थान आहे. मंडाले येथील तुरुंगामध्ये लोकमान्यांनी भगवद्गीतेवर स्वतःचे भाष्य करणारा 'गीतारहस्य अथवा कर्मयोगशास्त्र' हा आपला बहुमोल ग्रंथ लिहिला. या ग्रंथामध्ये श्रीसमर्थांचा उल्लेख त्यांनी पृष्ठांक ४३५ वर कसा केला आहे ते पाहण्याजोगे आहे. ते लिहितात "पण तुकारामबुवा जरी संसारी होते तरी त्यांचा कल थोडासा कर्मत्यागाकडेच होता, म्हणून उत्कट भक्ती आणि त्याबरोबरच आमरणान्त ईश्वरार्पणपूर्वक निष्काम कर्म असे जे प्रवृत्तिपर भागवतधर्माचे लक्षण किंवा गीतेचा सिद्धान्त त्याचा पूर्ण खुलासा कोणास पाहिजे असल्यास तुकारामबोवांनीच शिवाजीमहाराजांस ज्या "सद्गुरूस शरण" जाण्यास सांगितले त्या श्रीसमर्थ रामदासस्वामींच्या दासबोध ग्रंथाकडेच त्यांनी वळले पाहिजे. भक्तीने किंवा ज्ञानाने परमेश्वराचे शुद्ध स्वरूप ओळखून कृतकृत्य झालेले सिद्ध पुरुष "शहाणे करून सोडावे। बहुत जन" (दास. १९, १०, १४) यासाठी निःस्पृहपणाने आपला व्याप यथाधिकार कसा सुरू ठेवतात ते पाहून सामान्य लोकांनी आपापले व्यवहार करावयास शिकावे. 'केल्याविण काहीच (होत) नाही' (दास. १९,१०,२५,१२,९,६,१८,७,३) असे अनेकवार सांगून शेवटच्या दशकात—

सामर्थ्य आहे चळवळीचे। जो जो करील तयांचे।
परंतु येथे भगवंताचे। अधिष्ठान पाहिजे॥

याप्रमाणे कर्माच्या सामर्थ्याची भक्तीच्या तारकत्वाशी समर्थांनी पूर्ण जोड घालून दिली आहे. ( दास. २०·४·२६ ) गीतेत " मामनुस्मर युध्य च " ( गी. ८·७ ) माझे नित्य स्मरण कर आणि युद्ध कर — असा जो अर्जुनास ८ व्या अध्यायात उपदेश केला आहे त्यातील किंवा कर्मयोग्यामध्येही भक्तिमान श्रेष्ठ ( गी. ६, ४७ ) असे सहाव्या अध्यायाच्या शेवटी जे म्हटले आहे त्यातील तात्पर्य हेच आहे. "

वरील अवतरणांवरून दासबोधाचा किती सखोल अभ्यास लोकमान्यांनी केला होता हे दिसून येते. पृष्ठांक ३७४ वर ते लिहितात " स्वार्थपरायण लोकांवर न रागावता किंवा त्यांची लोभवृद्धि पाहून आपल्या मनाची समता न ढळू देता, उलट अशा लोकांच्या कल्याणार्थच साधुपुरुष आपले उद्योग केवळ कर्तव्य म्हणून वैराग्याने सुरू ठेवीत असतात. हेच तत्त्व मनात ठेवून श्रीसमर्थ रामदासस्वामी यांनी दास-बोधाच्या पूर्वार्धामध्ये प्रथम ब्रह्मज्ञान सांगितल्यावर स्थितप्रज्ञ किंवा उत्तम पुरुष लोकांना शहाणे करून सोडण्यास वैराग्यांत म्हणजे निस्पृहपणाने लोकसंग्रहार्थ जो व्याप अगर उद्योग करीत असतात त्याचे वर्णन करण्यास अकराव्या दशकात ( दास. ११, १०; १२, ८-१०; १५·२ ) सुरुवात केली आहे. आणि पुढे १८ व्या दशकात ज्ञानी पुरुषाच्या म्हणजे जाणत्याच्या कथा, गोष्टी, युक्ती, पेचप्रसंग, साक्षेप, तर्क, धूर्तपणा, राजकारण, सहिष्णुता, तीक्ष्णता, औदार्य, आध्यात्मज्ञान, भक्ती, अलिप्तपण, वैराग्य आणि धारिष्ट, हव्यास, करारीपणा, निग्रह, समता विवेक इत्यादी अनेक गुण सर्वांनी शिकावे असे म्हटले आहे. ( दास. १८·२ ) परंतु या निस्पृहास लोभी मनुष्या-तच वागावयाचे असल्यामुळे –

" घटासी आणावा घट । उद्धटासी उद्धट ।
खटनटाशी खटनट । अगत्य करी ॥

असा अखेरीस समर्थांचा उपदेश आहे. ( दास. १९·९·३० ) तात्पर्य, पूर्णावस्थेतून व्यवहारात उतरले म्हणजे अत्युच्च पायरीचे जे धर्माधर्म त्यात थोडाबहुत फरक करावा लागतो हे निर्विवाद आहे. "

वरील अवतरण वाचले असता लोकमान्यांसारख्या कर्मयोग्याने स्वतःच्या वर्तनामध्ये विवेकाचा समतोल राखण्यासाठी श्रीसमर्थांच्या उपदेशाला कसे प्रमाणभूत मानले आहे याची जाणीव येते. ' उदंड राजकारण करताना लोकमान्यांना जे यश आले त्यावेळी जसा समर्थांच्या उपदेशाचा मागोवा त्यांनी घेतला त्याचप्रमाणे अध्यात्मशास्त्रातील प्रमेये अभ्यासताना देखील समर्थांचा विसर लोकमान्य टिळकांना पडलेला नाही.

विश्वाची उभारणी व संहारणी या प्रकरणात ते लिहितात " ही पुढील सृष्टी पंचमहाभूतांच्या मिश्रणाने होत असून त्या मिश्रणाच्या क्रियेस वेदान्तग्रंथात 'पंचीकरण' हे नाव दिलेले आहे. पंचीकरण म्हणजे पाच महाभूतांपैकी प्रत्येकाचा कमीजास्त भाग घेऊन त्या सर्वांच्या मिश्रणाने नवा पदार्थ तयार होणे असा अर्थ आहे....

" काळे पांढरे मेळविता । पारवे होते तत्त्वता ।
काळे पिवळे मेळविता । हिरवे होय ॥ असे दासबोधाच्या नवव्या

दशकात ( ९·६·४० ) सांगून तेराव्या दशकात—

" त्या भूगोलाचे पोटी । अनंत बीजाचिया कोटी ।
पृथ्वी पाण्या होता भेटी । अंकुर निघती ॥
पृथ्वी वल्ली नाना रंग । पत्रे पुष्पांचे तरंग ।
नाना स्वाद ते मग । फळे जाली ॥
.... .... .... .... .... .... ...
अंडज, जारज, स्वेदज, उद्भिज । पृथ्वी पाणी सकळाचे बीज ।
ऐसे हे नवलचोज । सृष्टिरचनेचे ॥
चारी खाणी चारी वाणी । चोऱ्यांशी लक्ष जीव योनी ।
निर्माण झाले लोक तिन्ही । पिंड ब्रह्मांड ॥ ( दा. १३·३, १०-१५ )

असे समर्थांनी जे वर्णन केले आहे ते याच धोरणावर केले आहे." ( संदर्भपृष्ठ १८१. )

कपिलसांख्यशास्त्र किंवा क्षराक्षरविचार यांची उकल करतानासुद्धा लोकमान्यांनी दासबोधाचा आधार पृष्टांक १५७ वर घेतला आहे. " प्रकृतीमध्ये परमाणुरूप अवयवभेद नसून ती सदैव एकाला एक लागून किंवा एकसारखी व निरवयव रूपाने सर्वत्र भरलेली आहे. परब्रह्माचे वर्णन देताना दासबोधामध्ये ( दा.२७·२·३ ) श्रीसमर्थ रामदासस्वामी सांगतात की,

" जिकडे पहावे तिकडे अपार । कोणीकडे नाही पार ।
एकजिनसी स्वतंत्र । दुसरें नाही ॥

सांख्यांच्या प्रकृतीला देखील हेच वर्णन लागू पडते.

—अशाप्रकारे श्रीसमर्थांच्या बोधाचा, आधिभौतिक किंवा आध्यात्मिक क्षेत्रातील विचारांचा प्रभाव लो. टिळकांमया मनावर इतका जबरदस्त होता की गीतारहस्या-

सारख्या महान ग्रंथाची प्रस्तावना लिहितानासुद्धा सरतेशेवटी ते लिहितात "**केल्या-विण काही होत नाही**" हा सृष्टीचा नियम लक्षात घेऊन तुम्ही निष्कामबुद्धीने कर्ते व्हा म्हणजे झाले .... मनुष्यमात्राचे संसारातले खरे कर्तव्य काय याचा तात्त्विकदृष्ट्या उपदेश करण्यासाठी गीताशास्त्राची प्रवृत्ति झालेली आहे.

लो. टिळकांच्या वाङ्मयामध्ये अन्यत्रही श्रीसमर्थांच्या संबंधात असंख्य उल्लेख आहेत. पण प्रस्तुत लेखामध्ये फक्त 'गीतारहस्य' या ग्रंथातूनच अवतरणे घेतली आहेत. या लेखमालेच्या उद्देशास ती पुरेशी आहेत असे मला वाटते.



## स्वातंत्र्यवीर सावरकर

स्वातंत्र्यवीर सावरकर हे दोन शब्द कानी पडताच एखाद्या धगधगणाऱ्या होमकुंडाची प्रतिमा डोळ्यासमोर येते. आपले सारे जीवनसर्वस्व केवळ देशासाठी त्यांनी देऊन भारताच्या स्वातंत्र्यासाठी पेटलेले होमकुंड त्या आहुतीने प्रज्वलित केले! अशा या स्वातंत्र्यवीराच्या नजरेतून श्रीसमर्थांचे दर्शन कोठे होते का यासाठी त्यांचे वाङ्मय पहावे असा विचार आला. तत्पूर्वी स्वा. सावरकर वाङ्मयाचे अभ्यासू डॉ. प्र. ल. गावडे यांना या संबंधात विचारणा केली तेव्हा त्यानी सांगितले की, " स्वा. सावरकर यांनी समर्थांच्या संबंधात स्वतंत्र लेखरूपात जरी,कोठे लिहिलेले नसले तरी समर्थांचा उल्लेख सावरकर– वाङ्मयात अनेक ठिकाणी आलेला आहे. ती स्थळे मुद्दाम शोधावी लागतील. शिव-समर्थांपासून बरीच प्रेरणा सावरकरांना लाभली होती. "

सावरकरांच्या महासागराप्रमाणे विशाल असलेल्या वाङ्मयातून नेमके रामदास-विषयक उल्लेख शोधणे हे काम मोठेच अवघड ! तथापि " समग्र सावरकर वाङ्मयाच्या आठव्या खडामध्ये पृष्ठांक ५२६– २७ वर मला सलग उल्लेख असलेला बराच मजकूर मिळाला. तो वाचल्यानंतर मला स्वा. सावरकरांमधील ही विशेषता दिसली की, त्यांच्या जीवनातील तत्त्वज्ञानाला तर श्रीसमर्थांचा आधार होताच पण कार्यपूर्तीनंतर त्यानी केलेल्या प्रायोपवेशनाच्या विचारांनाही त्यांनी समर्थचरित्राचा आधार घेतला ! खाली दिलेले अवतरण त्यादृष्टीने पहाण्यासारखे आहे. ( समग्र सावरकर वाङ्मय खंड आठवा पृष्ठांक ५२६ व ५२७ ).

" जे जीवनात संपादावयाचे होते ते सर्व संपादलेले आहे म्हणून आता कर्तव्य असे काही उरलेले नाही अशा कृतकृत्य भावनेने रिक्तकाम किंवा पूर्णकाम झालेले धन्य पुरुष आपण होऊन आपले प्राण विसर्जन करतात. ते आपले नश्वर जीवन,

विश्वाच्या चिरंतन जीवनात विलीन करून टाकतात. योगवासिष्ठात म्हटल्याप्रमाणे

अंता रिक्तो वही रिक्तो रिक्त कुम्भरिवाम्बरे ।
अंतःपूर्णो बहिःपूर्णो पूर्ण कुम्भरिवार्णवे ॥

हे त्यांचे ( देहत्यागाचे ) कृत्य आत्मसमर्पण म्हणून जे गौरविले जाते ते यथार्थच असते.

धन्योऽहं धन्योऽहं कर्तव्यं मे न विद्यते किंचित् ।
धन्योऽहं धन्योऽहं प्राप्तव्यं सर्वमद्य संपन्नम् "

जो जीव बाह्यनिमित्ताने जात नाही. तो आपला जीव आपण होऊन बळाने देणे हे कृत्य, व्यवहारात ज्याला आत्महत्या म्हणतात तीत आणि ह्या जिवंतपणी आपण होऊन अंतिम समाधी घेण्यात उभयसामान्य असताही त्याला ज्ञानेश्वरांनी 'आत्म-हत्या केली असे न म्हणता ज्ञानेश्वरांनी 'आत्मार्पण' केले, ज्ञानेश्वर समाधिस्थ झाले असे संतमहंतांपासून तो सामान्य जनतेपर्यंत सर्वामुखी म्हटले जात आहे.

तीच गोष्ट समर्थ रामदासांच्या आत्मार्पणाची आहे. प्रस्तुत यवनांचे बंड । हिंदू उरला नाही चंड । बहुता दिवसांचे मुंड । शासन मिळाले तयासी ॥" अशा परि-स्थितीने व्याकुळ होऊन त्या यवनांच्या बंडाचा समूळ निःपात करण्याच्या कार्यासच श्रीसमर्थांनी आपले जीवनकार्य मानले. महाराष्ट्रातील हिंदू समाजाच्या धर्मयुद्धाची आग पेटवून देण्यासाठी आपल्या तपोबळाने त्यांनी प्रचंड संघटना उभारली त्याला जोडूनच तिकडे त्याच महान ध्येयाने प्रेरित होऊन श्रीशिवछत्रपतींनी आपल्या शस्त्रबळाने मुसलमानांच्या शहांची आणि पातशहांची तक्ते गदगदा हलवीत जेव्हा प्रत्यक्ष औरंगजेबाच्या छातीवरच रायगडचे स्वतंत्र हिंदू राज्य, हिंदु ध्वज, नि हिंदु-सिंहासन उभारले तेव्हा हिंदू जातीच्या त्या महान विजयाने प्रफुल्लित होऊन समर्थ गर्जते झाले

स्वप्नी जे देखिले रात्री ते ते तैसेचि होतसे ।
बुडाला औरंग्या पापी म्लेंछसंहार जाहला ।
मांडली मोडिली छत्रे, हिंदुस्थान बळावले ॥

आपल्या प्रतिज्ञेची अशी कल्पनातीत पूर्तता झाली अशा कृतकृत्यतेच्या भावनेने आपल्या वयाच्या ७३ व्या वर्षी समर्थ रामदासांना आपले अवतार कार्य संपले असे वाटू लागले. इतक्यात शिवछत्रपतींचा अंतकाल झाल्याची दुष्ट वार्ता समर्थांना कळली. "राजे आम्हाला सोडून गेले" असे शोकाकुल उद्गार त्यांच्या तोंडून बाहेर पडले.

लगोलग संभाजी महाराजांनी उच्छृंखलपणाने शिवछत्रपतींना अनुकूल असलेल्या प्रमुख व्यक्तींना बंदीत घातले, कित्येकांना ठार मारले. स्वराज्यात भाऊबंदकीचा वणवा पेटला. स्वतः संभाजी संज्जनगडाच्या पायथ्याशी येऊन समर्थांना भेटण्यासाठी आग्रह धरून बसला. शिवछत्रपतींच्या अनेक विश्वासापात्र मंत्र्यांचा ज्याने घातपात केला तो शिवछत्रपतींचे राजगुरूच असलेल्या समर्थांनाही काही उपद्रव केल्याविना सोडणार नाही हे उघड दिसत असल्याने समर्थांनी कळविले की वयोमानाने आता गडाखाली उतरण्याची शक्ती आमच्यात राहिली नाही यास्तव आशीर्वादाचे पत्र तेवढे धाडीत आहे तेच ते खणखणीत, सणसणीत सुप्रसिद्ध पत्र होय की ज्यात समर्थांनी लिहिले होते—

"शिवरायाचे आठवावे रूप । शिवरायाचा आठवावा प्रताप ।
शिवरायाचा आठवावा साक्षेप । भूमंडळी ॥
जीवित तृणवत मानावे । कष्टे करून घसरावे म्लेंछावरी ॥
आहे तितुके जतन करावे । पुढे आणिक मेळवावे ॥
महाराष्ट्र राज्यचि करावे । जिकडे तिकडे ॥

याचवेळी हिंदूंचे स्वतंत्र राज्य स्थापन झाल्याचे ऐकून खवळलेला औरंगजेब साऱ्या मुसलमानी शक्ती एकवटून स्वतः मराठ्यांवर चालून येत आहे अशी बातमी आली. अशा या नवीन संकटाला तोंड देण्याची ज्याअर्थी आपल्या ७३ वर्षांवर गेलेल्या वयोमानाला नि व्याधिग्रस्त शरीरात शक्ती नाही, महाराजांसुद्धा आपली पिढीच्या पिढी निघून गेली त्या अर्थी आपले कर्तव्य संपले "उपाधीचे काम ऐसे । काही साधे काही नासे ॥" या न्यायाने या स्वतंत्र हिंदू राज्य स्थापनेचे जे महान कार्य पार पडते तीच आपल्या जीवनाची कृतकृत्यता ठरावी अशी भगवंताची इच्छा दिसते ! आता नवीन पिढीचे प्रश्न, नवीन पिढीच्या कर्तृत्वावर नि भगवंताच्या कृपेवर अवलंबून ! असा विचार करून समर्थांनी प्रायोपवेशन करण्याचा निश्चय केला. आपल्या सर्व शिष्य-शिष्यिणींना एकत्र करून सांगितले की, "आम्ही आता देह ठेवणार. आमचे अवतारकार्य संपले." ते ऐकताच शोकाकुल झालेल्या भक्तांना त्यांनी धीर दिला जरी

"माझी काया आणि वाणी । गेली म्हणाल अंतःकरणी ।
तरी मी असे जगज्जीवनी । निरंतर ॥

आणि मार्गदर्शनाविषयी विचाराल तर "हा माझा दासबोध मी मागे ठेवतो आहेच"

असे आश्वासून अचल आसन मांडून अन्नत्याग करून, रामनामाच्या गजरास समर्थांनी आरंभ केला. अशी कथा आहे की, त्या अखंड नामजपाच्या शेवटी श्री रामांनी समर्थांना दर्शन दिले. तेव्हा अत्यंत कृतकृत्य भावनेने श्रीरामाच्याच चरणी त्यांनी आपला शेवटला निश्वास सोडला ... .... समर्थ रामदासांनी आत्महत्या केली असे कोणीच मानीत नाही, तर समर्थांनी प्रायोपवेशनच केले, आत्मसमर्पण केले असेच इतिहास म्हणत आला आहे. "



## ह. भ. प. ल. रा. पांगारकर

संतांकडे व संतवाङ्मयाकडे पहाण्याचा सुशिक्षित लोकांचा दृष्टिकोण बदलण्यास ज्यांचे कार्य कारणीभूत ठरले, अशांमध्ये कै. ह. भ. प. ल. रा. पांगारकर यांची गणना करावयास पाहिजे. संत वाङ्मयावर त्यांनी जी ग्रंथमाला लिहिली तिने महाराष्ट्रातील रसिक वाचकांवर जणू मोहिनीच घातली होती. तुकाराम, मुक्तेश्वर एकनाथ यांची चरित्रे, भक्तिमार्गप्रदीप यासारखे ग्रंथ हे कै. पांगारकर यांचे जिवंत स्मारक आहे. 'मुमुक्षू' मासिकाद्वारा त्यानी अध्यात्मिक वाङ्मयाचा प्रसार केला. अशा या थोर अभ्यासू संशोधकाला श्रीसमर्थांबद्दल काय वाटते हे पहाणे महत्त्वाचे आहे. सर्वच संतांच्या जणू काही सानिध्यातच वावरणाऱ्या पांगारकरनी श्रीसमर्थांबद्दल खूप खूप लिहिले आहे; आणि त्यांच्या कार्याचे अचूक मूल्यमापन केले आहे. ते लिहितात—

"तीन शतकांमागे राष्ट्रावर कोणता तुफान प्रसंग आला होता व त्यातून स्वधर्मसूर्याचा महाराष्ट्र क्षितिजावर उदय होऊन तो कसा टळला हा रम्य इतिहास सर्वांस विदित आहेच. परधर्म व परदास्य यांच्या माऱ्याखाली हिंदुसमाज चिरडलेला, स्वधर्मकार्याचा प्रायः लोप झालेला, दैन्यदारिद्र्य उद्वेगाने लोक त्रस्त झालेले, अमर्याद फितवेखोरांचे फावलेले, नाना बंडपाखांडे माजलेली, चारित्र्य हीनावस्थेला पोहोचलेले– असल्या विकट परिस्थितीतून देवी भवानीने समर्थांच्या वाणीत व शिवबांच्या तरवारीत संचार करून महाराष्ट्राचा माथा जगाच्या इतिहासात उजळ केला. महाराष्ट्रधर्म, महाराष्ट्रीय लोक व मराठी भाषा यांचा डंका सर्वत्र गाजू लागला. सह्याद्रीच्या गिरीकंदरातून वीरश्रीचा व कर्तृत्वाचा वारा सोसाट्याने वाहू लागला. भीमथडीचे व गंगथडीचे घोडे हिंदुस्थानभर नाचू लागले. पराक्रमी वीर बुद्धिवंत मुत्सद्दी, स्वानुभवी संत व प्रासादिक कवी महाराष्ट्रात चमकू लागले. महाराष्ट्राचे हृदय वीररसाने उचंबळले. ब्रह्मतेज व क्षात्रतेज एकवटले. हात पाय, डोके हृदय–सर्व देहात वीरश्रीचा संचार

होऊन महाराष्ट्ररूपी विराट पुरुष कुंभकर्णी महानिद्रेतून जागा झाला. महाराष्ट्राची निद्रा कोणी घालविली ? तपःप्रभावाने अमोघ झालेल्या आपल्या संजीवनीवाणीने महाराष्ट्र ज्याने हलवून जागा केला, तो महामांत्रिक श्रीसमर्थ रामदासस्वामी हे होत. समर्थांची वाणी व शिवरायांची तलवार यांनी अद्‌भुत कार्य करून महाराष्ट्राचे 'आनंदवनभुवन' बनविले. समर्थांची ती तेजस्वीवाणी आजच्या महाराष्ट्राच्या कानावर पडावयास पाहिजे आहे." कै. पांगारकरांचे वरील विवेचन प्रभावी, हृदय-स्पर्शी व मार्मिक नाही असे कोण म्हणू शकेल ? समर्थांच्या यत्नवादासंबंधी अनेकांनी लिहिले आहे पण त्यामध्येसुद्धा पांगारकरांचे विवेचन अधिक मूलगामी ठरेल कारण नुसता यत्न किंवा 'ढोर मेहनत' त्याना अपेक्षित नाही. तर कार्यकारण संबंधांचा साकल्याने विचार करून 'अचूक यत्न' केला तरच यश येते हा मुद्दा त्यांनी फारच चांगल्याप्रकारे "समर्थ-संजीवनी" या पुस्तकात स्पष्ट केला आहे. ( पृष्ठ १२–१३ वर ) ते लिहितात—


"नुसत्या प्रयत्नाने कार्य साधते का, त्याला दैवबळाची मदत पाहिजे ? समर्थांनी दैववाद कोठेच सांगितला नाही. यत्नच मुख्य. मग यत्न करूनही कधी कधी अपेश का येते ? समर्थ म्हणतात की, "अचूक यत्न" होत नाही म्हणूनच अपेश येते. यत्नात कोठे तरी चुकते तेव्हाच अपेश येते. "अचूक यत्न तो देवो। चुकणे दैल्य जाणिजे" साक्षेपी लोकांचा संग करावा म्हणजे साक्षेप करण्याची स्फूर्ती होते व "साक्षपे साक्षपु वाढे। पुरती मनकामना।" उद्योगाने उद्योग वाढतो असा अनुभव कोणा उद्योगी माणसाचा नाही ? 'वन्ही तो चेतवावा रे। चेतविताचि चेततो।' इ. वचने अत्यंत बहारीची आहेत. समर्थांच्या वाणीची तेजस्विता प्रयत्नाचा पुरस्कार करताना व आळसाचा धिक्कार करताना कोणाच्याही प्रतीतीला येणारी आहे. तिच्यात विलक्षण जादू आहे. प्रयत्नांचा गौरव ऐकून प्रत्यक्ष आळसाचेही अंतःकरण थरारले पाहिजे अशी दिव्य स्फूर्ती त्यांच्या वाणीत आहे."

सध्याच्या लोकशाहीच्या युगामध्ये श्रीसमर्थांचा उपदेश कार्यकर्त्यांनी विशेषच ध्यानात ठेवला पाहिजे यावद्दल पांगारकर लिहितात "जग तिकडे जगन्नायक याचा विचार केला पाहिजे. कोण राजी राखले, कोण मनी भंगले हे क्षणक्षणा पहावे. थोडे बोलून समाधान करावे, कोणावर रागावण्याचा प्रसंग आला तरी त्याचे मन धरावे, तोडू नये. लोक राजी राखून सर्व काही करावे, विवेकाने लोक संभाळावे. सर्वत्र कीर्ति माजून भेटीचा हव्यास उपजेल ते करावे. जो जो भेटेल तो तो नष्ट मग "अवघे

नष्ट येकला भला। कशावरूनी ?" असेच कोणीही म्हणेल. ज्याला लौकिकात वर्तता येत नाही तो महंत कार्यकर्ता नव्हे. त्याने आपला काळ परमार्थ श्रवण करीत कंठावा, अभ्यासे प्रगट व्हावे नाहीतर झाकून असावे पण "प्रगट होऊन नासावे। हे बरे नव्हे" शेत पेरून ते वहायचे नाही, जवाहिराचा धंदा पत्करून, गावोगाव फिरावयाचे नाही, लोक समुदाय मिळवावयाचा पण संभाळावयाचा नाही याला काय म्हणावे ? प्रेम चढते वाढते राहील तरच परमार्थ पसरेल. सुरळीत (संगीत) चालला तो व्याप. नाहीतर संताप. मूर्ख मूर्खपणाने भांडतात व शहाणेही तसा कलह करतील तर फजितीला पारावार राहाणार नाही असो. ज्याचा त्याने विचार करावा व अनुकूल पडेल तसे वर्तावे"

राजकारणाची उपाधी कशी सांभाळावी याबाबतीत मात्र श्रीसमर्थ हे एकमेव संतच मार्गदर्शन करतात. अर्थात हे अन्य संतांचे न्यून नव्हे तर श्रीसमर्थांची विशेषताच होती व त्याचदृष्टिकोणातून कै. पांगारकर लिहितात, त्यावेळी समर्थांच्या वाङ्मयावर ते निराळाच प्रकाशझोत टाकतात — "परिभ्रमणात अनेक प्रकारचे लोक आढळतात सर्वांना अखंड राजी ठेवणारा पण उदासीनवृत्तीचा एखादा गाजी प्रापंचिक लोकातही भेटतो. आपल्याला कल्पनाही नसते असे पुष्कळ प्रकार जगात आढळतात एखाद्याचा प्रभावच असा असतो की दुसऱ्याला जपून न साधणारे काम तो सहज करून टाकतो. त्याला वाकड्या-तिकड्या मार्गाने जायचे कारणच पडत नाही.... शहाणे शहाणे लोक राजकारणात चुकतात, डाव अंगावर घेतात, त्यामुळे त्याची फजिती होते. म्हणून बिनचूक राजकारण करावे म्हणजे उदंड उपाय होतात. चुकीमुळे उपाय तोच अपाय होतो फड मोडतात, लोकांचा मनोभंग होतो व अशा गोंधळामुळे कोठे चुकते तेच कळेनासे होते! अंगात धमक नसता कार्याचा पसारा वाढविला म्हणजे तो घसरायचाच. दूरदृष्टीने अकलेचा बंध घातला नाही म्हणजे असेच व्हायचे. काही गलबला, काही निवान्त असा काळ कंठावा म्हणजे विश्रांतीला वेळ मिळते. उपाधी केलीच पाहिजे पण आत्मसमाधान हे मुख्य आहे : नरदेहाचे सार्थक त्यात आहे हे विसरू नये."

कै. पांगारकरांनी सुमारे ८० पृष्ठांच्या मजकूरामध्ये समर्थांच्या विचाराची ओळख करून देऊन नंतर 'रामदासी वेचे' सादर केले आहेत. त्यामुळे 'समर्थ संजीवनी' हे एक संग्राह्य पुस्तक झाले आहे. कै. पांगारकरांनी श्रीसमर्थांच्या वाङ्मय-वाटिकेतून निवडक सुवासिक फुलांचा हार तयार केला आहे. महाराष्ट्र शारदेचा तो एक अलंकारच झाला आहे!



## ह. भ. प. मामासाहेब दांडेकर

ज्यांचे नाव उच्चारताच आदराने मस्तक खाली नमते असे थोर ज्ञानी संत वै. सोनोपंत तथा मामासाहेब दांडेकर हे वारकरी संप्रदायाचे एक अध्वर्यू होते. मनाच्या श्लोकांमध्ये 'जगी धन्य तो दास सर्वोत्तमाचा' ही श्लोकमालिका वाचत असताना मामासाहेब दांडेकर यांचे वर्णन तर श्रीसमर्थ करीत नाहीत ना.... असे वाटते.

"मदे मत्सरे सांडिली स्वार्थबुद्धी ।
प्रपंचीक नाही जयाते उपाधी ।
सदा बोलणे नम्र वाचा सुवाचा ।
जगी धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥" हे वर्णन पहा नाहीतर

"नसे मानसी नष्ट आशा दुराशा ।
वसे अंतरी प्रेमपाशा पिपाशा ।
ऋणी देव हा भक्तिभावे जयाचा
जगी धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥"

हा श्लोक पहा, ज्यांनी वै. मामांना प्रत्यक्ष पाहिले असेल, त्यांचे बोलणे ऐकले त्यांना वरील श्लोकांचा अर्थ मनोमन पटेल असेच ते होते. ९ जुलै १९६८ या दिवशी त्यांचे निर्याण झाले. त्यांचे श्रीसमर्थांच्या संबंधातील विचार येथे देण्याचा मानस आहे.

वारकरी पंथ आणि समर्थांचा धारकरी पंथ यात मुळातच कोठे वैमनस्य नाही; तथापि काही दुराभिमानी व्यक्तींनी हा भेद माजविला, याबद्दल मामांना फार वाईट वाटे. तो भेद नाहीसा व्हावा यासाठी दासनवमीस श्रीसमर्थांच्या जीवनावर मामा

कीर्तन करीत असत. "सार्थ दासबोध वेचे" हे पुस्तक श्री. स. के. नेऊरगावकर यांनी लिहिले ते प्रा. दांडेकर धार्मिक वाङ्मय प्रकाशन मंडळ, पुणे या संस्थेने प्रकाशित केले आहे. त्या पुस्तकाच्या प्रस्तावनेमध्ये मामासाहेब दांडेकर यांनी पुढील मजकूर लिहिला आहे. "धार्मिक वाङ्मय मंडळातर्फे आजवर जी प्रकाशने झाली ती जवळ जवळ सर्वच वारकरी पंथाच्या साधूंच्या वाङ्मयाची झाली; पण हे प्रकाशन म्हणजे समर्थ संप्रदायाच्या वाङ्मयातील व ग्रंथ-राजाच्या वेच्यांचे प्रकाशन. धार्मिक वाङ्मय मंडळ हे वारकरी व रामदासी असा भेद करीत नाही व इतरांनीही तो करू नये असे त्याचे मत आहे. भेदावर नजर ठेवली तर तो भेद कोठवर पोहोचू शकेल याचे एक उदाहरण पुढीलप्रमाणे घेता येईल.

एक प्रसिद्ध सुशिक्षित वारकरी लेखकाने समर्थ हे साधूच नव्हेत, असे प्रतिपादिलेले आहे. अर्थातच मंडळास हे मत सर्वथा मुळीच मान्य नाही; हे सांगणे नकोच. साधू सर्व एकच आहेत. समर्थांनीच म्हटले आहे —

"साधु दिसती वेगळाले। परि ते स्वरूपी मिळाले।
अवघे मिळोनि एकचि झाले। देहातीत वस्तू॥


साधू सर्व एकच आहेत; व ते एकच भाषा बोलतात. हे वाचकांच्या लक्षात यावे म्हणून जवळजवळ प्रत्येक वेच्याच्या खाली ज्ञानेश्वरीतील समान ओव्यांचे आकडे दिले आहेत. वाचकांनी दासबोध व ज्ञानेश्वरी एकदम वाचावी म्हणजे महाराष्ट्रातील दोन पंथांच्या साधूंच्या उक्तीत किती विलक्षण साम्य आहे हे लक्षात येईल. .... म्हणून प्रथम आभार मानावयाचे तर हे वेचे काढून त्यांचे अर्थ देणारे व समान अर्थाच्या ओव्या काढून देणारे श्री. स. के. नेऊरगावकर यांचे. हे त्यांचे वेचे पाहिले म्हणजे मराठीतील दोन ग्रंथराज ज्ञानेश्वरी व दासबोध यांचा त्यांचा किती गाढ व्यासंग आहे हे कळून येणार आहे."

या संबंधात श्री. नेऊरगावकर यांनी सांगितले आहे की, ज्ञानेश्वरी व दासबोध या ग्रंथातील सदृश विचारांचा वाचकाला लाभ व्हावा व तौलनिक अभ्यास करणाऱ्यांना मदत व्हावी म्हणून परमपूज्य मामांनीच समानार्थी ओव्यांचे आकडे टाकण्याची मला सूचना केली.

मला वाटते वै. मामांनी हे जे कार्य केले आहे त्यामुळे दोन महान् संप्रदायामध्ये भेदाची जी काल्पनिक दरी निर्माण झाली होती ती सांधणारा पूलच उभा राहिला आहे. या **पुलाची आधारशीला हा मामासाहेबांसारखा पुण्य पुरुष आहे.**

दासबोध आणि ज्ञानेश्वरी यांच्या निर्मिती काळामध्ये ४०० वर्षांचे अंतर आहे. देश-कालवर्तमानानुसार त्यातील काही शिकवणुकीत फरक असला तरी देव व त्याची भक्ती, गुरुमहिमा, संसारदुःख, मनुष्यदेहाचे सार्थक असे जे विषय निरंतरचे असतात त्यासंबंधाची दोन्ही संतांची शिकवण समान आहे पण राष्ट्रीय जीवनामध्ये परचक्रपीडा, तजन्य दुर्गुण याची वाढ समर्थकालामध्ये झाली त्यामुळेच 'धटाशी आणावा धट । उद्धटाशी उद्धट । खटनटाशी खटखट । अगत्य करावा ॥ अशा प्रकारचा विशिष्ट कालखंडातील विचार समर्थांना मांडावा लागला तसा उद्गार ज्ञानेश्वरीत सामडणे साहजिकच अशक्य होय. हा महनीय विचार नव्याने व सुस्पष्ट मांडण्याचा प्रारंभ वै. मामासाहेबांनी प्रथम केला. त्यामुळे दोन्ही संप्रदायांवर त्यांचे मोठेच उपकार आहेत. त्यांनी श्रीसमर्थांच्या जीवनावर केलेले कीर्तन प्रत्यक्ष ऐकण्याची संधी मला लाभली नाही पण श्रोत्यांपैकी कोणीतरी हे लिपीबद्ध केले असल्यास त्याचे प्रकाशन जरूर करावे अशी सूचना येथे अप्रस्तुत होणार नाही.

म. पं. सं. ठाणे, जनसंपर्क शाखा.
वा. क्र. १४७५ दिनांक ६/८/८३



## समाजभूषण श्री. पु. पां. गोखले

"सज्जनगड"च्या वाचकांना 'समाजभूषण' पु. पां. तथा बाबूराव गोखले यांचा वेगळा परिचय करून देण्याची आवश्यकताच नाही. या मासिकाच्या अंकामध्ये श्रीसमर्थांच्या संबंधात आणि अन्य अध्यात्मिक विषयांवर त्यांचे अनेक लेख प्रसिद्ध झाले आहेत. त्यांनी साहित्याचा मोठा पसारा मांडला आहे. त्यामध्ये 'रामदासांचा जीवनवेद' 'रामदासांचा बालबोध' "समर्थ रामदास" आणि "श्रीराम-समर्थ" अशी चार पुस्तके केवळ समर्थांच्या संबंधातच आहेत. या उतार वयामध्ये त्यांची 'कार्यसाधनेची लगबग' यत्किंचितही कमी झालेली नाही. पद्मश्री पु. पां. गोखले यांना श्रीसमर्थांच्या संदर्भात जे सांगायचे आहे ते त्यांच्याच शब्दांत देण्याचा यत्न येथे करणार आहे.

"भोवतालची परिस्थिती पाहोन ऊर फाटतो" एवढेच बोलून समर्थ थांबले नाहीत तर "भले कुळवंत म्हणावे। ते ही वेगी हजीर व्हावे। हजीर न होता करावे लागेल पुढे॥" असे त्यांनीच प्रथम समाजधुरीणांना बजावले. मौर्याचे प्रचंड, वलाढ्य नि देशसंरक्षक साम्राज्य संस्थापून शेवटी त्यातील कशाचीही अभिलाषा न धरता तपश्चर्येसाठी हिमालयात निघून जाणारा आर्य चाणक्य, विजयनगरचे वैभवशाली साम्राज्य उभारणारे आणि शेवटी ईश्वरप्राप्तीसाठी वनाचा आश्रय करणारे स्वामी विद्यारण्य ही शुद्ध भारतीय परंपरा आहे, श्रीसमर्थ रामदास या तेजस्वी परंपरेतील एक दैदीप्यमान हिरा म्हणूनच त्यांची गणना इतिहासाने केली आहे.

समर्थांनी विवेकी प्रयत्न पुरुषार्थाला वैराग्याची जोड द्यावयास चुकू नये असे कर्तबगारांसाठी सांगून ठेवले आहे. रियासतकार सरदेसाई म्हणतात 'सर्व प्रचलित ग्रंथ किंवा गुरुपरंपरा सोडून रामदासाने रामोपासना सुरू केली, स्वतः गुरू न करता श्रीरामचंद्रासच गुरुस्थानी योजिले हेही त्याचे सहेतुक आहे. रामाची भक्ती करणे

रामाच्या नावाने प्रत्येक उद्योग करणे, सर्व यशापयश रामाला अर्पण करणे, सर्व सुख-दु:खांचा भार रामावर टाकणे हे रामभक्तीचे रहस्य. रामदास सांगतात – " संसार क्षणभंगुर आहे, केव्हातरी मरण येणारच ते मरण बिछान्यावर पडून येण्यापेक्षा स्वदेश सेवेत आल्याने जीवित साफल्य होते हे रामदासाने शिकविले. रामाची सेवा हीच "

वरील शब्दांमध्ये श्री. गोखले यांनी आपल्या ' श्रीराम समर्थ ' या आपल्या ग्रंथाचा शेवट केला आहे. समर्थ भक्तांपुढे एक नवीन कल्पना ते आता अत्यंत तळमळीने मांडत आहेत ती अशी की, श्रीसमर्थांच्या कार्याची कल्पना येण्यासाठी नुसत्या मराठी भाषेतील ग्रंथांचा आधार घेऊन भागणार नाही; तर भारतातील हिंदी, मल्याळी, तेलगु, ऊर्दू या भाषेतील पुस्तकांचे अध्ययन भारतातील अभ्यासकांनी करण्याची आता गरज आहे. असे झाले तर श्रीसमर्थांचे व्यक्तिमत्त्व हे महाराष्ट्रापुरते न राहाता ते खऱ्या अर्थाने गुरुस्थानी असल्याचे ओळखले जाईल. समर्थांची बुद्धी अतीव तीव्र होती त्यामुळे भारतातील अनेक भाषा त्यांनी आत्मसात केल्या होत्या. त्यांची कवने हिंदी, तेलगू आणि अन्य भाषांमध्ये देखील असण्याचा दाट संभव आहे. त्या भाषांचा अभ्यास करून त्या कवनांचे संशोधन करणे आता क्रमप्राप्त आहे. श्री समर्थ वाग्देवता मंदिर ही संस्था कै. नानासाहेब देव यांनी स्थापन केली. तिच्या ४० व्या वर्धापन दिनादिवशी मा. गोखले यांनी समारंभामध्ये हेच विचार व्यक्त केले.

परप्रांतामध्ये स्थायिक झालेली अनेक महाराष्ट्रीय कुटुंबे आहेत त्यांना तेथील भाषा अवगत झाल्या आहेत. त्यांनी तेथील भाषाभांडारामध्ये असलेले समर्थ–धन शोधून काढले पाहिजे हे काम एकट्यादुकट्याचे नाही. निदान वाग्देवता मंदिराकडे त्यांनी सदर लेखन किंवा मूळ हस्तलिखिते पाठविली तरी त्यांचा उपयोग करून पुढील संशोधनाचा मार्ग इतरांना खुला होईल. पद्मश्री गोखले यांना समर्थांबद्दल केवढा अभिमान आणि आदर आहे हे त्यांच्या बोलण्यात, लेखनात आणि प्रत्यक्ष कृतींमध्ये दिसून तर येतेच पण त्यांच्या स्फूर्तीच्या श्रोताचे प्रत्यक्ष उगमस्थान श्रीसमर्थच आहेत हे त्यांच्या निकटवर्तीयांना प्रत्ययास आले आहे. पुण्यास काही कारणाने ते आले असता रस्त्याकडेला उभे राहून आम्ही बोलत असता सारा वेळ त्यांनी वरील-प्रकारचे विचार व्यक्त केले. आपण रस्त्यावर आहोत याचे भान न राहिल्यावद्दल कदाचित लोक हसले असतील. त्यांचे स्नेही श्री. दयार्णव कोपर्डेकर हे तेव्हा उपस्थित होते. ते इतकंच म्हणतात, " श्री. गोखले यांनी जे ' वेड ' आयुष्यात जोपासलं त्याचा हेवा वाटावा असं ते आहे ! "



## श्री. रणजित देसाई

"स्वामी" "श्रीमान योगी" "राधेय" अशा एकापेक्षा एक सरस कादंबऱ्या लिहून मराठीमधील कादंबरी वाङ्मय समृद्ध करणारे सिद्धहस्त लेखक श्री. रणजीत देसाई यांचा वेगळा परिचय मराठी वाचकाला करून देण्याची आवश्यकता नाही. "जो जे वांछील तो ते लिहो" या मतप्रचाराचा काळ आज आला असला तरी "सत्यम् शिवम् सुंदरम्" हे उत्कृष्ट वाङ्मयाचे निकष मनी ठेवूनच रणजित देसाई स्वतःचे लेखन करीत राहिले आहेत.

'जेणे धारिष्ट चढे । जेणे परोपकार घडे ।
जेणे विषय वासना मोडे । त्या नाव ग्रंथ ॥ (दा. ७-९-३३)

यासारखी श्रीसमर्थांची ग्रंथासंबंधीची अपेक्षा ध्यानात ठेवून रणजित देसाई यांच्या वाङ्मयाकडे दृष्टिक्षेप केला तरी त्या कसाला तो उतरेल, विख्यात लेखक कै. वि. स. खांडेकर यांना गुरुस्थानी मानणाऱ्या रणजित देसाई यांचे श्रीसमर्थांच्या कार्यासंबंधात कोणते विचार आहेत हे समजाऊन घेण्याची माझी अनेक दिवसांची इच्छा होती. त्या इच्छेची पूर्ती होण्याचा अपूर्व योग नुकताच घडून आला.

पुणे येथील 'सौ. विमलाबाई गरवारे' प्रशालेमध्ये शिवाजी महाराजांच्या चरित्रावर एक व्याख्यानमाला श्री. रणजित देसाई यांनी ३० व ३१ जानेवारी या दिवशी गुंफली. सभेचे अध्यक्ष डॉ. प्र. ल. गावडे यांच्या प्रास्ताविकामध्ये त्यांनी व्याख्यात्यांची ओळख करून दिली. त्यानंतर रणजित देसाई यांच्या वक्तृत्त्वाचा जणू गंगौघच वाहू लागला. त्यांनी व्याख्यानाला प्रारंभ केला तोच श्रीसमर्थांच्या पुढील ओव्यांनी —
"निश्चयाचा महामेरू । बहुत जनासी आधारू । अखंड स्थितीचा निर्धारू ।
श्रीमंत योगी ॥ यशवंत कीर्तिवंत । सामर्थ्यवंत वरदवंत । पुण्यवंत नीतिवंत ।
जाणता राजा ॥"

आणि मग पुढील सर्व व्याख्यानामध्ये शिवरायांचे वरील सद्‌गुण कसकसे प्रगट होत गेले याचे सुरेख चित्रच त्यांनी श्रोत्यांच्या चित्तापुढे निर्माण केले. अफझलखानाच्या वधाचा, पावनखिंडीचा आणि आग्रा येथील बादशहाच्या भेटीचा प्रसंग विशेषच विस्ताराने त्यांनी कथन केला. त्यानंतर शिवरायांना राज्याभिषेक करण्यात आला हा प्रसंग त्यांनी आपल्या बहारदार शैलीत वर्णन केला. ते म्हणाले, "राज्याभिषेकाच्या समारंभाचे वृत्त साऱ्या देशभर पसरले पण त्याचा खरा अर्थ, त्याचे खरे महत्त्व साकल्याने जर कुणाला कळले असेल ते, दिल्लीच्या तक्ताधिपती असलेल्या बादशहा औरंगझेब याला आणि महाराष्ट्रामध्ये गावोगावी आपले शिष्य भिक्षेच्या निमित्ताने पाठवून धर्मजागृती करणाऱ्या संत रामदासांना ! असं म्हणतात की राज्याभिषेकाचे वृत्त दिल्ली दरबारात येताच दरबारातील बादशहाच्या खुषमस्कऱ्यांनी आणि त्याच्या सल्लागारांनी शिवरायाच्या मूठभर राज्याची आणि त्याला झालेल्या राज्याभिषेकाची टवाळी चालू केली तेव्हा बादशहा त्यांच्यावरच संतापला "बकवास बंद करो" अशी आज्ञा करून दरबारातून तो एकदम चालता झाला आणि त्याच्या महालात येऊन तो ढसढसा रडला ! अल्लासमोर गुडघे टेकून त्याने प्रार्थना केली. तो म्हणाला, "हे खुदा तुझी सेवा या बंदा गुलामाने केली पण तू कृपावंत झाला नाहीस. माझ्या सिंहासनाला नापाक सिवाजीच्या यशामुळे जो तडा गेला आहे तो सांधला जाणार आहे की नाही याची मला काळजी लागली आहे !"

सर्व भारतामध्ये धर्मवेड्या बादशहाच्या आणि अन्य सुलतानांच्या यशाचे पडघम वाजत असतानासुद्धा त्यांना आव्हान देऊन पायदळी तुडवून शिवाजीमहाराजांनी हिंदू समाजाला एकमेव अशास्थान होणारे आपले राज्य निर्माण केले याची महती इकडे महाराष्ट्रात समर्थ रामदासांनाच उमगली. त्यांच्या डोळ्यांमध्ये आनंदाश्रू निर्माण झाले ! त्यातूनच 'आनंदवनभूवन' या नितान्तसुंदर काव्याचा जन्म झाला. संताचे आनंदाश्रू पहाण्याला भाग्य लागतं ! महाराष्ट्रातल्या ज्या कोणाला श्रीसमर्थांचे ते आनंदाश्रू प्रत्यक्ष पहाण्याचं भाग्य लाभलं ते धन्य होत ! ते उद्‌गारले, "बुडांला औरंग्या पापी। म्लेंच्छसंहार जाहला। मोडली मांडली क्षेत्रे। आनंदवनभूवनी ॥" ते पुढे म्हणतात, "उदंड जाहले पाणी। स्नानसंध्या करावया।" याचा अर्थच आता आमच्या धर्माप्रमाणे वागण्यास कोठेही अडकाठी राहिलेली नाही, जुलमाचा अंमल आता संपला. शिवरायांच्या राज्यामुळे नवी सुप्रभात उगवली आहे." हे सांगून रणजित देसाई पुढे उद्‌गारले, "आज राजकारणी मंडळींनी जातीय दृष्टिकोणातून विचार करून

रामदासांना तुच्छ ठरविण्याचा प्रयत्न चालविला आहे. शिवरायांची व समर्थांची भेट झालीच नाही; त्यांचे परस्परांचे कोणतेही संबंध नव्हते असे आग्रहाचे प्रतिपादन ही मंडळी करीत असतात. समर्थांनी शिवाजीमहाराजांना लिहिलेल्या पत्रातील "तुमचे देशी वास्तव्य केले। परंतु वर्तमान नाही घेतले।" इतक्याच ओळी ते पुढे करून म्हणतात की, हे पहा, यावरून रामदास आणि शिवाजी यांची भेटच झालेली नव्हती. पण असे बोलणे म्हणजे सत्याचा केवळ अपलाप करणे आहे. मी स्वतः श्री. वि. स. खांडेकर यांना गुरुस्थानी मानतो. त्यांचा माझा दृढ परिचय आहे. मला नॅशनल अकादमीचे बक्षीस जाहीर झाले त्यावेळी अभिनंदन करणारे, खांडेकर यांचे एक पत्र मला आले. त्यातील काही वाक्ये अशी आहेत की त्यावरून 'रणजित देसाई आणि वि. स. खांडेकर' यांचे परस्परांशी कोणतेही संबंध नव्हते असे सिद्ध करता येईल. एखाद्या पत्रातील एखाद्या वाक्यावरून सत्य कधीही ठरवावयाचे नसते. ज्या वेळी इतिहासतज्ज्ञांना इतिहासाचे सांधे नीटपणे जुळविता येत नाहीत त्यावेळी त्यांनी साहित्यिकांची मदत घ्यावी तरच इतिहासकालात घडलेल्या विविध घटनांची संगती त्यांना जुळविता येईल. रामदासांच्या वाङ्मयाचा अभ्यास करणाऱ्याना ते वाङ्मय कितीतरी इतिहास सांगून जातं. रामदास तर 'शब्दसृष्टीचे ईश्वर' होते, आपले शब्द ते मोठ्या सावधपणे वापरत असत. शिवरायांना उद्देशून लिहिताना ते "नरपति हयपति गजपति। गडपति भूपति जळपति।" इत्यादी विशेषणांचा उपयोग करतात. यावरून शिवरायांच्या सेनेबद्दलची संपूर्ण माहिती समर्थांना होती. त्याच्यापाशी हत्ती, घोडे हे आहेत, नुसते किल्ले आणि जमीन त्याच्याजवळ नाही तर समुद्रावरसुद्धा शिवरायांची सत्ता चालते हे सुद्धा त्यांना ठाऊक होते. शिवरायांच्या आरमाराचा उल्लेख आपल्या वाङ्मयात करणाऱ्या रामदासांचे शिवरायांशी काहीच संबंध नव्हते असे म्हणणारे सत्याचा अपलाप करीत आहेत. राजकारण साधण्यासाठी ते जातीय वादावर फुंकर घालीत असतील हे ठीक आहे पण त्यामुळे सत्य काही नाहीसं होत नाही."

अशा उद्गारानंतर पुन्हा रणजित देसाई, आपल्या व्याख्यानाच्या समाप्तीकडे वळले. दोन दिवसांच्या या भाषणासाठी गरवारे हायस्कूलच्या पटांगणामध्ये जमलेल्या हजारो श्रोत्यांना श्री. देसाई यांनी तल्लीन करून सोडले यात शंकाच नाही. या भाषणाला श्रोत्यांचा प्रतिसाद केवळ अविस्मरणीय असाच होता. श्रीमान योगी या शिवरायांवरील कादंबरीप्रमाणेच श्रीसमर्थांसंबंधीही काही लेखन त्यांचे हातून घडो ही प्रार्थना.



## आचार्य प्र. के. अत्रे

"उत्कट भव्य तितुके घ्यावे। मळमळीत अवघे टाकावे" ही समर्थोक्ति जीवनामध्ये ज्यांनी आचरली असे कै. आचार्य प्र. के. अत्रे यांना ओळखत नाही असा कोणी मराठी मनुष्य असू शकेल का? शिक्षणक्षेत्र, वृत्तपत्रसृष्टी, चित्रपटसृष्टी, वाङ्मय, काव्य यांसारख्या भिन्न क्षेत्रांमध्ये विपुल कामगिरी करून आपला कीर्तिस्तंभ कै. आचार्य अत्रे यांनी उभारला आहे. सडेतोड निर्भय वक्तृत्व हा तर आचार्यांचा खासच गुण होता. वक्तृत्वाला विनोदाची फोडणी असल्यामुळे ते असंख्य श्रोत्यांचे आवडते वक्ते झाले. उत्कट गुण नेहमीच कीर्ती घेऊन येतात. "काही एक उत्कटेवीण। कीर्ति कदापि नोहे जाण।"

श्रीसमर्थांच्या संबंधात आ. अत्रे यांना अत्यंत उत्कट प्रेम वाटत असे. "मराठा तितुका मेळवावा" हे समर्थवचन अत्रे यांच्या 'मराठा' वृत्तपत्राचे ब्रीद वाक्य आहे ही एक गोष्ट देखील याबद्दलचा पुरावा आहे. समर्थांच्या वाङ्मयाचा व कर्तृत्वाचा ठसा आ. अत्रे यांच्या जीवनावर उमटला आहे. "देवद्रोही तितुके कुत्ते। मारून घालावे परते।" या प्रखर शब्दामध्ये समाजाचे उद्‌बोधन करणाऱ्या समर्थांच्या भाषेप्रमाणेच आ. अत्रे यांची भाषाशैली होती. संयुक्त महाराष्ट्र चळवळीचे वेळी आ. अत्रे यांची 'मुळूख मैदान' तोफ गर्जू लागली. ज्या दिशेला या तोफेचे तोंड वळेल तेथील बुरूज ढालळलेच पाहिजेत असा अनेकदा महाराष्ट्राला प्रत्यय आला आहे. समर्थांची निंदा-नालस्ती करणारे लिखाण आ. अत्रे यांच्या वाचनामध्ये येताच त्याच्या चिंध्या करून ती लक्तरे महाराष्ट्राच्या वेशीवर टांगण्याची कर्तबगारी त्यांनी 'मराठा' वृत्तपत्रामध्ये वेळोवेळी केली आहे. १९६९ च्या फेब्रुवारी ७, ८, ९ रोजी 'श्रीसमर्थांचे सत्त्वहरण' या शीर्षकाखाली आ. अत्रे यांनी तीन लेख प्रसिद्ध

केले आहेत. १४ मार्च १९६९ रोजी "कंधारचा लांडगा" आणि १६ मार्च रोजी "दासबोध' जाळणार तू?" हे दोन अग्रलेख लिहून आ. अत्रे यांनी समर्थांच्या निंदकांना अक्षरशः झोडपून काढले आहे. इतके की त्यानंतर त्यांच्या तोंडून ब्र देखील निघाला नाही! असे आचार्य यांनी लिहिले तरी काय? हे वाचकांना कळावे म्हणून काही अवतरणे येथे देण्याचा मानस आहे.

१४ मार्चच्या लेखामध्ये ते लिहितात "कंधारचे आ. केशवराव धोंगडे यांना आम्ही आतापर्यंत सभ्य गृहस्थ समजत होतो पण श्रीसमर्थांची टवाळी करणारे.... नावाचे एक वावीस पानी चोपडे लिहून त्यांनी आम्हाला 'गुरुवर्य अत्रे' असे संबोधून पाठविले आहे. ते वाचून धोंगडे हे एक अत्यंत वेवकूफ आणि अडाणी इसम आहेत अशी आमची खात्री झाली. म्हणूनच 'मराठ्या'च्या दोन अग्रलेखांत त्यांच्या भिकारड्या चोपड्याचे तीन तेरा वाजविले आणि प्रकट केलेला इरसाल मूर्खपणा साऱ्या महाराष्ट्राच्या वेशीवर टांगला. त्यामुळे मराठी मुलखात त्यांची सर्वत्र छीः थू झाली!"

"आदिलशहा आणि औरंगजेब यांची हेरगिरी समर्थांनी केली" असा आरोप करणाऱ्या नागपूरच्या प्रा. देशमुख आणि अमरावतीच्या श्री. मोहिते यांच्या लिखाणाचा समाचार घेत असता आ. अत्रे यांच्या तळपायाची आग मस्तकापर्यंत गेली आहे. त्यावेळी त्यांनी लिहिलेल्या अग्रलेखाची अवतरणे सुद्धा जशीच्या तशी देणे मला येथे शक्य नाही. काही शब्द वगळून लिहिलेली खालील अवतरणे पहावी.

"ब्राह्मणवैराचा आणि विशेषतः श्रीसमर्थ रामदास-द्वेषाचा भयानक महारोग ज्याच्या सर्वांगाला झाला आहे.....असा एक चांडाळ मनुष्य अमरावतीला राहतो. त्याचे नाव 'वीर उत्तमराव मोहिते"....कंधारच्या लांडग्याने नि नागपूरच्या प्रा. पोटभरे देशमुखाने श्रीसमर्थांची जेवढी निंदा केली नसेल त्याच्या शतपटीने या अवधूताने केली आहे. त्याबद्दल त्याचा सज्जनगडावरून शंभर वेळा कडेलोट केला तरी त्याच्या पातकाला पुरेसे शासन होणार नाही. हा स्वतःला वस्तुवादी नि विज्ञान-वादी म्हणवितो त्या भूमिकेवरून त्याने लिहिलेल्या दोन गचाळ चोपड्यांचा आम्ही 'मराठ्या'मध्ये सणसणीत समाचार घेतला आहे."

"शिवरायांच्या लष्करामध्ये गोमांस भक्षण करण्यास बंदी नव्हती आणि महाराजांनी अफझलखानाच्या सैन्यास गोमांस खावयास दिले" अशी विधाने मोहिते यांनी केली त्याबद्दल आ. अत्रे लिहितात "ही विधाने ताबडतोब सिद्ध


करून द्या नाहीतर शिवरायांसारख्या महापुरुषाची बदनामी केल्याबद्दल महाराष्ट्रीय जनता तुम्हाला जी भयानक शिक्षा देईल त्या शिक्षेला तयार रहा. शिवरायांची नालस्ती केल्यानंतर हा चांडाळ, समर्थरामदासांकडे वळला आहे. तो म्हणतो 'रामदासांपुढे औरंगजेबाने मांसाचा पुलावा आणला. मांसघृताने चपचपित अन्न। पोलावसातक पुढे ठेऊन। (औरंगझेब) म्हणे स्वीकार कर जोडून। तव हास्य आले समर्था। (दासविश्रामधाम १०७)"

समर्थांच्या नंतर सव्वाशे वर्षांनी जन्माला आलेल्या आत्मारामबोवांनी "दासविश्रामधाम" नावाचे प्रचंड काव्यबद्ध समर्थचरित्र लिहिले. समर्थांसंबंधी अनेक खऱ्याखोट्या आख्यायिकांनी ते भरले आहे त्यातली ही आख्ययिका आहे. श्रीसमर्थ आणि औरंगजेब यांची एकदा भेट झाली असता बादशहाने मांसान्न समर्थांपुढे ठेविले. तेव्हा समर्थांनी मांसाची गुलाबाची फुले केली. अशी ती आख्ययिका आहे. समर्थांपुढे औरंगजेबाने मांसाचा पुलावा ठेवला एवढाच अर्धवट पूर्वार्ध या अधमबोवाने येथे दिला आहे; नि पुढे त्या पुलावाचे रूपांतर समर्थांनी गुलाबाच्या फुलांत कसे केले हे सांगण्याचे मोठ्या युक्तीने टाळले आहे. जणू श्री समर्थांनी त्या पुलाव्याचा आस्वाद घेतला असला पाहिजे असेच त्या हलकट अधमबुवाला सुचवायचे आहे.

"रामदास हे औरंगजेब व आदिलशहा यांचे हेर होते" हा प्रा. पोटभरे देशमुख यांनी आपल्या ग्रंथात केलेला आरोप, आपणच मांडलेला सिद्धांत आहे असे जोराने प्रतिपादन करून तो खोडून काढावा असे आम्हाला आव्हान केले आहे. म्हणजे या अधमबुवाचा हलकटपणा पाहा ! रामदास हे औरंगजेबाचे हेर होते हा धादांत खोटा नि खोडसाळ आरोप कसलाही पुरावा न देता हा चांडाळ करतो नि तो खोडून काढा असे आम्हांला आव्हान देतो ! त्याला उत्तर द्यायचे म्हणजे त्याच्या चार मुस्काटात भडकावयाला पाहिजेत.

.... आम्ही या अधमाधम चांडाळाला जाहीरपणे आव्हान देतो की गावोगाव राहूदेच पण कोठल्याही गावात 'दासबोधा'चे एक पानही जाहीरपणे जाळण्याचा प्रयत्न कर ! नाही तुझ्या डोक्यावर घासलेट ओतून लोकांनी तुला त्या होळीवर जिवंत पेटविला तर महाराष्ट्राच्या अंगात शिवसमर्थांचे रक्त नाही असेच जग म्हणेल. आम्ही महाराष्ट्र शासनाला जाहीर इषारा देतो की शिवसमर्थांची बदनामी करणारे, महाराष्ट्रात जातीय भडका पेटविणारे अधमबुवा मोहित्यांचे जहरी लिखाण तात्काळ नाही थांबवण्यात आले तर त्याचे फार भयंकर परिणाम होतील."

आ. अत्रे यांच्या समर्थाभिमानाचे विचार वर उद्धृत केले आहेत. त्यांची भाषा कशी उग्र आहे याचा परिचय त्यावरून होईल. पण हेच अत्रे ज्यावेळी एखाद्या व्यक्तीबद्दल आदरपूर्वक लिहितात तेव्हा त्यांची भाषा किती मुलायम असते. ना. आंबेडकर किंवा म. फुले यांच्या कार्याविषयी त्यांनी जे काही लिहिले आहे त्यावरून हा मनुष्य किती उदारमतवादी नि निःपक्षपाती होता हे दिसून येते. आणि म्हणूनच श्रीसमर्थांच्या निंदकांवर ते घणाघाती प्रहार करू शकले हेही तितकेच खरे. आ. अत्रे यांनी लिहिलेले अग्रलेख वाचण्यासाठी मी मराठा कार्यालयात गेलो असता सध्याच्या संपादक श्रीमती शिरीष पै यांनी मला सदर लेख उपलब्ध करून दिले याबद्दल त्यांना या ठिकाणी धन्यवाद देणे आवश्यक आहे.





डॉ. सौ. कमलाताई गोखले

"शिवपुत्र संभाजी" या विषयावर सुमारे साडेपाचशे पृष्ठांचा एक ग्रंथ डॉ. सौ. कमल गोखले यांनी लिहिला आहे. संभाजीराजांच्या चरित्राचा दीर्घकाल अभ्यास करून मुंबई विद्यापीठाकडे सौ. कमलाताईंनी जो प्रबंध पाठविला त्यामुळे 'पी. एच. डी.' ही पदवी त्यांना प्राप्त झाली. अशा एका थोर व्यासंगी लेखिकेने संभाजीराजांची श्रीसमर्थांबद्दल काय भावना होती हे प्रकट करणारे ऐतिहासिक पुराव्यासह जे लेखन केले आहे त्यातील काही अंश येथे सादर करीत आहे.

"रामदासस्वामी आणि त्यांचे शिष्य यांचे संभाजीराजांशी संबंध कसे होते हे पाहणे अगत्याचे आहे. संभाजीमहाराजांनी रामदासी मठांच्या व्यवस्थेत जातीने लक्ष घातलेले पाहिले म्हणजे त्यांना स्वामीजी व त्यांच्या शिष्यगणांविषयी किती आदर होता हे सहज ध्यानात येते. समर्थांनी राजांना केलेला उपदेश सर्वांना माहिती आहे पण उलट राजाना त्यांच्याविषयी किती आदर होता याविषयी सर्वसाधारणपणे अज्ञानच आढळते."

शिवाजीमहाराजानी संभाजींला रामदासांकडे शिक्षणासाठी पाठविले होते.... १६७८ च्या डिसेंबर महिन्यामध्ये संभाजी सज्जनगडला गेला होता...राज्यारोहणानंतर शिवाजीमहाराज सर्व राण्यांसह सज्जनगडावर गेले होते तेव्हा संभाजीही त्यांच्याबरोबर होता. शिवाजीराजांच्या निधनानंतर संभाजीमहाराज रामचंद्रपंत आमात्य यांच्यासह ज्येष्ठमासी सज्जनगडावर येऊन समर्थांचे दर्शन घेऊन गेले.

चाफळ येथे श्रीरामाचा उत्सव करणे हे राज्यव्यवस्थेचे अंग होते. श्रीसमर्थांची आज्ञा मान्य करून श्रींच्या कार्याचा अंगीकार करणे, श्रीचा उत्सव चालविणे हा एक राजकारणाचा भाग आहे असे शिवप्रभू अखेरपर्यंत समजत असत. शंभू

छत्रपतींनी तेच धोरण अंगीकारले. त्यांनी कऱ्हाड, सातारा, सज्जनगड, चाफळ इत्यादी ठिकाणच्या अधिकाऱ्यांना आज्ञा करून उत्सवाच्या व्यवस्थेसंबंधी पत्रे पाठविली. श्री रामदासस्वामींच्या श्री रघुनाथ देवाच्या पूजा-नैवेद्यासाठी आणि देवाच्या सेवकांना जी मोईन शिवाजीराजानी १६७५ सालातील वर्षप्रतिपदेस करून दिली होती ती संभाजीमहाराजांनी दि. १८-१०-१६८० रोजी तशीच चालावी अशी आज्ञा देशाधिकारी व देशलेखक कासी रंगनाथ, प्रांत जावळी यांस दिली. (आधार श्रीसमर्थ सांप्रदायाची कागदपत्रे ले. ३६.)

श्रीरामदास स्वामींना अतीत अभ्यागत आदी नित्यनैमित्तिक चालविण्यासाठी शिवाजीमहाराजांनी बारीक सडीक तांदूळ, कणिक, डाळी, तूप, मीठ, सुपारी, दिव्यास तेल, कात असे एकूण एक मण साडे एकोणतीस शेर, साडेचार टाक आणि दरमाहे तीन तीन शेर ५०० विड्यांची पाने आणि एक दुभती म्हैस अशी मोईन करून दिली होती. ही मोईन (नेमणूक) आशीच चालू ठेऊन संभाजीराजांनी जावळीच्या अधिकाऱ्याला सांगितले की, जोपर्यंत म्हैस दुभती असेल तोपर्यंतच ठेवावी. म्हैस दूध देईनाशी झाली की ती जमा करून दुसरी द्यावी. नंदादीपासाठी देण्यात येणारे तेल रामदासांच्या समुदायाला देण्यास बजाविले. जावळीच्या सुभ्यातून पूर्वी फाटी आणि गवत देत असत ते सातारच्या सुभ्यातून देण्याची आज्ञा केली. सर्व सामान स्वामींकडे पोहोचते करून सामुग्री कमी पडणार नाही याची काळजी घेण्यास राजांनी अधिकाऱ्यांना बजावले होते. शिवाजी महाराजांच्या वेळेपासून श्रींच्या सेवेसाठी हरकारा होता त्याला दरमहा २ होन वेतन होते. त्याचा खर्च धर्मादाऊ म्हणून संभाजीराजांनी लिहिण्यास सांगितले होते." ही सनद महत्त्वाची असल्याने 'शिवपुत्र संभाजी' या ग्रंथात विस्तृतपणे छापली असल्याचे सौ. कमलाताई यांनी म्हटले आहे. येथे त्याचे आणखी एक कारण असे सांगितले की शिवाजी-महाराजांची मूळ सनद उपलब्ध नसल्यामुळे या सनदेला अधिक महत्त्व आहे. डॉ. कमलाताई पुढे लिहितात "संभाजी राजांनी समर्थांच्या व्यवस्थेत दाखविलेली तत्परता आणि बारकावा कौतुकास्पद आणि पुरेसा बोलका आहे."

संभाजीराजांनी राज्यभिषेकाच्या प्रसंगी समर्थांना आमंत्रण करण्यासाठी दिवाकर गोसावीबरोबर राघोअनंत यांना सज्जनगडावर पाठविले "आपणांस येणे होत नाही म्हणून समर्थांनी दिवाकर गोसावी यास पाठविले" तेव्हा समारंभानंतर समर्थांना वस्त्रे व देवाला पोषाख व जवाहीर इ० देण्यासाठी कारकुनांना राजांनी पाठविले असा

उल्लेख डॉ. कमलाताई यांनी ग्रंथामध्ये केला आहे. त्यानंतर संभाजीराजांना समर्थांनी पाठविले ते "अखंड सावधान असावे" हे प्रसिद्ध पत्र संपूर्णपणे ग्रंथात उद्धृत केले आहे.


शके १६०३, माघ वद्य नवमीस श्रीरामदासस्वामींनी अवतार पूर्ण केला ही बातमी संभाजीराजांना कळताच त्यांनी रामचंद्रपंत आमात्य यांना पुष्कळ द्रव्य देऊन सज्जनगडावर पाठविले. अमात्यांनी राजगुरूना शोभेल अशारीतीने दानधर्म करून उद्धवांकडून समर्थांचे उत्तरकार्य केले. दहनस्थळी समाधी बांधून चंदनाचा ओटा समर्थशिष्य तारळेकर गोसावी यांच्याकडून करवून त्यावर पादुकांची स्थापना केली. त्यानंतर राजे रामचंद्रपंतास घेऊन समाधीच्या दर्शनास गेले तेव्हा त्यांनी देवालय मोठे करण्यासाठी रामचंद्रपंतास आज्ञा केली. "अशा एक ना दोन अनेक तपशीलवार नोंदी ग्रंथामध्ये आहेतच पण त्याखेरीज आणखी एक महत्त्वाची नोंद पृष्ठांक ४४७ वर आहे. संभाजीराजांना समर्थांबद्दल आदर होता. तसाच राजांची पत्नी येसूबाईलाही होता. चाफळ येथील यात्रा सुखरूप पार पडाव्या असे त्यांना वाटत असे. संभाजी महाराजांच्या कारकिर्दीमधील तिचे एकच पत्र उपलब्ध आहे. या संबंधात येसूबाईनी दिलेले अभयपत्र असे आहे :—

"श्री देवाची यात्रा आली आहे. यात्रेस लोक यावयास अनमान करतील की आपले लोक दौड करून यात्रेस तसवीस देतील. ऐसीयासी अभयेपत्र अलियाने... देवाचा मोहछाये करतील म्हणौन हुजूर मालूम जाले. त्यावरून यात्रेस अभयेपत्र दिल्हे आहे. आमचे तर्फेने कोणी वाटे जाणार नाही. गावोगावी कागद पाठवून यात्रकरी बोलावून श्रींचा समारंभ करणे. आमचे अभये असे. जैसे सालाबाद चालिले आहे तेणेप्रमाणे आपलेही पत्र पाहिजे म्हणौन राजर्षी माधव गोसावी यांनी सांगितले. तेही आमचेही अभयेपत्र आहे. देवाचे इनामस्थळ तुमचे अध्येन आहे. आमचेतर्फेने आजार लागणार नाही. मोर्तबसुद देवाचा प्रसाद पाठविला तो आम्हास पावला" – मराठे आणि मुघलात लष्करी धामधूम चालली असताना मराठ्यांच्या सैन्यांकडून यात्रेकरूस त्रास होऊ नये म्हणून येसूबाईने हे अभयपत्र दिले असावे असे वाटते."

शिवपुत्र संभाजी हा ग्रंथ लिहून लेखिकेने संभाजीराजांच्या जीवनावर नवाच प्रकाशझोत टाकला आहे. त्यामुळे अनेक गैरसमज नष्ट होतील. ग्रंथाच्या शेवटी त्या लिहितात "जन्मभर चारी बाजूंनी वेढलेल्या शत्रूशी राजांनी लढा दिला होता. आपल्या प्रजेला दिलासा देणारा, मार्दव आणि कळकळ दाखविणारा राजा तितकाच

कठोर आणि निश्चयीही होता. "शिवरायास आठवावे । जीवित तृणवत मानावे । इहलोकी परलोकी रहावे । कीर्तिरूपे ॥ हा रामदासस्वामींचा उपदेश आठवून देशासाठी राजांनी देह कःपदार्थ मानला"

आपल्या ग्रंथामध्ये डॉ. सौ. कमलाबाई गोखले यांनी संभाजीराजे, येसूबाई यांना श्रीसमर्थांबद्दल वाटणारा आदर पुराव्यानिशी सिद्ध केला आहे. त्याप्रमाणेच त्यांनी त्यांना स्वतःला वाटणारी आदरभावना ग्रंथाशेवटी प्रगट केली आहे. असा ग्रंथ प्रसिद्ध केल्याबद्दल त्यांना शतशः धन्यवाद.


म. नं. मं. ठाणे, ग्रन्थालय शाखा.
ग्रंथ वाङ्मय विभाग
दा. क्र. 9404 दिनांक ६८।८३
विषय ..... .....



## प्रा. न. र. फाटक

महाराष्ट्रातील एक व्यासंगी इतिहास संशोधक प्रा. श्री. न. र. फाटक यांच्या नजरेतून श्रीसमर्थांचे दर्शन आता घ्यावयाचे आहे. त्यांनी "रामदास वाङ्मय आणि कार्य" हा साडेचारशे पृष्ठांचा ग्रंथ आणि "सार्थ दासबोध" हा सुमारे हजार पृष्ठांचा त्यांनी संपादन केलेला ग्रंथ यांच्या आधारे प्रा. फाटक यांच्या समर्थविषयक दृष्टिकोणाची माहिती आपण घेणार आहोत. प्रा. फाटक यांनी श्रीसमर्थांबद्दल जरा निराळा दृष्टिकोण मांडला आहे. पण त्यांनी समर्थांबद्दल वाईट असे कोठेही लिहिलेले नाही. त्यांना समर्थांबद्दल पूर्ण आदराची भावनाच आहे. त्याबद्दल आपण कोठेही गैरसमज करून न घेता शांतपणे त्यांचे म्हणणे काय आहे ते पाहिले पाहिजे. ज्या एका संशोधकाने समर्थांबद्दल दीड हजार पृष्ठांचा मजकूर प्रसिद्ध करून त्यामागील आपला व्यासंग प्रगट केला आहे, त्यांची श्रीसमर्थांच्या निंदकामध्ये गणना करता येणार नाही. फक्त एका किरकोळ मुद्यासंबंधी त्यांच्याशी आपला मतभेद होऊ शकतो तेवढा सोडून दिल्यास श्रीसमर्थांबद्दल त्यांनी जे उद्‌गार काढले आहेत ते पहाणे अगत्याचे आहे.

"पहिले हरिकथा निरूपण । दुसरे ते राजकारण ।
तिसरे ते सावधपण । सर्वविषयी ॥"

असे समर्थांनी स्वतःच सांगून ठेवले आहे. यामधील 'हरिकथा निरूपण' विषयक कार्यासंबंधी प्रा. फाटक यांचा कोणताही वाद नाही. पण ( Politics ) राजकारण हा शब्द ज्या अर्थाने वापरला जातो त्याच अर्थाने समर्थांनी ते केले नाही असे त्यांचे मत आहे. तिसरा कार्यभाग म्हणजे 'सावधपण सर्वविषयी' या भागाबद्दल तर सर्वसामान्य माणसास जी माहिती आहे त्यापेक्षा अधिकच माहिती प्रा. फाटक आपणांस देतील. जीवन यशस्वी होण्यासाठी जो 'सावधपणा' मानवाने बाळगा-

वयास हवा तो समर्थांनी स्वत: तर आचरलाच पण इतरांपुढे तो आदर्श त्यांनी उभा केला असे फाटक आपणास सांगतील. आता त्यांच्या लेखनामधीलच काही उतारे येथे सादर करतो.

( १ ) समर्थांच्या क्षात्रधर्मावरील व्याख्यानाबद्दल प्रा. फाटक लिहितात दा. ११:३ मधील दिनचर्येत " ज्या ज्याचा जो व्यापार । तेथे असावे खबरदार । १९ " असे एक वचन आहे. त्यास अनुसरून लढाऊ पेशाच्या लोकांना त्यांनी क्षात्रधर्म सांगितला. समर्थांना भेटण्याला, त्यांचा आशीर्वाद व जमल्यास अनुग्रह मिळविण्याला शिवाजी-महाराजांच्या पदरचे किंवा दुसरे मराठे सरदार शिपाई आल्यास त्यांचा व्यवसाय ध्यानात घेऊन त्यांनी आपली कामगिरी चोख बजावली पाहिजे, अशा धोरणाचा समर्थांनी उपदेश करावा आणि हे भेटणारे सर्व मऱ्हाष्ट–मराठे हिंदु असल्यामुळे त्यांनी देव मस्तकी धरावा, देवद्रोही कुत्र्यांना मारून पिटाळून लावावे, जेवढे मराठे मिळतील तेवढे एकत्र आणून मऱ्हाष्ट–मराठ्यांचा म्हणजे हिंदूंचा धर्म वाढवावा, हा संकेत या उपदेशात समर्थांच्या देशकालज्ञतेला किंवा सारासार विचारणेला पूर्णपणे शोभणारा आहे. ७ : ९ मध्ये समर्थांनी ज्याला जे आवडते तेच सांगावे, नाही तर हाताचे वीर-कंकण नाकात घालण्यासारखा आचरटपणा घडावयाचा, " जेथील तेथे आणिकी । कामा नये सर्वथा ॥ १५ " असा विवेक सांगितला आहे. शिपाईबाण्याच्या माणसांनी लढावे कसे हे समजाऊन देण्याऐवजी ध्यानकीर्तनावर जिभेचा पट्टा चालविण्याइतके समर्थ व्यवहारशून्य बुद्धीचे नव्हते ... प्रसंग व माणसे पाहून त्यांना जे उचित असेल ते सांगणे हा समर्थांच्या स्वभावाचा विशेष घटक आहे. "

( पृ. ३५५ रामदास वाङ्मय आणि कार्य )

( २ ) समर्थांची भाषा – " समर्थांपाशी मराठी भाषा पाणी भरत होती, असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. जे सांगावयाचे ते मोजक्या ठसठशीत शब्दात व नि:संदिग्धपणे सांगावे अशी त्यांची दृष्टी होती. मात्र त्या शिकवणुकीत धाक दपटशा नसावी, अशीही त्यांनी काळजी घेतल्याचा अनुभव येतो. शब्दासाठी ते कुठे अडून बसले नाहीत. " असे उद्गार प्रा. फाटक " सार्थ दासबोधात " पृ. ११ वर काढतात तर दुसऱ्या ग्रंथात ते लिहितात, " समर्थांनी आपल्या भाषेला संस्कृत किंवा परदेशी शब्दांची अटक ठेवलेली नाही. परदेशी शब्द वापरल्याने आपली भाषा विटाळते असा त्यांचा ग्रह नव्हता. आपला उपदेश सुबोध होण्यासाठी लोकांच्या परिचयाचे जे शब्द सुचतील, स्फुरतील त्यांचा उपयोग करावयाचा ही समर्थांची दृष्टी होती. शिवाय

समर्थांच्या ज्ञानभांडारामध्ये हिंदी हिंदुस्थानी भाषेच्या उत्तम परिचयाचा समावेश असल्यामुळे त्यांनी एकनाथ-तुकारामांच्या मानाने अधिक मुस्लिम शब्द बेधडक वापरले आहेत. मराठी कवितेत गम ( दुःख ) गुमान, तुफान, जबर्दस्त, खबर्दार, साहेब, फडनीस, बाजीगरी जर ( सोने ), बेईमान, तोलदार, फौज, कतार, एक-जिनसी, रूबरू इत्यादी पुष्कळ शब्द समर्थांनी वापरले आहेत ... समर्थांच्या भाषेचा एक उल्लेखनीय विशेष म्हणजे त्यांनी उत्पन्न केलेले काही वाक्प्रचार व नवे शब्द हा होय. कै. लोकमान्य टिळकांचे गीतारहस्य बारकाईने पाहिल्यास त्यांनी तेथे उपयोगात आणलेले कित्येक शब्द मुळात समर्थांचे आहेत असे लक्षात येईल. ब्रह्माचा एक-जिनसीपणा व मायेचा बहुजिनसीपणा या शब्दांचे मूलस्थान दासबोध असल्याचे दासबोधाच्या अभ्यासकांना सांगायला नको. 'चढते वाढते' वैभव यातील 'चढते वाढते' या वाक्प्रचाराचे जनक समर्थ असून त्याचा प्रयोग त्यांच्या पश्चात काही काळ चालू होता." यासारखा पानेच्या पाने मजकूर प्रा. न. र. फाटक हे सहजी लिहून जातात. समर्थांची भाषासुद्धा त्यांच्या वयोमानाप्रमाणे कशी प्रगल्भ होत गेली याची उदाहरणेही ते देतात.

( ३ ) समर्थ सांप्रदायाचा एक विशेष सांगताना ( रा. वा. का. पृष्ठ १७ ) ते लिहितात – "समर्थांनी स्त्रियांना आपल्या सांप्रदायाची दीक्षा देऊन त्यांच्या आयुष्याला परमार्थाची दिशा लावली व कृतार्थ केले. यासाठी त्यांना लोकापवाद सहन करावा लागला. पण समर्थांचे चारित्र्य इतके निर्मळ होते की,. त्यावर लोकापवादाचा काहीच परिणाम झाला नाही. समर्थांच्या शारीरिक जीवनाचा विचार करू लागले म्हणजे त्यांच्या ठिकाणी बाणलेल्या ब्रह्मचर्याच्या गुणाचे स्मरण झाल्याविना रहात नाही. या ब्रह्मचर्याची खूण त्यांच्या वाङ्मयातसुद्धा आहे. स्त्रियांसंबंधात अनुदारपणा तर त्यांनी कुठेच दाखविलेला नाही; पण ज्या योगाने वाचकांच्या मनात शृंगाराचा तरंग उठेल असे एक वाक्यसुद्धा त्यांच्या ग्रंथरचनेत सापडत नाही. बाणीचे ब्रह्मचर्य कडकडीतपणे पाळणाऱ्या पुरुषाचे हृदय किती स्वच्छ, निर्लेप असेल याचे निराळे वर्णन करावयास नको. त्यांच्या संप्रदायात शिष्यिणी आल्या तेव्हा त्यांचे वयोमान तारुण्याच्या उतारावर होते हे ध्यानात ठेवणे चांगले, शिष्यिणींमध्ये ज्यांची नावे सांप्रदायिक चरित्रकारांनी घेतली आहेत अशा मुख्य दोनच. एक वेणू व दुसरी अक्का .... वेणूच्या कीर्तनाला समर्थांची अनुज्ञा होती."

( ४ ) सार्थ दासबोधामध्ये प्रा. न. र. फाटक यांनी जो अर्थ सोप्या भाषेत

जागोजागी दिला आहे त्यामुळे तो ग्रंथ माझ्या नित्य वाचनात आहे. प्रा. फाटक यांनी मूळ ओवीचा अर्थ जेथे अधिक चांगल्या प्रकारे स्पष्ट केला आहे. अशी असंख्य स्थळे मी दाखवू शकेन. त्यांची नोंदही मी ठेवली आहे. त्यातील काही स्थळे येथे देणे उचित आहे.

( १ ) आपण विवेक उरेना। ( ६–७–४२ ) याचा अर्थ देहाला उपासना लावून ठेवावी आणि विवेकाने मीपणाची जाणीव नाहीशी करावी असा दिला आहे.

( २ ) " वस्तु येक आपण येक। ऐसी अस्ती वेगळीक " ( ६–१०–३४ ) या ओवीचा अर्थ देताना ब्रह्म व आपण यात जर वेगळेपणा असता तर अनुभवाचा विचार सुखाने करता आला असता " असा सोपा अर्थ दिला आहे.

प्रा. न. र. फाटक यांनी समर्थांच्या संबंधात व त्यांच्या कार्यासंबंधी बरेच लिहिले आहे. पण काही वेळा त्यांच्या हिमालयाएवढ्या चुकाही झाल्या आहेत. त्या त्यांनाही मान्य कराव्या लागतील. उदा. सार्थ दासबोधात प्रस्तावना लिहिताना पृष्ठ ६ वर ते लिहितात " हे देऊळ बांधले त्यावेळी नवी देवळे बांधण्याला, जुन्या देवळांच्या जीर्णोद्धाराला, उत्सवाला प्रतिबंध करावा अशा धोरणांचे एक फर्मान आदिलशहाने तयार केले होते. त्याकडे पाहता नवी देवळे बांधण्याचे एक विलक्षण साहस रामदासांनी केले असे म्हणावे लागते " इतके लिहिणारा हाच लेखक पुन्हा पान १६ वर लिहितो " देवस्थाने उभारावी वैभवसंपन्न करावी, तेथे यात्रा भरेल असे करावे असा निशंक उपदेश ज्याअर्थी रामदास करतात त्याअर्थी निदान त्यांच्या महंतीचा प्रारंभ झाला तेव्हा मुसलमानी अंमलातील धार्मिक अत्याचार शून्यापर्यंत येऊन पोहोचला असे म्हणावे लागते. " अशासारख्या प्रा. फाटक यांच्या उलटसुलट लिखाणाची संगती कशी लावावयाची ? तथापि त्यांच्या चुका काढणे हा येथील उद्देश नाही. श्रीसमर्थांच्या संबंधात जेथे काही विशेषता त्यांना आढळली ती त्यांनी मुक्त कंठाने गायिली आहे हे आपण ध्यानात ठेवले पाहिजे.

## प्रा. वि. रा. करंदीकर

प्रा. वि. रा. करंदीकर यांनी 'समाज प्रबोधन पत्रिकेच्या जाने-फेब्रु. १९७१' च्या अंकामध्ये श्रीसमर्थांच्या जीवनावर एक मार्मिक लेख लिहिला आहे. त्या लेखामध्ये श्रीसमर्थांच्या अवतारकार्याचे मर्म विविध दृष्टिकोणांतून प्रगट केले आहे. त्यामध्ये ते लिहितात—

"समर्थांची भूमिका राजकारणी मुत्सद्याची नव्हती तर ती मार्गदर्शक पुरुषाची होती; वैचारिक नेतृत्वाची होती. दीपस्तंभ स्वतः जहाजाचे सुकाणू हाती घेऊन नाव चालवीत नाही, तो केवळ प्रकाश देण्याचे काम करतो. पण त्या प्रकाशात खलाशी इष्ट त्या दिशेने जहाज नेऊ शकतात. त्या दीपस्तंभाप्रमाणे समाजाचा मार्ग विचारांच्या प्रकाशाने उजळून टाकण्याचे काम समर्थांनी पत्करले होते; आणि ते परिणामकारक रीतीने पार पाडण्यासाठी त्यांनी शिष्यसमुदाय गोळा केला. 'महंते महंत करावे। युक्तिबुद्धीने भरावे। जागते करून विवरावे। चोहोकडे॥" या त्यांच्या ओवीचे हे मर्म आहे. समर्थांच्या आधीपासून महाराष्ट्रात निरनिराळ्या संतांनी हे वैचारिक नेतृत्वाचे काम चालविले होते; पण त्यांच्यात व समर्थांच्यामध्ये एक महत्त्वाचा भेद होता. इतर सर्व संतांनी केवळ परमार्थाचा उपदेश केला. 'ऐहिक भोग हे मायात्मक अतएव मिथ्या" असे प्रतिपादन केले. जो भोग प्राप्त होईल तो प्रारब्धाचा भाग मानण्यास सांगितले आणि मोक्ष हा एकमेव जीवनहेतू मानून भक्ती हे त्याचे सुलभ साधन होय, हे सांगितले. देशाची ऐहिक स्थिती काय आहे हे त्यांच्या मनापर्यंत पोहोचले नाही. तो भाग त्यांच्या सुखाचा किंवा दुःखाचा विषय झाला नाही. तसाच त्यांच्या काव्याचाही झाला नाही.

समर्थांनीही या सर्व संतांप्रमाणे प्रामुख्याने परमार्थच सांगितला पण त्यांनी केवळ

परमार्थच सांगितला नाही तर त्याबरोबर आणखीही काही सांगितले. त्यांनी समाजाच्या अध्यात्मिक कल्याणाबरोबरच त्याच्या ऐहिक उन्नतीचीही चिंता वाहिली. त्यांनी प्रपंच वा परमार्थ यांचा समन्वय सांगितला. प्रारब्धापेक्षा प्रयत्नवाद मोठा असे समजाविले. लोकसंग्रह करावा, अनेकांची अंतरे राखावी असा उपदेश केला. पौरुष आणि पराक्रम यांची कास धरावयास सांगितले. महाराष्ट्र धर्माच्या तपशिलात कोणतेही मतभेद असोत पण 'मराठा तितुका मेळवावा। महाराष्ट्र धर्म वाढवावा' अशी व्यापक हाक समर्थांनी समाजास दिली.

समर्थ पारमार्थिक होते हे तर खरेच पण समाजाच्या राजकीय जीवनात घडणाऱ्या घटना समर्थांच्या हृदयापर्यंत पोहोचत होत्या. त्यातील बरेवाईट प्रसंग त्यांच्या भावनांना स्पर्श करू शकत होते हे त्यांचे विशेषत्व आहे. समर्थांचे देवकारण समाजाच्या दैनंदिन जीवनापर्यंत पोहोचले होते. देवकारण करीत असतानाच प्रपंचकारण व राजकारण जाणत होते. किंबहुना पुढची दोन व्यवस्थित चालतील तरच देवकारण नीट साधता येईल हे त्यांना उमजले होते. ती दिशा त्यांनी समाजाला दाखविली."

प्रा. करंदीकर यांनी वरील अवतरणांमध्ये समर्थांच्या उपदेशातील आगळेपण सुस्पष्ट केले आहे. ज्या मूर्तीसमोर स्वस्थचित्ताने बसून ध्यान करावयाचे त्या मूर्तीच उचलून नेऊन त्या फोडून टाकण्याचे कार्य यवनी सत्तेने हेतुपुरःसर चालविले होते, अशा काळात समर्थ वावरत होते त्यामुळे त्यांची मूळची प्रवृत्ती जरी शुद्ध अध्यात्मिक होती. तरी त्यांनी जनतेला केलेला उपदेश इतर संतांच्यापेक्षा निराळा आहे हे प्रा. करंदीकर यांनी विशेषत्वाने सांगितले आहे. कुलदेवता तुळजाभवानीपाशी समर्थांनी आपले हृद्गत व्यक्त करताना स्वतःच म्हटले आहे की, "वैराग्य घेतले पोटी। सर्व संसार मांडला!" म्हणजे पोटी वैराग्य असताना देखील मला राष्ट्राचा संसार मांडावा लागला आहे. म्हणून आता माझे मागणे एकच

"तुझा तू वाढवी राजा। शीघ्र आम्हासि देखता।"

*

प्रा. वि. रा. करंदीकर हे मराठीचे ख्यातनाम प्राध्यापक आणि फर्डे वक्ते म्हणून फर्ग्युसन कॉलेजमध्ये प्रसिद्ध आहेत. त्यांनी त्यांच्या लेखातील अवतरण प्रसिद्ध करण्यास संमती दिल्याबद्दल धन्यवाद.

# कै. आप्पासाहेब आळतेकर

कै. सदाशिव खंडो (तथा आप्पासाहेब) आळतेकर यांनी लिहिलेले "श्रीसमर्थ चरित्र" हा एक बहुमोल ग्रंथ आहे. याची २ री आवृत्ती १९७४ मध्ये प्रसिद्ध झाली. लेखकाच्या पश्चात आवृत्ती प्रसिद्ध होते यावरून देखील या ग्रंथाचे महत्त्व समजून येते. कै. आप्पासाहेब हे लोकमान्यांचे अनुयायी आणि घडाडीचे कार्यकर्ते म्हणून प्रसिद्ध होते. कराडच्या टिळक हायस्कूलच्या स्थापनेत त्यांचा पुढाकार होता. स्वातंत्र्याच्या चळवळीमध्ये त्यांना कारावासाची शिक्षा झाली त्यावेळी त्यांनी समर्थांच्या संबंधात सखोल वाचन केले. ज्याप्रमाणे अनेक महापुरुषांनी कारावासाच्या शिक्षेचा उत्कृष्ट उपयोग करून चिंतन मनन करून त्यातून अजरामर होणारी वाङ्मयकृती निर्माण केली. त्याप्रमाणे आप्पासाहेब आळतेकर यांनीही केले. मात्र प्रत्यक्ष कारावासात त्यांनी लेखन केले नाही तर सुटून आल्यानंतर १९३२–३३ या कालखंडामध्ये "श्रीसमर्थ चरित्र" लिहिले. या संबंधात लिहिताना त्यांचे सुपुत्र श्री. ग. स. आळतेकर (हेही स्वतः मोठे समर्थभक्त आहेत) म्हणतात "आप्पासाहेबांच्या अनेक वर्षांच्या सखोल व्यासंगाची, संशोधनाची व चिंतनाची महत्त्वाची कृती म्हणजे त्यांनी लिहिलेले "समर्थ चरित्र" ही होय. ही आप्पासाहेबांची महाराष्ट्राला अखेरची व बहुमोल देणगी आहे."

आळतेकरकृत "श्रीसमर्थ चरित्र" या पावणेतीनशे पृष्ठांच्या ग्रंथातून समर्थांच्या जीवन–कार्याबद्दल त्यांचा नेमका दृष्टीकोण कोणता आहे हे स्पष्ट झाले आहे. एखादा प्रदीर्घ शास्त्रीय प्रयोग पूर्ण केल्यानंतर ज्याप्रमाणे संशोधक त्या प्रयोगाचे अनुमान सूत्रमय भाषेत अगदी थोडक्यात जाहीर करतात त्याप्रमाणे कै. आळतेकर यांनी ग्रंथाच्या शेवटी एक महत्त्वपूर्ण सिद्धांत वाचकांपुढे प्रगट केला आहे. त्यात ते

लिहितात—

**" समर्थांनी आपल्या ग्रंथातून, सम्प्रदायातून कर्तव्यमूढ महाराष्ट्राला " धर्म-मूलक विवेकवैराग्यप्रधान प्रयत्नवाद " सांगून कर्तव्यदक्ष केले यावद्दल दुमत होईल असे आम्हांस वाटत नाही. " धर्मसूलक विवेकवैराग्यप्रधान प्रयत्नवाद " हे त्रिकालाबाधित तत्व आहे. कोणत्याही देशात, कोणत्याही धर्माच्या लोकांनी आपल्या देशाची निकृष्ट स्थिती घालविण्यास या तत्त्वाप्रमाणे प्रयत्न केल्यास त्यांना या प्रयत्नात यश आल्यावाचून राहणार नाही, असे त्रिकालाबाधित महत्त्वाचे तत्त्व सांगून समर्थांनी महाराष्ट्रातील किंकर्तव्यमूढ लोकांना जागृत केले हे समर्थांचे महत्तम कार्य होय. "**

या शब्दात आळतेकर यांनी ग्रंथाचा शेवट केला आहे. श्रीसमर्थांची आध्यात्मिक तसेच भौतिक व्यवहारातील शिकवण कशी होती याचे परीक्षण करताना तर्कशुद्ध पद्धतीने केलेला विचार हे या ग्रंथाचे वैशिष्ट्य मानता येईल. व्यक्तिनिरपेक्षपणे आपल्या चरित्रनायकाचे गुणवर्णन करण्याची लकब या ग्रंथात सर्वत्र आढळते. कोणत्याही अभिनिवेशाचा भाग येऊ न देता चरित्रग्रंथ कसा लिहावा याचा आदर्श कै. आळतेकर यांनी निर्माण केला आहे. चरित्रनायकाच्या गुणसमुच्चयामुळे मोहित झालेले बहुतेक चरित्रकार, ऐतिहासिक पुरावे डोळ्याआड करतात; पण असा कोणताही प्रकार या ग्रंथात दिसत नाही.

समर्थांची व शिवाजी महाराजांची गाठ महाराजांच्या पूर्व वयात पडली का उत्तर वयात पडली? समर्थांनी महाराजांना राजधर्म व क्षात्रधर्म सांगून " मराठा तितुका मेळवावा। महाराष्ट्रधर्म वाढवावा। " हा उपदेश पूर्व वयात केला का उत्तर वयात? यावद्दल टीकाकारांमध्ये मतभेद आहेत तेव्हा त्या वादात न पडता श्रीसमर्थांचा ठसा तत्कालीनच नव्हे तर नंतरच्या कांलखंडावरही कशाप्रकारे पडला याचे ठसठशीत चित्र के. आळतेकर यांनी काढले आहे. ते म्हणतात, " समर्थांनी यशप्राप्ती होण्याच्या प्रयत्नास जशी विवेक वैराग्यांची जोड दिली, त्याप्रमाणे भगवंताच्या अधिष्ठानाची म्हणजे धर्माची जोड दिली. राजकीय, धार्मिक सामाजिक अगर इतर कोणतीही राष्ट्रोन्नतीची चळवळ सुरू केली तरी त्या चळवळीत पूर्ण यश येण्यास भगवंताच्या अधिष्ठानाची आवश्यकता आहे, असे अनेक ठिकाणी समर्थ फार कळकळीने सांगतात. भगवान श्रीकृष्णांनी अठरा अध्याय गीतेचे रहस्य कै. लोकमान्य टिळकांनी " ज्ञानमूलक भक्तिप्रधान कर्मयोग " असे काढले आहे. समर्थ रामदासांनी महाराष्ट्रास

सांगितलेल्या वीस-दशक दासबोधाचे व इतर सामर्थ वाङ्मयाचे रहस्य थोडक्यात सांगणे झाल्यास "धर्ममूलक विवेक-वैराग्यप्रधान प्रयत्नवाद" असे सांगता येईल असे आम्हांस वाटते....या अमृततुल्य मंत्रोपदेशाप्रमाणे महाराष्ट्र वर्तला, तेव्हा महाराष्ट्राचे आनंदभुवन झाले, व महाराष्ट्र वैभव-शिखरावर चढला. **शिवसमर्थ कालनंतर चाललेल्या इतिहासप्रसिद्ध स्वातंत्र्ययुद्धात रामचंद्र नीळकंठ, पंत आमात्य, धनाजी जाधव, संताजी घोरपडे प्रभृती सुप्रसिद्ध मुत्सद्दी व योध्ये यांनी स्वार्थत्यागपूर्वक राष्ट्रहितैक दृष्टीने समर्थांच्या वरील मंत्रोपदेशाप्रमाणे प्रयत्न केला तेव्हा त्यांना त्या प्रयत्नात यश आल्याची साक्ष इतिहास देत आहे.**"

कै. आप्पासाहेब आळतेकर यांनी श्रीसमर्थ चरित्राचा सखोल अभ्यास करून वरील अवतरणामधील "विचार–मौक्तिके" शोधून काढली आहेत. कै. शंकर श्रीकृष्ण देव यांनी वरील ग्रंथाबद्दल अभिप्राय देताना असे लिहिले होते की "आपण योजिलेल्या त्रिखंडात्मक श्रीसमर्थ चरित्राचे दोन खंड प्रसिद्ध झाले आहेत पण श्रीसमर्थावतार हा खंड प्रकाशित होण्यापूर्वीच मला देह टाकून जावे लागले तर.... आप्पासाहेबांनी लिहिलेले चरित्रच त्रिखंडात्मक चरित्राच्या पहिल्या खंडाच्या जागी मानण्यात यावे!" इतक्या महत्त्वाच्या ग्रंथाची पुन्हा आवृत्ती काढल्याबद्दल प्रकाशकांना धन्यवाद देणे येथे अस्थानी होणार नाही, असे वाटते.

[ संदर्भ : श्री समर्थ चरित्र, ले. : स. खं. आळतेकर, मूल्य १५ रु., कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे ३० ]



## श्री काकासाहेब गाडगीळ

ज्यांच्याबद्दल साऱ्या महाराष्ट्राने सदैव अभिमान बाळगावा असे एक प्रसन्न आणि भारदस्त व्यक्तिमत्त्व कै. न. वि. गाडगीळांच्या रूपाने महाराष्ट्राला लाभले होते. काकासाहेब गाडगीळ या नांवाने ते ओळखले जात यावरून त्यांची समाजाशी जवळीक सिद्ध होते. विशिष्ट मिस्किल शैलीचा वक्ता, सिद्धहस्त लेखक, तळमळीचा देशभक्त, व्यासंगी विद्वान आणि चतुर राजकारणी अशा शब्दांत त्यांचे वर्णन करणे म्हणजे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला बंधन घालण्यासारखे होईल, त्यांच्या निर्भर वाणीतून निघणारे सडेतोड उद्‌गार विस्मयाने ऐकण्याचे भाग्य मला लाभले होते. अशा थोर माणसाला श्रीसमर्थांबद्दल काय वाटत होते हे पाहणे अगत्याचे आहे.

१९६१ च्या अमृत मासिकाच्या नोव्हेंबरच्या अंकामध्ये त्यांनी 'ग्रंथ माझे गुरू' या मथळ्याखालीं एक लेख लिहिला आहे. त्या लेखामध्ये श्रीसमर्थ आणि ग्रंथराज दासबोध यांच्याबद्दल अत्यंत गोरवाचे उद्‌गार, मोठ्या आत्मीयतेने त्यांनी काढले आहेत. पंजाबचे गव्हर्नर म्हणून त्याकाळी काकासाहेब काम करीत होते. वेळात वेळ काढून त्यांनी दासबोधाबद्दल जे लिहिले आणि भावी पिढ्यांना मार्गदर्शन केले ते संस्मरणीय आहे. ते लिहितास –

'आमची म्हातारी आत्या रामदासांचे श्लोक शिकवीत असे आणि पुष्कळ वेळा ते म्हटले नाहीत तर निराळ्या अर्थाने 'प्रसाद' मिळे." अशा प्रकारे रामदासांच्या वाङ्मयाचा पहिला संस्कार त्यांच्यावर झाला. पुढे पंधरा वर्षे त्यांनी जे विपुल वाचन केले त्यात थिऑसॉफिकल सोसायटीचे वाङ्मय, बायबल, धर्मानंद कोसंबी यांचे गोतमबुद्ध विषयक लिखाण, इतकेच काय पण कुराण ग्रंथ यांचाही समावेश होता. दयानंद स्वामींच्या सत्यार्थप्रकाशने त्यांना थोडा प्रकाश दिला. गीता अनेकदा वाचली.

ज्ञानेश्वरी तर गेल्या अनेक वर्षांत नियमाने वाचली इत्यादी माहिती त्यांनी त्या लेखामध्ये प्रथम सांगितली असून त्यानंतर त्यांनी जे लिहिले ते फारच मननीय आहे. " अनेक व्यक्ती व अनेक ग्रंथ व थोडेसे प्रसंग यांनी जरी गुरुत्व केले असले व त्यांच्याबद्दलची कृतज्ञता योग्यप्रसंगी मी व्यक्त केली असली तरी ज्या एका ग्रंथाने जीवनात आल्यापासून आजतागायत " गृहिणी सचिवा सखी मित्रा " इतक्या वृत्तीने साथ दिली आहे तो ग्रंथ म्हणजे " श्रीमत दासबोध "च होय. त्याच्या श्रवणाने मननाने काय होते हे पूर्णपणे सांगावयास शब्द समर्थ नाहीत. " जयाचा भावार्थ जैसा । तयास लाभ तैसा " असे फारतर सांगता येईल ! "

" शीख सांप्रदायात देव आणि गुरू यांचे समीकरण आहे आणि शिखांचा पवित्र ग्रंथ म्हणजे " गुरुग्रंथ " हा त्यांचा गुरू आहे. दहावे गुरू गोविंदसिंग यांच्यानंतर कोणी गुरू झाला नाही, शिखांनी मानला नाही आणि " गुरुग्रंथ " हाच परमेश्वर, त्याची पूजा ते करू लागले. जेव्हा केव्हा काही मार्गदर्शन हवे असेल किंवा मुलाचे नाव ठेवावयाचे असेल तर शलाका परीक्षेप्रमाणे एकदम पान उघडावयाचे व जेथे बोट पडेल ते वाक्य परमेश्वराचा म्हणजे गुरूचा आदेश मानावयाचा किंवा ज्या नावावर बोट पडेल ते नाव मुलाला ठेवावयाचे ही त्यांची रीत. त्याचप्रमाणे अनेकदा संभ्रम उत्पन्न झाला, काय करावे, काय करू नये अशी शंका मनात उत्पन्न झाली असता, " उदास वाटते जीवी । आता जावे कुणीकडे " असे वाटले असता मीही त्याचप्रमाणे करतो, व दासबोधातील जे वाक्य बोटाला लागेल त्यातील अर्थ ईश्वरी संकेत जरी मानत नसलो तरी त्यावर विचार करून निर्णय घेतो हे खरे आहे. –हे प्रासंगिक झाले. नित्य प्रतिदिन सकाळी अथवा शयनापूर्वी न चुकता " दासबोधातील निदान एखादा समास वाचीत असतो. प्रवासात मग तो धरणीवरून असो वा आकाशातून असो, हा नियम क्वचितच चुकला असेल. माझ्या अल्पबुद्धीने करीत असलेल्या प्रपंच आणि परमार्थ या दोन्ही क्षेत्रांमध्ये आपुलकीने पण निःस्पृहपणे मार्गदर्शन करणारा हा ग्रंथ माझा गुरू आहे. त्यागार्थ सांगितलेली मूर्ख लक्षणे, अंगी बाणण्यासाठी सांगितलेली उत्तम लक्षणे, पढत मूर्खाची लक्षणे, सर्वकाही अनुभवात पडताळून पहाण्यासारखी असल्याने पटत जातात. " हरिकथा निरूपण, राजकारण व सावधपण सर्वविषयी " हे या ग्रंथाचे मुख्य सूत्र ज्याने जाणले तो संसारात उत्तीर्ण झाला, हे सांगण्याचे कारण नाही. संघटण कसे करावे, कोणास हाती धरावे, कोणास दूर सारावे, राजकारण कितपत उघडे, कितपत गुप्त ठेवावे, या सर्वांविषयी केलेली

चर्चा; श्रेष्ठ मार्गदर्शन आहे. ज्ञानी आणि उदास परंतु समुदायाचा हव्यास करणाऱ्यास एकान्त सांगितलेला आहे. आणि "एकान्ती विवेक अनुमाना आणूनि सोडी" हे खरे आहे. "विवेकामध्ये सापडेना ऐसे तो काहीच असेना" व "सतत विवेक समजावा" हा या ग्रंथाचा उपदेश आचरण्याने जीव स्थिर व मन समतोल होते. "जे जे अनुकूल ते करावे तात्काळ। होईना त्यास निवळ विवेक उमजावा।"

अशा प्रकारचे मार्मिक विवेचन केल्यानंतर ते पुढं लिहितात – शाळेतील भिंतींवर ज्याप्रमाणे बोधवाक्ये लिहिलेली असतात त्याप्रमाणे मनाच्या मंदिरामध्ये या ग्रंथातील बोधवाक्ये खोदली गेली आहेत; व जेव्हा मनातील विचार बाहेर पडत असतो त्यावेळी त्याची दृष्टी या बोधवाक्यावर जाते व तो विवेकी होऊन बाहेर पडतो. अनेक विकल्प आयुष्यात आले आहेत. सत्य का लोकप्रियता, प्रिय बोलावे का यथार्थ बोलावे, अशा अनेक प्रसंगी 'दासबोधा'तील वाक्ये डोळ्यांपुढे येतात व मार्ग सुचतो. आपण जे बोलणार आहोत ते करण्याची जबाबदारी जास्तीत जास्त या ग्रंथाने मला शिकविली आहे. शब्दमत्सर करू नयें, द्वेष करू नये, अवघेची सुखी असावे, ही वासना असावी, सकळ लोकांचा जिव्हाळा मोडू नये, 'महंती नव्हे सुखाची' ही सर्व शिकवण सतत डोळ्यांपुढे आहे."

हे सर्व सांगितल्यावर काकासाहेबांनी नेमके कोणते काम करण्याची प्रेरणा दासबोधाने आपणास दिली याबद्दल चार शब्द लिहिले "करंटेपणा हा आज सामाजिक दोष झाला आहे. तो निवारला पाहिजे. हे काम केले पाहिजे याचीही प्रेरणा याच ग्रंथाने दिली आहे. "कष्टाशिवाय काही नाही।" "केल्याशिवाय होत नाही," अवघा वेदान्त सांगणे पुरेसे नाही याची जाणीव सतत वाचनाने याच ग्रंथाने मला दिली आहे; आणि म्हणून या ग्रंथाचे उपकार मी विसरू शकत नाही. कोणत्याही परिस्थितीत मी हडबडत नाही, गडबडत नाही, उपासनेचा आश्रय सोडत नाही. केवळ प्रपंचातच नव्हे तर परमार्थाच्या क्षेत्रातही मी काही अल्पस्वल्प प्रगती केली असेल, निदान जे काही मनःस्वास्थ्य मला लाभले आहे ते या ग्रंथामुळे" या शब्दांत त्या लेखाची समाप्ती झाली आहे. काकासाहेबांचा हा लेख म्हणजे समर्थ-भक्तांवरमोठे उपकार आहेत. कारण आयुष्यात ज्यांनी काही उच्च शिखर जिंकले त्यांचे उद्‌गार स्फूर्तिदायी ठरतात.

कै. काकासाहेब पुणे विद्यापीठाचे कुलगुरू असताना १९६५ च्या दासनवमी विशेषांकासाठी त्यांनी आपला संदेश पाठविला होता. तो असा, "श्रीसमर्थ राम-

दासस्वामी यांच्या पुण्यतिथीनिमित्त गडावर उत्सव होणार आहे हे ऐकून समाधान वाटले. आजच्या संभ्रमित संकटकाळात स्पष्ट व निःस्पृहपणे बोलणारी श्रीसमर्थांसारखी व्यक्ती हवी आहे. "निवाडे जेथिल तेथे" ही आजची गरज आहे. मोघम व मधुर शब्दांनी काम होणार नाही. केल्यावीण सांगितले जात आहे व सांगितलेले केले जात नाही, आणि ह्या विकृत आणि विसंगत परिस्थितीत सामान्य मने गडबडली आहेत. किंचित घाबरलेली आहेत. आणि म्हणून समर्थांच्या शब्दात सांगावेसे वाटते की "हडबडू गडबडू नका आणि उपासनेला सोडू नका" प्रसंग बाका आहे. पण मनुष्य हा अपरिमित विवेकाचा व विद्येचा प्रतिनिधी आहे. आणि त्या दृष्टीने त्याने वागले पाहिजे तरच समाजाची नौका संकटातून पार पडेल. अन्यथा नाही. म्हणून उपासना, उपासना हाच मंत्र जपला पाहिजे. व त्याचा अर्थ म्हणजे आपले आदर्श त्यांनाच धरून वागले पाहिजे हा आहे."

१९६६ मध्ये पंतप्रधान शास्त्रींच्या आकस्मिक निधनानंतर चोवीस तासांतच काकासाहेब गेल्याचे वृत्त देशाला ऐकावे लागले! "दुःख एकटे कधी न येत परि दुःखामागून दुःख नवे।" या काव्यपंक्तीचा अनुभव आला. देशसेवेचे असिधाराव्रत ज्यांनी जन्मभर पाळले आणि कर्तबगारीच्या जोरावर "वीज खाणकाम मंत्री" या नात्याने त्यांनी जे कार्य केले, राज्यपाल, कुलगुरू म्हणून ते कसे वावरले याची विस्मृती महाराष्ट्राला पडणार नाही. सातारा येथील मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. अशा या अष्टपैलू हिऱ्याला 'दासबोधा'चे कोंदण लाभल्याने त्याचे तेज अधिकच विलोभनीय झाले हे त्यांच्यात विचारांच्या आविष्कारातून दिसून येते. त्यांच्या स्मृतीला आदरांजली.

ब. पं. मं. ह्यॉ, ...
...
ह. ने. ... [illegible] ...
[illegible] ...



## वेदमहर्षि पं. सातवळेकर

"वेदमहर्षि" पंडित श्री. दा. सातवळेकर हे साऱ्या भारताला ललामभूत असलेल्या महापुरुषांपैकी एक होते. विसाव्या शतकातील थोर भारतीयांची यादी करावयाची झाली तर त्यात त्यांचा समावेश केल्याविना ती यादी अपुरी राहील ! हिंदी, मराठी, गुजराथी, इंग्रजी अशा अनेक भाषांमध्ये त्यांचे लेखन असून त्याची पृष्ठसंख्या पन्नास हजारांच्या वर जाईल. पंडितजी सातवळेकरांच्या रूपाने वेदांचे पुनरुज्जीवन झाले. औंध येथे स्वाध्यायमंडलाची स्थापना त्यांनी केली. तिच्याद्वारा वेद आणि त्यावरील वाङ्मय, महाभारत, रामायण यांचे खंड इत्यादी अमोल वाङ्मय त्यांनी प्रकाशित केले. पंडितजी नुसते रूक्ष प्रकांड पंडित नव्हते तर मर्मज्ञ रसिकही होते. ते स्वत: उत्कृष्ट चित्रकार होते. त्यांनी काढलेली चित्रे औंध येथे आजही आपणास पहावयास मिळतील. १९४८ च्या दंगलीमध्ये त्यांच्या सर्व व्यापाची होळी झालेली त्यांना पहावी लागली त्यावेळी त्यांचे वय ऐंशी होते. एखादा मनुष्य त्यावेळी पूर्णपणे खचला असता पण पंडितजींनी नाउमेद न होता गुजराथमध्ये पारडी येथे पुनश्च आपल्या संस्थेचा व्याप थाटला ! १९५९ मध्ये भारताच्या राष्ट्रपतींच्या हस्ते पंडितजींचा सन्मान झाला. अशा या थोर पुरुषाच्या दृष्टिकोणातून श्रीसमर्थांचे दर्शन आपणास घ्यावयाचे आहे.

पं. सातवळेकर यांना समर्थांच्यासंबंधी आत्यंतिक श्रद्धा होती. श्रीसमर्थांच्या पादुका पारडी येथे त्यांनी मुद्दाम नेल्या होत्या; त्यावेळी — "समर्थांनी वेदाचीच शिकवण आपल्या दासबोधातून जनतेला दिली आहे. धन्य तो महात्मा." असे उद्‌गार काढून अश्रुसिक्त नयनांनी त्यांनी पादुकांवर डोके टेकले होते. १९६२ च्या मार्च महिन्याच्या "सज्जनगड" अंकामध्ये त्यांनी "श्रीसमर्थ रामदासस्वामी महाराजांचे पुण्यस्मरण"

असा एक सुंदर लेख लिहिला होता. त्या लेखात त्यांनी (१) धनुर्धारी रामचंद्राची उपासना (२) मारुतीची स्थापना (३) मनाचे श्लोक (४) दासबोध असे चार विभाग कल्पून समर्थांच्या कार्याचा आढावा घेतला आहे. लेखाचे परिशीलन संक्षेपाने असे आहे.

श्रीसमर्थांनी "धनुर्धारी रामाची उपासना" सुरू केली ती एवढ्यासाठी की, श्रीरामचंद्रांनी धनुष्यबाण धारण करून रावणाचे राक्षसी साम्राज्य नष्ट करून तेथे आर्यांचे साम्राज्य सुरू केले. रामाने धनुष्यबाण हाती घेतले नसते तर हे कार्य झालेच नसते.

श्रीसमर्थांच्यापूर्वी कमरेवर हात टेवून विटेवर उभा असलेल्या शस्त्रहीन विठोबाची उपासना महाराष्ट्रात चालू होतीच. पण शस्त्रहीन देवाची उपासना मराठ्यांना उपयोगी नाही, महाराष्ट्रीयांनी सशस्त्र व्हावे व मोंगली साम्राज्याचा नाश करून हिंदुपद-पातशाही स्थापन करावी ही इच्छा श्रीसमर्थ रामदासस्वामींची होती.... श्रीसमर्थांनी "धनुर्धारी श्रीरामचंद्रांची उपासना केली कारण जसा देव असतो तसे भक्त होतात."

"गावोगावी मारुतीची स्थापना करून व्यायामशाळा सुरू केल्या व मारुतीला प्रणाम करून दररोज तालीम करणारी मंडळी उत्पन्न केली. हीच मंडळी पुढे श्रीशिवाजी महाराजांना उपयोगी पडली. सशक्त, वीररसाने स्फुरण पावलेले उत्साही, एकनिष्ठ वीर राज्यस्थापनेसाठी तयार होऊन मिळाले हा उद्देश गावीगावी मारुती स्थापनेमध्ये समर्थांचा होता."

"मनाचे श्लोक व असेच अनेक श्लोक समर्थांचे प्रसिद्ध आहेत. हे वाटेल तेव्हा म्हणता येतात हे खरे; पण गावातील तरुणांनी सकाळच्या वेळी मोठ्याने म्हणत जर ते गावातून हिंडले तर त्या श्लोकांच्या श्रवणाने इष्ट जो परिणाम होतो; तो अद्भुत आहे! सर्व गावातील स्त्री-पुरुषांची कर्तव्याविषयीची जागृती त्याने होते; **हे आम्ही अनुभवून पाहिले आहे.**" [असे पण्डितजींनी लिहिले आहे. कितीतरी राष्ट्रीय चळवळीत पण्डितजींनी भाग घेतला होता, आणि शिक्षाही भोगल्या होत्या. म्हणून त्यांच्या वरील उद्गारांचे महत्त्व विशेष आहे.]

"दासबोध हा नित्य पठण करण्यासारखा ग्रंथ आहे. सर्व लोकांना तो उत्तम बोध देणारा ग्रंथ आहे. मनुष्य कोणत्याही थरातील असो, त्याला योग्य उपदेश देऊन शुद्ध मार्गावर आणण्याचे सामर्थ्य त्या ग्रंथामध्ये आहे. जनतेचे लक्ष्य त्याकडे जावे तितके गेलेले नाही हे जनतेचे दुर्दैव आहे. महाराष्ट्राच्या जनतेच्या मनात आपली सर्वतोपरी

उन्नती व्हावी व आपण राष्ट्रोन्नती करण्याच्या कामी अग्रेसर व्हावे असे जर असेल तर श्रीसमर्थ रामदासस्वामींनी आखलेला कार्यक्रम त्यांनी आपलासा केला पाहिजे, तरच महाराष्ट्राची भाग्यरेषा लवकर तेजस्वी होऊन ती चमकू लागेल."

वरील शब्दांमध्ये पण्डितजी सातवळेकर यांनी त्या लेखाचा शेवट केला आहे. सातवळेकरांनी समर्थांप्रमाणेच "आधी केले मग सांगितले" ऋषितुल्य जीवन ते स्वतः जगले. "इहलोक आणि परलोक दोन्ही साधले" शतायुषी झालेल्या या महापुरुषाने जीवनातील प्रत्येक क्षणाचा योग्यप्रकारे करून देह सार्थकी लावला; आणि म्हणूनच त्यांच्या नजरेतून श्रीसमर्थांचे दर्शन घेताना अधिकच आनंद वाटतो.



# हरिजनसेवक पद्मश्री काकासाहेब कारखानीस

तळमळीचे देशभक्त आणि सुविख्यात हरिजनसेवक गणेश गोविंद कारखानीस यांच्या दृष्टीकोणातून आपणास श्रीसमर्थांचे दर्शन घ्यावयाचे आहे. त्या आधी काकासाहेब कारखानीस यांच्या जीवनातील काही विशिष्ट पैलूंचा परिचय करून घेणे जरूर आहे.

२० एप्रिल १८९० मध्ये मलकापूर येथे त्यांचा जन्म झाला. जमखंडी हायस्कूल-मधून ते १९०९ मध्ये मॅट्रिक झाले. पुढे बी. ए ची पदवी मिळविल्यावर एक वर्ष लॉ कॉलेजमध्ये ते गेले १९१९ ते २७ पर्यंत चिंचवडच्या राष्ट्रीय शाळेत अध्यापकाची नोकरी केली. १९२० मध्ये गुरुदेव रानडे यांच्या अध्यात्मभवनामध्ये राहिल्यामुळे त्यांच्या आध्यात्मिक संपदेचा मोठाच प्रभाव काकासाहेबांच्या मनावर पडला; आणि त्यातून "मामनुस्मर युद्धयच" हा संदेश त्यांच्या जीवनाचे ब्रीदवाक्य बनला. राष्ट्रीय चळवळीमध्ये त्यांनी सक्रिय भाग घेतला. त्यांचा कारावास हे त्यांच्या जीवनातील महत्त्वाचे पर्व आहे. प्रारंभीच्या काळात सत्याग्रहींना खोडावेडीसारख्या यमयातना ब्रिटिशांनी भोगावयास लावल्या. सात दिवस त्याही दिव्यातून काकासाहेब गेले आहेत. १९३३ मध्ये तुरुंगातून सुटल्यावर तीस वर्षे हरिजनसेवेचे व्रत त्यांनी घेतले. विजापूर हरिजनसेवक संघाचे सेक्रेटरी या नात्याने त्यांनी जे भरीव कार्य केले त्याची दखल भारत सरकारने घेतली. १९५९ मध्ये "पद्मश्री" ही पदवी देऊन त्यांचा गौरव केला. कर्नाटक राज्यानेही समाजकार्याचे सुवर्णपदक अर्पण करून त्यांचा सत्कार केला. लोकमान्य टिळक आणि महात्मा गांधी यासारख्या महापुरुषांच्या जीवनापासून स्फूर्ती घेऊन पद्मश्री कारखानीस यांनी जीवन कृतार्थ केले आहे.

महात्मा गांधी यांच्याकडून शाबासकी मिळविण्याचे भाग्य पद्मश्रींनी मिळविले होते यातच सारे काही आले !

फावल्यावेळामध्ये पद्मश्री कारखानीस यांनी भरपूर लेखन केले आहे. हरिवरदा प्रकाशनकार श्री. दयार्णव कोपर्डेकर यांनी ते त्रेरेचसे वाङ्मय एकत्र करून छापले. सज्जनगड मासिकातही पद्मश्रींचे अनेक लेख प्रसिद्ध झाले आहेत. विजापूरच्या ज्ञानेश्वरी अभ्यास मंडळाने पद्मश्रींच्या पंचाहत्तराव्या जन्मदिनी त्यांच्या संत वाङ्मयाचे दोन खंड प्रसिद्ध केले. त्यातच "श्रीसमर्थ रामदास–विचार आणि कार्य" हे बहुमोल पुस्तक प्रसिद्ध झाले. श्रीसमर्थ विषयक पुस्तकांचे ग्रंथालय करावयाचे कोणी ठरविल्यास या ग्रंथाविना ते अपूर्ण राहील इतके महत्त्वाचे हे पुस्तक आहे. "श्रीसमर्थांची शिकवण कालबाह्य झाली काय ?" या एका लेखात पद्मश्री काकासाहेब लिहितात : आपल्या महंताच्या अंगी कोणते गुण पाहिजेत, त्याने काय केले पाहिजे याचे टिपण श्रीसमर्थांनीच एका अभंगात केले आहे

प्रथम लिहीणे दुसरे वाचणे । तिसरे सांगणे अर्थांतर ॥ १४·१ ॥
आशंका निवृत्ती ऐसी चौथी स्थिती । पाचवी प्रचीती अनुभवे ॥ २ ॥
सहावे ते गाणे सातवे नाचणे । ताळी वाजवणे आठवे ते ॥ ३ ॥
नवा अर्थभेद दहावा प्रबंध । अक्रावा प्रबोध प्रचीतीसी ॥ ४ ॥
बारावे वैराग्य तेरावा विवेक । चौदावा तो लोक राजी राखे ॥ ५ ॥
पंधरावे लक्षण ते राजकारण । सोळावे ते जाण अवेग्रता ॥ ६ ॥
प्रसंग जाणावा हा गुण सत्रावा । काळ समजावा ठाई ठाई ॥ ७ ॥
आठ्ठावे लक्षण वृत्ती उदासीन । लोलंगता जाण तेथे नाही ॥ ८ ॥
एकोणीसावे चीन्ह सर्वासी समान । राखे समाधान ज्याचे त्याचे ॥ ९ ॥
विसावे लक्षण रामउपासना । वेध लावी जना भक्तीरंगे ॥ १० ॥

"श्रीसमर्थांची शिकवण कालबाह्य झाली" असे मानणारास आम्ही विचारतो यापैकी कोणती लक्षणे आजच्या बदललेल्या परिस्थितीतही सार्वजनिक कार्यकर्त्यांच्या अंगी असणे आवश्यक नाहीत ? कोणती लक्षणे टाकाऊ आहेत हे त्यांनी दाखवावे आणि मगच आपल्या आग्रही मतप्रतिपादनाच्या भानगडीत पडावे."

श्रीसमर्थ आणि इतर संत यांच्या शिकवणीतील अंतर दाखविताना काकासाहेबांसारख्या कर्मयोगी कार्यकर्त्याने आपल्या अधिकारवाणीने जे काही सांगितले आहे ते मुळातच सर्वांनी वाचले पाहिजे. तथापि त्यातील काही अवतरणे येथे देतो.

" परोपकार करावा हे सर्वच संतांनी अगदी कंठरवाने सांगितले आहे. परमार्थ-प्राप्तीच्या साधनांपेकी ते एक मोठे साधन आहे. " परोपकारः पुण्याय " हे वचन प्रसिद्धच आहे. पण तो करण्याच्या बाबतीत जे तारतम्य, जी दूरदृष्टी राखावयास पाहिजे ती श्रीसमर्थांच्या ठायी जशी काटेतोल राखलेली दिसते तशी इतरांच्यात दिसत नाही. श्रीसमर्थ व इतर संतांच्या मनाच्या ठेवणीतील भेद येथे स्पष्टपणे दिसून येतो. परोपकार करा. हे इतरांप्रमाणे श्रीसमर्थही पदोपदी सांगतात पण तो कोणावर तर—

" जाणत्यास करावा उपकार । " १८·२·४

व्यवहारचातुर्याने भरलेली वरवर साधी पण परिणामी महत्त्वाची अशी ही शिकवण श्रीसमर्थांखेरीज दुसऱ्या कोणी जनतेस दिली आहे काय ? सर्वांवर सरसकट उपकार केल्याने – सुष्टावर तसाच दुष्टांवर मित्रांवर तसाच शत्रूंवर; केल्याने भारताची काय दशा झाली व अजून होत आहे हे इतिहासात व आजही दिसून येत आहे. महंमद घोरीला अनेकदा खडे चारून त्याला प्राणदान देणाऱ्या पृथ्वीराज चौहानाने " जाणत्यास करावा उपकार " हे श्रीसमर्थांचे व्यवहारास पूर्णपणे धरून असलेले तत्त्व जर पूर्णपणे आचरणात आणले असते तर भारताची व सनातन धर्माची दुर्दशा होती ना ! पृथ्वी-राजाप्रमाणेच तदनंतरच्या अनेक रजपूत वीरांनी धर्मवेड, क्रौर्य व कत्तल यात आनंद मानणाऱ्या मोहम्मदीयांबरोबर वागताना हे तत्त्व अंमलात आणले असते तर भारतीयास पश्चात्तापाने पोळण्याची पाळी आली नसती. पण हिंदुस्तानच्या दुर्दैवाने श्रीसमर्थांच्या अवतारापर्यंत हे व्यावहारिक तत्त्वज्ञान त्यास शिकविणारा नेता मिळाला नाही व त्यांच्यानंतर ते समजूत घेऊन कोणी आचरणात आणले नाही; म्हणून " देखत देखत घरात शिरला पहा फिरंगी बोका " अशी स्थिती झाली. या पांढऱ्या पायाच्या अवदसेशी श्रीसमर्थशिष्य अमात्य रामचंद्रपंत बावडेकर यांच्या सूचनेप्रमाणे त्याकाळी जर महाराष्ट्र वागला असता तर त्याला व त्याच्याबरोबर भारताला द्रौपदीप्रमाणे धाय मोकलीत रडण्याची पाळीच आली नसती.... ...

.....जेशास तेसा जेव्हा भेटे । तेव्हा मज्यालसी थाटे । अशी नीती राष्ट्रास शिकविणारा नेता भेटल्याबरोबर पारडे कसे उलटले हे सांगणे नकोच ....याचे चित्र श्रीसमर्थांनी गायिलेल्या " आनंदवन भुवन " प्रकरणात पहावयास मिळते. " पद्मश्री कारखानीस यांनी श्रीसमर्थांची आणखी एक विशेषता पुढील शब्दात सांगितली आहे. " जगदुद्धार हेच सर्व संतांच्या आयुष्याचे एकमेव ध्येय असते. श्रीसमर्थांचे

ध्येय हेच होते. हेळामात्रे जग उद्धरीन " ही त्यांची प्रतिज्ञा होती. रामकथा ब्रह्मांड भेदून पैलाड नेण्याची त्यांची महत्त्वाकांक्षा होती पण त्यासाठी एक अभिनव संप्रदाय स्थापून श्रीसमर्थांनी आपल्या शिष्य-प्रशिष्यास पारमार्थिक व विशेषतः व्यावहारिक गोष्टीत एक कडक शिस्त पद्धत लाविली ... परमार्थाला पोषक व क्षूद्र दिसणाऱ्या त्याच्या खाजगी गोष्टीकडे ते बारकाईने पाहात.

श्रीसमर्थांस सर्व काही सुंदर पाहिजे असे.

" अक्षर सुंदर वाचणे सुंदर । बोलणे सुंदर चालणे सुंदर ।
भक्तिज्ञान वैराग्य सुंदर । करून दावी ॥ ११·६·११

याला म्हणतात खरी सौंदर्योपासना व कलादृष्टी ! त्यांच्या तालमीत तयार झालेल्या कार्यकर्त्यांनी केवढे सुंदर राष्ट्रकार्य केले याची पूर्ण कल्पना ' आनंदवनभुवन ' प्रकरणातील काही उद्गारात दिसते, अगदी साध्या गोष्टीतदेखील श्रीसमर्थांसारखा अट्टाहास त्यांच्या व्यतिरिक्त कोणी केला आहे काय ? "

पाठांतराचा आग्रह, संघटनाकौशल्य इत्यादी श्रीसमर्थांची वैशिष्ट्ये विस्ताराने सांगितल्यावर कारखानीस यांनी शारीरिक बल संपादन करण्याबद्दल समर्थांनी जो प्रचार केला त्याचा उल्लेख मोठ्या गौरवपूर्ण भाषेत केला आहे.

" प्रत्येही नित्यनूतन लोक शोधणारा माणूस शरीराने व मनाने चांगलाच सणसणीत असला पाहिजे. तरच त्याच्या हातून हे निभेल. हे जाणूनच श्रीसमर्थ, करुणाष्टकात एका स्थळी म्हणतात की, " हरिभजन कराया पाहिजे दृढ काया " ! शक्तिविना धड संसारही होत नाही मग राजकारणादी महत्त्वाच्या गोष्टी कशा होणार ? परमार्थाबरोबर याही गोष्टी साधण्यासाठी श्रीसमर्थांनी जशी शक्तीची उपासना – बलसंवर्धनाची चळवळ – केली तशी सबंध महाराष्ट्रातच काय पण उभ्या भारतवर्षात त्या काळी दुसऱ्या कोणी केलेली इतिहास सांगत नाही. त्यांनी शक्तीचे महत्त्व वर्णिले आहे ते पहा :

" शक्तीने पावती सुखे । शक्ति नसता विटंबना ।
शक्तीने नेटका प्राणी । वैभवे भोगता दिसे ॥
सार संसार शक्तीने । शक्तीने शक्ति भोगिजे ।
शक्ति तो सर्वही भोगी । शक्तीविण दरिद्रता ॥
शक्तीने मिळती राज्ये । युक्तीने येत्न होतसे ।
शक्ती युक्ती जये ठायी । तेथे श्रीमंत धावती ॥ "

इतके सांगून पद्मश्री काकासाहेब पुढे लिहितात – " प्रपंची जाणे राजकारण । " याचा अर्थ काही विद्वान करतात त्याप्रमाणे चातुर्य असा आम्हांस अभिप्रेत नाही. तसा अर्थ श्रीसमर्थांच्या ग्रंथात काही स्थळी असेलही. परंतु जेव्हा आम्ही श्रीसमर्थांचे राजकारण असा शब्दप्रयोग करतो तेव्हा ज्याला आंग्ल भाषेत " पॉलिटिक्स " म्हणतात तोच अर्थ त्या शब्दास असतो. नसतील श्रीसमर्थ हातात तरवार घेऊन प्रत्यक्ष रणात गेले ! त्यात काही बिघडले नाही ! पण त्यांच्या सांप्रदायिकांनी रणांगणावर बहादुरीची कामे केली ना ? रामचंद्रपंत आमात्य त्यांची जागा तेथे भरून काढत होते ना ? श्रीशिवरायांच्या दरबारी जाऊन श्रीसमर्थ यांनी श्रीछत्रपतींशी राजकारणाची खलबते केल्याचे कागदपत्र संशोधकास अद्याप सापडले नसतील पण त्यांचे—समर्थांचे शिष्य बाळाजी आवजी हे थोर मुत्सद्दी तेथे अहोरात्र जागरुकतेने बसले होते ना ?....श्रीसमर्थ आम्ही म्हणतो त्या अर्थाने राजकारणी नव्हते असा ज्यांचा अभिनिवेश असेल त्यांना

" मुख्य सूत्र हाती घ्यावे । करणे ते लोकाकरवी करावे ।
कित्येक खलक उगवावे । राजकारणामध्ये ॥ " १९–९–१८

या ओवीचे रहस्यच कळले नाही. दासबोधादी श्रीसमर्थ ग्रंथात अशी कित्येक प्रमाणे आहेत की, त्यांच्या सहाय्याने ऐतिहासिक कागदपत्रांच्या प्रत्यक्ष पुराव्याशिवायही श्रीसमर्थ राजकारणी पुरुष होते हे सिद्ध करता येईल. "

श्री. काकासाहेब यांचा हा युक्तिवाद मननीय नाही असे कोण म्हणेल ? हरिजन सेवा कार्यात ज्यांनी तनमनधनपूर्वक सेवा-कार्य केले आणि भारताच्या राष्ट्रपतींच्या हस्ते ज्यांचा पद्मश्री म्हणून गौरव झाला अशा काकासाहेबांसारख्या सज्जनाने श्रीसमर्थ चरित्राचे जे एकूण रहस्यकथन केले आहे ते खरोखर स्फूर्तिदायी आहे. गुरुदेव रानडे यांच्या या सदशिष्याला दीर्घायुष्य लाभो ही ईश्वरचरणी प्रार्थना.



## तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

" महाराष्ट्रातील संतांनी भक्तिमार्ग सांगताना संस्कृतीचे कोणतेही अंग बाजूला पडणार नाही याची खबरदारी घेतली आहे. ऐहिक जीवनाला पारमार्थिक स्पर्श असावा कारण परमार्थाचे जग जिवंत देहाभोवतीच आहे. श्रीसमर्थांनी मानवी देहाचे महत्त्व अत्यंत प्रभावीपणे सांगितले आहे. महाभारतानंतर राजकारणाची चर्चा करणारा दासबोध हाच दुसरा अध्यात्मिक ग्रंथ आहे. दासबोध हा ग्रंथ कशाचेही भाष्य नाही " या शब्दात महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध विचारवंत लेखक आणि वक्ते तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी दासबोधाबद्दल स्वतःचे मत नोंदविले आहे. ऑक्टोबर १९७६ मध्ये सातारा या ठिकाणी श्रीसमर्थ सेवा मंडळाचे रौप्यमहोत्सवामध्ये तर्कतीर्थांची दोन भाषणे झाली. त्यावेळी समर्थांच्या संबंधात त्यांचा केवढा खोल अभ्यास आहे याचा प्रत्यय उपस्थितांना आला.

शब्दरंजन स्पर्धेतर्फे दासबोध ग्रंथाची स्वस्त आवृत्ती काढण्यात आली होती. त्या आवृत्तीला प्रस्तावना लिहिताना तर्कतीर्थ श्री. लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी एक मोलाचा विचार मांडला आहे तो असा " समर्थांची दीर्घसूचना अशी आहे की, परमार्थ व प्रपंच ही दोन्ही ध्येये एकमेकांची पूरक आहेत. परमार्थसाधना उत्तम रीतीने करणारे गुणच प्रपंचाचाही महिमा वाढवितात. अशा प्रकारचा विचार रामदासांनी जितक्या स्पष्ट शब्दात मांडला आहे. तितका कोणीही भारतीय तत्त्ववेत्त्याने मांडलेला नाही. " सकळ जगदांतरीचा देव जनावेगळा नाही ' असे रामदास निक्षून सांगतात.

" जो जगदांतरे मिळाला । तो जगदंतरचि जाला ।
अरत्री परत्री तयाला । काय उणे ॥
बुद्धी देणे भगवंतांचे । बुद्धीवीण मनुष्य काचे ।

राज्य सोडून फुकाचे । भीक मागे ॥ दा. १५–१ )

अशी जगदांतरीच्या जगदीशाची आराधना, जीवात जीव घालून आत्म्यात आत्मा मिसळून, पुनःपुन्हा परांतराचा शोध घेऊन करावयाची असते."

समर्थांच्या विचारातील विशेषता थोड्या शब्दांत पण अत्यंत समर्पकपणे वर्णन करणारे वरील अवतरण आहे. ऐहिक यशाकडे ध्यान देण्याचा विचार समर्थांनी मांडला पण तो मांडताना सुद्धा वेदादि वाङ्मयापासून तो निराळा नाही हे कुशलतेने सांगितले. भगवान गौतमबुद्धाच्या प्रभावामुळे भारतीय तत्त्वज्ञानातून वरील विचार लुप्त होत चालला होता तो पुन्हा घासून पुसून समर्थांनी जनतेसमोर मांडला. शिवकालामध्ये याच विचाराची विशेष गरज समाजाला होती, आणि आजही आहे.

रौप्यमहोत्सवी सोहळ्यातील तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची भाषणे फारच विचारप्रवर्तक होती. त्यातील काही अवतरणे अशी आहेत —

" प्रबोध जाणिजे ऐसा । आधी प्रपंच शोधणे ।
अत्र मानता लोका । परत्र सहजी घडे । "

हा विचार स्वामींनी मांडला होता तो त्यांचा विशेष आहे. त्यामुळे ते प्रकाशस्तंभ म्हणून कायमचे चमकत राहिले. ऐहिक विचार करताना पहिल्याने देहाचा विचार करायचा. देहात्मज्ञान आहे. ते घ्या असे त्यांचे म्हणणे आहे हा एकप्रकारे परंपरेला धक्का आहे. " नाना सुकृताचे । तो हा नरदेह केवळ । " असे म्हणून नरदेहाचा त्यांनी गौरव केला आहे.

प्रपंचाचे विचारात " सबळ विषय त्यागणे " असे त्यांनी सांगितले आहे. संन्याशाला बाह्यत्याग विशेष आहे पण गृहस्थाला निषिद्ध असेल त्याचाच त्याग योग्य आहे. नित्यानित्यविवेक हा प्रपंच व परमार्थ यांना दोन्हीकडे सारखा हवा. दोहोंसाठी यत्नाची जोड आवश्यक आहे. यत्न न केला तर येणाऱ्या करंटपणाची लक्षणे दासबोधात सांगितली आहेत. आदर्शाची उत्तमपुरुषाची लक्षणे त्यांनी सांगितली तो आदर्श केवळ परमार्थी नव्हे तर प्रपंचातही आदर्श पुरुष असू शकतो. यत्न अचूक व्हावा लागतो. अचूक यत्न हा देव असल्याचे त्यांनी सांगितले.

" अचूक यत्न तो देव । चुकणे दैत्य जाणिजे । " ही त्यांनी केलेली व्याख्या महत्त्वाची आहे. समर्थांना राजकारण म्हणजे चातुर्य या अर्थाने म्हणायचे आहे असे प्रा. फाटकांनी लिहिले. मला ते पटले नाही. जेव्हा देवळे पाडली जात होती तेव्हा देवळाच्या उत्सवाचे प्रतिपादन हे पूजा स्वातंत्र्य उभारण्याचे राजकारण होते. धार्मिक

स्वातंत्र्य हा मानवमात्राचा अधिकार आहे. कोणत्याही संताने परमार्थाचे जोडीस राजकारण वापरले नाही पण रामदासांनी दासबोधात कमीत कमी पन्नासवेळा राजकारण हा शब्द परमार्थासोबत वापरला आहे.

रामदासांना भौतिक रामराज्याची विशिष्ट कल्पना होती. त्यात राजाचा आदर्श आहे. ते कसे सुखदायक असावे याचे त्यांनी चित्रण केले आहे. हे सख्य व प्रेमाचे राज्य आहे. अनेक शरीरे त्यामध्ये एकजीवाने वागतात; असे त्यांनी वर्णिले आहे. दरिद्री व मूर्ख कोणी नाही. आरोग्य सर्वत्र आहे. अशी रामराज्याची कल्पना त्यांच्या मनात होती. भौतिकावरोबर नैतिक सामर्थ्य त्यांना हवे आहे त्या दृष्टीने धूर्तपणाच्या राजकारणाचा उपदेश त्यांनी केला.

"गनिमांच्या देखता फौजा । रणशूरांच्या फुरफुरती भुजा ॥"

असे राजाबद्दल त्यांचे म्हणणे आहे; ते राजकारणीच आहे. राजाने न्याय पाहिला पाहिजे. सर्वत्र समबुद्धी हवी म्हणून परमार्थी राजा हवा. तो सत्याची बाजू घेणारा, दुर्जनांना धाक वाटणारा, प्रचीतीचे तडाखे देणारा, ढिलेपणाने न वागणारा राजा पाहिजे, असे राजकारण समर्थांनी सांगितले आहे. "तुझा तू वाढवी राजा । शीघ्र आम्हासी देखता ।" असे मागणे समर्थांनी कुलदेवतेपाशी मागितले ते काय राजकारण नव्हे ?"

तर्कतीर्थांनी वरील आशयाचे जे भाषण केले ते त्यांच्या समर्थ विषयक अभ्यासाचे आणि श्रद्धेचे प्रतीक होते. परिपक्व विचारांचा तो अर्क असून साखरेची गोडी त्यामध्ये होती.

[ आधार : साप्ताहिक समर्थ, सातारा १६।१०।१९७६ चा अंक. ]

# ५

## श्रीसमर्थ रामदास व्यक्ती आणि कार्य

**जन्माचा कालखंड**

१६ व्या शतकामध्ये महाराष्ट्रात सामान्य माणसाची परिस्थिती अत्यंत दुर्धर अशी होती. विजापूर, बीदर, नगर येथे मुसलमानी तख्ते निर्माण झाली होती. 'सुलतानशाही' चालू होती. आणि त्याच वेळी अनावृष्टी किंवा अतिवृष्टी यामुळे वारंवार दुष्काळ पडत असे. अशा विपरित कालखंडामध्ये रामदासांचा जन्म झाला. औरंगाबाद जिल्ह्यातील जाम्ब गावी सूर्याजीपंत ठोसर यांच्या पत्नी रेणुकाबाई यांनी शके १५३० (सन १६०८) चैत्र शुद्ध नवमी या दिवशी पुत्ररत्नास जन्म दिला. नेमक्या रामजन्माच्या वेळी रामनवमीला हे आश्चर्य घडले, ठोसर घराण्यातील एकवीस पिढ्यांची रामोपासना आणि सूर्याजीपंतांची सूर्योपासना त्याचे दृश्य फळ त्यांनाच नव्हे तर साऱ्या समाजाला मिळाले. सुपुत्राचे नाव नारायण असे ठेवले.

नारायणाच्या सातव्या वर्षी त्याचा उपनयन संस्कार झाला. त्याच्या बालपणातील काही आख्यायिका आहेत. एकदा नारायण अडगळीच्या अंधाऱ्या जागी ध्यान करीत बसला होता. दिवसभर शोधाशोध करूनसुद्धा तो सापडला नाही. नंतर तो सापडला तेव्हा आईने विचारिले "नारायणा. अरे असा अंधारात बसून काय करीत होतास?" उत्तर आले "आई चिंता करितो मी विश्वाची"

बालपणापासूनच नारायणाचा ओढा ईश्वरभजनाकडे होता; हे त्यांच्याच काही काव्य-पंक्ती सांगतात.

"राघवाची भक्ति, सुखाची विश्रांती।
पितयाची शांती झाली पुढे॥

पुढे ज्येष्ठ बंधू न सांगेचि काही।
सुखे देवालये निद्रा केली ॥
निद्रा केली तेथे श्रीरामे उठवोनी।
तोचि मंत्र कानी सांगितला ॥"

बालपणी वडील गेले, ज्येष्ठ बंधू आध्यात्मिक क्षेत्रातील मार्गदर्शन करीत नाहीत, अशा परिस्थितीत स्वतः श्रीरामप्रभू हेच नारायणाचे गुरू झाले. नारायणाच्या या विरक्तीमुळे मातोश्रींना त्याच्या भावी जीवनाबद्दल चिंता वाटू लागली, मग (सन १६२० मध्ये) नारायणाच्या बाराव्या वर्षी त्याचा विवाह करण्याचा घाट घालण्यात आला. पहिल्यापासून नारायण विरोध करीत होता. पण मातोश्री राणूबाई यांनी "नारायणा, तू लग्नाला उभा रहा नाही तर माझी तुला शपथ आहे." हे शब्द ऐकल्यावर मात्र नारायण म्हणाला "आई, तुझ्या शपथेसाठीच केवळ मी लग्नाला उभा राहातो."

आणि लग्नामधील मंगलाष्टकांपर्यंत नारायण लग्नाला उभे राहून नारायणाने आपले वचन पाळले. 'शुभमंगल सावधान' हे शेवटचे शब्द कानी पडताच मात्र नारायणाने बोहल्यावरून आश्चर्यकारकरीत्या धूम ठोकली. कोणालाही न सापडता नारायण कशा-रीताने पळून गेला असेल हे आज कोडे असले तरी पुढे अठरा दिवस पायी प्रवास करून तो नाशिकजवळील पंचवटीला श्रीरामांचे दर्शन करून टाकळी येथे पोहोचला हे निश्चित आहे. तेथे कडक तपश्चर्या त्याने केली. नदीमध्ये उभे राहून जप करीत अस्ता मासे दंश करीत ते सहन करीत आणि हरतऱ्हेची जननिंदा सहन करीत नारायण काल-क्रमणा करीत होता. गायत्रीमंत्र आणि शिवाय त्रयोदशाक्षरी रामनाम मंत्र त्यांनी पुरश्च-रणामध्ये जपला. या खेरीज आणखी कोणत्या गोष्टी नारायण करीत असेल ते समजण्यास काही साधन नाही. स. भ. कै. देव यांनी लिहिल्याप्रमाणे—'निरहंकारी थोर पुरुष एकान्तात जो साधनमार्ग आचरतात त्याविषयी ते सहसा कोणापाशी बोलत नाहीत. स्वतःविषयी एकंदरीतच ते फार थोडे बोलतात...त्यामुळे श्रीसमर्थांनी स्वतः कोणती साधने, कोठे व कशी केली वगैरे माहिती त्यांच्या तोंडून कळण्याचा संभवच नाही. त्यांनी आपल्या शिष्यांना वेळोवेळी कोणती साधने सांगितली ती त्यांच्या अंतर्भावादी काव्यांवरून आपणास कळतात. आणि

मुखी बोलल्यासारखे चालताहे।
मना सद्गुरू तोचि शोधून पाहे ॥ म. श्लो. १८२

या सिद्धांतान्वये तोच त्यांचाही साधनमार्ग असला पाहिजे असे अनुमान काढण्या

हरकत नाही. पुरश्चरणाच्या काळात एकांतवास, एकाग्रता, वैराग्य, ध्यान, मानसपूजा, देवदर्शन, ग्रंथावलोकन हाच त्यांचा इतर वेळातला कार्यक्रम असावा.'

याच काळामध्ये जुना दासबोध, करुणाष्टके ही रचना त्यांनी केली असावी हे मान-ण्यास आधार आहे. तपश्चर्येनंतर 'रामदास' या नावाने नारायण ओळखला जाऊ लागला. काही सिद्धी रामदासांना प्राप्त झाल्या. त्यातूनच एका सती जाणाऱ्या स्त्रीचा पती जिवंत करण्याचा चमत्कार झाला. नाशिकच्या पंचक्रोशीत रामदासांचे नाव कौतुकाने प्रसृत झाले. असल्या चमत्कारापुढे नमस्कार आपोआपच होतो.

**नाना तीर्थे धांडोळावी**

नाना तीर्था क्षेत्रांस जावे। तेथे त्या देवांचे पूजन करावे ॥ ( ४.५-१७ )

शके १५५४ ( सन १६३२ ) ते १५६६ ( सन १६४४ ) या कालखंडामध्ये रामदास तीर्थयात्रा करण्यासाठी बाहेर पडले. अयोध्या काशी, द्वारका, जगन्नाथपुरी, उत्तरखंड यात्रा करून ते दक्षिणेकडे वळले. गोकर्ण, महाबळेश्वर, शेषाद्री, श्रीशैल्य मल्लिकार्जुन, करवीर, पंढरपूर, भीमाशंकर, त्र्यंबकेश्वर अशी नाना तीर्थे त्यांनी पाहिली. त्याकाळी प्रवासाची आजच्यासारखी वेगवान साधने नव्हती, रस्ते ठाऊक नव्हते, निर-निराळ्या बोलभाषा ठाऊक नव्हत्या, आणि प्रवासासाठी आवश्यक ते धन त्यांच्यापाशी असण्याची शक्यताच नव्हती. तरी पण अशाही परिस्थितीत त्यांनी सारा देश पायाखाली घातला ! ते कोठे राहिले असतील, कितीदा त्यांना उपोषणे घडली असतील, उन्हा-तान्हात वावरताना त्यांना कोठे आजार घडला असेल का ? यासंबंधीची काहीही माहिती त्यानी कोठे लिहून ठेवली नाही पण त्यांच्या सूक्ष्म दृष्टीला जे काही आढळले आणि जे लोकांना सांगणे केवळ अगत्याचे होते तेवढेच त्यानी ठसठशीतपणे सांगितले आहे. देशपरिस्थिती आणि लोकांची अवनती पाहून ते व्याकुळ झाले.

'फिरे दास उदास लोकास पाहे।
मनामाजि थक्कित होवोनि राहे ॥'

हे त्यांचे उद्‌गार देश, काल परिस्थितीच्या प्रदीर्घ निरीक्षणानंतर बाहेर पडले आहेत.

यवनांच्या अत्याचाराच्या लीला त्यांनी प्रत्यक्ष पाहिल्या, ऐकल्या, त्यावर चिंतन केले. 'सकळ पृथ्वी आंदोळली। धर्म गेला' ही परिस्थिती पाहिली आणि 'सकळ जन सुखावे। तो कसा काळ फावे ॥' या चिंतेने ते व्याकुळ झाले. देशस्थितीच्या अवलोकनाने रामदासांना जो काही बोध झाला त्यामुळे त्यांच्या आयुष्याला एकदम वेगळेच वळण लागले. काही काळ त्याना चैन पडेना. काय करावे ते सुचेना. या काळात त्यांनी स्वत:चा उल्लेख

जरी 'पिसाट' रामदास म्हणून करून घेतला असला तरी भावी काळामध्ये 'समर्थ रामदास' म्हणून ते गाजले त्याची वीजे त्या पिसाट वृत्तीतच होती.

भारत भ्रमण झाल्यानंतर रामदास नाशिक येथे परतले. त्यावेळी ते उघडपणे समाजात मिसळले. त्यांची कीर्तन-प्रवचने झाली. जनजागृतीचे अमोघ अस्त्र त्यांच्या हाती गवसले होते. श्रीरामाच्या उपासनेचे पाठबळ, धगधगीत वैराग्य, आणि जिभेवर सरस्वती असणाऱ्या या तरुण संन्याशाने लोकांची मने चांगलीच आकृष्ट केली असली पाहिजेत. आंबे जोगाई येथे ते कीर्तनास गेले असता जांब येथील एका गृहस्थाना शंका आली की आपल्या गावच्या सूर्याजीपंत ठोसराचा जो मुलगा लग्नाच्या मंडपातून नाहीसा झाला तोच हा संन्यासी असेल काय? आणि मग कीर्तन संपल्यावर त्यांनी रामदासांची भेट घेतली. रामदासांनी घर सोडल्यापासून वीस वर्षे घराकडील हकीगतीची दखल घेतली नव्हती. पण त्या गृहस्थांनी जेव्हा मातोश्री राणूबाई यांचे रडून रडून डोळे गेले असे सांगितले तेव्हा रामदासाना काय वाटले असेल याची कल्पनाच करावी! मातेला मुलाबद्दल जे अपार प्रेम वाटते त्याबद्दल दासबोधात जे उल्लेख आले आहेत ते वाचताना वाचकांना असा प्रश्न पडतो की मातेची थोरवी सांगणाऱ्या ह्या महापुरुषाने वीस वर्षे तिचा वियोग कसा सहन केला असेल?

आंबेजोगाईहून रामदास तडक निघाले ते जांबेला आपल्या घरी परत आले. आईची त्यांची जी भेट झाली तिचे वर्णन करण्यास शब्द अपुरे पडतील. या वेळी श्रींच्या चरित्रातील एक चमत्कार घडला असल्याची नोंद आहे. आईला दृष्टी नव्हती त्यामुळे ती वीस वर्षानंतर भेटलेल्या मुलाला पाहू शकत नव्हती पण रामदासांचा स्पर्श तिच्या डोळ्यांना होताच ती दृष्टी परत आली! हा तर एक चमत्कार खराच पण त्याहीपेक्षा मोठा चमत्कार रामदासानी केला तो हा की जांबेला त्यांचा जो काही मुक्काम झाला असेल तेवढ्यात मातेला बाह्यदृष्टी प्रमाणेच आंतर्दृष्टी पण त्यांनी दिली, आपला पुत्र काही महनीय कामगिरी करण्यासाठी अवतरला असल्याची तिची खात्री पटली. त्यामुळे कृष्णातीराकडे कायमचे वास्तव्य करण्यासाठी रामदास निघाले तेव्हा तिने आनंदाने त्याना निरोप दिला. त्यानंतर एकदाच शके १५७६ मध्ये रामदास जांबेला येऊन गेले असा उल्लेख आहे. घरादाराचा आणि नातलगांचा पाश तोडून रामदास निघाले. महाबळेश्वर जरंडा इत्यादि ठिकाणी जाऊन त्यानंतर सातारा जिल्ह्यातील मसूर या ठिकाणी आपला तळ ठोकला. यावेळी काही तरी निश्चित अशा प्रकारच्या कार्याची योजना त्यांच्या डोळ्यांसमोर तरळत असली पाहिजे.

शके १५६६ ते ७२ या सहा वर्षांमध्ये मसूर, चाफळ, उंब्रज, माजगाव शिराळे, बहे, बोरगाव, पारगाव, मनपाडळे या गावी अकरा मारुतींची स्थापना रामदासांनी केली. शके १५७० मध्ये चाफळ येथे श्रीरामाचे मंदिर रामदासांनी उभे केले. या संबंधात इतिहास संशोधक प्रा. न. र. फाटक म्हणतात, "हे देऊळ बांधले त्यावेळी नवी देवळे बांधण्याला, जुन्या देवळांच्या जीर्णोद्धाराला, उत्सवाला प्रतिबंध करावा अशा धोरणांचे एक फर्मान आदिलशहाने तयार केले होते. त्याकडे पाहाता नवी देवळे बांधण्याचे एक विलक्षण साहस रामदासांनी केले, असे म्हणावे लागते."[१]

रामदासांना 'समर्थ' ही पदवी याच कालखंडामध्ये प्राप्त झाली असावी. कारण वाहत्या प्रवाहाच्या विरुद्ध दिशेने त्यांचा प्रवास यशस्वीरीत्या चालला असल्याचे समाजाच्या निदर्शनास याच वेळी आले असावे. ज्या कालखंडामध्ये मुसलमानांच्या धाडीच्या भीतीने लोक मंदिरातील मूर्ती जलाशयामध्ये टाकू लागले होते. त्याच काळात इकडे समर्थांचा उद्योग, नवीन मूर्ती बसविण्याचा किंवा जलाशयातील मूर्ती बाहेर काढून त्यांचे जाहीरपणे प्रतिष्ठापन करण्याचा चालला होता.

"धीर धरा, धीर धरा तकवा । हडबडू गडगडू नका ।
काळ देखोनि वर्तावे । सांडावे भय पोटिचे ॥ १ ॥
धरावा धीर तो मोठा । विचारे पाहता बरे ।
अधीर माणसे खोटी । काम काही कळेचिना ॥ २ ॥

असा धीराचा संदेश सांगण्यासाठी समर्थांचा संचार त्या सर्व भागांत होऊ लागला. एका बाजूने अशी जनजागृती चालली होती तर दुसऱ्या बाजूने शिवाजी महाराजांचे स्वराज्य संपादनाचे प्रयत्न चालू होते. ज्या चाफळ खोऱ्यामध्ये समर्थ राहात त्यावर शिवाजी महाराजांचा अंमल सुरू झाल्यावर समर्थांच्या धर्मकार्याची व लोकसंग्रहाची कीर्ती त्यांच्या कानांवर गेली. चाफळच्या राममंदिराच्या प्रचंड उत्सवाच्या हकीकती शिवरायांच्यां कानी गेल्याविना कशा राहातील ? आणि समर्थांना तरी स्वराज्य स्थापनेचा हव्यास धरणाऱ्या त्या महापुरुषाची भेट घेतल्याविना कसे राहावले असेल ? राजांचा मुक्काम माहुलीस असल्याचे वृत्त समजताच समर्थांनी राजांना एक पत्र लिहिले.[२]

त्या पत्रातील शब्दनशब्द अत्यंत बोलका आहे. शिवरायांच्या कार्याचा गौरव करून त्यांना प्रोत्साहन देणारे ते पत्र म्हणजे एक अजरामर काव्य बनले आहे. शिवरायांचा

१. सार्थ दासबोध, संपादन : प्रा. न. र. फाटक, सुरेखा प्रकाशन, पृ. ६.
२. 'श्रीरामसमर्थ' लेखक : पु. पां. गोखले देवस्थान ट्रस्ट, चाफळ, प्रकाशन पृ. ३१-३२

जो गौरव यथार्थाने त्याकाळी समर्थांनी केला त्याबद्दल प्रत्येक वाचकाला समधान वाटेल. शिवरायांची अद्‌भुत कामगिरी पाहिल्यावर त्यांची प्रशंसा करणारी असंख्य माणसे आज आहेत व पुढे होतील पण त्यांचे कार्य प्रत्यक्षात आकार घेत असतानाच त्याची महती समजून शिवरायांचा गौरव करण्याचे महत्त्वकार्यही समर्थांनीच केले. त्यांनी केलेली शिवरायांची प्रशस्ती अशी होती—

" निश्चयाचा महामेरू । बहुत जनास आधारू ।
अखंड स्थितीचा निर्धारू । श्रीमंत योगी ॥ १ ॥
परोपकाराचिया राशी । उदंड घडती जयाशी ।
तयाचे गुण महत्त्वाशी । तुळणा कैची ? ॥ २ ॥
नरपति हयपति । गजपति गडपति ।
पुरंदर आणि शक्ति । पृष्ठभागी ॥ ३ ॥
यशवंत कीर्तिवंत । सामर्थ्यवंत वरदवंत ।
पुण्यवंत आणि जयवंत । जाणता राजा ॥ ४ ॥
आचारशील विचारशील । दानशील धर्मशील ।
सर्वज्ञपणे सुशील । सर्वाठायी ॥ ५ ॥
धीर उदार सुंदर । शूर क्रियेसी तत्पर ।
सावधपणे नृपवर । तुच्छ केले ॥ ६ ॥
तीर्थ क्षेत्रे ते मोडली । ब्राह्मणे स्थानभ्रष्ट जाली ।
सकळ पृथ्वी आंदोळली । धर्म गेला ॥ ७ ॥
देवधर्म गोब्राह्मण । करावया संरक्षण ।
हृदयस्थ जाला नारायेण । प्रेरणा केली ॥ ८ ॥
शूर पंडित पुराणिक । कवेश्वर वैदिक याज्ञिक ।
धूर्त तार्किक सभानायेक । तुमचे ठायी ॥ ९ ॥
या भूमंडळाचे ठाई । धर्म रक्षी ऐसा नाही ।
महाराष्ट्रधर्म राहिला काही । तुम्हाकरिता ॥ १० ॥
आणिक धर्मकृत्ये चालती । आश्रित होउनी कित्येक राहाती ।
धन्य धन्य तुमची कीर्ति । विश्वी विस्तारली ॥ ११ ॥
कित्येक दुष्ट संव्हारिला । कितेकासी धाक सुटला ।
कित्येकास आश्रय जाले । शिव कल्याणराजा ॥ १२ ॥

तुमचे देशी वास्तव्य केले । परंतु वर्तमान नाही घेतले ।
ऋणानुबंधे विस्मरण जाले । काय नेणू ॥ १३ ॥
सर्वज्ञ मंडळी धर्ममूर्ती । सांगणे काय तुम्हांप्रती ।
धर्मस्थापनेची कीर्ति । सांभाळली पाहिजे ॥ १४ ॥
उदंड राजकारण दाटले । तेणे चित्र विभागले ।
प्रसंग नसता लिहिले । क्षमा केली पाहिजे ॥ १५ ॥

हे पत्र शिवरायांच्या हाती पडले. पत्रातील मजकूर त्यांना किती हृदयस्पर्शी वाटला असेल याची कल्पनाच केली पाहिजे. स्वराज्यस्थापनेचा जो महोद्योग त्यांनी आरंभिला होता त्यामध्ये किती दगदग, किती व्यवधाने, किती चिंता ! उन्हातान्हातून, दऱ्याखोऱ्यातून घोडदौडी, जिवावर बेतलेले शेकडो प्रसंग...त्यातून जे थोडे फार यश शिवरायाना त्याकाळी प्राप्त झाले होते त्याचे मूल्यमापन करणारी आजवर एकच व्यक्ती होती. ती म्हणजे मातोश्री जिजाबाई ! पण आता दुसरी एक थोर व्यक्ती आपणाला भेटली, असे शिवाजी महाराजांना वाटले असेल. रामदासांच्या समाजप्रबोधनाची कीर्ति शिवरायांच्या कानी त्यापूर्वी गेली होतीच पण पत्ररूपाने त्यांची अर्धी भेटच झाल्यासारखे महाराजांना वाटले. लगोलग उत्तर पाठविण्यासाठी त्यांनी चिटणीसांना मजकूर सांगितला. जासुदाच्या हाती मोहरबंद लखोटा पडला आणि तो रवाना झालासुद्धा. पण शिवरायांना त्या पत्राने इतकी मोहिनी घातली होती की समर्थांची प्रत्यक्ष भेट घेण्यासाठी त्यांचे मन उतावीळ होऊन उठले ! आणि मग अल्पावधितच समर्थांची भेट घेण्यासाठी स्वतः निघण्याचा निर्णय राजांनी घेतला.

शिंगणवाडी या चाफळनजीकच असलेल्या ठिकाणी पुष्पवाटिकेमधील एका भव्य चिंचवृक्षाखाली समर्थ त्यावेळी बसले होते. शिवरायांचा जासूद पत्र घेऊन तेथे पोहोचला. पण त्यातील मजकूर वाचून थोडा वेळ होतो न होतो तोच दिवाकररस्वामी यांनी महाराज स्वतःच दर्शनासाठी येत असल्याची वर्दी समर्थांना दिली. त्यावेळचे वर्णन चरित्रामध्ये करण्यात आले आहे. शिवाजी महाराजांना पहाताच समर्थ उठून उभे राहिले. त्यांना राजांनी नमस्कार घातला. 'तुमचे इप्सित सफल होईल' असा आशीर्वाद समर्थांनी दिला. महाराजांनी अनुग्रह करण्याविषयी विनंती केली. समर्थांनी संमती दिली. वाकेनिसी टिपणामध्ये ही घटना खालील शब्दात वर्णिलेली आहे.

'शिवाजी महाराज यास आनुग्रह शके १५७१ शिंगणवाडीचे बागेत वैशाख शुद्ध नवमी गुरुवारी जाला वरकड शिवछत्रपती प्रकरण आलाहिदा लिहिले आहे.

[ श्रीसमर्थांनी पार्थीव देह ठेवल्यानंतर केवळ चारच दिवसांनी म्हणजे माघ व १३ ला दिवाकर गोसावी यांनी ते टिपण करून घेतले आहे; त्यामुळे ते विश्वसनीय आहे. बखरीमध्येही अनुग्रहाची तिथी तीच देण्यात आली आहे. ]

शिवाजी महाराज आणि श्रीसमर्थ यांची भेट जेथे झाली तेथे एक सुंदर स्मारक तयार करण्याची योजना आखण्यात आलेली आहे. त्याच जागेवर निळो सोनदेव व बाळाजी आवजी चिटणीस यांना सुद्धा समर्थांचा अनुग्रह झाला. त्यांना सेवकधर्माचीही दीक्षा समर्थांनी दिली. शिवरायांना दिलेला 'लघुबोध' दासबोधामध्ये ( द. १३ स. ६ ) समाविष्ट झाला आहे आणि 'सेवकधर्म' ही लिपीबद्ध झाला तोही समर्थ वाङ्मयामध्ये जतन करण्यात आला आहे.

छत्रपतींचे भोसले घराणे, नीळो सोनदेव यांचे आमात्य घराणे आणि बाळाजी आवजींचे चिटणीस घराणे यांची कामगिरी महाराष्ट्राच्या इतिहासामध्ये केवळ अपूर्व अशीच आहे. तिचे वर्णन याच पुस्तकामध्ये अन्यत्र केले आहे. छत्रपती संभाजी राजांनी देशासाठी हौतात्म्य पत्करले. राजारामांनी औरंगजेबाच्या क्रूरतेला आणि पाताळयंत्री मुत्सद्देगिरीला भीक न घालता प्रसंगी वनवासही पत्करला, बाळाजी आवजींना संभाजीने हत्तीच्या पायी दिले असतानासुद्धा त्यांचा पुत्र खंडोजी याने राजघराण्याची व पर्यायाने देशाची जी सेवा केली तिला जोड नाही. निळो सोनदेवाचा पुत्र रामचंद्रपंत आमात्य यांनी, छत्रपतीनी विजनवास पत्करला त्या कालखंडात सारा महाराष्ट्र औरंगजेबाशी सतत झुंजत ठेवला. महाराणी ताराबाई यांचा केवळ उजवा हात असल्याप्रमाणे रामचंद्रपंतांची कामगिरी आहे. अशा अपूर्व गोष्टी साऱ्या भारताच्या इतिहासात क्वचितच कोठे घडल्या असतील. या इतिहासामागे शिव-समर्थांची प्रेरणाच कार्य करीत होती.

• " It is not the gun that fires but the hand behind it. It is not the hand that fires the gun but the mind behind it. " असे इंग्रजी वचन अत्यंत अर्थपूर्ण आहे. श्रीसमर्थांनी जनतेला निर्भय होण्याचा, तसेच " देवद्रोही तितुके कुत्ते । मारोनि घालावे परते ॥ " या सारखा केलेला प्रभावी उपदेश आणि शिवाजी महाराजांनी जणू काही स्वतःचा देहच पाजळून राष्ट्रापुढे निर्माण केलेली शौर्य-गाथा यांची स्फूर्ती महाराष्ट्राला अखंडपणे स्फूर्ती देत राहिली. लाखो माणसांनी स्वप्राणांचे बलिदान करून महाराष्ट्र-धर्म जिवंत ठेवला.

" देव मस्तकी धरावा । अवघा हलकल्लोळ करावा ।
मुलुख बडवा की बुडवावा । धर्म संस्थापनेसाठी ॥ " ही श्रीसमर्थांची आवेशपूर्ण

गर्जना केवळ राजकीय क्षेत्रापुरतीच नाही. आपल्या अंतर्मनामध्येसुद्धा अहोरात्र 'कुरूक्षेत्र' चालू असते. एक मोठे महाभारत तेथेही चालू असते त्या कुरुक्षेत्रामध्येही सत्पक्षाची बाजू घेण्यासाठी श्रीसमर्थांनी आवेशाने जो उपदेश केला आहे तो मराठी भाषिकांना अहर्निश स्फूर्ती देत राहील. एका ठिकाणी ते म्हणतात,

" प्रपंच धडका पेटला । मध्ये परमार्थ जळोनि गेला ।
ऐसे देखोनि तुम्हांला । कैसे बरे वाटते ? ॥
मुक्ताफळे आणि दिव्यांबरे । नाना वस्तूंची भांडारे ।
भस्म करून वैश्वानरे । विझोनि जाई जेवी ॥
तैसा प्रपंच हा परमार्थासी । जाळोनि भोगू नेदि आपणासी ।
आयुष्य गेलिया प्राणीयासी । विमुख होय ॥
जरी हा प्रपंच शास्वत जाणतो । तरी आम्ही यासीच धरतो ।
हा अशाश्वत म्हणोनि रडतो । तुम्हा भोवती ॥ "

संसार अशाश्वत आहे हे जाणून समर्थांनी सर्वार्थाने त्याचा त्याग केला आणि परमेश्वराची भक्ती करून ते साक्षात्कारी बनले. वास्तविकपणे त्यांच्याच शब्दात सांगावयाचे तर;

" जो रामरूपी मिळाला । तो परतोनि नाही आला ।
जैसा लोह परिसे पालटला । तो लोहखंड न होय ॥

अशाप्रकारे ज्याला साक्षात्कार झाला त्याचा व्यक्तिगत उद्धार होतो व तो पुन्हा सामान्य जनामध्ये परत येत नाही. तथापि जनतेच्या दु:खाकडे पाहून समर्थांना कळवळा आला आणि नीती, न्याय, विवेकाचा मार्ग दाखवून समाजाचे तारू योग्य मार्गावर आणण्यासाठी, समर्थ एखाद्या दीपस्तंभासारखे उभे ठाकले.

**दासबोध रचना**

ग्रंथराज दासबोधाची रचना एकावेळी झालेली नाही. प्रथम एकवीस समासी दासबोध लिहिला. त्यानंतर शके १५७६ ते १५८६ या काळामध्ये शिवथर घळीमध्ये पहिले सहाच दशक लिहिले. ही आपण दासबोधाची दुसरी आवृत्ती मानू त्यानंतर सध्याच्या दासबोधाचा सातवा समास आहे. ही दासबोधाची तिसरी आवृत्ती निघाली. " सरली शब्दांची खटपट । आला ग्रंथाचा शेवट ॥ असे शब्द या समासामध्ये आहेत. पण त्यानंतर १६०३ च्या मार्गशीर्षामध्ये समर्थांना समग्र ग्रंथाची पुनर्मांडणी करण्याची इच्छा झाली. पहिले सहा दशक नंतर सातवा दशक एकत्र केला. त्यात एकवीस समासामधील आठवा समास सामील केला आणि अन्यत्र कारण परत्वे जी प्रकरणे लिहिली होती ती सर्वही

एकत्रित करून त्यांचे वीस दशक तयार केले. अशा प्रकारे आयुष्याच्या अखेरीला २०० समासांचा ग्रंथराज दासबोध ग्रंथ निर्माण झाला. नंतर स्वामींनी डोमगावहून आपला आवडता शिष्य कल्याण याला बोलावून घेतले आणि तो ग्रंथ उतरून घेण्यास सांगितले. संपूर्ण ग्रंथ एकाच वेळी आणि तो शिवथर घळीतच पूर्ण झाला असावा असे वाटत नाही.

**अन्यवाङ्मय**

समर्थांनी आपल्या वाङ्मयाचा अक्षरशः महासागर निर्माण केला आहे. त्यांचे जीवनभर चिंतन, मनन व लेखन चालले होते. स्वामींनी उत्तर हिंदुस्थानच्या दौऱ्यामध्ये व्रज, अवधी आणि हिंदुस्थानी या भाषा आत्मसात केल्या होत्या. त्यांची काही पदे उर्दू भाषेमध्येही आहेत. त्याप्रमाणे तेलगू तामीळमध्येही त्यांची काही रचना असण्याची शक्यता आहे. हा संशोधनाचा विषय होऊ शकेल असे पद्मश्री पु. पां. गोखले यांनी सुचविले आहे.

तथापि एक गोष्ट मात्र मोठी क्रांतिकारक आणि मार्गदर्शकही ठरते ती ही की स्वामींनी भाषेपेक्षा अर्थाला खरे महत्त्व दिलेले आढळते. त्यामुळे शब्द योजना करताना तो शब्द लोकांच्या अंगवळणी पडलेला असला की मग तो संस्कृत असो हिंदुस्थानी असो किंवा फारशी किंवा अरबी असो त्याकडे त्यांनी मुळीच लक्ष दिलेले नाही. कितीतरी परदेशी शब्द याच कारणाने त्यांच्या भाषेत आढळतात.

मारुतीचा पराक्रम दाखविणारे सुंदरकांड, युद्धकांड, कृष्णचरित्रपर कविता, आनंदवनभुवन, सगुण निर्गुण पूजा, मानसपूजा, दासबोध, मनोबोध, करुणाष्टके काही प्रासंगिक कविता, क्षात्रधर्म, राजधर्म, बागाईत, कारखाने याबद्दल कविता आणि छत्रपतींशी केलेला ओवीरूप पत्र-व्यवहार असे २६३४९ ओळीचे श्रीसमर्थांचे आजवर ज्ञात असलेले वाङ्मय आहे. भावी काळामध्ये संशोधनानुसार यात भर पडणार नाही कशावरून ? असे हे वाङ्मयाच्या प्रचंड व्याप्तीचे स्वरूप आहे. ' लेखन प्रक्रिया ' मठातून सतत चालावी अशी स्वामींची इच्छा असे त्यावरून शिष्य-प्रशिष्यांनी त्यांच्या वाङ्मयाची लिहिलेली अनेक बाडे तयार झाली होती. त्यामुळे इतक्या कलावधिनंतरसुद्धा मठातून समर्थांचे वाङ्मय बऱ्याच चांगल्या अवस्थेत असल्याचे कै. शंकरराव देव याना आढळले. ते वाङ्मय चांगल्यारीतीने जतन करण्यासाठीच त्यांनी धुळे येथे श्रीसमर्थ वाङ्मयमंदिराची स्थापना केली. हे त्यांचे महदुपकार महाराष्ट्र कधीही विसरणार नाही. असो.

**समर्थांच्या जीवनाचे कालखंड**

बाल्यावस्था, टाकळी येथे केलेले तप यामध्ये समर्थांच्या जीवनाची पहिली चोवीस वर्षे गेली. त्यानंतरचा तीर्थाटनाचा बारा वर्षांचा कालखंड आहे. या काळामध्ये त्यांनी

जे पाहिले व अनुभविले त्यावरच भावी कालातील तीस वर्षांच्या जनसेवेची आखणी समर्थांनी केली. याच काळामध्ये धर्मासाठी आणि राष्ट्रासाठी प्रचंड व्याप केला. मारुतीच्या मूर्तीची स्थापना मठस्थापना करून असंख्य लोकांना बोध केला. महाराष्ट्रामध्ये स्वातंत्र्यसूर्याचा उदय झालेला त्यांनी पाहिला आणि शेवटच्या सहा सात वर्षांमध्ये सर्वस्वाचा संपूर्ण त्याग करून विरक्तीच्या जीवनाचा अनुभव घेतला.

प्रयत्न, प्रत्यय आणि प्रबोध या चाकोरीतून त्यांचा जीवनाचा प्रवास झाला. श्रीसमर्थांच्या प्रबोधामागे स्वानुभवाची भक्कम बैठक. असल्यामुळे त्यांची शिकवण कधीही कालबाह्य होणार नाही. तप, व्याप आणि त्याग हे त्या जीवनाचे कालखंड असल्यामुळे साऱ्या महाराष्ट्रापुढे एक आदर्श राष्ट्र-संत म्हणून त्यांचे जीवन-कार्य दीपस्तंभासारखे उभे आहे.

**अखेरचा कालखंड**

या काळामध्ये समर्थांनी आपला जीवनोपदेश पूर्णत्वाला गेलेला पाहिला. धर्मावर आलेले विघ्न बहुतांशी निवारण झाले होते. मठामठांमधून पारमार्थिक जीवन शिक्षणाची केंद्रे सुव्यवस्थित कार्य करू लागली होती. शिवरायांना राज्याभिषेक झाला. त्यानंतर ते स्वत: सज्जनगड येथे त्यांच्या सान्निध्यात राहून गेले.

शके १६०२ मध्ये श्रीशिवछत्रपतींचे निधन झाले. त्यानंतर समर्थांना अपरंपार दु:ख झाले असे त्यांच्या तत्कालिन चरित्रकारांनी वर्णिले आहे. "महाथोर ते मृत्युपंथेचि गेले। किती येक ते जन्मले आणि मेले ॥ असे निर्विकार मनाने सांगणाऱ्या समर्थांनासुद्धा राजांचा वियोग जाणवला ! आता आपलेही जीवनकार्य समाप्त करण्याची वेळ आली असल्याचे त्यांनी जाणले ! शके १६०३ च्या चैत्रामध्ये चाफळ येथे जाऊन तेथील श्रीरामचंद्राच्या चरणांचे दर्शन घेऊन ते पुन्हा सज्जनगड येथे आले; आणि इहलोकाचा निरोप घेण्यापूर्वी 'दासबोध' ग्रंथाची पूर्ती करण्यास ते प्रवृत्त झाले. वेळोवेळी लिहिलेल्य समासांची यथोचित जुळणी करून वीस दशकी दासबोध तयार केला.

"आमची प्रतिज्ञा ऐसी। काही न मागावे शिष्यासी।

आपणामागे जगदीशासी। भजत जावे ॥ ही ओवी १२ व्या दशकामध्ये दहाव्या समासामध्ये समाविष्ट झाल्यावर "समर्थकृपेची ती वचने" पूर्ण झाली. जीवन सफळ झाले. याच वेळी संभाजीराजे पौष वद्य नवमीला भेटावयास आले. त्यांना त्यावेळी जो संदेश दिला तो–

" शिवराजास आठवावे । जीवित्व तृणवत मानावे ।
इहपरलोकी राहावे । कीर्तिरूपे " असा होता.

यानंतर बरोबर एका महिन्याने म्हणजे माघ वद्य नवमीला स्वामींनी शिष्यमंडळींचा निरोप घेतला; तेव्हा त्यांनी काढलेले उद्गार असे आहेत.

" माझी काया आणि वाणी । गेली म्हणाल अंतःकरणी ।
परि मी आहे जगज्जीवनी निरंतर ॥
आत्माराम दासबोध । माझे स्वरूप स्वतःसिद्ध ।
असता न करावा हो खेद । भक्तजनी ॥ "

श्रीसमर्थांचे पार्थिव शरीर अग्निज्वालांमध्ये लुप्त झाले. तेथे आज सज्जनगडावर त्यांची समाधी आहे. " देहे त्यागिता कीर्ति मागे उरावी । " अशी अजरामर कीर्ती ठेऊन समर्थ रामचरणी विलिन झाले ! त्यांची वाङ्मय मूर्ती ' दासबोधा 'च्या स्वरूपात चिरंतन मार्गदायी झाली आहे.

# ६

## समर्थानुग्रहीत तीन घराणी

**प्रास्ताविक**

( १ ) भोसले ( २ ) पंतआमात्य ( ३ ) चिटणीस या घराण्यांतील तीन व्यक्तींना श्रीसमर्थांनी शिंगणवाडी येथे एकाच दिवशी अनुग्रह दिला. त्या अनुग्रहीत व्यक्तींनी आणि त्या घराण्यातील प्रसिद्ध पुरुषांनी महाराष्ट्राच्या या पवित्र भूमीवर जो इतिहास घडविला त्याचे दर्शन आता आपणास घ्यावयाचे आहे. त्या इतिहासाचा हेवा भारतातील अन्य राज्यांनी करावा असा तो अभिमानास्पद इतिहास... तो घडविणाऱ्यांच्या मनात श्रीसमर्थांबद्दल परम आदराची भावना होती आणि हृदयात समर्थांचा उपदेश होता. तो कृतीत आणण्यासाठी त्यांनी जी धडपड केली तिचे विस्मरण आपणास कधीही होऊ नये, स्वतंत्र भारताचे पहिले गव्हर्नर जनरल सी. राजगोपालाचारी यांनी एकदा उद्गार काढले होते की "महाराष्ट्रामध्ये पराक्रमाचा इतिहास सांगणारी कितीतरी ऐतिहासिक ठिकाणे आणि वस्तू आहेत... आमच्या मद्रास राज्याला मात्र तसा काही इतिहास नाही याची मला खंत वाटते. इंग्रजांनी फ्रेंचांचा पाडाव कसा केला त्यांच्या तोफा कशा जिंकल्या ही वर्णने म्हणजे आमचा इतिहास!! शिवछत्रपति आणि त्यांचे सहकारी यांनी महाराष्ट्राच्याच नव्हे तर साऱ्या भारताच्या इतिहासाला निराळे वळण लावले, समर्थ रामदासांच्या उपदेशामुळे राष्ट्रवाद जागा झाला आणि सर्वस्व पणाला लावून देश व धर्म यांच्या रक्षणासाठी महाराष्ट्र उभा राहिला." कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजच्या स्नेहसंमेलन प्रसंगी राजाजी यांनी काढलेले हे उद्गार किती मननीय आहेत याचा प्रत्यय प्रस्तुत प्रकरण वाचताना आपणास येईल.

या प्रकरणाचे पुढीलप्रमाणे उपविभाग आहेत.

६.१ शिवछत्रपतींचे भोसले घराणे.

६·२ दासबोधातील शिवरायांचे अप्रत्यक्ष उल्लेख.
६·३ समर्थ अनुग्रहीत आमात्य घराणे.
६·४ समर्थ प्रभावित रामचंद्रपंत आमात्य.
६·५ समर्थ अनुग्रहीत चिटणीस घराणे.
६·६ राष्ट्रभक्त खंडोबल्लाळ चिटणीस.

## शिवछत्रपतींचे भोसले घराणे

श्रीसमर्थांनी वैशाख शु. नवमीला गुरुवार शके १५७१ मध्ये शिवाजी महाराजांना शिंगणवाडी येथे अनुग्रह दिला. ( त्याची हकिगत यापूर्वी आलेली आहेच ) आणि त्या दिवसापासून भोसले राजघराण्यातील सर्वांनी त्यांना गुरुस्थानी मानले. अगदी आजतागायत राजमाता सुमित्राराजे भोसले यांच्यापर्यंत ही भक्तिभावाची भावना आहे. समर्थ सेवा मंडळाच्या रौप्य महोत्सव प्रसंगी दासबोधाचे पारायण सातारा येथे आयोजित करण्यात आले होते. त्या प्रसंगी राजमाता श्रीमंत छत्रपती सुमित्राराजे भोसले यांनी पहिल्याने ग्रंथराज दासबोधाचे पूजन केले. त्यावेळी त्यांनी समर्थांबद्दलची आदराची भावना व्यक्त केली आणि दासबोध ग्रंथाबद्दल त्या उद्गारल्या "या ग्रंथाने एकेकाळी साऱ्य महाराष्ट्राला चैतन्य दिले आहे. तसे चैतन्य पुन्हा निर्माण होण्यासाठी ग्रंथाच्या पारायणाची आवश्यकता आहे. ते या ठिकाणी होत आहे याबद्दल मला अत्यंत आनंद वाटतो."

शिवाजी महाराजांच्या घराण्यामध्ये ही समर्थ-भक्ती आजतागायत आढळते आहे. तिचे मूळ इतिहासकालामध्ये आहे. शिवाजी आणि रामदास यांची भेट केव्हा झाली आणि त्यांचे संबंध कोणते होते, राजकीय बाबींमध्ये समर्थांनी शिवरायांना काही सल्ला दिला किंवा कसे, याबद्दल महाराष्ट्रातील इतिहास संशोधकांमध्ये खळबळकारक वादविवाद आजवर झाले आहेत. तथापि निश्चित निर्णयकारी पुरावे हाती नसले तरी कोणीही जाणकार व्यक्ती काय म्हणू शकेल ते महत्त्वाचे आहे.

( १ ) शिवराय आणि समर्थ यांचे जीवनोद्देश समान होते. त्यामुळे अनुक्रमे राजकीय आणि सामाजिक क्षेत्रांमध्ये उभयतांनी जे कार्य केले ते परस्परांच्या कार्याला पोषक ठरले. ( २ ) परस्परांना एकमेकांच्या विषयी अत्यंत आदरभाव होता. ( ३ ) शिवरायांनी समर्थांच्या मठांना जी अनुदाने दिली त्यांचा प्रत्यक्ष पुरावा कागदपत्रांच्या रूपात उपलब्ध आहे. तर समर्थांनी शिवरायांच्या कार्याविषयी त्यांच्या हयातीतच गौरवोद्गार काढले इतकेच नव्हे तर आवेशयुक्त वाणीने लोकांना शिव-कार्याच्या साहाय्यासाठी प्रवृत्त केले. या संदर्भात अनेक अवतरणे देता येतील. ( ४ ) रामदासांनी शिवाजीराजांना राजकीय

बाबतीत सल्ला देऊन लुडबूड केली नाही तथापि दीपस्तंभ ज्याप्रमाणे स्वत: जहाजाबरोबर जात नाही पण त्याचे सहाय्य जहाजाच्या खलाशांना होते. अशा स्वरूपाचे समर्थांचे मार्गदर्शन शिवरायांना होत असावे. ( ५ ) आध्यात्मिक बाबतीत समर्थांचे मार्गदर्शन राजांना होत असे तरी पण समर्थ शिवरायांना ईश्वरी अवतार मानीत असत. दासबोधामध्ये शिवरायांचा प्रत्यक्ष उल्लेख झालेला नसला तरी त्यांचे अप्रत्यक्ष उल्लेख झाल्याची अनेक उदाहरणे आहेत. या संबंधात एक स्वतंत्र लेख सज्जनगड मासिकात मी लिहिला होता; तो या पुस्तकामध्येही समाविष्ट केला आहे.

शिवाजी महाराजांनंतर संभाजीराजे ' छत्रपति ' झाले. त्यांना समर्थांच्या संबंधी परम आदराची भावना होती. यासंबंधात बरेच पुरावे आज कागदपत्रांच्या स्वरूपात अस्तित्वात आहेत. ' शिवपुत्र संभाजी ' या विषयावर प्रबंध लिहून ' पी. एच्. डी. ' पदवी प्राप्त केलेल्या प्रसिद्ध विदुषी डॉ. कमल गोखले यांचे संशोधन या संबंधात महत्त्वाचे ठरते. साडेपाचशे पृष्ठांचा तो ग्रंथ समग्र वाचून त्यातून ' संभाजीराजे व समर्थरामदास ' यासंबंधात मला जी माहिती आंढळली ती संकलीत करून लिहिलेला माझा लेख याच पुस्तकात संग्रहित केला आहे तो वाचकांनी अवश्य पहावा; म्हणजे पुन्हा वेगळे लिहिण्याची आवश्यकता नाही. संभाजीराजे, राजमाता येसूबाई, या दोघांनीही समर्थ संप्रदाय महाराष्ट्रामध्ये रुजण्यास जे बहुमोल सहाय्य केले ते कोणासही विसरता येणार नाही. सज्जनगड येथील समर्थांचे समाधीमंदिर ही संभाजीराजांनी उभारलेली वास्तू आहे याचा विसर कोणालाच पडणार नाही त्याचप्रमाणे चाफळ येथील देवस्थानचे वैभव वाढते राहावे यासाठी येसूबाईराजे यानी केलेले सहाय्यही मोलाचे आहे.

छत्रपती राजाराम महाराज, आणि तदनंतरचे सारेच छत्रपती आणि राजघराण्यातील सर्व माणसे यांनी सज्जनगड येथे समर्थ समाधीच्या दर्शनास जाऊन आपली निष्ठा व्यक्त केली आहे. कोल्हापूर राज्याच्या संस्थापिका रणधुरंधर ताराबाई महाराणीसाहेब यांनीसुद्धा राजाराम महाराजांच्या बरोबर येऊन सज्जनगड येथील समाधीचे दर्शन घेतले होते.

राजाराम महाराज जिंजीहून परत आल्यावर धामधुमीच्या काळात चाफळच्या ज्या मूर्ती वाघापूर येथे नेऊन ठेवल्या होत्या त्या चाफळास परत आणल्याचा उल्लेख आहे. शके १६२९ मध्ये शाहूमहाराज मोंगलाच्या कैदेतून मुक्त होऊन साताऱ्यास आले. राज्याची सूत्रे त्यांच्याकडे आल्यानंतर त्यानीही समर्थसमाधीचे सज्जनगडास जाऊन दर्शन घेतले. इतकेच नव्हे तर चाफळ येथेही जाऊन राममूर्तीचेही दर्शन घेतले. समर्थांच्या शिष्या आक्का यांनी संप्रदायासंबंधीची सारी हकीगत सांगितली त्यावेळी समर्थसंप्र-

दायाची गादी सुरळीत चालू राहावी यासाठी श्रेष्ठांचे नातू गंगाधरपंत यास जांबेहून बोलावून घेतले. आणि शके १६३२ मध्ये त्यांच्या हाती समर्थ संप्रदायाचा कारभार सुपूर्त करण्यात आला. शके १६३२ च्या माघ शुद्ध अष्टमीस शाहूमहाराज स्वतः सज्जनगड येथे गेले होते त्यावेळी उद्धवस्वामींशी त्यांचा झालेला संवाद कागदपत्रांत आढळतो. शके १६५७ मध्ये शाहूमहाराज चाफळ येथे उत्सवासाठी गेले होते त्यावेळीही मठाधिपती ठरविण्यास त्यांनी सहाय्य केले असल्याचे आढळते. या सर्व हकीगतीवरून असा निष्कर्ष स. भ. कै. शंकरराव देव यांनी काढला की, समर्थ संप्रदायाची देखभाल, हे मराठी राज्याचे एक अंग छत्रपतींनी मानले होते.

शिवाजी महाराजांना समर्थांनी अनुग्रह दिल्यानंतर केलेला उपदेश 'लघुबोध' या समासामध्ये दासबोधात समाविष्ट केला गेला आहेच; पण संभाजीराजांना त्यांनी जो उपदेश केला तो पत्ररूपामध्ये उपलब्ध आहे. या पत्राचे निमित्ताने मराठी माणसाला नित्य प्रोत्साहन देणारा एक अक्षय्य ठेवा समर्थांनी अर्पण केला आहे. संभाजीराजानी स्वतःच्या कारकिर्दीच्या प्रारंभी बाळाजी आवजी, आण्णाजी दत्तो, हिरोजी फर्जंद यांच्यासारख्या शिवरायांच्या काळातील कसलेल्या मुत्सद्यांना ठार केले. आणि त्यांखेरीजही अनेक लोकांच्या हत्या करून राजसत्ता हाती घेतली. शिवरायांनी 'जीवित्व तृणवत' मानून निर्माण केलेल्या छोट्याशा राज्यामध्ये घडलेल्या या घटना पाहून समर्थांना हळहळ वाटली. स्वराज्यावर भावी काळात येणारे संकट त्यांच्या डोळ्यांपुढे तरळत होते. शिवाजी महाराजांच्या पराक्रमी कारकिर्दीमध्ये मोगलांची महाराष्ट्रात डाळ शिजू शकली नाही पण यापुढे मात्र दिल्लीच्या पादशहाच्या स्वारीचे महान संकट महाराष्ट्रावर कोसळल्याविना राहाणार नाही हे समर्थांना उमगले होते. 'पहिले हरिकथा निरूपण। दुसरे ते राज.-कारण। तिसरे ते सावधपण। सर्व विषयी॥' हे ब्रीद असणाऱ्या समर्थांनी संभाजीराजांना ओवीबद्ध पत्र लिहिले ते पुढीलप्रमाणे आहे.

अखंड सावधान असावे। दुश्चित्त कदापि नसावे।
तजविजा करीत बसावे। एकांत काळी॥ १॥

काही उग्रस्थिती सांडावी। काही सौम्यता धरावी।
चिंता लागावी पराची। अंतर्यामी॥ २॥

मागील अपराध क्षमावे। कारबारी हातीं धरावे।
सुखी करून सोडावे। कामाकडे॥ ३॥

पाणवठी तुंब निघेना । तरी मग पाणी चालेना ।
तैसे सज्जनांच्या मना । कळले पाहिजे ॥ ४ ॥
जनांचा प्रवाह चालला । म्हणजे कार्यभाग आटोपला ।
जन ठायी ठायी तुंबला । म्हणजे खोटे ॥ ५ ॥
श्रेष्ठी जे जे मेळविले । त्यासाठी भांडत बसले ।
मग जाणावे फावले । गलिमांसी ॥ ६ ॥
ऐसे सहसा करू नये । दोघे भांडता तिसऱ्यास जाये ।
धीर धरोन महत्कार्य । समजोन करावे ॥ ७ ॥
राजी राखता जग । मग कार्यभागाची लगबग ।
ऐसे जाणोनिया सांग । समाधान राखावे ॥ ८ ॥
सकळ लोक एक करावे । गलीम निवटून काढावे ।
ऐसे करिता कीर्ति धावे । दिगंतरी ॥ ९ ॥
आधी गाजवावे तडाखे । मग भूमंडळ धाके ।
ऐसे न करता धके । राज्यास होती ॥ १० ॥
समय प्रसंग ओळखावा । राग निपटून काढावा ।
आला तरी कळो नेदावा । जनामध्ये ॥ ११ ॥
राज्यामध्ये सकळ लोक । सलगी देऊनि करावे सेवक ।
लोकांच्या मनामध्ये धाक । उपजोच नये ॥ १२ ॥
बहुत लोक मिळवावे । एकविचारे भरावे ।
कष्ट करोन घसरावे । म्लेंछांवरी ॥ १३ ॥
आहे तितुके जतन करावे । पुढे आणिक मेळवावे ।
महाराष्ट्रराज्य करावे । जिकडे तिकडे ॥ १४ ॥
लोकी हिंमत धरावी । शर्तीची तलवार करावी ।
चढती वाढती पदवी । पावाल येणे ॥ १५ ॥
शिवाराजास आठवावे । जीवित्त्व तृणवत मानावे ।
इहपरलोकी रहावे । कीर्तिरूपे ॥ १६ ॥
शिवराजाचे आठवावे रूप । शिवराजाचा आठवावा प्रताप ।
शिवराजाचा आठवावा साक्षेप । भूमंडळी ॥ १७ ॥

शिवराजाचे कैसे बोलणे । शिवराजाचे कैसे चालणे ।
शिवराजाची सलगी देणे । कैसे असे ॥ १८ ॥
सकळ सुखांचा त्याग । करूनि साधिजे तो योग ।
राज्य साधनाची लगबग । कैसी असे ॥ १९ ॥
**त्याहून करावे विशेष । तरीच म्हणावे पुरुष**
याउपरी आता विशेष । काय लिहावे ? ॥ २० ॥

[ समर्थ संजीवनी पृष्ठ ७३ ]

तरुणांनी हे ओवीबद्ध पत्र मुखोद्गत करावे असेच आहे. समर्थांच्या उपदेशपद्धतीचा तो एक परिपक्व नमुना आहे. ज्या संभाजीराजांना उद्देशून पत्र लिहिले त्यांचे हातून घडलेल्या दोषांचा केवळ ओझरता उल्लेख करून यापुढे समय प्रसंग ओळखून राग आवरावा असा उपदेश केला आहे. 'दोघांचे भांडण तिसऱ्यास लाभ" हे सूत्र सांगून बहुत लोकांशी सलगी करून म्लेंछांवर घसरून पडण्याचा सल्ला दिला आहे. पत्राच्या उत्तरार्धामध्ये शिवरायांच्या दिव्य आणि भव्य स्मृतींना उजाळा देऊन त्यांच्याप्रमाणे आपणही जीवित तृणवत मानून शर्थीची तलवार करण्याचा उपदेश शूर संभाजीराजांना दिला आहे. हे पत्र संपविताना समर्थांनी ज्या ओळी लिहिल्या त्या ते केवळ समर्थ होते म्हणूनच लिहिण्याची हिंमत त्यांना झाली असे म्हणावे लागेल. शिवरायांनी सकळ सुखांचा त्याग करून राज्यसाधनाची लगबग कशी केली हे ध्यानात घेऊन, पुरुष म्हणवून घेण्यासाठी तुम्ही शिवरायांपेक्षा विशेष काही तरी करावे.

" सकळ सुखांचा त्याग । करुनी साधिजे तो योग ।
राज्य साधनेची लगबग । कैसी असे ॥
**त्याहून करावे विशेष । तरीच म्हणाहे पुरुष**
याउपरी आता विशेष । काय लिहावे ? ॥ "

या ओळींचा अर्थ किती खोल आहे तो पाहावा. शिवरायांनी राज्य संपाण्यासाठी जीवाचा केवढा आटापिटा केला तो पहा आणि आपण मात्र शिवरायांनीच विश्वासू सेवक म्हणून ज्यांना जवळ केले त्यांना ठार करीत आहात यात काहीच पुरुषार्थ नाही. तुम्हाला जर पुरुष म्हणून घ्यावयाचे असेल तर त्याहून काही तरी विशेष करावे लागेल. " अशा अर्थाचे पत्र संभाजीराजांसारख्या उग्र प्रकृतीच्या नरव्याघ्रास लिहिण्यास असामान्य धैर्य लागते. समर्थांसारखे भयरहित, निस्पृह समर्थच! शिवरायांनी जवळ केलेली माणसे संभाजीराजांविरुद्ध तरी का वागली ? खुद्द शिवाजीराजांची संभाजीराजांवर इतराजी का

झाली ? असे कोणते प्रमाद संभाजीराजांकडून घडले ? त्यावद्दल शिवरायांनी जी भूमिक घेतली ती बरोबर होती काय ? इत्यादी अनेक प्रश्न निर्माण होतात. ते साहित्यिकांच्या कथा कादंबऱ्यांचे विषयही झाले आहेत. त्या प्रश्नांबद्दल समर्थांनी आपल्या पत्रात चुकुन सुद्धा उल्लेख केला नाही उलट झाले ते होऊन गेले आता तरी 'उग्रस्थिती सांडावी" आणि सकळ लोक एक करून गलीम 'निवटून' काढण्याचा उपदेश केला. काय करू नये यापेक्षा काय करावे यावरच या पत्रामध्ये उपदेश देण्याचा भर आहे. "त्याहून करावे विशेष। तरीच म्हणावे पुरुष" येवढी एकच ओळ संभाजीराजांना जिव्हारी लागावी अशी त्या पत्रामध्ये आहे. पण त्यामुळे त्वेष येऊन संभाजीराजांनी समर्थांवर राग धरलेला नाही तर त्या उलट राजे अंतर्मुख झाले आणि खरोखरीच त्यांच्या वर्तनामध्ये त्या दिवसापासून बदल घडलेला असल्याचे इतिहास सांगतो. याला प्रमुख आधार म्हणजे कर्नाटकातील मुत्सद्दी रघुनाथपंत हणमंते यांना देखील संभाजीने जेरबंद करून आणविण्याची आज्ञा पूर्वी केली होती कदाचित त्यांना सुद्धा प्राणदंड मिळाला असता पण राजांचे मन बदलले आणि पंतांना मुक्त करण्याचा हुकूम गेला ! या हुकमामुळे पंतांना इतका आनंद झाला की तो वयोवृद्ध मुत्सद्दी अनवाणी पायांनी अनेक कोस अंतर चालून शिवपुत्र संभाजीच्या भेटीसाठी आला. आणि राजांच्या पायाला त्याने कडकडून मिठी मारली.

संभाजी राजांची पुढची सारी कारकीर्द केवळ शौर्य आणि धाडस याचा एक अजब नमुना आहे. अल्पावधीतच मराठी राज्याचा खातमा करण्याची औरंगजेबाची महत्त्वाकांक्षा त्याने धुळीस तर मिळविलीच पण त्याही पेक्षा संभाजीराजांनी ज्या पद्धतीने धैर्याने मृत्यूला कवटाळले त्याचे स्मरण होताच शरीरावर रोमांच उभे राहातात.

" शिवरायास आठवावे। जीवित्व तृणवत मानावे ।
इहपरलोकी रहावे। कीर्तिरूपे" – हा समर्थोपदेश संभाजीराजांनी सार्थ केला. सारा महाराष्ट्र आज राजांना मानाचा मुजरा करीत आहे.

## दासबोधामधील शिवरायाचे अप्रत्यक्ष उल्लेख

संत हे परमेश्वराचे जणू काही 'निरोपे'च असतात. विशिष्ट कालामध्ये विशिष्ट प्रकाराने लोकांना ते उपदेश करतात. सर्वांचा अध्यात्माच्या क्षेत्रातील उपदेश जरी एकच असला तरी समाजामध्ये जे वैचारिक नेतृत्व ते पत्करतात त्यामध्ये मात्र भेद आढळतात. त्या दृष्टीने पाहू गेल्यास समर्थांच्यामध्ये आणि अन्य संतांच्यामध्ये एक प्रमुख

भेद असा आढळतो की त्यांनी परमार्थाबरोबर आणखीही काही महत्त्वाचे सांगितले. समाजाच्या ऐहिक उन्नतीचीही त्यांनी चिंता वाहिली. प्रारब्धापेक्षा प्रयत्नवाद मोठा हे त्यांनी ठसठशीतपणे सांगितले. समाजाच्या राजकीय जीवनामध्ये घडणाऱ्या घटना त्यांच्या हृदयापर्यंत पोहोचत आणि त्यांच्या भावनांना त्यांचा स्पर्श होई. त्यामुळे त्या घटनांचे पडसाद समर्थांच्या सर्वच काव्यामध्ये जागोजागी आढळतात. शिवरायांच्या पराक्रमामुळे हर्षित झालेल्या समर्थांच्या लेखणीतूनच 'आनंदवनभूवना'चे उल्हासित करणारे वर्णन बाहेर पडले आहे. शिवरायांच्या साऱ्या चरित्राचीच घडण श्रीसमर्थांच्या नजरेसमोर होत होती. त्यामुळे 'शिवकल्याण राजांचे' गुणगान त्यांनी केले आहे. वास्तविक 'दासबोध' हा ग्रंथ त्यांनी भक्तिमार्गाच्या प्रसारासाठीच लिहिला आहे. तथापि त्यातही शिवरायांचा उल्लेख अप्रत्यक्षपणे झालेला आपणास आढळून येईल.

"धर्मस्थापनेचे नर । ते ईश्वराचे अवतार ।
जाले, आहेत, पुढे होणार । देणे ईश्वराचे ॥ (दा. १८ स. ६.)

या ठिकाणी ईश्वराचे अवतार सध्याही आहेत असा उल्लेख करताना शिवरायांचीच मूर्ती समर्थांच्यापुढे होती, हे निर्विवादपणे म्हणता येईल.

"महायत्न सावधपणे । समयी धारिष्ट धरणे ।
अद्भुतचि कार्य करणे । देणे ईश्वराचे ॥ , हे वर्णन शिवरायांनाच लागू पडते. दासबोधातील अठराव्या दशकातील सहाव्या समासाचे या दृष्टीने परीक्षण केल्यास प्रत्यक्ष नामोल्लेख न करता लिहिला गेलेला तो समास आहे. हे कोणाच्याही नजरेस येईल. त्याखेरीज आणखी चार सहा ठिकाणी शिवरायांचा असाच उल्लेख झाला आहे असे मला वाटते. दशक १५, समास ३ मधील दोन ओव्या पहा.

"व्याप आटोप करिती । धके चपेटे सोसिती ।
तेणे प्राणी सदेव होती । देखत देखता ॥ ७ ॥
ऐसे हे **आता** वर्तते । मूर्ख लोकांस कळेना ते ।
विवेकी मनुष्य समजते । सकळ काही ॥ ८ ॥

जे व्याप-आटोप करतात, धक्काबुक्की सहन करतात ते लोक पाहता पाहता सद्भाग्याचे होऊन जातात, आता सध्यादेखील हा प्रकार सुरू आहे. एक सद्भाग्याचा प्राणी उदयाला येतो आहे पण तो मूर्खांना समजत नाही. विवेकी माणसांना मात्र हे उमगते आहे ... हा भावार्थ शिवरायांचे समकालीन समर्थ व्यक्त करतात. न जाणो शिवरायांचे कर्तृत्व न मानणारी मंडळीही त्यावेळी त्या श्रोत्यांमध्ये असतील त्यांना उद्देशूनही हे नाही कशावरून?

द. १६ स. ४ मधे "नाना अवतारपंगती । भूमंडळावरी ॥ असा उल्लेख २७ व्या ओवीमध्ये केल्यानंतर "सध्या रोकडे प्रमाण । काही करावा नलगे अनुमान ।" हा २८ व्या ओवीतील उल्लेख शिवरायांबद्दलच असावा असा माझा तर्क आहे. कारण शिवाजी-महाराज हे अवतारी पुरुष असल्याबद्दलचा समर्थांचा कयास होता.

आता द. ६ स. ७ मधील पुढील दोन ओव्या पहा;

" करी दुर्जनाचा संव्हार । भक्तजनास आधार !
ऐसा हा तो चमत्कार । रोकडा चाले ॥ २९ ॥
मनी धरावे ते होते । विघ्न अवघेचि नासोनि जाते ।
कृपा केलिया रघुनाथे । प्रचित येते ॥ ३० ॥

या ओव्यांमध्ये दुर्जनांचा जो संव्हार समर्थांनी संकल्पिलेला होता तो प्रत्यक्ष संहार त्याच्या नजरेसमोर चाललेला ते पहात होते. ही जी रोकडी प्रचीती आल्यावर त्यांनी उद्गार काढले ते शिवरायांना उद्देशूनच होते असे समर्थ वाङ्मयाच्या अभ्यासकांना वाटल्याविना राहणार नाही.

द. १२ स. ८मध्ये "मागा होते जनकादिक । राज्य करताही अनेक । तैसेचि आत पुण्यश्लोक । कित्येक असती ॥" या ओवीमध्ये त्यांच्या नजरेपुढे शिवरायांखेरीज दुसर कोणता पुण्यश्लोक राजा होता की ज्याची तुलना जनकाशीच व्हावी ? "पुण्यवंत नीतीवंत । जाणता राजा । असा शिवरायांचा उल्लेख करणाऱ्या समर्थांनी 'पुण्यश्लोक' हा शब्द उपनिर्दिष्ट ओवीमध्ये उपयोजिला तो शिवरायांना उद्देशूनच असला पाहिजे.

शिवरायांचे समर्थांशी संबंध होते का ? असल्यास ते कशाप्रकारचे असतील याबद्दल हरतऱ्हेने संशोधन पूर्वी सुरू होते व आजही आहे. पण या बाबतीत संशोधकांची खरी गैरसोय जर कोणी केली असेल तर ती स्वतः समर्थांनीच असे प्रा. शिवाजीराव भोसले एकदा म्हणाले होते. सध्याचे कवी ज्याप्रमाणे एखादी कविता लिहिल्यावर ती कोणत्या तारखेस लिहिली इतके लिहून थांबत नाहीत तर अमुक कविता मिरज ते बेळगाव प्रवासात रेल्वेच्या डब्यात बसून, अमुक इतके वाजता कविता पूर्ण केली, असा उल्लेख करतात अशा प्रकारचा कोणताही उल्लेख समर्थांनी केला नाही, असे विनोदी उद्गार महाराष्ट्रकवी यशवंत यांनी काढले आहेत.

शिव-समर्थ संबंधामध्ये तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी म्हणाले होते की, "आधी केले मग सांगितले" असा समर्थांचा बाणा होता. त्यांनी "गुप्त ते गुप्त जाणावे" असे लिहिले आहे. असे असताना, त्यांनी जे काही राजकारण केले असेल ते उघडे

कसे होऊ शकेल ? कारण ती गुप्तता समर्थांची होती, येरागबाळ्याची नव्हती. त्यामुळे कागदपत्रांचे संशोधन करणाऱ्यांच्या पदरी निराशाच येईल. बोलावयाचे लिहू नये। लिहावयाचे बोलू नये' अशा प्रकारचे दंडक समर्थांनी पाळले होते." वरील विचार मार्मिक आहेत.– "× × × गुन्ह्याचा शोध करण्यासाठी × × × नावाचे सी. आय. डी. इन्स्पेक्टर × × × येथून येत आहेत" अशा बातम्या काही वेळा वृत्तपत्रात येतात– समर्थांनी गुप्तता पाळली ती अशा प्रकारची असणे शक्यच नाही, त्यामुळे शिवरायांच्या बाबतीत त्यांचे विचार कोणते होते, त्यांच्याशी समर्थांचे संबंध कसे होते हे आता म्हणजे ३०० वर्षांनंतर शोधावयाचे तर समर्थांचे समग्र वाङ्मयच अभ्यासिले पाहिजे. ते पहात असताना मात्र अनेक ठिकाणी संदर्भ मिळू शकतात. समर्थांनी तुळजाभवानीची केलेली प्रार्थना, शिवरायांना त्यांनी पाठविलेली एक दोन पत्रे, संभाजीला लिहिलेले पत्र यावरून सर्व धागे जुळविता येतात. पण या ठिकाणी केवळ दासबोधामध्ये शिवरायांचे जे उल्लेख अप्रत्यक्षपणे समर्थांनी केले आहेत, असे मला वाटते त्यांचाच केवळ निर्देश केला आहे.

बाह्य परिस्थिती एकसारखी पालटत असते. त्यामुळे विशिष्ट काळच्या परिस्थितीचा किंवा व्यक्तींचा ग्रंथातील उल्लेख कालबाह्य होतो आणि तो ग्रंथसुद्धा कालबाह्य ठरतो. पण ज्यामध्ये चिरंतन तत्त्वे गोविली जातात असा ग्रंथ मात्र अजरामर ठरतो. 'दासबोध' हा ग्रंथ असाच सदा सर्वकाळ साधकांना मार्गदर्शक ठरणारा अजरामर ग्रंथ ठरावा ही समर्थांची इच्छा होती. त्यामुळे शिवरायांचा उल्लेख प्रत्यक्षपणे त्यात त्यांनी केलेला नसला तरी शिवरायांचा अप्रत्यक्ष उल्लेख मात्र त्यांनासुद्धा टाळता आलेला नाही किंवा त्यांनी तसा टाळलेला नाही; अशा काही स्थळांचे दर्शन मला मोठे विलोभनीय वाटले. तेच वाचकांना घडविणे हाच या लेखाचा मानस.

श्रीसमर्थ अनुग्रहीत 'अमात्य' घराणे

## श्रीसमर्थ शिष्य–"हुकुमतपन्हा" रामचंद्रपंत आमात्य

कुशल राजनीतिधुरंधर, पराक्रमी देशभक्त आणि महान समर्थशिष्य या शब्दांत ज्यांचा गौरव करता येइल असे एक चरित्र महाराष्ट्राच्या आणीबाणीच्या काळात निर्माण झाले. ते चरित्र मराठी राज्याचे निष्ठावंत आमात्य, रामचंद्रपंत यांचे ! शिवरायांच्या राजनीतीवर सुसूत्र असा त्यांचा ग्रंथ "आज्ञापत्र" हा असून तो असंख्य विद्यार्थ्यांचा अभ्यासाचा विषय आजही आहे. महाराष्ट्राचे ज्येष्ठ इतिहास संशोधक म. म. दत्तो वामन पोतदार या ग्रंथाबद्दल म्हणतात : "आज्ञापत्र हा ग्रंथ मराठी भाषेचे राजकीय वाङमयाचे

केवळ एक अपूर्व लेणे आहे. अथपासून इतिपर्यंत हा चिमुकला पण तेजस्वी ग्रंथ हजार वेळा वाचला तरी तृप्ती होत नाही. शिवकालीन राजनीतीचे इतक्या सुंदर भाषेत, इतक्या ऐटीने आणि इतक्या प्रचीतीने अन्य कोठेही वर्णन केलेले आढळणार नाही.'' आपल्या कर्तृत्त्वाने आणि लेखनशैलीनेही अजरामर झालेल्या रामचंद्रपंतांच्या चरित्राचे अल्पसे दर्शन आपणास घ्यावयाचे आहे.

रामचंद्रपंताचे मूळ घराणे कल्याणकडील कोलवण येथील आहे. या घराण्याकडे वतनाची अनेक गावे होती त्यामुळे 'भिवडीकर,' 'भाणादेकर' इत्यादी अनेक आडनावांप्रमाणे बहुतकर हेही या घराण्याचे मूळ नाव होते. रामचंदपंतांचे आजोबा सोनभट यांचा शिवाजीमहाराजांशी संबंध आला. रायरी व शृंगारपूर जिंकून घेण्याच्या मोहिमेत सोनभटांचे दोन चिरंजीव आबाजी अणि निळोजी यांचे कर्तृत्त्व शिवरायांना दिसून आले माणसांची पारख करण्यामध्ये अद्वितीय अशा शिवरायांनी त्या बंधूद्वयास आपल्या नजीक ओढले. १६६२ मध्ये निळोजी सोनदेव हे छत्रपतींचे 'आमात्य' झाले. तेव्हापासून या घराण्याचे आडनावही 'आमात्य' च झाले.

चाफळनजीक शिंगणवाडी येथे शिवरायांना श्रीसमर्थांचा अनुग्रह झाला, त्यावेळी त्यांच्या समवेत असलेल्या नीळोपंत मुजुमदार आणि बाळाजी आवजी चिटणीस यांनाही अनुग्रह दिला व दोघांना सेवाधर्म सांगितला. त्यावेळेपासून रामचंद्रपंत आमात्यांच्या घराण्यामध्ये रामभक्ती सुरू झाली व दासपंथाचे अनुयायांमध्ये त्यांची गणना झाली. रामचंद्रपंतांचा जन्म इ. स. १६५० मध्ये झाला. श्रीसमर्थांच्या आशीर्वादानेच हा मुलगा आपणांस लाभला आहे अशी भावना असल्यामुळे मुलाचे नाव 'रामचंद्र' ठेवले. निळो सोनदेव यांनी १६६२ ते ७२ पर्यंत शिवरायांचे अमात्यपद भूषविले या काळामध्ये रामचंद्रपंतांनी त्यांच्या राजनीतीचे सूक्ष्म अवलोकन जसे केले तसेच श्रीसमर्थांच्या अध्यात्मिक विचारांचाही अभ्यास केला असे म्हणण्याजोगा पुरावा देता येईल. रामचंद्रपंतांनी शिवरायांचे चित्त आकृष्ट करून घेतले. त्यामुळेच निळो सोनदेवांना देवाज्ञा झाल्यानंतर आमात्यपदाची धुरा रामचंद्रपंतांवर सोपविली गेली. १६७२ ते ७७ पर्यंत ते अमात्यपदावर होते. त्यानंतर १६८० ते ८५ या काळात कुडाळचे सुभेदार म्हणून पंतांची नेमणूक झाली होती. संभाजी महाराजांची कारकीर्द संपून राजाराम महाराज अत्यंत आणीबाणीच्या प्रसंगात मराठ्यांच्या सिंहासनावर आले. त्यांनी १६९२ मध्ये आमात्यपद पुन्हा रामचंद्रपंतास दिले. राजाराम महाराजांना स्वसंरक्षणासाठी महाराष्ट्र सोडून जिंजीस जावे लागले. अशा परिस्थितीत महाराष्ट्रात सैन्याची उभारणी करून मोंगली फौजांशी दोन हात करण्याचा

प्रसंग रामचंद्रपंतांवर आला. शंकराजी नारायण, संताजी घोरपडे आणि धनाजी जाधव हे त्यांचे सहकारी होते. पुढे परशुरामपंत प्रतिनिधी, हणमंतराव निंबाळकर आणि नेमाजी शिंदे हे सहकारी नव्याने लाभले. मराठ्यांच्या हालचालींना सुरुवात नोव्हेंबर १६८९ पासूनच झाली. मुख्य प्रेरक शक्ती रामचंद्रपंत यांची होती. "[१]

रामचंद्रपंत यांनी युद्धाला निराळेच वळण दिले.[२] संभाजी राजांना हौतात्म्य लाभले, महाराणी येसूबाई व शाहू हे मोगलांच्या कैदेत सापडले. राजारामाला जिंजीला जावे लागले. मराठ्यांचे किल्ले मोगलांच्या ताब्यात गेले हे सर्व झाले तरी मराठ्यांची सैन्ये शाबूत होती. सैन्याचा पुरा मोड झाला नव्हता हे लक्षात ठेऊन मराठ्यांच्या नेत्यांनी आपले लष्करी अणि राजकीय डावपेच आखले. रामचंद्रपंतांच्या पुढील पत्रात धोरण व्यक्त झाले आहे.

"आम्ही स्वारी करून वाईस आलो. वाईचा कोट रगडून घेतला. प्रतापगड आदि करून किल्ले हस्तगत केले; तुम्ही नवा जमाव करून सुभेदाराजवळी राहाणे, पोख्तीच्या जमावे करून स्वारी शिकारी करून जे गड गनिमाने घेतले ते फिराऊन हस्तगत करणे. गनिमांची ठाणी जागोजाग असतील ते कुल मारून काढणे. ( शके १६१२ वैशाख शुद्ध अष्टमी ) "[३]

पण अशा प्रकारचे पत्र लिहिणारे पंत काही नुसते लोकांना उपदेश करणारे नव्हते. "आधी केले मग सांगितले" असा वाणा असलेल्या सद्गुरूंचे ते शिष्य होते. पंतांनी प्रथम प्रतापगडचा किल्ला सर केला, वाईचे मोगल ठाणे उधळून लावले आणि नंतरच त्यांनी या यशाचा पूर्ण फायदा घेण्यासाठी आपल्या सहकाऱ्यांना अपूर्व असे प्रोत्साहन दिले.

दत्ताजी केशवजी नाईक, पिसाळ यांनी आपल्या कैफियतींत याचा उल्लेख असा केला आहे " त्यावरून आपण फिरोन लष्करात जाऊन आपली सनद दुरुस्त करावी. तो वाईचे ठाणे, राजश्री रामचंद्र पंडित आमात्य व राजश्री शंकराजी पंडित सचिव व संताजी घोरपडे व जाधवराव यांनी येऊन मारून काढले. खिजमततलबखान दस्त केला. या कैफियतीचा सरळ अर्थ हाच की छत्रपतींच्या विजनवासामध्ये वरील मराठी राज्य अग्रणीनी देश यशस्वीरीत्या लढवीत ठेवला. औरंजेबाने एकदा रामचंद्रपंत व अन्य सरदार यांच्यात फूट पाडण्याचा प्रयत्न करून पाहिला पण त्या पाताळयंत्री कारवाया हाणून पाडून रापचंद्रपंतांनी परिस्थितीवर मात केली, फितुरीवर मात करून आपला पत्रव्यवहार विनचूक राखला व शेवटी जिंजीहून मोगलांच्या तडाख्यातून राजारामास

१-२. हिंदवी स्वराज्य आणि मोगल पृष्ठ ११४.

३ राजवाडे, खंड १७ लेखांक २०.

सोडवून आणले. राजारामाने नंतर "हुकुमतपन्हा" हे अमात्यावरचे नवीन पद निर्माण करून रामचंद्रपंतास 'बढती' दिली. आपल्या अधिकाराचा उपयोग अत्यंत नेकीने करून स्वराज्याची सेवा त्यांनी निष्ठेने केली." [१]

राजारामाच्या निधनानंतर महाराणी ताराबाईच्या पक्षाला रामचंद्रपंत मिळाले. देशाच्या आपत्काली ताराबाई यांनी नामोहरम न बनता मराठा मंडळास प्रोत्साहन दिले होते. त्यामुळे त्यांचाच पक्ष खरा असे रामचंद्रपंतास वाटले. संभाजीपुत्र शाहूराजे हे राज्याचे कायदेशीर वारस असले तरी रामचंद्रपंतांनी त्यांना विरोध केला. मोगलांचा पाठिंबा व शिफारसपत्र घेऊन आलेल्या शाहूला रामचंद्रपंतांनी कधीच आपले मानले नाही. तथापि छत्रपती शाहूला यश लाभले. इकडे महाराणी ताराबाई यांना मनातून रामचंद्रपंतांबद्दल काहीसा अविश्वास वाटू लागला. एकदा तर रामचंद्रपंतास महाराणी ताराबाई यांनी कैद करण्याचा प्रसंग आला. पण त्यावेळी देखील रामचंद्रपंतांच्या पूर्वायुष्यातील कामगिरी-बद्दल पूर्ण आदर व्यक्त करण्याच्या भावनेने रुप्याची बेडी त्यांना घालण्यात आली. या प्रसंगात महाराणी ताराबाई यांच्या विवेकशीलतेचा प्रत्यय येतो.

"रामचंद्रपंताने मग धनाजी जाधव यास फितूर करून शाहूकडे पाठविले. परशुराम-पंत प्रतिनिधी लढाईचे इराद्याने शाहूमहाराजांवर चालून गेला. परंतु जाधवराव वगैरे सरदार तिकडे मिळालेले पहाताच तो साताऱ्यास पळून गेला. शाहू महाराजांनी परशु-रामपंतास कैद केले. हे वर्तमान येताच ताराबाईंनी रामचंद्रपंतास कैदेतून सोडून रांगण्यास आणले." [२]

पुढे १७१४ मध्ये राजारामाची दुसरी पत्नी राजसबाई हिचा मुलगा संभाजी हा कोल्हापूरच्या गादीवर आला. याच्याच कारकिर्दीमध्ये रामचंद्रपंतांनी 'आज्ञापत्र' हा आपला बहुमोल ग्रंथ निर्माण करून महाराष्ट्रशारदेच्या कंठामध्ये एक मनोहर अलंकार चढविला. "राज्यकारभाराचा अनुभव त्याने लिहिलेल्या राजनीतीत ओतला आहे. त्यावरून त्याची कर्तबगारी व्यक्त होते. १७१६ नंतर अमात्य म्हणून त्यांचे कागद उपलब्ध नाहीत. रामचंद्रपंताचा मृत्युकाळ निश्चित नाही..... कारभारामध्ये आपले प्रयोजन राहिले नाही असे समजताच सर्व कामे सोडून केवळ संन्यस्त वृत्तीने अज्ञातवासात उत्तरायुष्य घालवणारे रामचंद्रपंतासारखे धैर्यवान पुरुष फारच विरळा दिसून येतात." [३] या शब्दात

---

१. सुलभ विश्वकोश पृष्ठ २।४३.

२. मराठी रियासत मध्यविभाग १ पृष्ठ १८.

३. मराठी रियासत मध्यविभाग १ पृष्ठ ४३.

रियासतकार गो. स. सरदेसाई यांनी रामचंद्रपंताच्या कर्तबगारीचे वर्णन केले आहे.

वर उल्लेखल्याप्रमाणे पंतांच्या मृत्युकाळासंबंधी निश्चित माहिती नाही. तथापि आता १७१९ साली ते निर्वतले असल्याचे काही संशोधन झाले आहे. गिरीधरस्वामींनी आपल्या समर्थप्रतापमध्ये पंताच्या पन्हाळ्यावरील समाधीवृंदावनाचा उल्लेख केला आहे.

' "रामचंद्र नीळकंठ शिवराज अमात्य । अतिशय उत्सह करी नित्यनैमित्य ।
ज्याची वृंदावने लोक नित्य । पराशरपर्वती पूजिताती ॥ ५ ॥ "

## श्रीसमर्थ प्रभावित रामचंद्रपंत आमात्य :

श्री समर्थांची जी अनेक चरित्रे प्रसिद्ध झाली आहेत त्यामध्ये कै. स. खं. आळतेकर लिखित चरित्रास विशेष महत्त्व आहे. समर्थांनी 'धर्ममूलक विवेक वैराग्यप्रधान प्रयत्नवाद' शिकविला त्यायोगे शिवसमर्थकाळीच नव्हे तर त्यांच्या पश्चात झालेल्या इतिहासप्रसिद्ध स्वातंत्र्ययुद्धात महाराष्ट्र यशस्वी झाला हा सिद्धांत त्यांनी मांडला आहे. रामचंद्रपंत आमात्य, धनाजी जाधव, संताजी घोरपडे, प्रल्हाद निराजी, खंडो बल्लाळ आदी वीरांनी हाच उपदेश कार्यवाहीत आणला. येथे त्यापैकी रामचंद्रपंतांच्या संबंधीच काही विचार मांडण्याचा यत्न आहे.

रामचंद्रपंतांच्या घराण्यात दाससंप्रदाय अगोदर पासूनच चालू होता. संस्थान बावडे येथील अस्सल कागदपत्रावरून हे दिसून येते. रामचंद्र नीळकंठाना मुज झाल्यापासूनच समर्थांचा सहवास मिळाला होता. त्यांना त्यांच्या पिताजींप्रमाणेच समर्थांचा अनुग्रह लाभला होता.

समर्थांच्या समाधीची बातमी समजताच संभाजीराजे यांनी रामचंद्रपंतापाशी पुष्कळ द्रव्य देऊन सज्जनगडावर पाठविले. आमात्यांनी राजगुरूंना शोभेल अशारीतीने दानधर्म करून उद्ध्वाकडून समर्थांचे उत्तरकार्य केले. नंतर दहनस्थळी समाधी बांधून चंदनाचा ओटा समर्थशिष्य तारळेकर गोसावी यांचेकडून करवून त्यावर पादुकांची स्थापना केली. लवकरच रामचंद्रपंत आमात्य यास बरोबर घेऊन स्वतः संभाजीमहाराज समर्थ समाधीच्या दर्शनार्थ गेले तेव्हा समाधीसुद्धा मोठे देवालय बांधण्याचा हुकूम दिला व महिन्यात मोठे देवालय करविले.' ( पृ. ९४,९५ आळतेकरकृत स. च. )

चाफळ येथे समर्थस्थापित राममंदिर आहे. त्याला औरंगझेबाच्या स्वारीचे वेळी धोका होण्याचा संभव आहे हे ध्यानात घेऊन तेथील श्रींच्या मूर्ती वाघापूरच्या

३. श्रीसमर्थ चरित्र खंड ३ पृष्ठ २४६ ले. शं. कृ. देव.

सड्यावर नेण्याची व्यवस्था केली. तेथेही उत्सव होत असे त्यावेळी पंतआमात्य साहित्य पुरवीत असत.

लढाईच्या धामधुमीमध्येही रामचंद्रपंत सज्जनगडास येत असत असे दिसते. राजकारणपट्टू ताराबाईराणी महाराज, राजाराम महारांजावरोबर चंदीचंदावरास जाण्यापूर्वी सज्जनगडास समर्थ समाधीच्या दर्शनास आल्या होत्या. अशाप्रकारचे अनेक उल्लेख सापडतात; त्यावरून छत्रपतींचे भोसले घराणे, पंत आमात्यांचे घराणे तसेच बाळाजी आवजींचे चिटणीस घराणे यांची समर्थांवरील निष्ठा प्रगट होते. रामचंद्रपंतांच्या ठिकाणी ती निष्ठा विशेषच होती असे दिसते. त्यानी लिहिलेल्या आज्ञापत्रातून हा एक पुरावा मिळतो.

" एवढी समर्थ-भक्ती बाळगणारा अणि समर्थांच्या सान्निध्यात वावरलेला मुत्सद्दी जेव्हा समर्थांनी उत्कटतेने पुकारलेल्या शिवप्रभूंच्या स्वराज्यनीतीचे विवरण करावयास प्रवृत्त होतो तेव्हा आपोआपच त्याच्या लेखणीतून समर्थवाणीचा प्रभाव व्यक्त होतो. या प्रभावाची गमके 'आज्ञापत्रात' जागोजाग आढळतात. वाचकांच्या सोयीसाठी काही वेचक साम्यस्थळे खाली देत आहे. समर्थ-साहित्याशी परिचय झालेला कोणीही वाचक 'आज्ञापत्र' वाचताच अशी कबुली देईल की " आज्ञापत्रकार समर्थ-वाणीत रंगून गेलेला आहे. "[१]

( १ ) " ( थोरले महाराजसाहेब यांनी ) बुद्धिवैभवे व पराक्रमे कोण्हाची गणना न करिता, कोण्हावरी चालोन जाऊन तुंबल युद्ध करून रणासी आणिले, कोण्हावरी छापे घातले. कोण्हाचे डेरियात सिरोन मारामारी केली. औरंगजेबासारिखे महाशत्रु स्वप्रतापसागरी निमग्न करून दिगांत कीर्ती संपादली, ते हे राज्य " हा रामचंद्रपंतांनी वर्णन केलेला भाग आणि श्रीसमर्थांनी केलेला शिवगौरव हे शेजारी ठेऊन पडताळून पहाण्यासारखे आहेत. ' कित्येक दुष्ट संहारिले । कित्येकास धाक सुटले । कित्येकास आश्रय जाले । शिव कल्याणराजा ' किंवा ' सावधपणे नृपवर तुच्छ केले ' हे समर्थांचे उद्गार वाचून त्यांची ज्यांच्यावर छाप पडली आहे अशा रामचंद्रपंतानी शिवरायांवद्दल लिहिलेला गौरवपूर्ण मजकूर यात विलक्षण साम्य आहे.

( २ ) ' इतकियाचवर कृतकार्यता किंवा श्लाघ्यता मानून राहीन म्हणता पुढील उद्योग राहून जातो ' ' संपादिले पाठीशी घालून नित्यनूतन संपादावे ' हे आज्ञापत्रामधील शब्द आणि ' आहे तितुके जतन करावे । पुढे आणिक मेळवावे । ' हा श्रीसमर्थांचा उपदेश यात काय फरक आहे ?

(३) ' मनुष्य परीक्षेने नूतनच सेवक नवे नेमून योग्यतेनुसार भार वाढवून महत्का-

१. श्री रा. चिं. ढेरे व प्र. पं. जोशी संपादित ' रामचंद्रपंत प्रणीत आज्ञापत्र. '

र्योपयोगी करून दाखविले '–आज्ञापत्र १. ' जे लोक ठेवणे ते परम विश्वासू पारंपर्यसेवक अलालुची, प्रामाणिक जे असतील, ते परीक्षा करून ठेऊन ज्याचा अधिकार जो असतो त्याचेच हाते... '–आज्ञापत्र ३. हा भाग वाचून कोणाचीही अशी खात्री पटेल की, ' आधी मनुष्य ओळखावे । योग्य पाहून काम सांगावे । निकामी तरी ठेवावे । एकीकडे ॥– राजधर्म ४. हे श्रवण केलेल्या व्यक्तीचे हे उद्‌गार असले पाहिजेत. श्रीसमर्थांनी जो राजधर्म सांगितला आहे त्याचाच गद्यावतार आज्ञापत्रामध्ये अवतीर्ण झाला असल्याबद्दल खात्री पटविणारी आणखी काही उदाहरणे पहावी.

( १ ) ' मुख्य सूत्र हाती घ्यावे । करणे ते लोकाकरवी करवावे ' श्रीसमर्थ.

' सकळही अवश्यमेव अवगत करून ठेवावे, परंतु हे श्रमावह धंदे स्वांगे करीत न जावे '–आज्ञापत्र ३.

( २ ) ' हिंडता पारखी लोका । कार्यकर्ता जिवी धरी ' श्रीसमर्थ.

' फिरतेसमयी मनुज्याची आस्था धरून...जेथे जे जे उत्तमप्रतीचे मनुष्य आढळेल ते समागमे घेऊन माया लावून परीक्षा करून...ठेवावे '–आज्ञापत्र ३.

( ३ ) ' समयी मनुष्य कामा येते । याकारणे सोसिजे ते ॥ श्रीसमर्थ.

' राजेलोकी सोसक असावे '–आज्ञापत्र ३.

( ४ ) ' कार्यकर्ता प्रयत्ने जाड । काही एक असला हेकाड । तरी समर्थपणे पाठवाड । केली पाहिजे ' श्रीसमर्थ. ( राजधर्म ६ ).

' प्रधान म्हणजे हस्तीचे अंकुश. सकलामध्ये त्याचे थोरपण वाढले पाहिजे याकरित समयविशेषे आपला आग्रह सोडून त्याचा शब्द चालविलासा करावा. '–आज्ञापत्र.

( ५ ) दासबोधात श्रीसमर्थांच्या विवेचनपद्धतींची एक विशिष्ट अशी शैली आहे. ' कवीश्वर स्तवना ' मधील त्यांची कवींचे महत्त्व सांगणारी शैली पाहावी आणि मग रामचंद्रपंताच्या आज्ञापत्रातील ' प्रधानमहिमा ' वर्णन करणारी वाक्ये पहावी. उदाहरणार्थ–

' प्रधान म्हणजे राज्यरक्षणाचे स्तंभ आहेत. प्रधान म्हणजे नृपसत्ताप्रसारक. प्रधान म्हणजे प्रजापालनधर्म संरक्षणाचे अध्यक्ष प्रधान म्हणजे राजमदजनित अन्यायसागराची मर्यादा. प्रधान म्हणजे हस्तीचे अंकुश. किंबहुना प्रधान म्हणजे..नृपाची विश्रांती. प्रधान हेच राजेलोकांचे बाहू. प्रधान हेच राजबंधू..' हा रामचंद्रपंताच्या गद्यशैलीचा नमुना आणि

" कवी मुमुक्षाचें अंजन । कवी साधकांचे साधन ।
कवी स्वधर्माचा आश्रयो । कवी मनाचा मनोजयो ।
कवी धर्मिकाचा विनयो । विनयकर्ते ॥ ११ ॥

कवी सभेचे मंडण । कवी भाग्याचे भूषण ।
नाना सुखाचे संरक्षण । ते हे कवी ॥ १९ ॥ (दा. २, ७) यातील साधर्म्य पहावे.

वास्तविक श्रीसमर्थ आणि रामचंद्रपंत आमात्य यांचे वर्ण्यविषय अगदीच भिन्न आहेत. पण श्रीसमर्थांच्या विचेचन शैलीचाच नव्हे तर विवेकपूर्ण तपशील देण्याचा प्रकारही रामचंद्रपंताने समर्थांपासूनच उचलला असल्याचे सिद्ध करता येण्याजोगे आहे. दासबोधामध्ये दास्यभक्तीचे विवरण करताना, पुण्यवाटिका कशा कराव्या, भोजनशाळा, धर्मशाळा कशा असाव्यात, जयंत्या महोत्सव कसे साजरे करावे, " भंगली देवालये करावी, मोडली सरोवरे बांधावी " इत्यादी कितीतरी मजकूर श्रीसमर्थ भराभर लिहून जातात अगदी त्याच शैलीने पंत आमात्यसुद्धा दुर्गव्यवस्था कशी असावी, दुर्गाधिकारी कसे असावे दुर्गावरील सुसज्जता कशी राखावी याचा अत्यंत बारीक तपशील लिहितात. किल्ल्यावरील दारूगोळा कसा ठेवावा, त्याला " आठपंधरा दिवशी हवालदाराने बाहेर काढून उष्ण देऊन मागुती मुद्रा करून ठेवीत जावे " असे सूक्ष्म वर्णन देतात. विवेकाची सूक्ष्म दृष्टी समर्थांच्या उपदेशातून जागृत झालेले रामचंद्रपंत राजकारणातही तीच दृष्टी उपयोगात आणीत असत.

या सर्व संबंधात श्री. रा. चिं. ढेरे आणिश्री. प्र. पं. जोशी या लेखकद्वयाने त्यांच्या " रामचंद्रपंत आमात्यप्रणीत स्वराज्यनीती–आज्ञापत्र " या पुस्तकामध्ये एक महत्त्वाचा सिद्धान्त प्रक्षेपित केला आहे. तो अधीकच महत्त्वाचा आहे.

" समर्थ-साहित्य आणि आज्ञापत्र यातील साम्याचा प्रत्यय अत्यंत उद्‌बोधक आहे. कारण त्या साम्यप्रत्ययाने शिवसमर्थ-ऐक्यात्म्यावरही आपोआप प्रकाश पडतो. शिवप्रभूंची राजनीती समर्थ-विचारांशी सुसंवादी आहे, हे शिव-समर्थ अनुयायी असणाऱ्या रामचंद्रपंतांच्या " आज्ञापत्रा "त दिसून यावे ही गोष्ट एका दगडाने दोन पक्षी मारणारी आहे. समर्थ-प्रभावित ' आज्ञापत्र ' समर्थभक्त रामचंद्रपंतांनीच लिहिले आहे आणि शिवप्रभूंच्या राजनीतीवरचा हा ग्रंथ समर्थ-विचारांशी सुसंवादी असल्यामुळे शिव-समर्थांचे हृदय एकरस आहे; हे दोन सिद्धान्त यातून निष्पन्न होतात. "

[ आज्ञापत्र हे नीळकंठ मोरेश्वर या शिवकालीन मुत्सद्यांनी लिहिले असावे असा एक प्रवाद आहे. ज्याप्रमाणे शिव-समर्थ भेट झालीच नाही यावर इतिहास संशोधक वाद-विवाद करीत असतात तशातीलच हाही प्रकार आहे. देशासाठी देहत्यागापर्यंतची ज्याची तयारी होती त्या रामचंद्रपंतास देशद्रोही म्हणण्यापर्यंतही एका संशोधकाची मजल

गेली आहे ! विशिष्ट रंगाचा चष्मा लावून पाहणाऱ्यांनी सत्याचा अपलाप केला तरी त्याकडे दुर्लक्ष करावे हेच उत्तम.]

श्रीसमर्थांच्या समाधी मंदिराची उभारणी करण्यासाठी संभाजी महाराजांनी रामचंद्रपंतासच सज्जनगडावर पाठविले होते. समर्थ अनुग्रहीत रामचंद्रपंताने देशरक्षणासाठी केलेली कामगिरी व त्याने प्रगट केलेली शिवराज्यनीती याबद्दल कोणाही समर्थभक्ताला त्यांच्याबद्दल परम आदरच वाटेल.



श्रीसमर्थ अनुग्रहीत 'चिटणीस' घराणे

## राष्ट्रभक्त खंडो बल्लाळ (भाग १ ला)

शिवाजी महाराजांचे महाप्रयाण इ. स. १६८० मध्ये झाले. त्यानंतरच्या काळामध्ये एकामागून एक अशा दुर्घटना महाराष्ट्रात घडल्या. संभाजी राजांनी राज्यपद मिळविल्यानंतर त्याना विरोध करणाऱ्या साऱ्यांचा निकाल करण्याचे तंत्र अवलंबिले. त्यातच १६८१ मध्ये ऑगस्ट महिन्यात सज्जनगडाच्या पायथ्याशी असलेल्या परळीनजीक उरमोडी नदीच्याकाठी एक अत्यंत हृदयद्रावक घटना घडली, ती म्हणजे शिवरायांनी ज्यांना राज्याची चिटणिसी बहाल केली होती असे त्यांच्या विश्वासातले बाळाजी आवजी चिटणीस यांना हत्तीचे पायी देण्यात आले ! इतके करूनही उग्रप्रकृती संभाजीराजे थांबले नाहीत. बाळाजींचे बंधू शामजी आणि बाळाजींचा मुलगा आवजी यांचाही तशाच प्रकारे वरूरतेने वध करण्यात आला ! बाळाजींचे वतन सरकारजमा तर करण्यात आलेच पण शिवरायांनी चित्रे घराण्यास (बाळाजी आवजींचे मूळ आडनाव चित्रे होते.) वंशपरंपरेने चिटणिसी बहाल केली ती चालविणारा कोणी वंशज शिल्लकच राहू नये म्हणून बाळाजींचे आणखी जे मुलगे खंडोजी आणि निळोबा हे होते त्यांनाही वाघाच्या तोंडी देण्याचा हुकूम काढला !

खंडोजी हा त्यावेळी चौदा वर्षांचा होता. त्याला स्वतःच्या वडिलांप्रमाणेच लेखनक्रियेचा छंद होता. त्याचे हस्ताक्षर म्हणजे जणू मोत्यांचे सरच ! राणी येसूबाई यांनी या मुलाला हेरले होते. संभाजी राजांचा हुकूम आला; खंडोजीला वाघाच्या तोंडी द्या ! या हुकमाच्या आड जगातील कोणती शक्ती येणार ? पण येसूबाईसाहेबांनी खंडोजीला अभयदान दिले आणि त्याच्या जीवदानासाठी राजांपाशी पदर पसरला. त्यामुळे खंडोजीची सुटका झाली. 'खंडो बल्लाळ चिटणीस' म्हणून मराठ्यांच्या इतिहासात पुढे जे दैदीप्यमान चरित्र गाजले ते राणी येसूबाई यांच्या दयाळूपणामुळेच. येसूबाई यांनी

खंडोजीचा पुत्रवत सांभाळ केला. कागदपत्र लिहून देणे आणि राजमुद्रा उठविणे हे काम तो करू लागला.

खंडोजीला कुशाग्रबुद्धी आणि थोर विवेक यांची ईश्वरी देणगीच मिळाली होती. चित्रे घराणे कोकणामध्ये असताना खंडोजीच्या आजोबांना गोणपाटाच्या पोत्यात घालून समुद्रात बुडवून सिद्दयाने त्यांचा वध केला होता. त्या काळी परकीय अंमलाखाली महाराष्ट्र कसा भरडून निघाला होता याची वर्णने खंडोजीने आपल्या मातापित्यांकडून ऐकली होती. परवशतेचा अंधार नष्ट करून स्वातंत्र्यसूर्याची प्रभा सर्वत्र पसरविणाऱ्या महापराक्रमी शककर्त्या शिवरायांना खंडोजीने स्वत:च्या डोळ्यांनी नुसते पाहिले नव्हते तर त्यांचा प्रत्यक्ष परिचय त्याला झाला होता. " शिवरायाचे कैसे बोलणे । शिवरायाचे कैसे चालणे । " हे त्याच्या ध्यानीमनी सदैव भरून राहिले होते. शिवरायांच्या तेजस्वी जीवनाची आणि अंतरंगाची माहिती चिटणीसाइतकी दुसऱ्या कोणास असणार ? अशा बाळाजी आवजीचा सुपुत्र खंडोजी होता. येसूबाईने कृपेची पाखर घातल्यामुळे स्वराज्याची सेवा करण्याची पुन्हा संधी खंडोजीला लाभली होती आणि स्वत:वर सोपविलेले काम तो अगदी मन:पूर्वक करीत असे. संभाजीराजांनी खंडोजीच्या बडिलांचा निर्दयपणे वध केला होता पण खंडोजीने ते सारे विसरून जाण्याचेच ठरविले होते आणि निष्ठेने छत्रपतींची सेवा करण्याचे व्रत त्याने घेतले. कारण छत्रपतींची सेवा म्हणजे देशाचीच सेवा आहे याची खूणगाठ त्याने मनाशी बांधली होती. संभाजीराजे आता खंडोजीला विश्वासात घेऊ लागले होते.

राजांनी पोर्तुगीजांवर स्वारी केली त्यावेळी अशा दोन घटना घडल्या की खंडोजी राजांच्या पूर्णपणे मर्जीमध्ये आला आणि राज्याची चिटणिशीसनद पुन्हा खंडोजीच्या स्वाधीन त्यांनी केली.

पहिली घटना म्हणजे काही महत्त्वाची पत्रे खंडोजीला लिहावयास संभाजीराजांनी सांगितली आणि राजे स्वत: पुढे निघून गेले. ती पत्रे सत्वर रवाना करण्यापूर्वी राजांना दाखविणे जरूर होते म्हणून राजांना गाठण्यासाठी खंडोजी कागदपत्रे बरोबर घेऊन धावत सुटला. त्यावेळी त्याला इतके श्रम झाले की राजांच्या मुक्कामाच्या जागी तो पोहोचला तेव्हा त्याला रक्ताची गुळणी झाली. खंडोजीची कार्यनिष्ठा पाहून राजे गहिवरले आणि त्यांनी एक गुणी खास घोडा खंडोजीला दिला. त्या घोड्यावर बसून खंडोजी आता राजांच्या मागे सावलीसारखा राहू लागला.

संभाजी राजांची साहसीवृत्ती सुप्रसिद्धच आहे. फिरंग्यांशी लढाई देताना कापाकापी

करीत असता भान न राहून राजांनी खाडीमध्ये घोडा घातला. नेमकी त्यावेळी भरती आली होती. घोडा वाहून जाऊ लागला. खंडोजीने राजांवरील हे संकट पाहिले मात्र ! त्याने एकदम समुद्रात उडी घेतली. कौशल्याने पोहत जाऊन राजांच्या घोड्याचा लगाम त्यांने धरला आणि पोहत पोहत घोडा काठाकडे आणला, संभाजी राजांचे मन कृतज्ञतेने भरून आले. ज्या खंडोजीने आपले प्राण संकटात वाचविले त्याच्या वडिलांना आपण पूर्वी देहान्ताची शिक्षा दिली होती याबद्दल राजांना अतोनात पश्चात्ताप झाला. ते उद्‌गारले " खंडोजी तुमच्या स्वामीभक्तीला तोड नाही ! तुमच्या घराण्याची चिटणिशी आम्ही काढून घेतली होती, पण आता तुमची चिटणिशी वंशपरंपरेने चालविण्याचे वचन आम्ही देतो. दाभोळचे तुमचे वतनही तुमच्या स्वाधीन करतो. "

खंडोजीने छत्रपतींचा विश्वास परत मिळविला होता. वतनापेक्षा त्याला त्याचेच मोल अधिक होते. येसूबाई यांना तर तो मातेप्रमाणे मानत होता. त्या राजघराण्याची सेवा म्हणजे पर्यायाने राष्ट्राची सेवा करण्यात खंडोजी अहोरात्र खपू लागला. पण त्यावेळी एक अभूतपूर्व संकट चिमुकल्या मराठी राज्यावर कोसळले होते. ज्या राज्याने शिवरायांच्या वेळी निजामशाही आदिलशाही आणि वेळप्रसंगी दिल्लीची पातशाही यांना खडे चारले होते त्याच राज्याचा ग्रास घेण्यासाठी स्वतः आलमगीर बादशहा दिल्लीहून महाराष्ट्रात जातीने चाल करून आला होता. त्याच्यापाशी अपार खजिना, सैन्यबळ होते आणि त्याहून अधिक म्हणजे पाताळयंत्री कपटीपणात बादशहाचा हात धरणारा दुनियेत अन्य कोणी नव्हता. उगाच नाही समर्थांनी त्याचा उल्लेख " औरंग्या " म्हणून केला !

इ. स. १६८८ नोव्हेंबर महिन्यात संभाजीराजे खेळणा गडावर असताना येसूबाई-साहेब मेण्यात बसून त्यांना भेटण्यासाठी निघाल्या होत्या. निवडक घोडेस्वार बरोबर होते. ही खबर मोगलांना कशी मिळाली कुणास ठाऊक ! पण बाईसाहेबांना पळवून नेण्याचा घाट त्यांनी घातला. प्रसंग मोठा कठीण पण खंडोजी बरोबर होता त्याने मोठीच हिकमत केली. त्याची मावस बहीण संतूबाई बरोबरच्या लवाजम्यात होती. तिला त्याने येसूबाईंचा पोशाख करावयास सांगितले. महाराणींच्या सोन्याच्या साखळ्या स्वतःच्या पायात घालून ती लुटुपुटूची महाराणी बनली ! स्वतःच्या भगिनीने जिवावर उदार होऊन ही भूमिका बजावण्याचे ठरविल्याचे पाहून खंडोजीच्या डोळ्यांत आनंदाश्रू आले. तो म्हणाला " ताई, देशासाठी तुझा देह कारणी लागत आहे. मोगलांनी तुझी अब्रू घेण्यापूर्वी तू बलिदान कर त्यासाठी ही हिरकणी तुला भी देत आहे. " असे म्हणून हिरकणी बसविलेली अंगठी त्याने तिला दिली.

मोगलांनी वेढा दिला आणि येसूबाई समजून संतूबाईला पळवून ते घेऊन गेले. इकडे येसूबाईंना रायगडावर खंडोजीने सुखरूप पोहोचते केले. मोगलाच्या हाती संतूबाईंचा निर्जीव देह सापडला ! तिने आत्महत्या केली होती. धन्य तो देशसेवक खंडोजी आणि त्याची भगिनी संतूबाई. अशांच्या शौर्यकथांमुळे महाराष्ट्राची भूमी पावन झाली आहे.

## राष्ट्रभक्त खंडो बल्लाळ (भाग २ रा)


खंडो बल्लाळाच्या चरित्राचा अर्धा भाग आतापर्यंत आपण पाहिला आहे. आता त्याचा रोमहर्षक उत्तरार्ध येथे पहावयाचा आहे.

दिल्लीच्या मुगल सम्राटाने साऱ्या भारतभर दिग्विजय केले आणि देश पादाक्रान्त केला पण केवळ महाराष्ट्रामध्ये तेवढी त्याची डाळ शिजली नाही. पराक्रमी मराठ्यांपुढे मोगली समशेर बोथट ठरली याबद्दल औरंगझेब बादशहाच्या मनात वेदना सलत होती. शिवरायांच्या निर्याणानंतर औरंगझेबाने मराठ्यांच्या पाडावाचा दृढ संकल्प मनाशी केला आणि त्याप्रमाणे प्रचंड सेना घेऊन तो दक्षिणेत उतरला ! १६८९ मध्ये संभाजी राजांना पकडून त्यांचा वधही त्याने केला. तथापि त्यामुळेसुद्धा मराठी रक्त नामोहरम झाले नाही. राजाराम महाराजांच्या नेतृत्वाखाली मराठी सेना पुन्हा बादशहाशी झुंज देऊ लागली.

प्रसंग फार भयंकर होता. मराठ्यांच्या तिसऱ्या राजाच्या प्राणाचा घास घेण्यासाठी बादशहाचे निकराचे यत्न चालू होते. एकामागून एक किल्ले सर करीत मोगल सैन्याने रायगडला वेढा दिला. तेथून मोठ्या मुष्किलीने राजे निसटले तेथून प्रतापगड नंतर पन्हाळा त्यांनी गाठला पण तेथेही त्यांचा पाठलाग चालूच होता. शेवटी राज्यापासून दूर असलेल्या जिंजी या ठिकाणी जाण्याचे त्यांनी ठरविले. त्याप्रमाणे बरोबर प्रल्हादपंत, संताजी, धनाजी आणि खंडोबल्लाळ अशी विश्वासाची माणसे घेऊन राजाराम महाराज जिंजीला जाण्यासाठी बाहेर पडले. शत्रूस समजू नये म्हणून त्यांनी वैराग्याचे वेष धारण केले. तथापि ही बातमीसुद्धा बादशहाच्या कानी पडली, या मंडळींना कैद करण्याचे हुकूम सर्व अधिकाऱ्यांना त्याने काढले. अशा वेळी बेंगळूर येथे एक धर्मशाळेत राजांचा मुक्काम होता; तेव्हा एक कठीण प्रसंग गुदरला, केवळ खंडोबल्लाळाच्या चातुर्याने आणि निष्ठेने त्यातून राजारामाची सुटका झाली.

राजाराम महाराज आणि त्यांची सहकारी मंडळी धर्मशाळेत उतरली असता जेवणाची तयारी झाली. राजे हातपाय धुण्यासाठी उठले तेव्हा एकजण त्यांच्या पायावर पाणी घालू लागला. जवळपास वावरणाऱ्या कानडी गावकऱ्यानी हा प्रकार पाहिला तेव्हा त्यातील

एक गावकरी दुसऱ्यास म्हणाला "हा कोणी वेषान्तर केलेला श्रीमान गृहस्थ असावा" लोकांच्यामध्ये ही कुजबूज वाढू लागली. खंडोजीला कानडी भाषा अवगत असल्याने



त्याने प्रल्हादपंतांना सगळा प्रकार सांगितला. "आता आपण सावधगिरीने उपाय शोधून काढला नाही तर राजांना येथेच बंदिवान होऊन पडावे लागेल." असे सांगितले. सर्व जण एकदम पुढे निघाल्यास पाठलाग होईल म्हणून संताजी व धनाजी यांना महाराजांच्या बरोबर पुढे पाठवून प्रल्हादपंत आणि खंडोजी स्वतः मागे धर्मशाळेतच थांबले. महाराज रातोरात जिंजीला रवाना झाले खरे पण वेंगळूरच्या मोगल ठाणेदारापर्यंत, धर्मशाळेतील वैराग्यांच्या संबंधीची कुजबूज पोहोचली. त्याने धर्मशाळेला वेढा दिला आणि यात्रेकरूंना पकडून चौकीवर नेले.

'तुम्ही कोण, कोठून आलात' असा प्रश्न ठाणेदाराने विचारला तेव्हा 'आम्ही तुंगातीराचे जंगम. यात्रा करीत श्रीरामेश्वराला जाणार आहो' असे उत्तर मिळाले.

'खरी हकीगत सांगा नाहीतर हालहाल करीन' अशी धमकी ठाणेदाराने दिली पण यात्रेकरूंचे उत्तर कायमच. तेव्हा ठाणेदाराला पराकाष्ठेचा संताप आला. खरे उत्तर

काढण्यासाठी खंडोबल्लाळ, प्रल्हादजी, दाभाडे यांना तीन दिवस उपाशी ठेवले, चाबकाचा मार दिला आणि राखेचे तोबरे देऊन त्यांच्या डोक्यांवर तीन तीन मण वजनाचे धोंडे दिले तरी पण यात्रेकरूंचे उत्तर तेच ! 'आम्ही तुंगातीराचे जंगम. आमचा उगाच छळ का करता ?'



तेव्हा अखेरीला ठाणेदारालाच पश्चात्ताप झाला की आपण या यात्रेकरूंचा हकनाक छळ केला ! त्याने खंडोबल्लाळ आदीना मुक्त करून त्यांना भोजन देऊन सोडून दिले. मग ही मंडळी मजल दरमजल करीत सावकाशीने जिंजीला राजारामास मिळाली.

...तरी पण खंडोजीच्या राष्ट्रनिष्ठेची अजून परीक्षा पहाण्याचेच जणू कालपुरुषाने ठरविले असावे. कारण जिंजीलासुद्धा राजाराम महाराजांचा पिच्छा शत्रूने सोडला नाही. झुल्फिकारखानाने जिंजीला वेढा दिला ! सात वर्षेपर्यंत किल्ल्यातील मराठी फौजेने वेढा लढविला पण शेवटी अन्नटंचाईमुळे किल्ला शत्रूच्या हाती देण्याविना मार्गच राहिला नाही.

अशा वेळी राजांची सुटका कशी करावी असा प्रश्न खंडोजीपुढे उभा राहिला. त्यातून एक युक्ती त्याला सुचली. शिर्के घराण्यामधील अनेकांचा वध संभाजीराजांनी केल्यामुळे चिडून गेलेले मराठी सरदार गणोजी शिर्के मोंगलास जाऊन मिळाले होते. जिंजीच्या वेढ्याचे वेळी एका विभागाकडील वेढा सांभाळण्याचे काम गणोजी व त्यांचे पुतणे रामोजी यांच्यावर सोपविले गेले होते. ही माहिती खंडोजीला लागली तेव्हा त्याने एक मोठा साहसी बेत केला. राजारामाची सुटका केवळ गणोजीच्या हातूनच होणे शक्य आहे हे ओळखून खंडोजी गुप्तपणे गडावरून निघाला तो गणोजीला एकान्तात भेटला. राजारामाची सुटका झाली तरच मराठ्यांचे राज्य वाचू शकेल हे परोपरीने गणोजीला त्याने पटवून देण्याचा प्रयत्न केला पण गणोजी आपला हेका सोडीना तेव्हा खंडोजीने आपले स्वत:चे खाजगी वतन गणोजीच्या नावे करून देण्याचे अमीष दाखविले. तरी-सुद्धा गणोजीला विश्वास वाटेना तेव्हा छत्रपतींकडून लेखी सनद आणवून ती गणोजींच्या स्वाधीन केली. मग मात्र गणोजी त्या स्वार्थत्यागाने अक्षरश: दिपून गेले. बाळाजी आवजींना जरी संभाजीने हत्तीच्या पायी दिले तरी खंडोजीने छत्रपतींची बाजू सोडली नाही इतकेच नव्हे तर छत्रपतीसाठी स्वत:च्या वतनावरदेखील पाणी सोडले हे पाहून गणोजी पार विरघळला ! त्याने राजारामास बुरख्याच्या पालखीतून वेढ्यापलीकडे जाऊ दिले ! राजे पुन्हा साताऱ्यास आले. पुढील काळात मराठी सैन्याने बादशहास कसे नमविले हा इतिहास सर्वश्रुत आहेच.

पुढे शाहू महाराज छत्रपतींचे गादीवर आले त्यावेळीही खंडोजीच्या जीवनातील एक संस्मरणीय प्रसंग घडला. परशुरामपंत प्रतिनिधी यांना शाहूराजांनी प्रतिनिधी नेमले होते. तरी पण एकदा चंद्रसेनाच्या बंडाळीमध्ये त्यानी राजांच्या विरुद्ध बाजू घेतली तेव्हा शाहूराजांनी परशुरामपंतास कैद केले. त्याच्या अपराधाबद्दल त्याचे वतन, घरदार तर जप्त केलेच पण त्यासही डोळे काढण्याची शिक्षा फर्मावली. ही शिक्षा अंमलात आणली जाणार इतक्यातच खंडोजी तेथे आला. आणि शिक्षा काही काळ स्थगित करण्यास तेथील माणसाला सांगून तो धावतच शाहूराजांकडे गेला व परशुरामपंतासाठी त्याने पदर पसरला. संभाजीच्या वेळी झाला तसा अविचार आपल्या हातून घडू नये. पराक्रमी सेवकांच्या हातून जर चुकीचे वर्तन झाले तर त्याना एकदम ठार करू नये तर अघटित कामावर घालावे, अशी राजांची समजूत त्याने घातली. आणि केवळ खंडोजीच्या शब्दाखातर शाहूमहाराजांनी परशुरामपंताची शिक्षा रद्द केली ! या प्रसंगाचे उपकार स्मरण्यासाठी प्रतिनिधींच्या घराण्यात श्राद्धाच्या दिवशी चिटणीस घराण्यातील व्यक्तीला

भोजनास बोलाविण्याची वहिवाट पडली. काही कुलाचारातून इतिहासाचे जतन अशा प्रकारेही होऊ शकते.

खंडोजीचा साराच जीवनपट अत्यंत भव्य आणि दिव्य आहे. स्वतःच्या जीवनामध्ये त्याने हालअपेष्टा भोगल्या, दारिद्र्य पत्करले पण तो आणि त्याचे हजारो अनामिक सहकारी यांनी केलेल्या त्यागातूनच परचक्रातून महाराष्ट्राची सुटका झाली. हा त्यावेळचा इतिहास विसरता येणार नाही. आजही आणीबाणीच्या काळात देशभक्तीची भावनाच प्रखर व्हाव-यास पाहिजे.

'सज्जनगड' सारख्या आध्यात्मिक क्षेत्रातल्या मासिकामध्ये खंडोजींचे चरित्र प्रसिद्ध करण्यामध्ये मला औचित्य एवढ्यासाठीच वाटते की श्रीसमर्थांनी अनुग्रहीत केलेली जी काही घराणी आहेत त्यामध्ये चिटणीस घराणे हेही होते. शिवरायांनी समर्थांचा अनुग्रह घेतला त्यानंतर शिंगणवाडी येथेच बाळाजी आवजी चिटणीस आणि निळो सोनदेव यांनीही अनुग्रह घेतला. चिटणीस घराण्यात खंडोजी हा राष्ट्रभक्त निपजला त्याचप्रमाणे निळो सोनदेवांच्या घराण्यात रामचंद्रपंत आमात्य यांच्या सारखा कर्तृत्ववान पुरुष निपजला. श्रीसमर्थांनी 'क्षात्रधर्म,' 'सेवकधर्म' यांचा जो उपदेश केला त्याचा परिणाम या थोर सेवकांच्या आचारावर निश्चित झाला आहे असे मला वाटते. शिवराय आणि समर्थ यांच्या भव्योदात्त चरित्रातून स्फूर्ती घेऊन अवघा महाराष्ट्र पंचवीस वर्षे एकसारखा मोगलांशी लढत राहिला. जे परकीय इतिहासकार असे म्हणतात की भारतीयांमध्ये देशहिताची भावनाच मुळात नव्हती ती त्यांनी इंग्रजांपासून उचलली, त्यांनी खंडोजीसारख्यांचे त्यागपूर्ण जीवन अभ्यासलेच नसावे. एरव्ही त्यांनी असे उद्गार काढलेच नसते. ते असो; पण आपण तरी अशी चरित्रे विस्मृतीमध्ये जाऊ देणे उचित नाही, "शिव-समर्थांचे स्मरण म्हणजेच या देशाचे जीवन." असा सिद्धान्त कै. शंकरराव देव यांनी काढला होता. खंडोजीसारख्या राष्ट्रवीराचे स्मरण म्हणजे शिवरायांच्या कृतीचे आणि श्रीसमर्थांच्या उपदेशाचेही स्मरणच होय.

# ७

## 'प्रेरक' वाङ्मयाचे जनक श्रीसमर्थ

माघ वद्य नवमी या दिवसाला नावच आहे 'दासनवमी.' २९५ वर्षांपूर्वी याच दिवशी श्रीसमर्थांनी पार्थिव देहाचा त्याग केला. त्या पूर्वीच्या काळात माघ वद्य अष्टमी आणि दशमी तसाच नवमी हाही दिवस होता पण माघ वद्य नवमीशी समर्थांनी नाते जोडले मात्र आणि तो दिवस 'दासनवमी' म्हणून पावन झाला. या दिवशी सर्वत्र कथा-कीर्तने आणि प्रवचनांतून रामदासस्वामींचे पुण्यस्मरण केले जाते. त्यांनी लिहिलेल्या प्रेरक वाङ्मयाच्या श्रवणाने मरगळलेली मने पुन्हा ताजीतवानी होतात.

ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम आणि रामदास हे महाराष्ट्राचे संतपंचक आहे. "सदा स्वरुपानुसंधान। हे साधूचे मुख्य लक्षण। जनी असोन आपण जनावेगळा॥" हे साधूचे प्रमुख लक्षण असले तरी महाराष्ट्राच्या संतपंचकापैकी प्रत्येकाची स्वतःची अशी काही खास लक्षणे आहेत. हे सर्वच संत ईश्वरभक्त, तथापि त्यांच्यामध्ये सगुण-भक्तीची परमावधी नामदेवामध्ये दिसते. सर्वच संतांचा मनोविकारांवर पूर्ण ताबा असला तरी परमशांतीची चित्तवृत्ती म्हटले की एकनाथच आपणास स्मरतात. सर्वच संत जरी समाधानी होते तरी तुकारामाची समाधानीवृत्तीची परिसीमा आपणास थक्क करते. सारेच संत वैराग्याचे अवतार असले तरी धगधगीत वैराग्य म्हटले की रामदासांचेच चित्र डोळ्यांसमोर तरंगते. हे जसे सद्गुणांमधील अधिकउण्यांचे दर्शन आपणास घडते त्याचप्रमाणे या संतपंचायतनाच्या वाङ्मयाच्या संबंधातही आपणास विविधता दिसते. ज्ञानेशांची ओवी ती ज्ञानेशांचीच. तुकाराम ती लिहू शकणार नाही तर तुकोबांचा अभंग एकनाथाला जमणार नाही. एकनाथांचे भारुड समर्थांना साधणार नाही पण खण-खणीत शब्दांतील समर्थांची गर्जना; जिने महाराष्ट्राची झोप उडविली ती अन्य संतांना साधणार नाही. **तरुणांना प्रेरणा देणारे, कार्यप्रवण करणारे जे वाङ्मय असते**

त्याला 'प्रेरक वाङ्मय' म्हणतात. असे आदर्श प्रेरक वाङ्मय कुणाचे म्हटले तर रामदासांकडेच बोट करावे लागेल. हे वाक्य लिहीत असताना इतर संताचा अवमान नाही. त्यांच्यासंबंधीची परम-आदराची भावना पोटी बाळगूनच या ठिकाणी प्रेरक वाङ्मय श्रीसमर्थांचेच हे मांडण्याचा यत्न करणार आहे.

" साधू दिसती वेगळाले । परि ते स्वरूपी मिळाले :
अवघे मिळून एकच झाले । देहातीत वस्तू ॥ "

असे स्वत: समर्थांनीच लिहून ठेवले आहे. त्यामुळे त्यांच्यामधील डावे-उजवे शोधण्याचा गैरप्रकार येथे मुळातच नाही. तथापि वै. मामासाहेब दांडेकर म्हणायचे 'विशिष्ट कालखंडामध्ये ईश्वराचा विशिष्ट संदेश मानवासाठी घेऊन येणारे 'निरोपे' म्हणजेच साधुसंत. श्रीज्ञानेश्वर–तुकारामादी संतांपेक्षा काही निराळा संदेश किंवा निरोप श्रीसमर्थांनी आणला होता.' अध्यात्माचा चुकीचा अर्थ लावल्याने भावडा आणि अकर्मण्यवादी समाज विनाशाच्या गर्तेत जात होता. असेल माझा हरी तर देईल खाटल्यावरी ही घात करणारी वृत्ती, धर्माचा अगर ईश्वरभक्तीचा चुकीचा अर्थ लावल्याने तरुणांमध्ये फैलावत चालली होती. अशावेळी " यत्न तो देव जाणावा । यत्नेवीण दरिद्रता ॥ " ही सिंहगर्जना महाराष्ट्राच्या दऱ्याखोऱ्यांत उमटली.

" आपुले अथवा परावे । कार्य अवघेचि करावे ।
प्रसंगी कामास चुकवावे । हे विहित नव्हे ॥ "
असा पुकार करीत एक गोसावी गावोगाव हिंडू लागला.
" आपल्या पुरुषार्थ वैभवे । बहुतास सुखी करावे ।
परंतु कष्टी करावे । हे राक्षसी क्रिया ॥ "

अशा प्रकारच्या पुरुषार्थाच्या गोष्टी तो लोकांस उपदेशू लागला. सदा सर्वकाळ आपणांस 'मरणाचे स्मरण असावे' हे ठीकच आहे परंतु 'मरोन कीर्तीस उरवावे' किंवा " जिजोन कीर्तीस उरवावे । नाना प्रकारे " हाही महत्त्वाचा भाग त्याने सांगितला त्या वैराग्याने सारा देश पायाखाली घातला होता. त्या भ्रमंतीतून जो विचार मनामध्ये स्फुरला तो त्याने " दासबोधा " मध्ये अजरामर केला आहे.

एच. डब्ल्यू लाँगफेलो याने आंग्लभाषेत केलेली कविता प्रेरक वाङ्मयाचा एक उत्कृष्ट नमुना म्हणून जगतात मान्यता पावली आहे. श्रीसमर्थांचे वाङ्मय आणि लाँगफेलोची " A psalm of life " ही कविता यांच्यातील विचाराच्या भागातील साम्यता पाहून परम आश्चर्य वाटते. पूर्वीच्या पाठ्यपुस्तकांमध्ये लाँगफेलोच्या त्या कवितेचे के. ह.

ना. आपटे यांनी केलेले रूपांतर समाविष्ट केले होते त्यामुळे त्या वेळच्या सर्व पिढीला ती कविता स्मरतही असेल. त्या कवितेचा प्रारंभ "असार जीवित केवळ माया। रडगाणे हे गाऊ नका। घेई झोपा तो नर मेला। संशय याचा धरू नका॥" असा होता. झोपा काढण्याच्या वृत्तीवर आणि आळसावर श्रीसमर्थांनी असाच प्रहार केला नाही का?

"आळसाचे फळ रोकडे। जांभया देऊन निद्रा पडे।
सुख म्हणून आवडे। आळस लोका॥"

पण या आंळसातूनच करंटेपणाच्या खुणा प्रकट होतात.

"आळस उदास नागवणा। आळस प्रेत्न बुडवणा।
आळसे करंटपणाच्या खुणा। प्रगट होती॥"

असे समर्थ म्हणतात.

"उठा उठा तर निजू नका। 'होईल कैसे'। म्हणू नका।
कशाहि विघ्ना भिऊ नका। दीर्घोद्योगा सोडू नका॥"

असे लाँगफेलो सांगतो तर

"धारधरा धीरधरा तकवा। हडबडू गडबडू नका।
काळ देखोनि वर्तावे। सांडावे भय पोटीचे॥

असे समर्थ गर्जतात!

"जाते घडि ही अपुली सावा, करा काय ते आता करा॥
चित्तामध्ये धैर्य धरा रे हरिवरी ठेवा भाव पुरा॥"

असे लाँगफेलो लोकांची आर्जवा करतो त्याच धर्तीवर श्रीसमर्थही सूचना करतात.

"नरदेह परम दुर्लभ। येथे घडे दुर्लभ लाभ॥"

असे एका ठिकाणी म्हणतात तर दुसऱ्या ठिकाणी "रिकामा जाऊ नेदी क्षण" असे सांगतात.

"सदासर्वदा देव सन्निध आहे। कृपाळूपणे अल्प धारिष्ट पाहे॥"

या शब्दात हरीवर भाव ठेवण्याचा त्यांचा उपदेश काव्यरूप धारण करून अजरामर झाला आहे.

"जग हे त्यजिता भवसागरिच्या वाळवंटीवर तरी जरा।
चार पाऊले उमटू आपुली, ठेऊ खुणेचा मार्ग बरा॥"

या शब्दात लाँगफेलो लोकांना कार्यप्रवण करू इच्छितो. वर समर्थ लोकांना खडसाऊन सांगतात.

" जन्मा आलीयाचे फळ । काही करावे सफळ ॥
ऐसे न करता निर्फळ । भूमीभार होय ॥ "

जन्माला येऊन ' काही ' साध्य करा नुस्ते भूमीभार कशाला होता ? मला वाटते, " achievement motivation " करण्यासाठी म्हणजे कार्यसिद्धतेसाठी जागृती निर्माण करण्यासाठी मराठी भाषेचा याहून अधिक चांगला उपयोग कोणालाही करता आलेला नाही !

श्रीसमर्थ सुमारे तीनशे वर्षांपूर्वी जेव्हा मानवदेहामध्ये वावरत असता यासारखा उपदेश देत असतील तेव्हा तर तो हजारो श्रोत्यांना नवजीवनाची प्रेरणा देणारा ठरला असेलच पण आता ते देहाने आपल्यात नसले तरी त्यांच्या वाङ्मयातील ते धगधगीत स्फुल्लिंग आपल्या जीवनामध्ये आजही ऊब आणू शकतात.

" गेल्या गोष्टी स्मरू नका । गत काळाचा शोक फुका " असे लाँगफेलो सांगतो त्याचप्रमाणे " बरे ऐसा प्रसंग जाला । जाला तो होऊन गेला ॥ " असे म्हणून पुढे तरी सत्कार्यासाठी तयार व्हा असेच समर्थ सांगतात.

श्रीसमर्थांच्या विवेचनामध्ये सर्वत्र वैज्ञानिक दृष्टिकोण आढळून येतो असे विधान केले तर कोणाला आश्चर्यही वाटेल. वैज्ञानिक दृष्टी ही केवळ विज्ञानाच्या विषयातच असते असे नाही. प्रयत्न, प्रत्यय आणि त्यानंतर प्रबोध या त्यांच्या आचरणाच्या पायऱ्या मूर्तिमंत वैज्ञानिक दृष्टिकोण आहे. संसार करताना तो यशस्वी होण्यासाठी त्यांनी केलेले विवेचन म्हणजे कार्यकारण मिमांसा करून लावलेली उत्कृष्ट अर्थसंगती आहे. त्यांच्या उपदेशात विखुरलेली ही विचार मौक्तिके पहा.

( १ ) " लेकरे उदंड झाली । तव ते लक्ष्मी निघोनि गेली । "
( २ ) " कीर्ति पाहो जाता सुख नाही । सुख पाहता कीर्ति नाही । "
( ३ ) " जनामध्ये सार्थकता । विचारेचि होय ॥ "
( ४ ) " हाडामासाच्या सगट मोळ्या । पाणिये सोवळ्या होती कैशा ।
देवाकडे मन लागता उन्मन । सोवळा ब्राह्मण तोचि एक ॥ "
( ५ ) " पेरले ते उगवते । बोलिल्यासारखे उत्तर येते ।
तरी मग कर्कश बोलावे ते काये निमित्त ? ॥ "

प्रपंच करावा पण तो नेटका करावा. " सावधपणे करीत जावा संसार आपुला " ही त्यांची वचने सध्याच्या नियोजनाच्या युगामध्ये खचितच प्रेरक आहेत. समर्थांना तीव्र निरीक्षण शक्ती लाभली होती. हरभऱ्याच्या डहाळीवर असलेल्या आळीची हाल-

चाल त्यांनी लक्षपूर्वक न्याहाळली. पाने खात खात ती आळी डहाळीच्या टोकापर्यंत जाते खरी पण तेथे गेल्यावर ती आळी शरीराच्या पुढच्या भागाने अंदाज घेऊन नंतर शरीर मागे नेते. हा केवढा विचार त्या क्षूद्र जीवापाशीसुद्धा असतो हे पाहिल्यानंतर समर्थांच्या वाणीतून पुढील ओळी उमटल्या,

"पर्णाळी पाहूनि उचले । जीवसृष्टी विवेके चाले ।
आणि पुरुष होऊन भ्रमले । यासी काय म्हणावे ? ॥"

एवढीशी आळी ती काय पण तीसुद्धा अंदाज घेऊनच मार्गक्रमण करते पण आमची माणसे मात्र भ्रमल्यासारखे अस्ताव्यस्त वागत आहेत ! इतिहासकालात होऊन गेलेल्या श्रीसमर्थांच्या विचारांची झेप पहा. सर्व भारतभर भ्रमण करून आल्यानंतर त्यांनी जे काही पाहिले आणि अनुभविले त्यातूनच त्यांचा उपदेश बाहेर पडला आहे. सच्च्या अनुभवावर आधारलेले त्यांचे प्रेरक वाङ्मय मराठी माणसाच्या बालपणापासूनच त्याच्या कानी पडले पाहिजे असे मला सदैव वाटते. कारण समर्थांचा उपदेश आजही ताजा टवटवीत आहे. तो कालबाह्य झालेला नाही.

श्रीसर्थांच्या काळी आणीबाणी होती त्यावेळी त्यांनी "आधी ते करावे कर्म । कर्ममार्गे उपासना ।" असा उपदेश केला. जर प्रत्येकाने आपले कर्म उत्तमप्रकारे केले तर एकप्रकारची उपासनाच होईल. शेतकरी, कामगार, शिक्षक, विद्यार्थी या सर्वांना त्यांनी हा जो प्रेरणादायी उपदेश केला आहे त्यातून देशाची त्याप्रमाणे व्यक्तीची देखील उन्नती होईल. प्रा. बेलसरे संपादित दासबोध आवृत्तीचे प्रकाशन करताना ना. यशवंतराव चव्हाण यांनी काढलेले उद्‌गार या ठिकाणी आठवतात. "सामान्य माणसापासून अध्यात्माच्या मार्गाला लागलेल्या प्रत्येकाला मार्गदर्शन करणारा 'दासबोध' हा लोकशिक्षण करणारा ग्रंथ आहे."

केवळ दासबोधाचेच नव्हे तर साऱ्याच समर्थवाङ्मयाचे असे सर्वव्यापक रूप आहे. ते माणसाला निष्क्रीयतेपासून वाचविते. नव्या जीवनाची प्रेरणा देते म्हणून श्रीसमर्थांनी स्वतःच सांगितल्याप्रमाणे "माझी काया आणि वाणी गेली असे मनात म्हणत असाल तर ते बरोबर नाही. मी जगज्जीवनामध्ये भरून राहिलो आहे" याचा प्रत्यय त्यांचे प्रेरक वाङ्मय वाचल्याने येतो.

# ८

## निस्पृहपणे विख्यात व्हावे । भूमंडळी ॥

" कीर्ति "विषयक समर्थांचे विचार.

देहे त्यागिता कीर्ति मागे उरावी ।
मना सज्जना हे चि क्रीया धरावी ॥
मना चंदनाचे परी त्वा झिजावे ।
परी अंतरी सज्जना नीववावे ॥ "

समर्थांना प्रवृत्तिवादी संत असे म्हणतात. पण यावर काहीजण आक्षेप घेतात की जो प्रवृत्तिवाद शिकवितो तो ' संत ' असूच शकत नाही. मानवाला संसारातून निवृत्त होण्यासाठी जो उपदेश करतो तोच केवळ संत अशी या मंडळींची प्रामाणिक समजूत असते. हे जगच जर एक माया आहे तर या मायावी जगामध्ये आपली कीर्ती मागे रहावी असा उपदेश करणाऱ्या किंवा त्या उपदेशानुसार वागणाऱ्यांना संत हे विशेषण कसे लावता येईल ? असा या आक्षेपकांचा प्रश्न असतो. या प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी समर्थांच्या वाङ्मयाचा खोल अभ्यास आवश्यक आहे. वर जो श्लोक उधृत करण्यात आला आहे; त्यातील पहिल्या दोन ओळी वाचल्यावर आक्षेप बरोबर आहे असे वाटू लागेल. पुढच्या दोन ओळी वाचताच आपला भ्रम निघून जाईल. मनाला उद्देशून समर्थ म्हणतात, " हे मना तू चंदनाप्रमाणे झीज. त्यायोगे साऱ्या सज्जनांची अंतःकरणे तृप्त होतील. "

या ओळींमध्ये मोठाच आशय भरलेला आहे. चंदनाचा दृष्टांत त्यांनी त्या ठिकाणी किती समर्पकपणे उपयोगात आणला आहे याचा विचार करू. चंदन जेव्हा सुगंध निर्माण करते त्यावेळी ते स्वतः नष्ट होते आणि त्यानंतरच इतरांना तो सुगंध समजू शकतो. अशा प्रकारे सत्कृत्य करीत असताना स्वतः मरण्यास सामोरे जाण्याचा उपदेश समर्थ करीत आहेत. ज्याचा देह विसर्जित होतो त्याला स्वतःला कीर्तीचा काय उपयोग

असतो. जी कीर्ती स्वतः कानांनी ऐकू येणार नाही अशी कीर्ती मिळव; असा उपदेश समर्थ करीत आहेत. निष्कर्मण्यतेपेक्षा हा उपदेश लाखोपटीने श्रेयस्कर नव्हे का ?

चंदनाची उपमा आणखी एका दृष्टीने लक्षणीय आहे. चंदनाच्या झाडाला फूल नाही आणि फळही नाही पण त्या झाडाचे खोड देवघरामध्ये जेव्हा सहाणेवर घासले जाते तेव्हा त्याचा सुगंध साऱ्या आसमंतात दरवळतो त्याप्रमाणे "मना चंदनाचे परि त्वा झिजावे" असे समर्थ सांगतात. "सदा देवकाजी झिजे देह ज्याचा... जगी धन्य तो दास सर्वोत्तमाचा।"

आपण कोणत्याही प्रकारची फलासक्ती न ठेवता कर्म करीत राहणे ही क्रीया करीत राहिल्यामुळे सज्जनांच्या मनाला आनंद होतो. अर्थातच त्यांचे आपल्याबद्दल जे चांगले मत होते त्यालाच सद्कितीं असे म्हणतात. ती आपोआपच निर्माण होते तिच्यासाठी वेगळा आटापिटा करावयास नको. ज्याची कीर्ती शाश्वत मागे राहाते त्याने सत्कृत्ये केलेली असली पाहिजेत त्याविना किर्ती मागे राहू शकणार नाही.

"झिजल्याविना किर्ति कैची। मान्यता नव्हे की फुकाची ॥ (१९–३२४) मान-मान्यता काही फुकट लाभत नसते.

कीर्तीसुद्धा दोन प्रकारची असते बरी आणि वाईट. तैमूरलंगाची किंवा हिटलरची कीर्ति-सुद्धा मागे राहिली आहेच की ! पण ती दुष्कीर्ती आहे. कारण त्या लोकांनी जी कृत्ये केली त्यामुळे सज्जनांची हृदये निवली नाहीत. "परि अंतरी संज्जना नीववावे" असा उपदेश समर्थांनी केला आहे म्हणजे त्यांना अभिप्रेत आहे ती सत्कीर्ती ! उत्कट भक्ती, ज्ञान, वैराग्य, उत्कट यत्न इत्यादी मार्गांनी मनुष्य ध्येयासक्तीने कर्मे करू लागला तरच ती कीर्ती प्राप्त होते. कीर्ती हे प्राप्तव्य नव्हे पण अनासक्त किंवा निष्काम कर्म केल्या-नंतर प्राप्त होणारे ते अपरिहार्य फल आहे. एखाद्या फुलझाडाची सर्वतोपरि उत्तमप्रकारे निगा राखली तर त्याला सुंदरसे फूल येणारच ते अपरिहार्य आहे कारण त्याविना दुसरी गतीच नाही. त्याप्रमाणे सत्कृत्याचे फल म्हणजे ते करणाऱ्याला शान्ती मिळते आणि आजू-बाजूला त्या कर्माचा कीर्तिरूपी सुगंध दरवळत राहतो. इतरांना त्यापासून प्रेरणा मिळावी यासाठीच तो सुगंध जन्म घेतो अशीच ईश्वरी योजना आहे की काय न कळे !

# १

## विज्ञानयुगातसुद्धा श्रीसमर्थांची शिकवण उपयुक्त

सध्याचे युग विज्ञानाचे आहे. विज्ञानाने मानवी जीवनाचा हरेक क्षेत्रामध्ये आमूलाग्र बदल घडवून आणला आहे. विज्ञानाची कास धरल्याने मानवी विकास झाला आहे म्हणून "विज्ञानाची कास = विकास" हे समीकरण झाले आहे. अशा या चालू जमान्यामध्ये श्रीसमर्थांच्या संबंधात हे पुस्तक मी लिहीत असताना साहजिकच मनात विचार आला की, जमाना इतका बदलला असतानासुद्धा श्रीसमर्थांच्या शिकवणीचे स्मरण करण्याचे कारण काय, अशा प्रश्नाचे समर्पक उत्तर आपणास देता येईल का ? आजचा वाचक चोखंदळ बनला आहे. विज्ञाननिष्ठेवर आधारलेली त्याची बुद्धी आता तर्काच्या निकषावर सत्याची पारख करू लागली आहे. अंधश्रद्धांचा काळोख विज्ञानाच्या प्रकाशात नष्ट होत आहे; ही आनंदाची गोष्ट आहे. कारण त्याचमुळे अध्यात्माचा खरा अभ्यास आता होऊ लागला आहे. धर्मग्रंथ म्हणजे सोवळ्यात पुजून ठेवण्याच्या पोथ्या हा समज यापुढे नष्ट होऊन दैनंदिन जीवनासाठी प्रेरणा घेण्यासाठी आध्यात्मिक ग्रंथांचा अभ्यास आता सुबुद्ध नागरिक करू लागले आहेत. आणि मौज ही की विज्ञानानेच त्याना ही दिशा दाखविली आहे.

"Science without religion is lame and religion without science is blind." या सारखा सद्विचार विज्ञानयुगाचे एक निर्माते आल्बर्ट आईन्स्टिन यांनी जगाला सांगितला आहे. दुसऱ्या एका ठिकाणी ते लिहितात,

"Release of power locked in an atom has changed everything in this world, except our ways of thought and hence we are drifting to an unexampled catastrophe."

"अणूमधील बंदिस्त असलेली ऊर्जा (विज्ञानाने) मुक्त केली त्यामुळे सारे जगच बदलून झाले आहे पण तसा बदल आपल्या (म्हणजे मानवाच्या) विचार

पद्धतीत मात्र झालेला नाही म्हणून हे सारे जग अभूतपूर्व अशा विनाशाच्या गर्तेमध्ये कोसळण्यासाठी सरकत चालले आहे." हे घडू द्यावयाचे नसेल तर सद्विचाराचा प्रसार करणाऱ्या शुद्ध अध्यात्माचा प्रसार केला जाण्याची आज नितान्त आवश्यकता आहे. त्या दृष्टीने आध्यात्मिक ग्रंथ वाचले जाण्याची आवश्यकता आहे.

"विज्ञानासाठी नव्यात नवा ग्रंथ पहावा तर अध्यात्मासाठी जुन्यात जुना ग्रंथ अभ्यासावा" अशी एक अर्थपूर्ण म्हण आहे. त्यादृष्टीने भगवद्गीता आणि आपले सारेच संतवाङ्मय अभ्यसनीय आहे. मानवी जीवनाचा हेतू काय; यावद्दचे काहीसे समाधानकारक उत्तर त्या ग्रंथातूनच सापडेल. विज्ञानाच्या शोधांमुळे मानवाची प्रगती झाली आणि मानवी जीवनाला गती मिळाली पण ती दिशाहीन गती आहे. ज्या देशांमध्ये विज्ञानाच्या प्रगतीने शीग गाठली आहे तेथील लोकांचे जीवन सुखपूर्ण झाले आहे काय ? अमेरिकेमध्ये मद्य आणि जुगार यांचा प्रसार विलक्षण झाला आहे. आत्महत्या करणारांची संख्या अमेरिकेमध्ये सर्वांत अधिक आहे हे आश्चर्यकारक आहे. झोपेसाठी एल. एस. डी. सारख्या गोळ्या घेणाऱ्यांचे सर्वाधिक प्रमाण अमेरिकेत आहे. समृद्धीतून जीवन सुखमय होतेच असे नाही. वास्तविक विज्ञानवाद म्हणजे नास्तिकतेचा प्रसार नव्हे पण तो झाला असल्याने मनुष्य असमाधानी मात्र झाला आहे. अध्यात्म आणि विज्ञान यांचा छत्तीसचा आकडा आहे असे मानणेच मुळी चुकीचे आहे. भौतिक सृष्टीच्या सुसंगतवार ज्ञानास विज्ञान म्हणतात तर अदृश्य सृष्टीच्या संगतवार रीतीने मांडलेल्या ज्ञानास अध्यात्म असे म्हणता येईल. ही व्याख्या स्वीकारली तर मला वाटते विज्ञान आणि अध्यात्म यांच्या संबंधातील अनेक गैरसमज दूर होतील; कारण मग विज्ञानाचे कार्यक्षेत्र 'दृश्य सृष्टी' हे ठरेल तर अध्यात्माचे कार्यक्षेत्र 'अदृश्य सृष्टी' हे ठरेल. अशा प्रकारे कार्यक्षेत्र भिन्न ठरले तर दोहोमधील विरोध तर नाहीसा होईल आणि त्याउलट एकमेकांत सामंजस्य निर्माण होईल.

"दृश्य सृष्टीच्या पाठीमागे एकप्रकारची सुव्यवस्था आहे ( Order behind the appearances ) तिची जाणीव अंतःस्फूर्तीला पुष्टिदायक ठरते आणि त्यातून संशोधनाचा मार्ग उजळला जातो" हे अवतरण कोण्या एखाद्या अध्यात्मजड कर्मठाचे नसून अणुयुगाचा जनक म्हणून मान्य असलेल्या अल्बर्ट आइन्स्टिन यांचे आहे.

आईन्स्टिन यांच्या प्रमाणेच आणखी एक श्रेष्ठ वैज्ञानिक नोबेल पारितोषिक विजेते रॉबर्ट मिलिकन यांनी तर विज्ञान आणि अध्यात्म यांच्याबद्दल अत्यंत सखोल विवेचन करून मानवजातीला उपकृत केले आहे, रॉबर्ट मिलिकन यांची बुद्धिमत्ता किती श्रेष्ठ

दर्जाची आहे याबद्दलची अल्प माहिती या स्थळी देणे गैर होणार नाही. विश्वनिर्मितीतील प्रत्येक मूलद्रव्याचा एक घटक 'इलेक्ट्रॉन' हा असतो. तो अत्यंत सूक्ष्म असतो. त्या इलेक्ट्रॉनवर विद्युत-जागृती नेमकी किती असते याची गणती रॉबर्ट मिलिकन यांनी जगात पहिल्याने केली. त्यासाठी त्यांनी जी पद्धती वापरली तिला " Millikan's oil drop method " असे म्हणतात. त्यांचा हा शोध म्हणजे मानवी बुद्धिमत्तेची साक्ष देणारे एक देदीप्यमान शिखरच आहे.

अशा या मिलिकनने विज्ञान आणि अध्यात्म याबद्दल लिहिलेले अवतरण अत्यंत मननीय नाही असे कोण म्हणेल ? " Spirit of religion and the spirit of science are the pillers upon which rest human well-being and all of human progress. The purpose of science is to develop without prejudice of preconception of any kind, a knowledge of facts, the laws and processes of nature. The even more important task of religion, on the other hand is to develop the consciences, the ideals and the aspirations of mankind."

" आध्यात्मिक प्रवृत्ती आणि वैज्ञानिक प्रवृत्ती यांचा मानवी प्रगतीला आधारस्तंभासारखा आधार आहे. निसर्गातील घडामोडींचे आणि नियमाचे मागे असणारे सत्य शोधून काढताना कोणतीही पूर्व कल्पना किंवा पूर्वग्रह दूषितता न बाळगता ज्ञानवर्धन करावयाचे हा विज्ञानाचा उद्देश असतो तर अध्यात्माचा उद्देश त्याहूनही अधिक महत्त्वाचा असतो. मानवामध्ये सद्सद्विवेकबुद्धी, ध्येयवाद आणि उच्च आकांक्षा निर्माण करणे हे ( धर्माचे ) अध्यात्माचे कार्य आहे. "

विज्ञानाला प्रयोगातून गवसलेल्या सत्याचा आधार आवश्यक असतो त्यातून वैज्ञानिक-सत्य प्रगटते त्याप्रमाणे अध्यात्माला तपस्येतून गवसलेल्या आत्मप्रत्याचा आधार असतो. आध्यात्मिक ग्रंथांना हा जो आधार असतो त्यामुळेच ते जुने होऊ शकत नाहीत. ज्ञानेश्वरी, तुकोबांचा गाथा किंवा समर्थांचा दासबोध हे ग्रंथ आजही ताजेतवाने वाटतात त्याचे कारण त्या ग्रंथांचे लेखक, हे आत्मप्रत्ययी किंवा साक्षात्कारी संत होते. विज्ञानातील सत्ये जशी जगमान्य होतात कारण त्यामागे वैज्ञानिकाचे अविश्रांत श्रम असतात त्याप्रमाणे संतांनी सांगितलेली आध्यात्मिक सत्येदेखील सर्वमान्य असतात; कारण संतांनी त्यासाठी विशिष्ट मार्गाने, मग तो ज्ञानमार्ग, योगमार्ग किंवा भक्तिमार्ग कोणताही असो त्या मार्गाने, जीवनात प्रयोग करून, कठोर तपस्या करून सत्यान्वेषण केलेले असते. तुकाराम महाराज एकान्तामध्ये तल्लीन होऊन भजन, चिंतन, मनन

करीत असत तर समर्थांनी टाकळी येथे बारा वर्षेपर्यंत कठोर तपश्चर्या केली. कमरेइतक्या पाण्यात उभे राहून मध्यान्हीपर्यंत जप करणे, दुपारी वेगवेगळ्या आध्यात्मिक ग्रंथांचे परिशीलन करणे, सायंकाळी अध्यात्म श्रवण करावयास राममंदिरात जाणे हा त्यांचा दिनक्रम होता. त्यातून त्यांना आत्मसाक्षात्कार झाला.

संतांची वाणी प्रासादिक का याचे कारण विश्वाची चालकशक्ती त्यांच्या माध्यमातून शब्दद्वारा प्रगट होते. "वेदांताचा अर्थ आम्हासीच ठावा। इतरांनी वहावा भारा माथा॥" ही तुकारामाची स्पष्टोक्ती त्या तपश्चर्येच्या आधारातून अवतीर्ण होते. दासबोधामध्ये देखील समर्थांनी अशाच प्रकारची ओवी प्रारंभीच्या समासात लिहिली आहे. आपला ग्रंथ लिहिताना आधारासाठी घेतलेल्या अनेक ग्रंथांची यादी ते प्रथम देतात तथापि या ग्रंथाला मुख्य आधार आत्मप्रचीतीचा असल्याचे त्यांनी लिहिले आहे.

"नाना ग्रंथांच्या संमती। उपनिषदे वेदान्तश्रुती।
आणि मुख्य आत्मप्रचीती। शास्त्रेसहित॥ दा. १–१–१५.

यावरून दासबोध हा एका साक्षात्कारी महापुरुषाचा ग्रंथ आहे हे दिसून येते.

दासबोधातील शिकवणीमध्ये आध्यात्मिक आणि त्याचबरोबर व्यावहारिक स्वरूपाचा उपदेशही आहे. ज्यांना अध्यात्मामध्ये गोडी नसेल त्यांनासुद्धा या ग्रंथात बराच उपयुक्त भाग आढळेल. संसारात यशस्वी होण्यासाठी जे सद्गुण आवश्यक आहेत तेच सद्गुण आध्यात्मिक क्षेत्रात प्रगती करण्यास सहाय्यक ठरतात. हा महत्त्वाचा सिद्धान्त आहे. दुर्गुण कोणते आहेत ते सांगून ते झटकून टाकण्याचा उपदेश दासबोधात आहे.

"निद्रा आळस दुश्चितपण। हेचि मूर्खांचे लक्षण।
येणेकरिता निरूपण। समजेना॥ असे म्हटले आहे. याउलट

"सावध, साक्षेपी आणि दक्ष! तयास तात्काळचि मोक्ष।
इतरास ते अलक्ष। लक्षिले न वचे॥" असे दासबोधात म्हटले आहे. या विज्ञानयुगातसुद्धा वरील प्रकारची शिकवण कालबाह्य होऊ शकत नाही. सच्चा संशोधक शास्त्रीय संशोधनाच्या मागे लागतो त्यावेळी त्याने "सावध, साक्षेपी आणि दक्ष" असलेच पाहिजे. त्या संशोधनातील यशप्राप्ती हा त्यावेळी त्याचा मोक्ष असतो.

विज्ञानामध्ये प्रयोग, निरीक्षण आणि अनुमान या तीन पायऱ्यांचे महत्त्व असाधारण आहे. आणि वैज्ञानिक पद्धतीमध्ये त्याच्या पुढची पायरी म्हणजे आपण जे सत्य शोधून काढले ते इतरांना समजावे यासाठी प्रयत्न करणे, ही आहे. समर्थ रामदासस्वामी यांचा

नेमका हाच मार्ग आहे. "प्रयत्न, प्रत्यय आणि प्रबोध" या तीन पायऱ्यांमध्ये सारी वैज्ञानिक पद्धतीच आहे.

"प्रपंच अथवा परमार्थ । प्रचीतीविण अवघे व्यर्थ ।
प्रत्ययज्ञानी तो समर्थ । सकळांमध्ये" आणि त्यानंतर
"जितुके आपणासी असे ठावे । ते हळुहळु इतरासी सिकवावे ।
शहाणे करून सोडावे । सकळ जन ॥" असे ते म्हणतात. या ठिकाणी वैज्ञानिक पद्धतीची परिसीमा होते. ती त्यांनी गाठली होती. म्हणून समर्थ रामदास यांची शिकवण कालबाह्य होऊ शकत नाही. त्यांच्या शिकवणीतील हजारो पैलू पहावयाचे तर त्यांचे सारे वाङ्मय पाहावे लागेल. तथापि ज्या काही विशेष तेजस्वी पैलूंमुळे माझे चित्त मोहून गेले ते या ठिकाणी सादर करण्याचा मानस आहे.

( १ ) स्वच्छता आणि सौंदर्य याविषयी आवड :–

वरील दोन गुणांविषयी भारतामध्ये कमालीची अनास्था आहे. परदेशातून आलेल्या प्रवाशांचे अनुभव विचारले तर प्रथम तिकडची स्वच्छता आणि लोकांची सौदर्यदृष्टी यांची तारीफ ते करतील. या गोष्टींकडे लोकांचे लक्ष वेधण्याचे काम तीनशे वर्षांपूर्वी समर्थांनी केले होते.

"दंत चक्षु आणि घ्राण । पाणी वसन आणि चरण ।
सर्व काळ जयाचे मळीन । तो एक मूर्ख ॥" तसेच
"सदा दात घासोनि तोंडा धुवावे । कळाहीन घाणेरडे वा नसावे ।"

हे त्यांचे वचन अतोनात प्रसिद्ध आहे. दासबोधामध्ये महंताची लक्षणे सांगताना ते सहज लिहून जातात,

"अक्षर सुंदर वाचणे सुंदर । बोलणे सुंदर चालणे सुंदर ।
भक्ति ज्ञान वैराग्य सुंदर । करूनि दावी ॥"

श्रीसमर्थांना महंत, मठाधिकारी म्हणून पाहिजे तो असा !

त्यांचे बोलणे, चालणे, अक्षर, अर्थांतर सांगणे आणि वागणे सारे काही त्यांना सुंदर हवे. पण या सुंदरतेची व्याप्ती त्यांनी केवळ ऐहिक गोष्टींपुरती मर्यादित ठेवलेली नाही तर भक्ती, ज्ञान, वैराग्य हे सुद्धा लोकांनी टकमक पहात राहावे इतके त्याने ते आश्चर्यकारकरीत्या सुंदर करावयास हवे असे त्यांचे सांगणे असे. एका बाजूला आनंदरूप आणि निर्मळ अशा परमेश्वराची चर्चा करावयाची आणि प्रत्यक्षात चर्चा करणाऱ्यांची

रहाणी मात्र दु:खदायक आणि घाणेरडी असावी याबद्दल त्यांनी आपला निषेध किती तीव्र शब्दात व्यक्त केला आहे ते पहावे,

" अद्वैत चर्चा कंटाळवाणी । राहणी पहाता सकळैक घाणी ।
तेणे गुणे मानस लाजताहे । होऊनिया सावध तू चि पाहे ॥ "

असे त्यांनी त्यांच्या श्लोकबद्ध प्रकरणात म्हटले आहे.

लेखनक्रिया समासामध्ये अक्षर कसे काढावे, ग्रंथ कसा लिहावा याबद्दल त्यांनी किती तपशीलवार आणि सुरेख मार्गदर्शन केले आहे ते पहावे. लेखनसाहित्य कसे असावे, ते ठेवण्यात, वापरण्यात व्यवस्थितपणा कसा असावा यासारखे त्यांनी केलेले मार्गदर्शन आजही उपयुक्त ठरावे असेच आहे. आता फौंटनपेन, टाईपरायटर यांसारखी साधने आली म्हणून तेवढा तपशिलात बदल करावा लागेल. पण

" ऐसा ग्रंथ जपोनि ल्याहावा । प्राणीमात्रास उपजे हेवा ।
ऐसा पुरुष तो पहावा । म्हणती लोक ।
काया बहुत कष्टवावी । उत्कट कीर्ती उरवावी ।
चटक लावोनि सोडावी । काही येक ॥ "

हा समर्थांचा उपदेश आजच्या काळातसुद्धा सारखाच उपयुक्त आणि मार्गदर्शक ठरेल. हा या समासातील एक शब्द मात्र आता कालबाह्य झाला आहे तो म्हणजे 'ब्राह्मण' हा शब्द ! समर्थांच्या काळात मुख्यत: ब्राह्मणवर्ग लेखनक्रियेत असे. चातुर्वर्ण्य ही त्याकाळची समाजव्यवस्था होती. आता ती इतिहासजमा झाली आहे. त्यामुळे आता साक्षर आणि सज्ञान लोकांसाठी तो उपदेश आहे असे समजून घेऊन पूर्वग्रहरहित मनाने तो उपदेश मानला जावा. समाजाच्या सर्व थरातील लोकांना त्यापासून लाभ होईल.

( २ ) रिकामा जाऊ नेदि क्षण ":–

समर्थांच्या उपदेशामधील जो भाग कधीही कालबाह्य होणार नाही त्यामध्ये वरील अवतरणाचा समावेश करावा लागेल.

" दुर्लभ शरीरी दुर्लभ आयुष्य । याचा करू नये नास ।
दास म्हणे सावकाश । विवेक पहावा ॥ "

अत्यंत बहुमोल असे शरीरयंत्र आपणास लाभले आहे. हे यंत्र दक्षतापूर्वक वापरावे; त्याचा नाश कालापव्यय केल्याने होतो. मानवी जीवनाचे सार्थक होईल अशा अनंत गोष्टी करता येण्यासारख्या आहेत; म्हणून बाष्कळपणा सोडावा.

लिहिणे नाही वाचणे नाही । पुसणे नाही सांगणे नाही ।
नेमस्तपणाचा अभ्यास नाही । वाष्कळपणे ॥
अवगुण अवघेचि सांडावे । उत्तम गुण अभ्यासावे ।
प्रबंध पाठ करीत जावे । जाड अर्थ ॥

( ३ ) " नाना सुकृताचे फळ । तो हा नरदेह केवळ "

मानवी देहाचे महत्त्व सांगणारा बराच भाग दासबोधात आहे. " १८-४ " हा संपूर्ण समासच त्यासाठी खर्ची घातला आहे. हा देह आहे म्हणूनच आपण संत, सज्जन व श्रोते यांना भेटू शकत आहोत असे समर्थ म्हणतात. या देहाच्या सहाय्यानेच अध्ययन करता येते.

" देह्याकरिता कवित्वे चालती । देह्याकरिता अधेने करीती
देह्याकरिता अभ्यासिती । नाना विद्या ॥
देह्याकरिता ग्रंथलेखन । नाना लिपीवोळखण ।
नाना पदार्थशोधन । देह्याकरिता ॥
देह्याकरिता सकळ काही । देह्याविण काही नाही ।
आत्मा विरे ठाई ठाई । नव्हताच जैसा ॥

माणूस इतकी प्रगती करू शकला याला कारण त्याला लाभलेला देह ! सर्वसामान्यपणे हा देह माणसाच्या स्वाधीन असतो पण तो परोपकारासाठी झिजवावा असे समर्थ सुचवितात.

नरदेह हा स्वाधीन । सहसा नव्हे पराधीन ।
परंतु हा परोपकारी झिजवून । कीर्तीरूपे उरवावा ॥

देहाचे महत्त्व पटल्याविना त्याचा उत्तम उपयोग कसा करावा हे कळणार नाही. " या शरीरयंत्रा ऐसे यंत्र । आणिक नाही " या छोट्याशा अवतरणात समर्थांनी केवढा अर्थ भरला आहे पहा. या विज्ञानयुगात हजारो प्रकारची आश्चर्यकारक यंत्रे मानवाने निर्माण केली आहेत पण या शरीरयंत्राची त्यांच्याशी तुलनाच करता येणार नाही. हे समर्थांचे म्हणणे कोणालाही नाकारता येणार नाही. अन्य यंत्रे कितीही गुंतागुंतीची आणि प्रचंड कामे करणारी असली तरी ती स्वत:ची काळजी स्वत: घेणारी, स्वत:च दुरुस्त होणारी ( Self-repairing ) आहेत काय ? शरीरयंत्रामध्ये ती शक्ती आहे. औषधे त्यास सहाय्य करतात पण मुख्य काम शरीरच स्वत:च करीत असते. तेच स्वत: जेव्हा

कमकुवत होते तेव्हा औषधेही काही करू शकत नाहीत. " मेडिकल सायन्स " तेथे तोकडे पडते !

मानवी देहाचे महत्त्व ओळखून त्याच्याकडून सत्कार्य करून घ्यावयाचे हा उपदेश समर्थांनी स्वतःच्या आचरणातून दिला आहे. सत्कार्य करताना देहावर उदार व्हावे लागते तरी सुद्धा विवेकाने काम पार पाडल्यास शरीररक्षण करूनही सत्कार्य करणे शक्य होते.

" देव मस्तकी धरावा । अवघा हलकल्लोळ करावा ।
मुलुख बडावा का बुडवावा । धर्मस्थापनेसाठी ॥ "

अशा प्रकारचा स्फुरणदायी उपदेश करण्यासाठी समर्थांचा संचार अदिलशाही मुलखामध्ये होत असे. निर्भयपणे वावरून कीर्तन-प्रवचनांतून हा प्रचार त्यांनी स्वतः केला. पण प्रचाराचे कार्य संपताच आपण कोठे जाणार आहोत ते स्थळसुद्धा लोकांना कळू न देता ते एकान्तस्थळी निघून जात असत. सज्जनगडावर समर्थांच्या काही वस्तू दाखविल्या जातात त्यामध्ये गुप्ती बसविलेली एक कुबडी पहावयास मिळते. हे गुप्त हत्यार स्वशरीर रक्षणार्थ बाळगणाऱ्या त्या थोर संताच्या विवेकाचे कौतुक वाटते. महाराष्ट्रातील सह्याद्रीलगतच्या भागात वारकरी संप्रदायाने वैदिक संस्कृती धगधगीत ठेवली होतीच तिच्यामध्ये क्षात्रधर्म जागृत करण्याचे महत्कार्य समर्थांनी केले त्यासाठी त्यांनी न थकता अखंड भ्रमण केले " यत्न तो देव जाणावा " या खंबीर भावनेने महाराष्ट्रातील दऱ्याखोऱ्यांतून, दिवसा-रात्री, उन्हातान्हातून, थंडीवाऱ्यातून एकसारखा संचार केला. " आधी केले मग सांगितले " हाच त्यांचा उपदेशाचा आधार होता.

( ४ ) " लहानथोर काम काही । केल्यावीण होत नाही ॥ "

वरील अवतरणात एक त्रिकालाबाधित सत्य समर्थांनी सांगितले आहे. कोणतेही काम; मग ते लहान असो वा मोठे असो, ते काही आपोआप होणार नाही. त्यासाठी आळस झटकूनच कामाची पूर्तता करावी लागते. दिसावयास अगदी साधी वाटणारी गोष्ट पण परिणामी फार महत्त्वाची ! ती नेमकी समर्थांनी सांगितली आहे.

" कष्टेवीण फळ नाही । कष्टेवीण राज्य नाही ।
केल्यावीण होत नाही । साध्य जनी ॥
आळसे काम नासते । हे तो प्रत्ययास येते ।
कष्टाकडे चुकविती । हीन जन ॥
आधी कष्टाचे दुःख सोशिती । ते पुढे सुखाचे फळ भोगिती ।
आधी आळसे सुखावती । तया पुढे दुःख ॥

जेही उदंड कष्ट केले । ते भाग्य भोगुनि ठेले ।
येर ते बोलतचि राहिले । करंटे जन ॥ "

कष्ट सहन करण्याची महती समर्थांनी ज्या शब्दात सांगितली आहे ते इतके सोपे आहेत की कोणाही मराठी भाषिकाला ती भाषा अगदी सहज समजावी. गद्य आणि पद्य यांच्या सीमेवरील ही भाषा आहे.

जमाना कितीही बदलला तरी 'यत्नवादा'चे महत्त्व तिळमात्र कमी होणार नाही. " समर्थांनी शिवरायांच्या आदर्श वागणुकीचे उदाहरणच समाजापुढे मांडले आहे.

" शिवरायाचे कैसे बोलणे । शिवरायाचे कैसे चालणे ।
शिवरायाची सलगी देणे । कैसे असे ।
सकळ सुखाचा त्याग । करुनि साधिजे तो योग ।
राज्यसाधनाची लगबग । कैसी असे ॥ "

समर्थांच्या कालखंडामध्ये किंवा त्यानंतरच्या काळात वरील उपदेश जितका प्रभावी ठरला तितकाच आजही ठरेल. सद्यःस्थितीत उपदेश करताना आणखीही काही आधुनिक काळातील उदाहरणे देणे उचित ठरेल. आधुनिक भगीरथ म्हणून ज्याचा उल्लेख करावा लागेल असा डी. लेसेप्स, प्रतिकूल परिस्थितीवर मात करणारा बुकर टी. वॉशिंग्टन, किंवा 'स्प्रू' रोगावरील इलाज शोधून काढणारे डॉ. यल्लप्रगदा सुब्बाराव ही किंवा यांसारखी उदाहरणे आजच्या समाजापुढे मांडल्यास 'समर्थांचा यत्नवाद' अधिक सुस्पष्ट होईल इतकेच.

विज्ञानयुगामध्येही प्रारब्धावर अवलंबून राहाणारी माणसे आपणास आढळून येतात. वृत्तपत्रामधील राशिभविष्य हा अधिक वाचकांना आवडणारा भाग आहे. समर्थांना प्रारब्धवाद अजिबात मान्य नव्हता. प्रारब्ध तरी पूर्वीच्या कर्माचे फळ असते म्हणून सत्कर्म करून प्रारब्ध देखील बदलविता येते असा त्यांच्या उपदेशाचा भावार्थ आहे. कागदावर काढलेली रेषा जशी रबराने खोडता येते त्याप्रमाणे ललाटरेषा देखील सत्कर्माने पुसून टाकता येते हा प्रत्यक्ष अनुभव असल्याचे समर्थांनी सांगितले.

" रेखा तितुकी पुसोन जाते । प्रत्यक्ष प्रत्यया येते ।
डोळे झाकणी करावी ते । काये निमित्त ? " असा प्रश्न ते विचारतात.

" ब्रह्म लिहितो अदृष्टी । आणि वाचून जाते सटी ।
ऐशा प्रकारीच्या गोष्टी । या नाव भ्रम ॥ " अशा प्रकारच्या अनेक ओव्यांतून तत्कालीन जनतेच्या अंधश्रद्धा नष्ट करण्याचा त्यांनी प्रयत्न केला आणि ठसठसीत भाषेत

'यत्नवादा'ची कास धरण्याचा उपदेश त्यांनी केला.

"सुखदु:खाचे भोग भोगणे, हा मुळी जीवित हेतु नसे" हे आंग्ल कवी लॉंगफेलो म्हणतो त्याचप्रमाणे "उगाच शरीरे भोगिजे भोग। या नाव भ्रम" असे समर्थ म्हणतात. जे उत्कट आणि भव्य असेल त्याचा स्वीकार करावा. 'नित्य नवा हव्यास धरावा' हे सांगणाऱ्या समर्थांची दृष्टी केवढी विशाल असावी! देशावर आलेल्या परचक्रामुळे भेकड बनलेल्या जनतेला निर्भय बनविण्याचे कार्य नियतीने त्यांच्यावर सोपविले होते.

'बहुत लोक मिळवावे। एकविचारे भरावे। कष्ट करोन घसरावे। म्लेंच्छांवरी।'

अशा प्रकारचा उपदेश करीत संचार करणारा संत महाराष्ट्रात होऊन गेला; ही अभिमान वाटण्यासारखी गोष्ट आहे. या ठिकाणी एक खुलासा करणे आवश्यक आहे, तो असा की, म्लेंच्छांशी ते केवळ म्लेंच्छ आहेत. यास्तव समर्थांचा त्यांच्यावर रोष मुळीच नव्हता तर त्यांची जी म्लेंच्छवृत्ती होती तिच्याशी त्यांचा झगडा होता. वास्तविक प्रत्येकाला स्वत:च्या श्रद्धेनुसार परमेश्वराची आराधना करण्याचा हक्क आहे. पण 'आम्ही म्हणतो त्याचप्रमाणे आराधना करावी. एक कुराण नाहीतर तलवार' ही हटवादी वृत्ती समर्थांना मान्य नव्हती. परमेश्वर निर्गुण आणि निराकार आहे खरा. पण 'सगुणाचेनि आधारे। निर्गुण पाविजे निर्धारे।' असा त्यांचा उपदेश होता. मूर्तिभंजन आणि देवालये पाडणे यात कृतकृत्यता मानणाऱ्या यवनी सत्तेला आव्हान देणारे जे शिवरायांचे राज्य निर्माण होत होते त्याच्या यशासाठी समर्थांनी जनमानस तयार केले. प्रारब्धवादाचा त्याग करून म्लेंच्छांच्या हटवादी, जुलमी सत्तेला तोंड देण्यासाठी यत्नवादाची शिकवण समर्थांनी दिली ती चिरंतन स्वरूपाची आहे.

(५) प्रापंचिकांना संसाराची सनद देणारा संत म्हणून समर्थांचे वर्णन काही ठिकाणी करण्यात आले आहे. पण तो संसार रडका असता कामा नये. रडक्या संसाराचे समर्थकृत हे वर्णन पहा–

"नसे अंथराया, नसे पांघराया। नसे धाम ना दृढ छाया निजाया।
नसे अन्न खाया, नसे रम्य जाया। वृथा शीण संसार करिती रडाया॥ १॥
नसे द्रव्य काही, घरी धान्य नाही। बहू वेष्ठिला कामक्रोधाधि देही।
पराधीनता वेळ नाही मराया। वृथा शीण संसार करिती रडाया॥ २॥
मनासारिखा मित्र तोही मिळेना। परस्त्रीक ते ज्ञान पोटी वसेना।
उणे बोलिती सर्व काही छळाया। वृथा शीण संसार करिती रडाया॥ ३॥

असला लाजिरवाणा संसार न करता आळसाला थारा न देता यत्नपूर्वक यशस्वी संसाराची

उभारणी करावी असे त्यांनी सांगितले.

" लोकी संसार करावा । नाना यत्ने आटोपावा ।
लोकांमध्ये मिरवावा । पुरुषार्थ आपुला ॥ "

तरीपण एक चिरंतन तत्त्व समर्थांनी सागून ठेवले आहे ते या विज्ञानयुगातही कोणालाही प्रत्ययाला येईलच ते असे; की संसार हा मुळातच दु:खदायी आहे. तो विवेकाने नेटका करण्याचा प्रयत्न करावयास हवा. पण तसे करणाऱ्या विवेकी माणसाची संसाराची गोडी हळूहळू कमी होत जाते.

" संसार मुळीचा नासका । विवेके करावा नेटका ।
नेटका करिता फिका । होत जातो ॥ "

मनुष्याने संसार नेटका करण्याचा कितीही प्रयत्न केला तरी त्याला त्या संसाराची नश्वरता जशी अनुभवाला येत जाते तशी त्याची संसारावद्दलची आसक्ती कमी होत जाते. यासाठी " सार-असार " यांचा विचार माणसाने सदैव चित्तात ठेवण्याचा प्रयत्न करावयास हवा; आणि हळूहळू स्वार्थी संसाराचे रूपान्तर " परम-अर्थी " म्हणजे परमार्थी संसारात करावयास हवे.

" विचारे इहलोक परलोक । विचारे होतसे सार्थक ।
विचारे नित्यानित्यविवेक । पाहिला पाहिजे ॥ "

( ६ ) नियोजन ( म्हणजेच प्लॅनिंग ) हा विज्ञानयुगातील जणू परवलीचा शब्द झाला आहे. नियोजनाशिवाय व्यक्तीचा काय किंवा राष्ट्राचा काय विकास योग्य प्रकारे होणार नाही. त्या विचारातूनच पंचवार्षिक, सप्तवार्षिक योजना अस्तित्वात आल्या. व्यक्तिजीवनामधील नियोजनात खर्चाचे नियोजन कुटुंब नियोजन किंवा वेळाचे नियोजन हे महत्त्वाचे आहे. कोणत्याही प्रकारच्या नियोजनाचा पाया विचार किंवा विवेक यामध्ये असतो. रामदासांच्या वाङ्मयामध्ये जनजागृतीचा जो भाग आहे त्यात लोकांची विचार-शक्ती जागृत करण्यावर त्यांचा भर होता. दूरदृष्टीने विचार करण्यात इहलौकिक किंवा पारलौकिक कल्याण आहे हे त्यांचे आग्रहाचे प्रतिपादन आहे.

इहलोक अथवा परलोक । दोहीकडे सारखीच विवेक ।
दीर्घ सूचनेचे कौतुक । कळले पाहिजे ॥

इहलोकामधील अडीअडचणींसाठी द्रव्य साठवून ठेवावे तर परलोकप्राप्तीसाठी परमार्थाचा विचार करावा हे त्यांनी आवर्जून सांगितले आहे. या संबंधात

" इहलोकीचा संचितार्थ । परलोकीचा परमार्थ ।
संचितेवीण व्यर्थ । जितचि मेले ।
मेळविती तितुके भक्षिती । ते कठीण काळी मरोनि जाती ।
दीर्घसूचनेने वर्तती । तेचि भले ॥ "

हा उपदेश कधीच कालबाह्य होणार नाही. " बचत सप्ताह " किंवा " नॅशनल सेव्हिंग्ज सर्टिफिकिटे " यांचा प्रचार करताना आजच्या 'विज्ञानयुगामध्ये' सुद्धा उपयोगी पडतील अशी ही अवतरणे आहेत.

" फॅमिली प्लॅनिंग " संबंधातदेखील दासबोधातील " लेकुरे उदंड जाहली । तो ते लक्ष्मी निघोनि गेली । " अशांसारखी वचने पहावी ! कोणत्याही प्रकारचे नियोजन नसलेल्या एका दुर्दैवी संसाराचे भडक वर्णन दासबोधातील तीन समासांमध्ये समर्थांनी केले आहे : अशा प्रकारचे चित्र मांडून " सावधपणे करीत जावा । संसार आपुला " असे सांगणारे संत रामदास हे आगळेच संत होते असे म्हटल्यास वावगे होणार नाही. आळशी, ऋणग्रस्त आणि खादाड लोकांवर समर्थांनी कोरडे ओढले; कारण समर्थांचा अधिकारच तसा दांडगा होता. त्यांनी स्वतःच्या जीवनामध्ये सर्वत्र 'नियोजन' करून त्याची सुरेख आखणी केली होती. पहिली बारा वर्षे बालपण, पुढे बारा वर्षांची तपश्चर्या, नंतरची बारा वर्षे ज्या समाजाचा, देशाचा उद्धार करावयाचा त्याचे सूक्ष्म निरीक्षण करण्यासाठी देशभर पदयात्रा आणि नंतरची तीन तपे केवळ देशासाठी आणि देवासाठी सर्वस्वाचे अर्पण हा त्यांचा जीवनपट पाहणारा आजही आश्चर्याने विस्मित होतो. धगधगीत वैराग्य, निर्भयता आणि निस्पृहता श्रीसमर्थांच्या पार्थिव देहाच्या रूपाने स्वतः देहरूप धारण करून या महाराष्ट्रात तीन तपे संचार करीत राहिली होती. शिवरायांच्या स्वर्गवासानंतर रामदासस्वामींना स्वतःचेही अवतारकार्य संपल्याची जाणीव झाली. तथापि जीवनांच्या अखेरच्या कालखंडामध्ये म्हणजे केवळ एक वर्षामध्ये आपल्या साऱ्या उपदेशाची वीस दशकांत किंवा दोनशे समासांमध्ये त्यांनी जुळणी केली आणि नियोजनपूर्ण रचलेल्या स्वतःच्या जीवनमंदिरावर जणू कळस चढविला. तो दासबोध ही मराठी माणसाला समर्थ रामदासांची चिरंतन स्वरूपाची भेट आहे. विज्ञानामुळे माणसाच्या ऐहिक जीवनामध्ये कितीही स्थित्यंतरे झाली तरी समर्थांच्या शिकवणीपैकी बराच भाग कालबाह्य होणार नाही.

( ७ ) " आपण यथेष्ट जेवणे । उरले ते अन्न वाटणे ।
परंतु वाया दवडणे । हा धर्म नव्हे ॥ "

दासबोधातील उपनिर्दिष्ट अवतरण इतके मोलाचे आहे की महाराष्ट्रातील प्रत्येक मंगलकार्यालयात आणि भोजनगृहात या ओवीचे सुवर्णाक्षरातील फलक लावावे. मेजवानीच्या प्रसंगी अन्नाची नासधूस कशाप्रकारे होते हे पाहिले असता समर्थांची वरील शिकवण आजच्या विज्ञानयुगातसुद्धा कालबाह्य ठरणारी नाही याची खात्री पटते.

पण केवळ अन्नाच्या बाबतीतच समर्थांचा हा उपदेश नाही कारण वरील ओवी-पुढील त्यांची दुसरी ओवी आहे.

" तैसे ज्ञाने तृप्त व्हावे । तेचि ज्ञान जगास सांगावे ।
तरतेन बुडो नेदावे । बुडतयासी ॥ "

हा त्यांचा उपदेश विशेषच मोलाचा आहे. आपले ज्ञान दुसऱ्याच्या उपयोगी पडले पाहिजे. स्वतःस पोहता येते आहे आणि बुडत्याला मदतीचा हात देण्याचे ज्याचे सामर्थ्य आहे त्याने बुडत्याला कधीही बुडू देऊ नये हा उपदेश कोणत्या शतकात कालबाह्य होऊ शकेल ? उत्कृष्ट नागरिकाच्या अंगी जे सद्गुण असावयास हवेत त्यामध्ये वरील प्रकारच्या वृत्तीचा अंतर्भाव प्रामुख्याने करावयास हवा.

" स्काउटिंग " ही आजच्या जगातील सुजाण नागरिक घडविणारी चळवळ म्हणून मान्यता पावली आहे. " स्काउट प्रॉमीज " किंवा बालवीर वचनामध्ये " दुसऱ्याच्या सदैव उपयोगी पडण्याचा यत्न करणे " हा महत्त्वाचा भाग असल्याचे लॉर्ड बेडन पॉवेल यांनी सांगितले आहे. " तरतेन बुडो नेदावे । बुडतयासी । " हे वचन समानार्थीच नाही काय ? संकटग्रस्तांच्या मदतीसाठी हात पुढे करणाऱ्या वृत्तीची जोपासना करणे म्हणजे जगामध्ये सुखाच्या वाढीला सहाय्य करण्यासारखेच आहे.

( ८ ) विज्ञानयुगामध्ये व्यक्तिस्वातंत्र्याला साहजिकच महत्त्व प्राप्त झाले आणि व्यक्तीच्या मतावर सरकारची निवड होण्याचा जमाना आला. " लोकशाही सत्ता " ही नव्या जमान्याची देवता बनली. या सत्तेच्या आश्रयाने ज्या व्यक्तीला कर्तेपणाने समाजसेवा करावयाची असेल त्याला लोकमत सांभाळावे लागते. त्याला लोक राजी राखावे लागतात. या विषयासंबंधी समर्थांनी दासबोधामध्ये अनेक समासांमध्ये मार्गदर्शन केले आहे.

" राखावी बहुतांची अंतरे । भाग्य येते तदनंतरे " हे त्यांचे वचन कोणत्याही क्षेत्रामध्ये नेतृत्व काण्याची इच्छा बाळगणाराने सदैव चित्तात ठेवावे असे आहे. मात्र समर्थांची लोकांना राजी राखण्यामागची विचारधारा आध्यात्मिक आहे.

" पृथ्वीमध्ये जितुकी शरीरे । तितुकी भगवंताची घरे ॥ " असे ते म्हणतात. " परांतर रक्षायाची कामे । बहुत कठीण विवेक कर्मे " असे जरी असले तरी परांतर

राखण्याची गुरुकिल्ली परोपकार आणि सतत जागृत ठेवलेली सेवाभावना यामध्ये आहे. त्या संबंधातील अवतरणे कधीही कालबाह्य ठरणार नाहीत.

( १ ) " जे परोपकार करीतचि गेला । पाहिजे तो ज्याला त्याला ।
मग काय उणे तयाला । भूमंडळी ॥ "

( २ ) सकळाशी नम्र बोलणे । मनोगत राखोन चालणे ।
अखंड कोणियेकाचे उणे । पडोचि नेदी ॥

( ३ ) जनी जनार्दन म्हणोति जना । संतुष्ट करावे ।

( ४ ) उपासनेसारिखे बोलावे । सर्व जनासी तोषवावे ।
सगट बरेपण राखावे । कोणी येकासी ॥

( ५ ) काया बहुत कष्टवावी । उत्कट कीर्ती उरवावी ।
चटक लावून सोडावी । काही येक ॥

( ६ ) जगामध्ये जगमित्र । जिव्हेपाशी आहे सूत्र ।
कोठे तऱ्ही सत्पात्र । शोधून काढावे ॥

( ७ ) " मुख्य मनोगत राखणे । हेचि चातुर्याची लक्षणे ।
चतुर तो चतुरांग जाणे । इतर ती वेडी ॥ "

( ८ ) दिसे सकळास सारिखा । पाहाता विवेकी नेटका ।
कामी निकामी लोका। बरे पाहे ॥

( ९ ) माणुस हेंकाड आणि कच्चे । मान्य करावे तयाचे ।
येणे प्रकारे बहुतांचे । अंतर राखावे ॥

अशासारखी विचारसूत्रे म्हणजे श्रीसमर्थांनी आपल्या देशभरच्या तीर्थयात्रेच्या प्रसंगाने मिळविलेल्या मनुष्य स्वभावाच्या अनुभवाचे नवनीत आहे. " सुशब्दे राजी राखावा सकळ लोक " असे जाणून सुशब्द बोलत असतासुद्धा काही वेळा काही व्यक्तींचे समाधान करणे अशक्य होते हा अनुभवही समर्थांनी घेतला होता.

" अंतरी पीळ पेच वळसा । तोचि वाढवी बहुवसा ।
तरी मग शहाणा कैसा । निवडू नेणे ॥ "

तरी पण एखाद्याशी सदैव वैरभाव धरणे किंवा एखाद्याची सदैव बाजू घेणे हे चातुर्याचे लक्षण नसल्याचे समर्थ सांगतात. जनसंघटनेचे हे सूत्र " येकाची पाठी राखणे । येकास देखो न शकणे । ऐसी नव्हेत की लक्षणे । चातुर्याची "

या शब्दात त्यांनी सांगितले आहे. मनुष्य स्वभाव जाणून बोलण्यात नम्रता ठेवून त्याचे मन आकर्षित करावे.

" अहो; काहो, अरे; कारे । जनी ऐकिजेत की रे ।
कळत असताचि कारे । निकामीपण ? ॥ " असे ते विचारतात.
जगदांतरे बोळला धणी । किती येकवटील प्राणी ।
परि ते बोळायाची करणी । आपणापाशी ॥ "

मनुष्य जोडणे किंवा तोडणे ही करणी आपल्या हातीच बहुतांशी असते.

" हे तो आपणाकडेच येते । राजी राखिजे समस्ते ।
देहासि बरे करावे ते । आत्मयास फावे ॥ "
दुसऱ्याचे चालणी चालावे । दुसऱ्याचे बोलणी बोलावे ।
दुसऱ्याचे मनोगते जावे । मिळोनिया ॥ "

मनोगत जाणण्याची महती समर्थांनी मोठ्या टसठशीत भाषेत सांगितली आहे.

" जो दुसऱ्याचे अंतर जाणे । देश, काळ प्रसंग जाणे ।
तया पुरुषा काय उणे । भूमंडळी ॥ "

कोणतेही सामाजिक कार्य करावयाचे असेल तर त्यासाठी अनेक माणसांना विश्वासात घ्यावेच लागते. जरी एखादी सुवर्ण मोलाची कल्पना एखाद्या कार्यकर्त्यापाशी असेल पण त्याचा स्वभाव भांडकुदळ असला तर यश दुःप्राप्य होते.

" आपण येकायेकी येकला । सृष्टीत भांडत चालला ।
बहुतांमध्ये येकल्याला । येश कैचे ॥ "

वरील ओवी तर नगरपित्यापासून राज्यमंत्र्यापर्यंत सर्वांना सारखीच स्मरणीय वाटेल. वेड्याला सुद्धा वेडा म्हणून चालणार नाही.

" वेड्यास वेडे म्हणो नये । वर्म कदापि बोलो नये ।
तरीच घडे दिग्विजये । निरपृहासी ॥ "

कोणी कर्तबगार असो किंवा कोणी नसो दोघांचेही सामर्थ्य ओळखून आपण स्वीकारलेल्या कार्यासाठी त्यांची योग्य जागी योजना करावयास हवी हे महत्त्वाचे सूत्र खालील ओवीत गोविलेले आहे.

" जाणोन पाहिजेत सर्व । हेचि तयाचे अपूर्व ।
ज्याचे त्यापरी गौरव । राखो जाणे ॥ "

अनेकांशी एकाच वेळी झगडा देण्याचा प्रसंग आला तर आपली बाजू खरी असली

तरी आपणास यश येतं नाही ही सावधपणाची सूचना समर्थांनी अनेकदा दिली आहे.

" प्रसंग जाणावा नेटका । बहुतांशी जाझु घेऊ नका ।
खरे असताचि नासका । फड होतो ॥
सकळ जगदांतरीचा देव । क्षोभता राहाव्या कोठे ठाव ।
जना वेगळा जनास उपाय । आणिक नाही ॥ "

जनातारूपी ईश्वराला प्रसन्न करून घेण्यासाठी एकांतात विचार करण्याची स्वतः समर्थांची सवय होती.

" कोण कोण राजी राखिले । कोण कोण मनी भंगले ।
क्षणक्षणा परीक्षिले । पाहिजे लोक ॥ "
धूर्तपणे सकळ जाणावे । अंतरी अंतर बाणावे ।
समजल्याविण सिणावे । कासयासी ॥

जे सुयोग्य असतील अशांची प्रशंसा करतानासुद्धा ऐकणाऱ्यांपैकी अन्य कोणाचे मन दुखविले जाण्याचा अकारण संभव असतो. अशांचेही ध्यान ठेवावे आणि त्यानाही वरवर संतुष्ट करावे.

" पूज्य पूजेसी अधिकार । उगेचि तोषवावे इतर ।
दुखवू नये कोणाचे अंतर । म्हणिजे बरे ॥ "
" जिकडे जग तिकडे जगन्नायक । कळला पाहिजे विवेक ।
रात्रीदिवस विवेक लोक । सांभाळीत जाती ॥ "

विवेकी माणसाने रात्रंदिवस जगन्नायकाचे अंतर सांभाळले पाहिजे.

स्वतः जो निरपृह नसेल त्याचे म्हणणे बहुतांशी मान्य केले जात नाही. तथापि जो निरपृह असेल त्यानेही जनमानस सांभाळण्याची हयगय करता उपयोगी नाही.


" स्वतः निरपृह असेना । त्याचे बोलणेचि मानेना ।
कठीण आहे जनार्दना । राजी राखणे ॥ "

आपल्या स्वतःच्या वृत्तीचे आणि वागण्याचे " आत्मपरीक्षण " वारंवार केले पाहिजे तरच कोणत्याही व्यक्तीचे सुयश कायम राहते. आपणावर लोकांनी टीका केली तर लोकांवरच सर्व बोल ठेवता कामा नये.

" जो जो लोक दृष्टीस पडला । तो तो नष्ट ऐसा कळला ।
अवघेच नष्ट येकला भला । काशावरूनी ? ॥ असा प्रश्न विचारून समर्थ म्हणतात, मनुष्य सर्वमान्य केव्हा होतो ? तर

" काही नेमकपण आपुले । बहुत जनासी कळो आले ।
तेचि मनुष्य मान्य जाले । भूमंडळी ॥ "

समर्थांचे " नेमकपण " सर्व महाराष्ट्राच्या नजरेमध्ये त्यांच्या हयातीतच भरले. " जिकडे तिकडे कीर्ति माजे । सगट लोकास हव्यास उपजे ॥ " ही अवस्था आली आणि " समर्थ " हा श्रेष्ठ पदवी त्याना प्राप्त झाली. म्हणून स्वानुभवावर आधारलेला " लोक राजी राखण्याचा " त्यांचा उपदेश कालबाह्य होऊ शकणार नाही.





करुण-रम्य
तथापि उत्कट आणि भव्य
अशी रामकथा
" ब्रह्मांड भेदून पैलाड "
नेण्याचा प्रयत्न करणारे
मराठीचे प्रति-वाल्मीकी

श्री. ग. दि. माडगूळकर
यांना ही अल्पशी कृती
सादर समर्पित

—द्वा. वा. केळकर

# समर्थ रामदास—नंदादीप ? नव्हे दीपस्तंभ


* **श्री समर्थांच्या सान्निध्यात** १–५

* **बहूतांच्या नजरेतून श्रीसमर्थ** ६–७२

श्री. यशवंतराव चव्हाण–७; आचार्य विनोबा ८–९, कवी यशवंत १०–१२, श्री. म माटे १३–१५, प्रा. शिवाजीराव भोसले १६–१८ कॉस्मे ड गार्डा १९–२०, लो. टिळक २१–२४, स्वा. सावरकर २५–२८, ल.रा.पांगारकर २९–३१, मामासाहेब दांडेकर ३२–३४ समाजभूषण पु. पां.गोखले ३५–३६, श्री रणजित देसाई ३७–३९, आचार्य अत्रे ४०–४३ डॉ. सौ. कमलाबाई गोखले ४४–४७, प्रा. न. र. फाटक ४८–५१, प्रा. वि. रा. करंदीकर ५२–५३, कै. स. खं. आळतेकर ५४–५६ न. वि. गाडगीळ ५७–६० पं. सातवळेकर ६१–६३ हरिजनसेवक ग. गो. कारखानीस ६४–६८ तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी ६९–७१

* **श्रीसमर्थ रामदास व्यक्ती आणि कार्य** ७२–८३

* **समर्थानुग्रहीत तीन घराणी** ८४–१०८

शिवछत्रपतींचे भोसले घराणे ८५–९३
'आमात्य' घराणे ९३–१०१, चिटणीस घराणे १०१–१०८

* **'प्रेरक' वाङ्मयाचे जनक श्रीसमर्थ** १०९–११३

* **'विख्यात व्हावे । भूमंडळी ॥'** ११४–११५

* **विज्ञानयुगातसुद्धा श्रीसमर्थांची शिकवण उपयुक्त** ११६–१३२

# प्रस्तावना

## समर्थांचे आज महत्व

देशाच्या व समाजाच्या जीवनातील प्रत्येक कालखंडात अनेक अडचणी व आपत्ती निर्माण होत असतात. अशा वेळी विचारवंत आपल्या इतिहासकालीन श्रेष्ठ पुरुषांच्या चरित्रापासून आणि लेखनापासून मार्गदर्शन घेण्याचा प्रयत्न करतात. समर्थांच्या व शिवाजीराजांच्या चरित्रापासून विविध कारणाकरता प्रेरणा घेण्याची क्रिया एक शतकभर तरी चालू आहे. पारतंत्र्याच्या काळात स्वातंत्र्याची आणि स्वातंत्र्य विचारांची स्फूर्ती मिळविण्याकरता शिवजयंती आणि दासनवमी हे राष्ट्रीय उत्सव म्हणून सुरू झाले. आज स्वातंत्र्य आहे पण समाजात नैतिक आणि सामाजिक ध्येयवाद नाही म्हणून पुन्हा समर्थांच्या चरित्राकडे आणि वाङ्मयाकडे समाजाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न चालू आहे. श्री. द्वा. वा. केळकर यांचा उपक्रम याच कार्याचा एक भाग आहे. " समर्थ रामदास–नन्दादीप ? नव्हे दीपस्तंभ " या ग्रंथलेखनाच्या द्वारे त्यांनी समर्थांच्या चरित्राकडे, विचारांकडे आणि वाङ्मयाकडे तरुण पिढीचे लक्ष वेधून घेण्याचा प्रयत्न केला आहे. समर्थांचे चरित्र व विचार आजही विचारवंतांना मान्य आणि कालमानाला उचित व उपयुक्त आहेत हे या पुस्तकाच्या लेखनाने दाखविले आहे.

पुस्तकाच्या पूर्व भागात महाराष्ट्रातील वीस प्रसिद्ध व्यक्तींना समर्थांविषयी काय वाटते आणि त्यांच्या विचारांवर व जीवनावर त्यांचा काय परिणाम झाला त्याचे दिग्दर्शन आहे. त्यात लो. टिळक, वॅ. सावरकर, कै. काकासाहेब गाडगीळ मा. यशवंतराव चव्हाण यांच्यासारखे राजकारणी आहेत; पू. विनोबा, वै. मामा दांडेकर यांच्यासारखे संत आहेत; श्री. रणजीत देसाई, प्राचार्य भोसले, कै. माटे यांच्यासारखे लेखक आहेत; श्री. पु. पां गोखले, श्री. काका कारखाननीस यांच्यासारखे समर्थ भक्त आहेत आणि श्री. न. र. फाटक, डॉ. गोखले, तर्कतीर्थ ल. जोशी व प्रा. वि. रा. करंदीकर यांच्यासारखे संशोधक आहेत. श्री. केळकर यांनी मनात आणले असते तर ही यादी आणखीही वाढविता आली असती. ग्रंथाच्या उत्तर भागात स्वतः लेखकाने समर्थांचे चरित्र, वाङ्मय, अनुग्रहीत व्यक्ती, वाङ्मयगुण, इ. विषयांचे विवरण देऊन नंतर आजच्या विज्ञानवादी परंतु भोगप्रधान युगातही समर्थांच्या वाङ्मयाची उपयुक्तता, जरुरी व औचित्य कसे आहे ते विषद केले आहे. शेवटी काही उत्कृष्ट व पाठांतरयोग्य असे उतारे विवेचनासह दिले आहेत. सारांश हे एक पुस्तक वाचल्याने तरुण वाचकाला समर्थांचे चरित्र, कार्य, विचार, परंपरा व आजच्या काळात महत्त्व यांची चांगली कल्पना येईल. महाराष्ट्रांतील इतर संतांशी असलेले समर्थांचे साम्य व इतर संतांत दिसून न येणारे त्यांचे वैशिष्ट्य हे वारंवार दाखविले आहे.

वयाच्या १२ ते २४ या कालखंडात तपश्चर्या, उपासना व अध्ययन; २४ ते ३६ या परिपक्व जीवनावस्थेत अथांग भारतप्रवास व समाजनिरीक्षण; आणि नंतरची तीन तपे आयुष्यातील उदंड चिंतन, उपदेश व लेखन–असे हे अलौकिक जीवन आहे. या जीवनाचा समर्थांच्या लेखनावर, भाषेवर व जीवनावर प्रभाव पडलेला आहे.

आज भक्ती, ईश्वर–प्राप्ती, मोक्ष इत्यादी मूल्यें प्रभावशाली राहिलेली नाहीत. परंतु नैतिक जीवन, सामाजिक ध्येयवाद, सुखप्राप्ती, दुःखनाश, माणुसकी, समता, उत्कृष्ट व्यक्तिमत्त्व, सद्‌गुणसाधना, यशप्राप्ती, वैभव आणि कीर्ती या मूल्यांना महत्त्व प्राप्त झालेले आहे. ही आजची मूल्यें साध्य करण्याकरिताही समर्थांच्या दासबोधाचा आणि श्लोकांचा फार उपयोग आहे. विज्ञानयुगामुळे तर माणुसकीच्या सद्‌गुणांची साधना फार मोठ्या प्रमाणावर समाजाने केली पाहिजे नाही तर भस्मासुराने आपल्याच हाताने आपला नाश करून घेतला तसे मानवाचे झाल्याशिवाय राहणार नाही. **पाश्चिमात्य विज्ञान आणि भारतीय जीवनदृष्टी यांचा समन्वय करणे हे भारताचे मिशन आहे. एका हातात टेस्टट्यूब किंवा यंत्राचे चाक आणि एका हातात दासबोधासारखा ग्रंथ अशी सांगड घातल्याखेरीज भारताचे ध्येय साध्य होणार नाही.** भावी नागरिकाच्या भारताची घडण करण्याकरता अशा ग्रंथाची अत्यंत आवश्यकता आहे. प्रत्येक नागरीकाच्या हातात व वाचनात असे पुस्तक द्यायला हवे.

२८–२–७७ **—ग. श्री. खैर**

ज्येष्ठ शु, ॥ १० १८९९

# लेखकाचे मनोगत

श्रीसमर्थ रामदासस्वामी यांच्या जीवनाला नंदादीपापेक्षा दीपस्तंभाची उपमाच अधिक शोभून दिसते. यांची चरित्रे अनेक लेखकांनी लिहिली आहेत ती वाचल्यानंतर आणि समर्थांच्या वाङ्मयाचा बराच अभ्यास झाल्यानंतर माझे वरील प्रकारचे मत बनले म्हणून या पुस्तकाला जरा लांबलचक भासणारे " समर्थ रामदास–एक नंदादीप ? नव्हे, दीपस्तंभ " असे नाव दिले.

आपण राहात असलेल्या या भू-गोलावर अधिकांश भागावर जो सागर पसरला आहे त्याच्या पृष्ठभागावरून सतत वाहतूक चाललेली आहे. लहान मोठ्या नावा, जहाजे आगबोटी यांचा संचार चाललेला असताना सागर बहुधा शांत असतो. पण काही वेळा मात्र तो रौद्र स्वरूप धारण करतो. प्रचंड झंझावातात त्याच्या डोंगराएवढ्या लाटा थैमान घालू लागतात. एखाद्या पाळण्याप्रमाणे जहाजेच काय पण प्रचंड आगबोटीसुद्धा हेलकावे खाऊ लागतात. कोणत्या क्षणी कोणत्या बाजूला कलंडून जलसमाधी मिळणार हे समजेनासे होऊ लागते. अंधाराची भयाणता प्रत्यही वाढू लागते. किनारा दिसेनासा होतो. होकायंत्राची तबकडी काम देईनाशी होते. दिशा दिसेनाशा झाल्यावर खलाशी कोणीकडे नाव वल्हविणार ? आगबोटीच्या कप्तानाच्या डोळ्यांपुढे अंधेरी येऊ लागून मदतीसाठी विनतारी संदेश सतत पाठविणे इतकेच काम त्याचे हाती राहाते. त्या सुसाट वाऱ्यामध्ये विमाने तरी मदतीसाठी कशी धावून येणार ? असहाय्यपणे केविलवाणी धडपड सुरू असताना एकाएकी किनाऱ्यावरील एखाद्या दीपस्तंभावरून प्रकाशाचा तेजस्वी झोत दिसतो. अशावेळी खलाशाना जो काही आनंद होतो त्याचे वर्णन कोणत्या शब्दात करणार ? दीपगृहातून येणाऱ्या प्रकाशझोतामुळे किनाऱ्याची दिशा तर समजतेच पण त्याखेरीज पाण्यात लपलेले खडकही समजतात त्यामुळे सावधपणे मार्गक्रमण करणे शक्य होते...श्रीसमर्थ हे असले दीपस्तंभ आहेत !

मानवी जीवनाचे तारूही अगाध, अनंत कालसागरावरून प्रवास करीत असते. ज्या मानवांचा समाज बनत असतो त्याचाही अशाच प्रकारचा प्रवास अखंड चालू असतो. व्यक्तिमात्राप्रमाणे समाजावरही झंझावाती वादळातून प्रवास करण्याचे प्रसंग येतात. निबिड अंधकारात दिशाहीन अवस्थेत प्रवास करण्याची भयाण अवस्था प्राप्त होते. आशेचा किरण कोठून तरी दिसतो का, ते पहात असताना अचानक एखाद्या महामानवाचा " दीपस्तंभ " मार्गदर्शक ठरतो; आणि व्यक्तिमात्रांची व साऱ्या समाजाची सोडवणूक त्या जीवघेण्या संकटातून होते. श्रीसमर्थ रामदासस्वामी यांच्या जीवनाला उपमाच द्यावयाची असेल तर ती दीपस्तंभाची द्यावी, असे मला वाटते. साडेतीनशे वर्षांपूर्वी आपल्या देशावर केवढा भयंकर प्रसंग

गुदरला होता. भारताने जपून ठेवलेली हजार वर्षांची उच्च संस्कृती नष्ट होते किंवा काय असे वाटत होते. व्यक्तिमात्राला जीवनाची शाश्वती राहिली नव्हती, आयाबहिणींची अब्रू कशी वाचेल अशा चिंतेने समाज ग्रासलेला होता. **यवनांच्या परचक्रामुळे देशाची झालेली नासाडी ही त्यावेळच्या निसर्ग निर्मित हानिपेक्षा महाभयंकर होती.** घरे जाळली जात होती. पिके लुटली जात होती, धर्मवेड्या सैतानांच्या नाचापुढे जनतेची स्थिती मेंदरलेल्या सशासारखी झाली होती. या देशाचे हे भव्य तारू कोठल्याही खडकावर आपटून फुटून जाणार अशी चिन्हे दिसत होती. पण इतक्यातच एक अद्भुत चमत्कार घडला एका खंबीर दीपस्तंभावरून झगझगीत प्रकाशझोत आला. सुकाणूधारी कप्तानाचा विश्वास दुणावला आणि त्यांच्या इषाऱ्यामुळे साऱ्या खलाशांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले. देशाची नौका किनाऱ्याला सुरक्षित पणे लागली!

श्रीसमर्थांचे मार्गदर्शन केवळ संकटकाळापुरतेच या समाजाला झाले असे नाही तर आजही व्यक्तिमात्रांच्या जीवनामध्येही हरप्रकारे मार्गदर्शन करण्याचे सामर्थ्य त्यामध्ये आहे. देहेबुद्धी (देह म्हणजेच मी अशी बुद्धी) तिच्यातून प्रकट होणारी मीपणाची भावना आणि काम-क्रोधादि षड्रिपु यामुळे तसेच जीवनामधील त्रिविध तापांमुळे मानवी जीवन उध्वस्त होऊ लागते त्यावेळी समर्थरूपी दीपस्तंभातून प्रकाश किरणे दिसू लागताच व्यक्तिमात्राला जीवन-प्रवासाची दिशा उमगू लागते. अशाप्रकारे **मानवाच्या व्यक्तिजीवनामध्ये आणि समाजाच्या राष्ट्रजीवनामध्ये समर्थ—दीपस्तंभामुळे सारखेच मार्गदर्शन होत आले आहे व भविष्यकाळा-मध्येही ते होत राहील.**

श्रीसमर्थ रामदासस्वामी यांनी ते ज्या भीषण कालखंडात जीवन जगले, त्या काळी त्यांनी जसे मार्गदर्शन केले तितक्यात प्रभावीपणाने त्यानंतरच्या काळामध्येही त्यांचा उपदेश राष्ट्रोद्धारक ठरला. याला इतिहासाची साक्ष आहे. पुढे एक कालखंड असा आला की त्या दीपस्तंभाचे विस्मरण आपणास झाले. अशावेळी धुळे येथील कै. शंकरराव देव यांच्यासारख्या साक्षेपी पुरुषाने "**श्रीशिव–समर्थांचे स्मरण हेच महाराष्ट्राचे जीवन व त्यांचे विस्मरण म्हणजे मरणच.**" या सिद्धान्ताच्या पूर्तीसाठी आपले सारे जीवन खर्ची घातले. आसेतुहिमाचल पर्यटन करून समर्थ-वाङ्मयाचा प्रचार केला, तीन खंडांमध्ये समर्थचरित्र प्रसिद्ध केले, मासिके काढली लेख लिहिले, मठामठातून संग्रहित असलेले वाङ्मय जतन करण्यासाठी 'श्रीसमर्थ वाग्देवता मंदिर' स्थापन करून कार्याची परिसीमा केली. कै. स. भ. देव यांच्या कार्यातून अनेकांना समर्थांच्या कार्याचे नव्यानेच दर्शन झाले. दीपस्तंभापासून येणाऱ्या प्रकाशकिरणांचे दर्शन परिस्थितिजन्य दाट धुक्यातूनसुद्धा मराठीभाषिकांना होऊ लागले. दासबोध ग्रंथाला स. भ. देव यांनी प्रदीर्घ प्रस्तावना लिहून त्याचे संपादन केले.

एका बाजूस श्रीसमर्थांच्या वाङ्मयाचे संशोधनकार्य चालू झाले तर दुसऱ्या बाजूस 'श्रीसमर्थसेवामंडळ' या संस्थेची स्थापना झाली. या संस्थेने दास संप्रदाच्या तीर्थक्षेत्रांच्या पुनरुज्जीवनाचे कार्य मोठ्या तडफेने करण्यास प्रारंभ केला. सज्जनगड हे एक आदर्श असे

क्षेत्र आज आपण पाहू शकतो. या क्षेत्रामधील स्वच्छता आणि सौंदर्य पाहून मन हरकून जाते. या क्षेत्राचेच नाव धारण करणारे 'सज्जनगड' या नावाचे मासिक प्रकाशित होऊ लागले. दरमहा नियमितपणे वाचकांपर्यंत समर्थोपदेशाची अमृतकिरणे त्यामुळे प्रत्यक्षपणे पोहोचू लागली. समर्थ संप्रदायामध्ये या मासिकामुळे मोठीच जागृती झाली यात शंकाच नाही. स्वर्गीय बाबूरावजी बैद्य, मा. भि हिरळीकर यांच्यासारख्या समर्थ भक्तांनी सेवा मंडळाच्या कार्यास खतपाणी करून त्याचा जोमदार वृक्ष करण्यास सहाय्य केले. आणि आजही समर्थ सेवामंडळातर्फे चाफळ, शिवथर यासारख्या क्षेत्रांचे जीर्णोद्धार कार्य मोठ्या जिद्दीने चालू आहे. श्रीसमर्थांच्या प्रेरणेमुळे माननीय उद्योगपती अरविंदभाई मफतलाल यांच्यासारख्या परप्रांतीय सज्जनाला सकृतदर्शनी 'उत्पादनशून्य' अशा कार्यामध्ये लक्षावधी रुपये गुंतविण्याची बुद्धी झाली. चाफळ क्षेत्राचा जीर्णोद्धार करण्याचे कार्य आता बहुतांशी पूर्ण झाले आहे.

महाड नजीकच्या बरंधा घाटातून शिवथर येथे जाण्यास मार्ग आहे. दुर्लक्षित अशी शिवथरची घळ व सुंदरमठ आज विद्युतदीपांच्या प्रकाशात नव्याने उजळून निघाली आहेत. अनेक समर्थभक्तांचे परिश्रम या कारणी पडले आहेत. आता दासबोध मंदिराची नावीन्यपूर्ण वास्तू तेथे उभी राहाणार आहे.

—अशाप्रकारे श्रीसमर्थांचे पुण्यस्मरण घडविण्याचे प्रयत्न हजारो हातांनी चालले आहेत. त्यातच माझी एक लहानशी ओंजळ अर्पण करीत आहे ती या पुस्तकाच्या रूपाने! श्रीसमर्थ हा एक दीपस्तंभ आहे. हा भव्य दीपस्तंभ स्वतः समुद्रांच्या लाटांचे तडाखे खात, खात निश्चलपणे उभा असतो आणि तशातच तो चुकलेल्या तारवांना मार्गदर्शन करीत राहातो. लपलेले खडकही दाखविते याचा प्रत्यय महाराष्ट्रामधील बहुतेक सर्व विचारवंताना आला आहे. अशा अनेकांचे विचार या पुस्तकामध्ये एकत्रित करण्यात आले आहेत. लो. टिळकांपासून, मा. यशवंतराव चव्हाण यांच्यापर्यंत अनेक लोकाग्रणींना श्रीसमर्थांबद्दल काय वाटते हे त्यांच्याच शब्दात जाणून घेण्याची सोय या पुस्तकात आहे. मराठी वाङ्मयामध्ये अमोल भर घालणारे श्री. म. माटे, आचार्य अत्रे, रणजित देसाई यांच्यासारखे लेखक हरिजनसेवक पद्मश्री काकासाहेब कारखानीस, वारकरी संप्रदायाचे अध्वर्यू प. वा. मामासाहेब दांडेकर वेदमहर्षि पंडितजी सातवळेकर यांच्यासारख्या विविध क्षेत्रांतील ख्यातनाम व्यक्तींना श्रीसमर्थांबद्दल काय वाटते याची उत्सुकता प्रत्येक वाचकाला वाटेल. साक्षेपी संतवाङ्मय लेखक कै. पांगारकर तर चिकित्सक तत्त्ववेत्ते तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, प्रा. शिवाजीराव भोसले, तसेच इतिहाससंशोधक प्रा. न. र. फाटक, डॉ. कमलाताई गोखले, प्रा. वि. रा. करंदीकर यांच्या नजरेतून श्रीसमर्थांचे दर्शन आपणांस या पुस्तकामध्ये घडू शकेल. "बहुतांच्या नजरेतून समर्थ" ही एक लेखमालाच मी 'सज्जनगड' मासिकामध्ये लिहिली. अर्थात मूळ लेखकांचे उतारेच उद्धृत केले असल्यामुळे लेखनाचे सारे श्रेय वरील विचारवंताचेच आहे. त्या सर्वांचा मी ऋणी आहे.

पुस्तकाचा आणखी एक भाग म्हणजे श्रीसमर्थांनी जी घराणी अनुग्रहीत केली त्यांपैकी, भोसले, आमात्य, आणि चिटणीस या घराण्यांतील थोर पुरुषांनी समर्थांच्या उपदेशाला पोषक अशी देशसेवा कशी केली त्याचे चित्रण याच पुस्तकात आपणांस आढळेल. या तीन घराण्यांचे उपकार मराठी माणसाला कधीही विसरता येणार नाहीत. त्यांचे पुण्यस्मरण करणे हाच ऋणमुक्तीचा मार्ग आहे.

त्याखेरीज पुस्तकाचा अखेरचा भाग म्हणजे श्रीसमर्थांनी, मानवी जीवन यशस्वी होण्यासाठी जी वाङ्मय–रचना केली तिच्यातील 'प्रेरक' भाग दर्शविणारे काही लेख एकत्र केले आहेत. त्यातच 'श्रीसमर्थांच्या सानिध्याचा स्वानुभव' कथन केला आहे.

"प्रपंची जो सावधान । तोचि परमार्थ करील जाण ।
प्रपंची जो अप्रमाण । तो परमार्थी खोटा ।। "

हा एक नावीन्यपूर्ण सिद्धान्त समर्थांनी अत्यंत प्रभाविपणे सांगितला आहे. प्रत्येकाने आपल्या उपजीविकेचा व्यवसाय करताना खबरदारी बाळगिली पाहिजे. सध्या "Professional growth" किंवा व्यावसायिक वाढ करण्याचे कसोशीने प्रयत्न परदेशांमध्ये चालू आहेत. तशाच प्रकारचा उपदेश श्रीसमर्थांनी त्याकाळी केला; अशाप्रकारच्या त्यांच्या शिकवणी एका सूत्रात गुंफलेला एक लेखही या पुस्तकात समाविष्ट करण्यात आला आहे.

देवालयामध्ये संथपणे जळत राहून मूर्तीचे दर्शन भक्तांना घडविण्याचे कार्य नंदादीप करीत असतो. त्याचे हे कार्यही श्रेष्ठ आहे पण अशाप्रकारचे कार्य श्रीसमर्थांवर नियतीने सोपविले नव्हते. नंदादीपापेक्षा वेगळ्या स्वरूपाचे म्हणजे दीपस्तंभाचे कार्य करण्यासाठी त्यांचा अवतार झाला असे मला वाटते. मी गेली पंधरा वर्षे तरी समर्थांच्या वाङ्मयाचा अभ्यास करण्याचा व त्यांचे विचारधन समजून घेण्याचा यत्न करीत आहे व त्यावरूनच मला पुस्तकाचे नाव 'श्रीसमर्थ रामदास, नंदादीप नव्हे, एक दीपस्तंभ" असे ठेवल्यास ते अधिक अर्थपूर्ण होईलसे वाटले. वाचकांनासुद्धा तेच नाव रास्त आहे असे वाटले, तर या पुस्तकाला काहीसे यश मिळाले असे होईल आणि अर्थातच त्या दीपस्तंभाच्या प्रकाशाच्या अनुरोधाने प्रवास सुरू करावा अशी प्रेरणा त्यांना झाली तर माझे मन समाधानाने तृप्त होईल. वाचकांनी या पुस्तकावद्दल आपली प्रतिक्रिया कळविण्याचे कष्ट घेतले तर त्यांचा मी ऋणी होईन.

卐

# आभार प्रदर्शन

या पुस्तकाचे प्रकाशन करण्याबद्दल 'पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन' संस्थेला मी विचारणा केली. त्यानी माझी विज्ञानासंबंधीची अनेक पुस्तके प्रकाशित करताना जो उत्साह दाखविला त्याच उत्साहाने हे पुस्तकही स्वीकारण्यास तात्काळ होकार दर्शविला. त्या क्षणापासूनच ते पुस्तक हातावेगळे होईपर्यंत ज्या ज्या व्यक्तींचा संबंध या पुस्तकाच्या कामाशी आला त्यांनी अत्यंत आपुलकीने काम पार पाडले. श्रीसमर्थाच्या संबंधातले हे काम म्हणजे आपलेच काम ही भावना त्यामागे असल्याचे दिसून आले! प्रकाशन विभागाचे व्यवस्थापक श्री **प. भ. कुलकर्णी** यांचे प्रथम आभार. तसेच त्यांचे सहाय्यक **श्री रा. ल. शेटे, कल्पना** मुद्रणालयाचे व्यवस्थापक श्री. **सी. एस. लाटकर आणि त्यांचे कर्मचारी,** मुखपृष्ठाचे चित्रकार श्री. **चंद्रशेखर** जोशी यांनाही धन्यवाद देणे आवश्यक आहे.

महाराष्ट्रातील ख्यातनाम शिक्षणतज्ज्ञ आणि विचारवंत **डॉ. ग. श्री. खैर** यांना प्रस्तावना लिहून देण्याबद्दल मी विनंती केली. 'बहुतांच्या नजरेतून श्रीसमर्थ' या मजकुरावर केवळ नजर फिरविताच 'पुस्तक मंजुर आहे!' असे उद्गार काढून माझी विनंती मान्य करून अल्पावधीत आपला मजकूर उपलब्ध करून दिला. हार्दिक आभार. समर्थ सेवामंडळाचे अध्यक्ष श्री **आण्णाबुवा कालगावकर** यांनी पुस्तकाला प्रेमपूर्ण आशीर्वाद पाठविले त्यांचा मी ऋणी आहे.

नजरचुकीचे पुस्तकात काही मुद्रणदोष राहिले असल्यास वाचकांनी त्याबद्दल क्षमा करावी आपले अभिप्राय आणि सूचना मला अवश्य कळविल्यास मी अत्यंत आभारी होईन. ही वाङ्मयसेवा गोड करून घ्यावी.

'रघुनंदन'
पटवर्धन बाग, एरंडवणे
पुणे ४११००४.

— द्वा. वा. केळकर

BVBK-0401475